
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
क्र. नं. २८

…माला, पुष्प १० वें.

…वकेसरी

# दे. भ. लालालजपतराय



REFBK-0003859

लेखक–
उमाकांत केशव आपटे.

किं. १ रुपया.

अभिनव ग्रंथमाला पुष्प १० वें.

पंजाबकेसरी

# दे. भ. लालालजपतराय

## ( चरित्र )

—:o:—


लेखक—

उमाकांत केशव आपटे, नागपूर.


—:o:—

प्रस्तावना लेखक—

दे. भ. [illegible]र, मुंबई.


REFBK-0003859



श्रीधर नारायण हुद्दार, बी. ए. ( टिळक. )


---


( सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन )


---


आवृत्ती पहिली
प्रत १५००

किंमत १ रुपया.

अधिक चैत्र
१८५१
मे १९२९.

प्रकाशक—
श्रीधर नारायण हुद्दार,
संपादक, अभिनव ग्रंथमाला,
नागपूर शहर.

× × ×

## अभिनव-मुद्रणालय.

या मुद्रणालयांत सर्व प्रकारचें छपाईचें काम अल्प-काळांत व अल्पमोलांत शुद्ध सुबक छापून दिलें जातें. मुद्रणालयांत छपाईचें काम देणें म्हणजे पर्यायानें ग्रंथमालेच्या साहित्यसेवेच्या कार्यास साहाय्य करणेंच होय. करितां दुसरीकडे काम पाठविण्यापूर्वी या मुद्रणालयाशीं पत्रव्यवहार करा किंवा समक्ष भेटा.

अभिनव कार्यालय, नागपूर शहर.

× × ×

मुद्रक—
श्रीधर नारायण हुद्दार,
चालक, अभिनव मुद्रणालय,
नागपूर शहर.

# मालेसंबन्धीं दोन शब्द.

———:o:———

चालूं वर्षांतील चवथे पण मालेचे दहावे पुष्प दे. भ. लाला लजपतराय चरित्र आज प्रसिद्ध होत असून ग्राहकांकडे लवकरच रवाना होईल. संकल्पाप्रमाणे चार पुष्पे प्रसिद्ध करून ग्रंथमाला या वर्षाच्या वर्गणीपुरती ग्राहकांच्या ऋणांतून मुक्त होत आहे. मागील पुष्पांतील निवेदनांत सांगितल्याप्रमाणे प्रस्तुत पुस्तकाची छपाई मालेच्या अभिनव मुद्रणालयांत करण्यांत आलीं असून बांधणीचे बाबतींतहि थोडीफार सुधारणा करण्यांत आली आहे.

ग्रंथमालेने आपला व्याप वाढविला खरा पण हा व्याप वाढविण्याचे कामीं बऱ्याच सद्गृहस्थांचे सहाय्याची व प्रोत्साहनाची मदत तिला झाली आहे. मुद्रणालयाची कल्पना मूर्त स्वरुपांत आणण्यास चालना जर कोणी दिली असेल तर ती वडिल बंधु रा. **बाळासाहेब** उर्फ **गोपाळ मुकुंद हुद्दार** यांनीं होय. यानीं दिलेल्या १५० रु. च्या भांडवलावर प्रथम मुद्रणालयाचें सामान खरेदी करण्यास सुरुवात झाली. यानंतर **श्री. भास्करराव नावलेकर** वकील पांढरकवडा यांनीं स्नेहभावानें व मालेवरील प्रेमामुळे ३०० रु. चे 'लोन' मुद्रणालयाकरितां दिले. ज्येष्ठ बंधु ती. स्व. **बाळासाहेब** उर्फ **जयदेव नारायण हुद्दार** यांनींहि सुमारे ४५० रु. पर्यंत साहाय्य केले. या सर्व मदतीमुळे सुमारे १००० रु. चे मुद्रणालयाचे सामान विकत घेतले गेले असून आणखी १००० रु. खर्चून अत्यंत आवश्यक अशी मशिनरी खरेदी करावयाची आहे. आश्रायदाते व डिबेंचर होल्डर्सकडून झालेल्या मदतीमुळे मालेचीं चालु कामें सुरळितपणे होऊं शकली. या सर्व खटाटोपांत पुर्वींचे कांहीं कर्ज निवारण्यांत आले असले तरी अद्याप जुने नवे मिळून बरीच कर्ज

फंड मालेस करावयाची आहे. लहानसे कां होईना पण स्वयंपूर्ण असे मुद्रणालय झाल्यावर या सर्व कर्जांतून हळूहळ ग्रंथमाला मुक्त होईल अशी उमेद वाटते.

मुद्रणालयासंबंधीं इतके लिहिल्यावर ग्रंथ मालेसंबंधीं दोन शब्द लिहिणें भाग आहे. याच वर्षांत कै. राजवाडेचरित्र, शासन संस्था भाग १ व दे. भ. लालालजपतराय चरित्र ही स्वतंत्र पुस्तकें प्रसिद्ध केली आहेत. केवळ अनुवादित पुस्तकेंच प्रसिद्ध करण्याचें कार्य मालेकडून होत नाहीं हें यावरून स्पष्ट झाले आहे. मालेतर्फे एक **बालविभाग** सुरू करावा अशी कांहीं डेप्युटी. इन्स्पेक्टरांकडून सूचना करण्यांत आली आहे. कांहीं जिल्हा कौंसिलांनीं यासाठीं मालेस साहाय्य केल्यास माला प्रस्तुत कार्यहि खुषीनें करण्याचे पत्करील.

आतां प्रस्तुत पुस्तकाविषयीं लिहावयाचे. प्रस्तुत पुष्प येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उत्साही सदस्य **रा. रा. उ. ग. आपटे** यांनीं लिहिलें आहे. प्रस्तुत पुष्पाकरितां त्यांनीं किती परिश्रम घेतले हें पुस्तकांतील विविध माहिती व मराठी भाषेची सजावट याचा प्रत्यक्ष परिचय झाल्यावर वाचकाना समजून येईलच. प्रस्तुत पुस्तकास दे. भ. **बाबाराव सावरकर** यांनीं प्रस्तावना लिहून देऊन मालेवर मोठाच अनुग्रह केला आहे. श्री. आपटे व दे. भ. सावरकर या उभयतांचीहि याबद्दल ग्रंथमाला फार आभारी आहे. मुख पृष्टाकरितां **श्री. दादासाहेब ओगले** सं. महाराष्ट्र यांनीं लजपतरायांचा ब्लॉक दिला याबद्दल त्यांचीहि ग्रंथमाला ऋणी आहे.

अभिनव कार्यालय,
नागपूर शहर
ता. ८-५-२९.

सर्वांचा नम्र,
श्रीधर नारायण हुद्दार.

# ग्रंथमालेचे सन्मान्य आश्रयदाते.

——:o——

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. जयदेव नारायण हुद्दार | काटोल |
| २ | सौ. मनोरमाबाई हुद्दार | ,, |
| ३ | श्री. रामचंद्र विठ्ठल इंदापवार, वकील | बालाघाट |
| ४ | सौ. ताराबाई इंदापवार | ,, |
| ५ | श्री. वामन नरसिंह घोरपडे | तळेगांव (हिंगणघाट) |
| ६ | डॉ. ना. भा. खरे, बी. ए., एम्. डी. | नागपूर |
| ७ | श्री. मनोहर कृष्ण गोळवलकर, वकील, | जबलपूर |
| ८ | ,, बा. वि. अडबे, बी. ए. एल्. टी. | चांदा |
| ९ | ,, रघुनाथ मुकुंद हुद्दार, सब-रजिस्ट्रार | खांडवा |
| १० | श्रीमंत जमखिंडीकर संस्थानिक | जमखिंडी |
| ११ | ,, पंतसचिवसाहेब संस्थान | भोर |
| १२ | प्रो. ना. के. बेहरे, एम्. ए., बी. एस्सी., एल्. टी. | नागपूर |
| १३ | श्री. ज. मा. कायंदे बी. ए. | नागपूर |
| १४ | ,, कृ. म. धर्माधिकारी, वकील | बैतूल |
| १५ | रा. ब. नारायणराव केळकर, एम्. एल्. सी. | बालाघाट |
| १६ | श्री. श्रीपाद वामन चिंचाळकर, एम्. एस्सी. | नागपूर |
| १७ | सौ. इंदिराबाई नावलेकर | पांढरकवडा |
| १८ | श्रीमंत आप्पासाहेब हळदे | मोहपा |
| १९ | श्री. वासुदेव कृष्ण देव | नागपूर |
| २० | ,, वि. ना. बल्लाळ, एम्. ए. | नागपूर |
| २१ | ,, अनंत गोविंद परांजपे, डे. एज्यु. इन्सपेक्टर | सांगली |

# डिबेंचर होल्डर्सचीं नावें.

——:o:——

| नांव | डि. ची संख्या | निवासस्थल. |
|---|---|---|
| श्री. यशवंत यारायण बल्लाळ, बी. ए. | १ | नागपूर |
| ,, रा. वि. इंदापवार, वकील | १ | बालाघाट |
| ,, रघुनाथ मुकुंद हुद्दार | २ | खांडवा |
| ,, ग. वि. पटवर्धन, बी. ए. (टिळक) | १ | रत्नागिरी |
| ,, वि. गं. लेले | २ | पुणें |
| ,, उ. के. आपटे | २ | नागपूर |

श्री. भा. ल. नावलेकर, बी. ए., एल्. एल्. बी., पांढरकवडा यांनीं मुद्रणालयासाठीं ३०० रु. ची रकम 'लोन' म्हणून दिली असून श्री. बाळासाहेब उर्फ गो. मु. हुद्दार बी. ए. नागपूर यांनीं १५० रु. ची व ज्येष्ठ बंधु श्री. जयदेव नारायण हुद्दार यांनीं सुमारें ४५० रु. मदत केली आहे. श्री. गो. रा. देव वकील, नागपूर यांनीं डिबेंचर घेण्याचें अभिवचन दिलें आहे.

# लेखकाचे दोन शब्द.

---:o:---

महाराष्ट्र वाङ्मयाची अल्पस्वल्प सेवा आपले हातून व्हावी ही इच्छा फार दिवसांची-जवळजवळ बाळपणापासूनची म्हटली तरी चालेल. परंतु परिस्थिति प्रतिकूल, आत्मविश्वासाचा अभाव व या इच्छेला चार शब्दांना उत्तेजन देऊन कृतींत परिणत करील असा जिव्हाळ्याचा माणुस जवळ कोणी नाहीं. यास्तव प्रगती फारशी होईना, आपल्या हातून कधीं काळीं काहीं सेवा महाराष्ट्र-शारदेची होईल ही आशाही बहुतेक नष्ट होण्याच्या पंथास लागली. अशा स्थितींत दैवगतीनें एकाएकीं पलटी खाल्ली व नागपुरास आगमन होऊन श्री. माधवराव पाध्ये यांचे येथें उद्यम कार्यालयांत नोकरी करण्याचा प्रसंग आला. लेखनाला अनुकूल परिस्थिती बरीच उत्पन्न झाली व मनाच्या स्वभाविक कलानुसार महापुरुषांचीं चरित्रें लिहाव-याचीं असें ठरवून तो उद्योग चालविला. याप्रमाणें दोन तीन लहान लहान चरित्रें अभ्यासादाखल लिहिल्यावर १९२८ च्या मध्याचे सुमा-रास म्हणजे बरोबर वर्षापूर्वी पंजाबकेसरी लाला लजपतराय यांचें चरित्र लिहावयासाठीं म्हणून हातीं घेतलें. कारण या थोर महात्म्यासंबंधीं महाराष्ट्रांत आदर पुष्कळ असला तरी त्यांचें त्रोटकसुद्धां चरित्र मराठींत तोंवर नव्हतें. चरित्र लिहावयास घेतलें खरें पण मनाजोगें व्यवस्थित चरित्र लिहावयास माहिती मिळेना. त्यांचे ग्रंथ बहुतेक वाचले. ग्रंथांत कांहीं चरित्र थोडेंच सांपडतें ? तेव्हां या कामासाठीं त्या प्रांतीं एकवार चक्कर मारावा लागेल असें ठरवून कांहीं दिवस काम बंदच ठेवलें. पण पुढें एकाएकीं नोव्हेंबर १७ ला या पंजाब

केसरीचा अंत झाला ! तेव्हां वाटलें, हातीं घेतलेलें काम आतां पुरें करावेंच-फार तर ते मनाजोगें सुंदर व माहितीपूर्ण नाहीं होणार ! माहिती यावेळीं वर्तमानपत्रांतून बरीच येऊं लागली तिचा संग्रह केल्यावर, मोठें नाहीं तरी लहान त्रोटकसें चरित्र लिहावयास ती पुरेशी आहे असें दिसून आलें व त्याप्रमाणें हें चरित्र डिसेंबर जानेवारींत लिहून पूर्ण केलें. वर्तमानपत्रांतील माहितीपेक्षां जास्त माहिती पंडित देवव्रत शर्मा यांच्या 'लालाजीके लेख और व्यख्यान' व 'पंजाबकेसरी लजपतराय' या पुस्तकावरून तसेंच मद्रासच्या नटेसन कंपनीच्या पुस्तकावरून घेतली आहे.

लालाजींचे ग्रंथ बहुतेक वाचल्याविषयीं वर सांगितलेंच आहे. या ग्रंथांतही चरित्रोपयोगी माहिती बरीच मिळते. विशेषतः लालाजी.चा प्रत्येक ग्रंथ हा त्यांनीं २५-२५ वर्षे काम केलल्या क्षेत्रांतील विषयावर असल्यामुळें त्यांच्या त्या त्या ग्रंथांत लेखकाचें चरित्र अंशतः प्रतिबिंबित झालेलें दिसतें. यामुळें या ग्रंथांचा उपयोग चरित्र लेखनास फार झालेला आहे.

चरित्र लिहितांना एकच पद्धति अंगीकारलेली आहे. ती म्हणजे वस्तुस्थिति निदर्शनाची. लालाजी जसे दिसले त्यांच्या ग्रंथांतून, त्यांच्या व्याख्यानांतून, वर्तमानपत्रांतून, जसे दिसले तसेच त्यांना दाखविण्याचा प्रयत्न या लहानशा पुस्तकांत केलेला आहे. त्यांच्या कृतीचें रहस्य सांगतांना, त्यांची मतें वर्णितांना, त्यांची कामगिरी सांगतांना सर्वत्र जें जें सत्य म्हणून वाटलें, त्यांच्या ग्रंथादीमध्यें ज्याला आधार मिळाला, तेवढ्याचाच काय तो उपयोग केला आहे.

पुस्तक लिहून झाल्यानंतर प्रकाशनाचा प्रश्न पुढें आला. पण त्यासाठीं मुळींच खोळंबावें लागलें नाहीं. आमचे स्नेही श्री. बाळासाहेब हुद्दार यांचे मध्यस्तीनें या प्रांतातील एकमेव वाङ्मयिक प्रयत्न

मोठ्या धडाडीनें व सुयोग्यतेनें चालविणारे अभिनव ग्रंथमालेचे संचालक श्री. श्रीधर नारायण हुद्दार यांचा परिचय होऊन त्यांनीं तत्काळ पुस्तक आपले मालेंतून प्रकाशित करण्याचें पतकरलें.

आतां आभार मानावयाचे. उभयतां हुद्दारांचे उपकार आम्हांवर फार मोठे आहेत त्यांचे आभार कोणत्या शब्दीं मानावेत हेंच आम्हांस कळत नाहीं. त्यांचें साह्य न मिळतें तर पुस्तक कदाचित पेटींतच पडून राहून कृमीकीटकांच्या क्षुधाशमनार्थ कामीं येतें! पण तसें न होतां आज जनतेच्या हातांत पुस्तक आहे या श्रेयाचें भागी सर्वांशीं तेच आहेत.

दुसरे आभार मानावयाचे म्हणजे प्रस्तावना लेखकांचे. हें काम तर वरच्याहून किती तरी बिकट आहे. ज्याच्यापासून क्विा शिकून शिकून थोडी बहुत जाणीव अंगीं आली किंवा ज्याच्या अन्नावर पिंड पोसतां पोसतां तो कांहींसा सुदृढ व बलिष्ठ झाला त्या आपल्या पूजनीय तीर्थरुपांचे लेकरानें काय आभार मानावे ? या पुस्तकाचे प्रस्तावनाकार पूजनीय बाबासाहेब सावरकर यांच्याविषयीं असेंच आहे. नुसता शब्द टाकतांच त्यांनीं प्रस्तावना लिहिण्याचें मान्य केलें. व शेंकडो कामांची घाई मागें असतांना तशांतच वेळ काढून सर्व हस्तलिखित प्रत वाचली, अवश्य तेथें सूचना केल्या, शेवटीं सुंदरशीं स्फूर्तीदायक प्रस्तावना लिहून दिली! तरी यासाठीं त्यांचें आभार मानणें उचित दिसत नाहीं. त्यांचें चरणीं आमचीं शतशः नमनें सादर असोत.

शेवटीं ज्या मंगलमय प्रभूच्या कृपेनें हें कार्य झालें त्यांचें एकवार भक्तिपूर्वक स्मरण करून विराम पावतों.

वर्षप्रतिपदा
१८५१

उमाकांत केशव आपटे.

# अनुक्रमणिका.


| | पृष्ठें |
|---|---|
| प्रस्तावना | १-६ |
| प्रवेश | १-६ |
| जन्मकालीन परिस्थिति | ७-१२ |
| जन्म आणि विद्यार्थी दशा | १३-१९ |
| दयानंद कॉलेजची स्थापना | २०-२५ |
| समाजकारण व राजकारण | २६-३४ |
| वंगभंग आणि हद्दपारी | ३५-४३ |
| राष्ट्रीय सभेंतील दुफळी आणि नंतर | ४४-५१ |
| दुसरी हद्दपारी व अमेरिकेंतील कार्य | ५२-६१ |
| असहकारितेचे अध्वर्यू | ६२-६६ |
| हिंदुसंघटनाचें कार्य | ६७-७९ |
| शेवटचे दिवस आणि मृत्यु | ८०-८७ |
| लोकसेवक समीति | ८८-९० |
| लालाजींचें लेखन आणि वक्तृत्व | ९१-९६ |
| लालाजी आणि लोकमान्य | ९७-१०३ |
| लालाजींची कामगिरी | १०४-१२४ |
| लालाजींचें गुणसंकीर्तन | १२५-१३८ |

# प्रस्तावना

या मृत्यु लोकांत अत्यंत क्षुद्र किडामुंगीपासून तों बुद्धिसामर्थ्यानें युक्त अशा विशिष्ट मनुष्य प्राण्यापर्यंत अनंत संख्याक प्राणीवर्ग नांदत आहे. जन्मावें, आहार निद्रा भय मैथुनाच्या कक्षेंत फिरत आयुष्य घालवावें व शेवटीं कसें तरी व केव्हां तरी मरून जावें; हा अव्याहत क्रम सर्व प्राण्यांचा सारखाच चाललेला असतो. व असाच क्रम जोपर्यंत मनुष्य प्राणी चालवीत आहे तोंपर्यंत बुद्धिसामर्थ्य असलें तरी किड्याच्या योग्यतेहून त्याला अधिक योग्यता द्यावयाला कांहींच कारण उरत नाहीं. उलट जन्मदत्त बुद्धीचा उपयोग न करतां तो जाणून बुजून कुजक्या आयुष्यांतच डुंबत राहतो ह्मणून किड्यापेक्षाहि एकप्रकारें हीन ठरतो, ठरविला पाहिजे. कारण किड्याला बुद्धीच नसते व ह्मणून अपरिहार्यतेनें त्याला हीन आयुष्य कंठण्यावांचून गत्यंतरच उरत नाहीं. परंतु मनुष्य प्राण्याला जगामध्यें मनांत आणील तें तें कमी अधीक मानानें घडवून आणण्याची शक्ति देणारें बुद्धिसामर्थ्य मिळालेलें असतें. व असें असूनहि त्याचा उपयोग तो उन्नत स्थितीप्रत जाण्यासाठीं करीत नाहीं, त्या बुद्धिसामर्थ्याच्या साह्यानें श्रेष्ठतेच्या–योग्यतेच्या–चढत्या जिन्यावरून चढूं इच्छित नाहीं. यासाठीं तो मनुष्यप्राणी हीनच नव्हे तर अपराधी ठरण्याला पात्र होतो.

आणि जगांत प्रत्येक देशांत अशाच मनुष्य प्राण्यांचा भरणा फार असतो तरी पण बुद्धि हें एक अद्वितीय सामर्थ्य आहे. बहुतेक मनुष्यप्राणी त्या सामर्थ्याला व्यक्त होवूं देत नसले तरी सर्व देशांत न्युनाधिक मानानें हें बुद्धिसामर्थ्य प्रगट होत असतेंच व या बुद्धिसामर्थ्ययुक्त विशेष पुरुषांच्याच ज्ञानवत्तेनें त्या त्या देशांतील समाज हे न्युनाधिक प्रमाणांत उन्नत झालेले असतात. कोणत्याही देशाचा इतिहास घ्या. इतिहास ह्मटला ह्मणजे तो त्या देशांतील असामान्य पुरुषांच्या चरित्रांनींच भरलेला असतो. कोणत्याही देशांतील एका विशेष पुरुषाच्या इतिहासाला चरित्र ह्मणतात व देशांतील तशा समग्र पुरुषांच्या भूतकालीन समवायी चरित्रलेखनाला इतिहास ह्मणतात. चरित्र ह्मणजे एकाच असामान्य पुरुषाचा इतिहास व इतिहास ह्मणजे देशांतील सर्व

असामान्य पुरुषांच्या चरित्रांचा गुंफलेला गुच्छ अशाच त्यांच्या यथार्थ व्याख्या करतां येतील.

ज्या देशांत राजकारण, जातिकारण, धर्मकारण आदिक क्षेत्रांत चमकते पुरुष अधिक निर्माण होतात तो देश श्रेष्ठ ठरतो—श्रेष्ठतेच्या पदाचा उपभोग घेतो. ज्या देशांत तसे पुरुष कमी कमी उत्पन्न होत जातात तो देश हळूं हळूं अवनतीला जातो. व या पुरुषांच्या अभावानें युक्त असलेला देश किड्यांच्या बुजबुजाटांचा एक कूप ठरतो किंबहुना लौकर वा उशीरा नष्ट होतो.

जगांत प्रत्येक वस्तुप्रमाणें देशालाहि उदयास्त लागलेले असतात. ज्या देशांत सर्व क्षेत्रांत विशेष पुरुष चमकूं लागतात तो देश सर्वतोपरी श्रेष्ठतेच्या पदाचा अधिकारी होतो आणि ज्या देशांत सर्व क्षेत्रांतील कर्त्यापुरुषांची संख्या इतर देशांहून अधिक ठरते तो देश सर्व जगांत मूर्धस्थानीं विराजमान होण्यास समर्थ होतो. ज्या ज्या क्षेत्रांत अशा पुरुषांची उणीव पडेल त्या त्या क्षेत्राच्या कक्षेचे दृष्टीनें ती उणीव असलेला देश हीन ठरतो. राजकीय क्षेत्रांत जो देश असले असामान्य पुरुष उत्पन्न करूं शकत नाहीं तो देश इतर क्षेत्रांत कितीही श्रेष्ट पुरुष निर्माण करणारा असला तरी त्या देशाच्या कपाळीं पारतंत्र्याच्या खाईत लोटलें जाण्याची आपत्ति आल्यावांचून राहत नाहीं. कधीं कधीं इतर कांहीं अपरिहार्य अशा आगांतुक कारणानें पारतंत्र्याच्या वणव्यांत एखादा देश सांपडला तरी जोंपर्यंत त्या देशांत वा जातींत राजकारण क्षेत्रांत चमकते वीर उत्पन्न होत आहेत व असतील तोंपर्यंत त्या देशाला वा जातीला, ‘पारतंत्र्यांतून आम्ही कसें बाहेर पडूं!’ अशी शंका घेण्याचें कांहींच कारण नाहीं.

आपल्या हिंदुस्थानाला सन १००० चें सुमारास पारतंत्र्याच्या राहूनें स्पर्श केला व हिंदुजाति त्या आपत्तीशीं झगडत असतांहि हिंदुस्थानाला खग्रास ग्रहण मुक्त होण्याची वेळ आली होती. हा जीवनमरणाचा जातीय झगडा हिंदुजातीनें शतकोंशतकीं चालविला होता, आणि तो कोणाचे बळावर? तर पृथ्विराज, बाप्पारावळ, संग्रामसिंह, महाराणाप्रताप, राजसिंह शिवाजी महाराज, छत्रसाल, संभाजी महाराज, पेशव्यांचे कुल, शिंद्यांचे पुरुष,

बापू गोखले आदिक असामान्य वीरांच्या मालिकांनीं तो झगडा चालवून हिंदुस्थानला ग्रहण मुक्त करीत स्वातंत्र्यपदाचा अधिकारी केला. या दीर्घ कालनि संग्रामांतून भारत मुक्त झाला नाहीं तोंच राजकारण क्षेत्रांत शौर्यापेक्षां कुटिलतेचा आश्रय करणारी व उघड्या डावापेक्षां पाताळयंत्री डावांचाच उपयोग करणारी युरोपिय जाति–इंग्लिश जाति–हिंदुस्थानच्या राजकारण क्षेत्रांत अग्रेसर होवूं लागली व पाताळयंत्री कपटपटुतेच्या व्यवहारांत जवळजवळ अनभिज्ञ असलेल्या भारतवर्षीय जातीवर मात करून भारत वर्षावर राजकीय वर्चस्व स्थापन करण्यांत यशस्वी झाली.

१८१८ हें वर्ष भारत वर्षाला पुन्हां पारतंत्र्याचें जोखड घालणारें ठरलें. १८५७ पर्यंत अन्यायपूर्ण कपटपटुतेनें इंग्लिशांनीं संपूर्ण हिंदुस्थान गिळंकृत केला. परंतु हा एवढा मोठा घास सहजगत्या पचणारा नव्हता. हिंदुस्थान पुरुषश्रेष्ठांना जन्म देण्याच्या दृष्टीनें केव्हांहि असमर्थ ठरला नाहीं. १८५७ त स्वातंत्र्यभक्त नानासाहेब, रण पंडिता महाराणी लक्ष्मीबाई, संघटना-कुशल सेनापती तात्या टोपे आदिक वीरवरांनीं इंग्लिश जातीवर मात करण्याची वेळ आणली होती. परंतु भेदनीतींत कुशलतर असलेल्या इंग्लिशांनीं भारतीयांतलिच शिख गुरखा यांचे शौर्य–साह्यानें व बंगाली गुप्त चरांच्या वार्ताहारी बुद्धिसामर्थ्याच्या बलावर हिंदुस्थानावर पुन्हां विजय मिळविला व १८५७ मध्यें झालेला स्वातंत्र्य–प्रयत्न विफल झाला!

इंग्लिशांचें राज्य हिंदुस्थानावर स्थिर झालें तरी भारतवर्षीय जातीनें तें पारतंत्र्याचें जोखड केव्हांहि मान्य केलें नाहीं, स्विकारलें नाहीं. पारतंत्र्यांतून सुटण्याकरितां भारतीयांचा अव्याहत प्रयत्न चाललेला आहे. कधीं शस्त्रबलानें, तर कधीं निःशस्त्र मार्गानें, कधीं वैध तर कधीं अवैध उपायांनीं परंतु अविश्रांतरीत्या भारतवर्ष स्वातंत्र्यार्थ प्रयत्न अद्यापहि करीत आलेला आहे.

ही अभिमानोक्ति भारतीयांना कोणाचे बलावर काढतां येत आहे? स्वातंत्र्याच्या प्राप्तिसाठीं व पारतंत्र्याच्या नाशासाठीं अव्याहत प्रयत्न चालविणारे कोण? आहारनिद्रादिकांत चूर होवून केव्हां तरी जन्मणारे व कसें तरीं मरून जाणारे पशुवत आयुष्यधारी लोकहि जातीय दृष्टीनें ' आम्हीं

सतत स्वातंत्र्याचेच पूजक राहात आलों आहात, पारतंत्र्याखालीं आह्मीं आपली मान स्वेच्छेनें केव्हांहि नमविली नाहीं,' असे जे अभिमानपूर्वक ह्मणूं शकतात ते कोणाच्या कृपेनें? याचा विचार करितां या भारतवर्षात जीं कांहीं असामान्य योग्यतेच्या श्रेष्ठ पुरुषांची परंपरा निर्माण होत आली आहे त्यांच्याचकडे दृष्टि वळते. त्यांच्याच कृपेनें आमचा भारतवर्ष अद्यापि उज्वल कीर्तिसंपन्न आहे. आमचा धर्म, संस्कृति, जाति ही अद्यापि –जवळ जवळ हजार वर्षें महान संकटांच्या ज्वालांनीं तप्त होत असतांहि– अमरवत् ठाण मांडून उभीं आहेत याचें सर्व श्रेय त्या महान विभूतींच्या स्पृहणीय आयुष्यक्रमाला व त्यांच्या महनीय कृत्यांना आहे. आणि आह्माला आमचा परमश्रेष्ठ धर्म महान जाति व महनीय संस्कृति अशीच अक्षुण्णपणें उज्वल व तेजः संपन्न रहावींत अशी इच्छा असेल तर आदर्श पुरुषांची परंपरा आमच्यांत निर्माण होत राहील असाच मार्ग आह्मीं चोखाळला पाहिजे.

प्रत्येक मनुष्यांत श्रेष्ठतेला पोंचविण्याला समर्थ अशी बुद्धि शक्ति असते. जो मनुष्य त्या शक्तीचा योग्य उपयोग करण्याला प्रवृत्त होतो तो श्रेष्ठतेच्या श्रेणींत बसावयाला योग्य ठरतो. उपजत बुद्धीनेंच श्रेष्ठतेच्या मार्गाला लागणारें अपवादात्मक महापुरुष वगळले असतां सर्व श्रेष्ठ मार्गगामी पुरुषांना पूर्व पूर्व कालीन समर्थ पुरुषांच्या चरित्रांनींच स्फूर्ति मिळालेली असते. कैसरला नेपोलिअनच्या दिव्य चरित्रानें महत्वाकांक्षी बनविलें. लेनिनला कार्लमार्क्सच्या चरित्ररहस्यानें उद्दीपित केलें. श्री शिवरायांच्या आंगीं असलेल्या जाती–धर्म–रक्षणीं उपजत बुद्धीला रामायण महाभारतीय महापुरुष चरित्रांनीं प्रदीप्त केली. थोडक्यांत सांगावयाचें तर प्रत्येक असामान्य पुरुष स्वतःच्या आयुष्यात जाति–धर्म–संस्कृतिपैकीं एक अनेक वा सर्व क्षेत्रांत असामान्यतेनें चमकून जगाचें कल्याण करतो इतकेंच नव्हे तर आपल्या आयुष्याचे जिते जागतें उदाहरण पुढील पिढीपुढें ठेवून एक प्रकारें चिरस्थायी मार्गदर्शक होवून बसतो.

लोकोत्तर पुरुषांचीं चरित्रें ह्मणजे राष्ट्रांतील लोकसमाजाच्या प्रगति मार्गावरील मार्गदीप आहेत. यांच्या प्रकाशांत लोकसमाज उन्नतीचा मार्ग आक्रमण करण्यास समर्थ होतात. या लोकोत्तर पुरुषांचीं चरित्रें त्यांच्या रहस्यदर्शनासह तरुण पिढीपुढें ठेवली जाणें ह्मणजे तरुण पिढीच्या बुद्धीमध्यें

भावनाप्रधान प्रबलतेची ज्योति पटविणें होय. तारुण्यांतच भावी आयुष्याला निश्चित आकार मिळण्याचा संभव असतो. या वयांत ज्या भावनांची ज्योति हृदयांत प्रज्वलित होईल त्या उद्दीप्त भावना प्रौढपणांत कार्य रूपांत परिणत होवूं शकतात आणि ह्मणून आपला समाज ज्या ज्या कार्य क्षेत्रांत उच्च पदस्थ व्हावा असें वाटत असेल त्या त्या कार्यक्षेत्रांत लोकोत्तर पुरुषांच्या चरित्र दर्शनानें तरुण पिढींची मनें भारलीं जातील असा प्रयत्न व्हावयास पाहिजे. सर्व कार्यक्षेत्रांपेक्षां पारतंत्र्याच्या कालांत राजकारणक्षेत्रांतील महापुरुषांचीं सरहस्यचरित्रें तरुण पिढीपुढें ठेवलीं जाणें हें अत्यंत अवश्यक आहे.

गेल्या तीस चाळीस वर्षांतील भारतीय इतिहासकालांत **हुतात्मा लाला लजपतराय** याची योग्यता फार उच्च प्रतीची आहे. या कालांत जे कांहीं असामान्य कर्तृत्वशाली देशभक्त होवून गेले अथवा अद्यापि जीवमान आहेत त्यांत श्रीमान् लाला लजपतराय यांची प्रामुख्यानें गणना केली पाहिजे. त्यांची देशभक्ति व स्वातंत्र्यप्रेम ही त्यांच्या विविध कार्यक्षेत्रांतील विविध कामगिरींतून सुस्पष्टपणें प्रतिबिंबित झालेली दिसल्यावांचून राहणार नाहीं. आपला देश पारतंत्र्याच्या खाईंत भाजला जात आहे व त्याला या दुःस्थितींतून मुक्त करून स्वातंत्र्याच्या श्रेष्ठ व कल्याणकारी उच्च स्थानावर सुप्रतिष्ठित करावयाचा आहे याची सतत तीव्र जाणीव त्यांच्या मनाला जागृत ठेवीत असे व त्यांच्या आयुष्यक्रमांतील प्रत्येक प्रयत्न—प्रत्येक हालचाल—या एका महत्तम आकांक्षेच्या प्रेरणेनेंच घडत असे. भारताचें कल्याण साधनार्थ 'स्वतंत्र भारत' कसा निर्माण करतां येईल? या चिंतेनें प्रेरित होवून तदनुरोधी मार्गाचें अनुसरण करण्यांत ते तत्पर असत. भारत—भारतीय हिंदूजाति—धर्म व संस्कृति यांची सुरक्षिती व त्याकरितां स्वातंत्र्य संपादन हा काय तो त्यांच्या आयुष्यक्रमाचा एकमेव भ्रमण—केंद्र होता. व ह्मणून ते अर्वाचीन भारताचे एक आदर्श पुरुष ठरले.

देश, जाति, धर्म व संस्कृति यांचेसाठीं त्यांनीं चंदनासारखा देह झिजविला. याकरितां ते जीवंत राहिले. परंतु महनीय कार्यक्षेत्रावर कार्य करीत असतां 'रणेचाभिहते' मृत्यूचें भाग्य मात्र फारच थोड्या सुदैवी पुरुषांना लाभतें. तसें स्पृहणीय भाग्यरूप मरण देशभक्त लाला लजपतराय

यांना लाभलें आणि त्या महनीय हुतात्मतेच्या मरणानें ते महा पुरुषत्वाच्य' दिव्यकोटीला पोंचलें. ईश्वर करो व या देवप्रिय हिंदूजातीला—भारत वर्षाला—अशा महणीय मरणाला आनंदानें कवटाळणारे कर्मयोगी महापुरुष विपुल संख्येनें लाभोत.

या कर्मयोगी महापुरुषांच्या बल संख्येची भरती राष्ट्रांतल्या तरुण पिढीं-तून होणारी आहे. हुतात्मे लाला लजपतरायांचें विस्तृत चरित्र पुढें मागें कोणी देशभक्त चरित्रलेखक लिहून जनतेपुढें ठेवील तेव्हां ठेवील. परंतु देशभक्त लालाजींचें आटोपसर स्वरुपांत पण सरहस्य चरित्र आज तरुण पिढी-पुढें मांडण्याची आवश्यकता जाणून श्रीयुत आपटे यांनीं केलेला प्रयत्न ती उणीव निश्चयानें भरून काढील. या समयोचित चरित्र लेखनाप्रमाणेंच इतर उद्दीपक व उद्‌बोधक चरित्रें लिहून तरुण पिढीपुढें ते ठेवतील तर तरुण पिढीला आदर्श आयुष्यक्रमाचे मार्ग—दर्शन दिल्याचें श्रेय त्यांच्या पदरीं पडेल.

शेवटीं तरुण बंधुवर्गाला प्रेमाची विनंति आहे कीं, हुतात्मेतेचें मरण पत्करून देव कोटीला पोंचलेल्या देशभक्त लालाजींचें चरित्र व तत्सम दुसरीं महापुरुषांचीं चरित्रें वाचून व मनन करून भावनांना उत्स्फूर्त करणाऱ्या त्यांतील चरित्रक्रमांचा आदर्श आपल्यापुढें ठेवावा व त्या आदर्शावर आपली दृष्टि अचल व अटल ठेवून त्या आदर्श जीवनक्रमाप्रमाणें आपल्या आयुष्याला वळण द्यावें. त्यायोगें देश, जाति, धर्म व संस्कृति यांची सेवा केल्याचें पुण्य लागून आदर्श पुरुषांच्या वर्गांत समाविष्ट होण्याची योग्यता प्राप्त होईल.

**गणेश दामोदर सावरकर.**

—:—

पंजाबकेसरी

# दे. भ. लाला लजपतराय

यांचें चरित्र.

# प्रवेश.

ता. १७ नोव्हेंबर १९२८ हा दिवस या भारताला अत्यंत अनिष्ट असा उगवला! त्यादिवशीं भारत लक्ष्मीचा प्रिय पुत्र पंजाबकेसरी लाला लजपतराय आपल्या कर्तव्य क्षेत्रामध्यें उभा राहून समोरासमोर प्रतिपक्षांशीं झुंजत असतांना छातीवर घाव लागून धारातीर्थी पतन पावला. खरोखरच राष्ट्रासाठीं रात्रंदिवस तळमळणारा महापुरुष ज्या दिवशीं दिवंगत होतो त्या दिवसाइतका दुर्भाग्याचा दिवस दुसरा कोणचाही नसेल! आणि परतंत्र राष्ट्राला तर असा दिवस अधिकच दुर्भाग्याचा जातो, का कीं त्या देशभक्त महाभागाच्या प्रत्येक कृत्याकडे परक्यांच्या जुलमानें व्याकूळ झालेली त्याची मातृभूमी अत्यंत आशाळभूतपणानें पहात असते. आपल्या वीरकृत्यांनीं माझें पारतंत्र्य निवटून हा मला मुक्त करील आणि मला सुखाचा दिवस दाखवील असें ती प्रतिक्षणीं म्हणत असते आणि एक एक दिवस मोठ्या कष्टानें कंठीत असते. पण दुष्ट काळाला तें खपत नाहीं. एकाएकीं सोसा-ट्याचा वारा सुटावा, विद्युल्लता चमकावी आणि एखादा प्रचंड वृक्ष कडकडून मोडून भुईवर पडावा आणि पडतां पडतां त्याचे आधारावरच निर्भयपणें झोंपणाऱ्या द्विजकुलाचाही त्यांच्या घरट्यांसकट चक्काचूर होऊन जावा, किंवा एकादी प्रचंड नौका अथांग सागरांतून प्रवास करीत असतां जीर्ण व्हावी तिचीं यंत्रें अकार्यक्षम होऊन पडावीत, अन्नाचा सांठा संपत यावा आणि अशा वेळींच तिचा कुशल कर्णधार मरून जावा अशा प्रकारची कठोर लीला हा निर्घृणकाळ नेहमींच खेळत असतो. मग त्याला या अभागी भारताची दया कोठून येणार! आणि या पंजाबच्या सिंहाला आमच्यांतून एकाएकीं उचलून नेऊन या भारतीला शोकसागरांत बुडवून टाकण्याला तो मागेपुढें कसा पाहणार!

लाला लजपतराय यांच्या मरणाची वार्ता ऐकतांच प्रत्येक हिंदवासि-याच्या अंतःकरणावर वज्रासारखा आघात होऊन मग विकल मनानें तो वरील सारखे विचार करूं लागला तर त्यांत काय नवल आहे? हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या लढ्यामध्यें प्रस्तुतचा काल हा संक्रमण काल आहे. तो आशा-

दायक करणें किंवा निराशामग्न होणें सर्वस्वीं आपल्या कर्तृत्वावर अवलंबून आहे. एका बाजूला पाताळापर्यंत जाऊन भिडणारी खोल व भीषण दरी आणि दुसऱ्याबाजूला आकाशालाही भेदून जाणारी पर्वत शृंगांची मालिका अशा एका बिंदूवर आज आपण उभे आहोंत. थोडासा जरी तोल गेला तरी पाय घसरून त्या मृत्युमुखी दरींत आपल्याला पडावें लागणार आणि दुसऱ्या बाजूच्या त्या वैभव शिखरावर चढावयाचें म्हटलें तरी तो मार्ग अत्यंत दुर्गम असल्यामुळें त्याचें आक्रमण अत्यंत चिकाटीनें एकजूटीनें व धैर्यानें करावयास अशक्य वाटणार! अशी बिकट परिस्थिति असतांना या ऐनवेळींच लालाजी सारखा वयोवृद्ध, दमदार, अनुभविक धुरंधर योद्धा व एक प्रमुख नेता विपक्षाच्या आघातानें ही नश्वर काया सोडून परलोकाला जावा हा विचार, ही कल्पना किती निराशाजनक आहे!! चित्ताला मोह विमूढ करून टाकणारी आहे! पण जिच्या कल्पनेनेंही अंगावर कांटा यावा तीच गोष्ट प्रत्यक्ष घडवून काळानें हें दुःखाचें ताट आपल्या पुढें वाढून ठेविलें आहे. अशा वेळीं मनाचें समाधान करावयाला,

राष्ट्र पुरुष तो राष्ट्र संकटीं सोडुनियां जाई।
इतिहासाचा नियम असे हा पहा मागुती बाहीं ॥ १ ॥

ह्या कवीचे शब्द कितीतरी अपुरे पडतात कवीनं नियम पण नियम सांगितला आणि त्याला पुष्टी देणारीं चार दोन उदाहरणेंही देऊन तो तेव्हांच मोकळाहि झाला! पण दुःखभारानें आक्रांत झालेल्या हळुवार मनाला हा रुक्ष नियम-मग तो कितीही खरा असला तरी-कसा पटणार! या मनाचें समाधान करण्यासाठीं भगवान श्रीकृष्णांच्या संदेशाकडे-त्या श्रीमद्भगवद्गीतेंतील उदात्त धीरदायी उपदेशाकडेच-धांव घ्यावी लागते.

ती वीर कर्तव्योपदेशिका गीता वाचल्यानंतर मन कांहींसें शांत होऊन गेल्या दहा पंधरा वर्षांतील इतिहास मीं पाहूं लागला तेव्हां वर सांगितलला नियम किती अक्षरशः खरा आहे याची प्रचीती येऊन डोळ्या-पुढें एकामागून एक महापुरुषांचीं चित्रें उभीं राहूं लागलीं. भारतीच्या गळयांतील तेजःपुंज हिरे-भारत सेवक गोखले, मुंबईचे सिंह मेहता, पितामह दादाभाई नौरोजी-या काळानें तीन वर्षांतच हिरावून नेलें त्यावेळीं

ही हिंदमाता किती शोकाकुल झाली असेल! सारे भारतखंड त्या दुःखाच्या लाटेंत बुडून गेलें. पण मृत्युला त्याचें काय? त्याचें तोंडच मुळीं मृत्यु! दोन तीन वर्षे लोटत नाहींत, तोंच काळसर्पानें पुन्हां संधी साधली आणि त्या रक्ताळ हृदयाचा कडकडून चावा घेतला. या भारतीचें हृदय दुभंग झालें! भारतीचा सौभाग्यतिलक तिला सोडून गेला. लोकमान्यांना आह्मी आंचवलो!! यानंतर काळाला बळी पडलेले देशबंधू दास आणि बंगालचे अनभिषिक्त सम्राट सुरेंद्रनाथ बेनर्जी यांचीं चित्रें डोळ्यापुढें आलीं आणि पाहता पाहताच संन्यासी श्रद्धानंदांच्या हृदयांतून उडालेले रक्ताचें कारंजे मला दिसूं लागलें. हाय! काळानें संन्याशावरही हात टाकला. तोंच-नश्वरकायेचा त्याग करून पूर्ण चैतन्यानें विलसत असलेला तोच-संन्यासी काळाच्या छाताडावर पाय देऊन या हिंदूजातीचा भगवा झेंडा हिमालयाइतका उंच फडकवींत पुन्हां आत्मयज्ञाच्या तेजांत स्थिरचा स्थिरच! या अमोघ दृश्यानें जणूं काळाच्याही क्रूर डोळ्यांना झांपड आली, आणि त्याची सर्व शुद्धिबुद्धी नष्ट होऊन कायद्याच्या काटेकोर धारेनें चालणाऱ्या इंग्रज सरकारनें आपल्या प्रतिपक्षाची, या पंजाब केसरीची सूक्तासूक्त विचार न पाहतां प्रत्यक्ष छातीवर आघात करून हत्या करावयाला लावली!

या हिंदभूमीचें अनेकानेक वीरपुत्र शतशत समरांत झुंजलेले अतिरथी महारथी वीर, स्वतंत्रतेच्या स्थंडिलावर आपला बळी देऊन मरण वरते झाले. पण हें मरण-पंजाबकेसरीचें हें मरण किंवा हें मरण कसचें ही हत्या-बिनतोड आहे. कित्येक देशभक्त देशदेश करून हाय खाऊन मरण पावले. कित्येक स्वतंत्रतेचे वेड लागून मरण पावले. कित्येक दुर्दांत नोकरशाहीनें निर्वासित करून परदेशांत पाठविले तेथेंच भटकत भटकत हाल अपेष्टांत मेले, कित्येक काळ्यापाण्यावर जाऊन तेथील प्रत्यक्ष नरकमय जीविताला कंटाळून आत्महत्या करून मेले, तर कित्येक फांसांवर लटकून मेले. पण हा प्रकार कांहीं निराळाच! आज इंग्रजी सत्तेच्या अलीकडच्या काळांत हा प्रथमच घडला. सरकारी अधिकाऱ्यांच्या हस्तकांनीं छातीमध्यें ठोसे मारल्यामुळें या पुरुषसिंहाची हत्या घडली! या जगांत कारणावांचून कार्य घडत नसतें, आणि या न्यायानें पाहूं गेलें असतां लालाजींच्या या विलक्षण मरणाचें रहस्य त्यांच्या लोकोत्तर जीवनांतच सांपडलें पाहिजे आणि शोध-

पूर्वक पाहणाराला तें सांपडतेही. लालाजी धीर वीर होते, चतुर मुत्सद्दी होते. धडाडीचे कार्यकर्ते होते. ते हातचें कार्य क्षणभरही सोडीनात आणि सरकारनें जंगजंग पछाडले तरी त्याच्या कचाट्यांत सांपडेनात. प्रत्यक्ष कारण कांहीं एक न देतां २० वर्षांपूर्वी नुसती दंडुकेशाही चालवून सरकारनें त्यांना हद्दपार केलें तर इकडे देशभर असा हल कल्लोळ माजला कीं सहा महिन्यांत त्यांची सुटका करणें सरकारला भाग पडलें. नंतर त्यांच्या विरुद्ध कांहीं धडपड करावी, कांहीं कड्याळ त्यांच्यावर आणून त्यांना डांबून ठेवावें तर हे आपल्याच पायानें परदेशांत निघून गेले. सरकार मनांत ह्मणालें पीडा चुकली. सुंठी वांचून खोकला गेला. आतां परत यायला अनुज्ञा देऊं नये ह्मणजे झालें. पण लालाजींची करणी विचित्र; त्यांनीं सरकारचे दांत त्याच्याच घशांत घातले. परदेशांत राहून अदम्य उत्साहानें क्षणभर विश्रांती न घेतां त्यांनीं तेथें चळवळ चालविली सगळ्या जगभर हिंदुस्थानची वकीली त्यांनीं इतक्या कुशलतेनें व निरलस मनानें केली कीं 'भीक नको पण कुत्रा आवर.' अशी सरकारची गत होऊन काय करशील ते इथें दृष्टीसमोर तरी कर उगीच जगभर बदनामी नको असें पुटपुटत त्यांना परत येण्याची अनुज्ञा सरकारला आपणहून द्यावी लागली! बरें आल्यानंतर तरी हें स्वस्थ बसले कां? थोडी विश्रांती तरी घेतली कां? छे! छे! या गोष्टीची जणूं त्यांना ओळखच नव्हती. हिंदुस्थानांत पाय ठेवतांच तें असहकारितेच्या धुमश्चक्रींत शिरले आणि आपल्या तेजस्वी शिकवणीनें उभा पंजाब इतका खवळून सोडला कीं प्रतिपक्षाच्या गोटांत अस्वस्थता उत्पन्न झाली. सरकारचें मनांत दंश होतांच त्यानें देशबंधूंना व मोतीलालजींना ज्या नियमाखालीं ६ महिन्यांची शिक्षा दिली त्याच नियमाखालीं या पंजाबकेसरीला २ वर्षांची शिक्षा ठोठावली. सरकार पुन्हां चुकले. या अमानुष शिक्षेची त्याची त्यालाच लाज वाटली आणि मरणासन्नावस्थेंत या सिंहाला पिंजऱ्याचें बाहेर शिक्षा भरण्यापूर्वीच सोडून दिलें. पण ते आतां दैवी तेजानें युक्त होऊन संचरूं लागले होते. त्यांनीं निर्भीक अंतःकरणानें घोषणा केली कीं, सशस्त्र उठावणी हा प्रत्येक परतंत्र राष्ट्राचा हक्क आहे. उभ्या हिंदुस्थानांत अशी गर्जना करणारा त्यावेळीं हा पुरुषसिंह एकटाच होता.

दोन वर्षांपूर्वी स्वामी श्रद्धानंदांची एका नृशंस नराधमानें हत्या केली. ही वातमी लालाजींना कळतांच ते सहज स्फूर्तीनें उद्गारले कीं, " बस्, बस् ! मरण यावें तर असें यावें !! आपण आपलें कार्य शांतपणें करीत असावें पण ते इतक्या नेटानें आणि चिकाटीनें करावें कीं प्रतिपक्षाचा अचूक मर्मभेद व्हावा आणि त्याची शुद्धबुद्ध नष्ट होऊन त्यानें पिसाळून जाऊन आपले अंगावर हात टाकावा आणि आपला देहांत व्हावा. अर्थात देशाकारितांच जगत असतांना मरण यावें " ही इच्छा स्वतः त्यांचे संबंधांत अक्षरशः खरी झाली आहे. ते आपलें कार्य शांतपणें करीत होते. सरकार ते चुकतात कोठें इकडे डोळयांत तेल घालून पहात होते पण लालाजी सरकारच्या बारशाला जेवलेले. कुटील सरकारच्या कायद्यामध्यें ते अत्यंत निष्णात. मनामध्यें असलेला अर्थ ते सुव्यक्तपणें लिहून किंवा बोलून दाखवीत, परंतु त्यांचेवर विधिनियमानुसार दावा सरकारला केव्हांही उभारतां आला नाहीं. प्रत्येक वेळीं सरकारला वांकड्या मार्गाचाच अवलंब करून या पुरुषसिंहाला दडपून ठेवावें लागले. आतां हा शेवटचा प्रसंग होता. सरकार अगदीं मेटाकुटीस आलें होतें. सत्तापक्षाला वाटे कीं आपला प्रतिपक्षी मोठा प्रबल आहे त्याचा कांटा मार्गांतून काहासीं तर केलाच पाहिजे. पण तो कसा करावयाचा ? मागचा अनुभव तर असा होता कीं, जें शस्त्र लालाजीवर फेंकावें तें हातातून भारती भगदत्ताच्या सुटलेल्या दैवी गदेप्रमाणें उलट खाऊन शतपट वेगानें सत्तापक्षाच्याच मर्मस्थानीं येऊन भिडावें. जो लोकक्षोभ नष्ट करण्याकारितां दंडविधिनियम झुगारून देऊन व दडपशाहीच्या आडरानांत शिरून लालाजीवर हात टाकावयाचा तोंच त्याच कृत्यानें लोकक्षोभाचा पारा चढत्या बिंदूला पोंचून सरकारला चटके बसुं लागत असा मागचा अनुभव होता. तरीही ' विनाशकाले विपरीत बुद्धिः ' या न्यायानें सत्तापक्षानें फिरून एकवार तोंच प्रयोग करून पाहण्याचें जणूं काय ठरविलें. काय करील बिचारें ! सायमन मंडळाचें धिंडवडे डोळयानें बघवेनात. सायमन सप्तकांचा बहिष्कार जो जो यशस्वी होत चालला तों ता सरकारचें माथें फिरून गेलें. विवेक नष्ट झाला आणि मग ' विवेक भ्रष्टानाम् भवति विनिपातः शतमुखः ' अशीगत होऊन लालाजींच्या मृत्यूला सरकार कारण झालें. असा अगदीं भर दिवसा ढवळया असला नागडा अत्याचार करावयास यापूर्वी सत्तापक्ष क्वचितच धजला असेल

पण यावेळीं मात्र सर्वस्वीं विवेकहीन झाला. हा पूर्ण विवेकभ्रष्टतेचाच परिणाम नव्हे तर काय?

या प्रमाणेंच सत्तापक्षानें आपली पराकाष्ठा केली पूर्ण विवेकभ्रष्टता पत्करली आणि तरीही तो शेवटीं चकलाच. कारण सारा देश किंबहुना सारे जग एकस्वरानें म्हणत आहे कीं, हा लालाजींचा विजय आहे. परंतु सरकारला ही गोष्ट अगोदर सुचली नाहीं. कशी सुचणार! साम्राज्याची (धुंद) मस्ती डोळ्यावर आली म्हणजे बुद्धी भ्रष्ट होते, स्मृती नष्ट होत असते आणि मग दोनच वर्षांपूर्वी स्वामी श्रद्धानंदांचे हत्येचा हिंदु जगतावर काय परिणाम झाला ही गोष्ट दिसणें अशक्य होऊन बसते. तोच प्रकार येथेंही झाला. तें कसेंही असो. सरकार साम्राज्य मदानें धुंद होवो किंवा न होवो आपला विचार सरकार पाहून घेईल. आम्हाला या अत्यंत अनिष्ट घटनेच्या दुःखांत पडून न जातां ज्या ध्येयासाठीं हुतात्मे लालाजी जगले व मेले तें आमचें ध्येय आम्हांस गांठावयाचें आहे. आमच्या देशमातेला पुनरपि स्वतंत्र, समर्थ, आणि संघटित करावयाची आहे. आणि हें ध्येय गांठण्याचा मार्ग लालाजींनीं स्पष्ट सांगितला आहे. तो त्यांच्या चरित्रामध्यें ओतप्रोत भरलेला असल्यानें प्रिय वाचक बंधूनों, चला! त्या चरित्र सुधेचा आस्वाद घेऊन त्यांत सांपडणाऱ्या ध्येय साधनाच्या मार्गास लागूं या.

---

# जन्मकालीन परिस्थिती.

पंजाब केसरी लाला लजपतराय यांच्या जन्मवेळची देशाची परिस्थिती पहावयाची ह्मणजे त्या पूर्वीचा इतिहास थोडा डोळ्यापुढें आणावा लागतो. कारण लालाजी हेच कांहीं पंजाबचे पहिले सिंह नव्हेत. पंजाबचा पहिला सिंह ह्मणजे रणजीत सिंह. यानें सारा पंजाब आपल्या सत्तेखालीं आणून हिंदूंच्या स्वतंत्रतेचें कार्य जन्मभर केलें. तो जीवमान होता तोंवर प्रतापी इंग्रजही पंजाबकडे वाकडा डोळा करून पाहूं शकत नव्हता. परंतु रणजित सिंहाच्या कार्याचें बीज पंजाबमध्यें फारसें रुजलें नाहीं. १८३९ मध्यें रणजितसिंह स्वर्गस्थ झाला. आणि १८६५ मध्यें पंजाब केसरी लाला लजपतराय जन्म पावले. मध्यंतरीचा काल महत्वाच्या ऐतिहासिक घटनांनीं व्यापिलेला आहे. परंतु त्यांतल्या एकाच गोष्टीचा उल्लेख येथें केला असतां बस होईल. ती गोष्ट ह्मणजे १८४८ मध्यें ज्या शीखांचें स्वातंत्र्य इंग्रजांनीं नष्ट करून त्यांच्या पायांमध्यें परदास्याच्या बेडया अडकविल्या, तेच शीख लोक त्यानंतर केवळ ९ वर्षांनीं उभारल्या गेलेल्या देशव्यापी क्रांतियुद्धामध्यें त्यांच इंग्रजाच्या वतीनें लढले आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नांना अपेशी करण्यास कारणीभूत झाले.

हे असे कां झालें? ह्याचें यथायोग्य विवरण करण्यास येथें अवकाश नाहीं. येथें केवळ त्रोटक विचार करणेंच शक्य आहे. पंजाबमधील हिंदूंना आपल्या स्वत्वाचा विसर इतक्या थोड्या अवकाशांत कसा पडला हें आपल्याला मागील दोनतीन शतकांच्या इतिहासाचें सिंहावलोकन केलें असतां सहज लक्षांत येतें., सोळाव्या शतकांतला हिंदुस्थान वाचकांनीं डोळ्यापुढें आणावा. सतत पांचशें वर्षें परकीय इस्लामी सत्तेशीं प्राणांतिक झगडा करून करून येथली हिंदुसत्ता जर्जर झाली होती. उभें भरतखंड 'आसिंधु सिंधु भारत'— मोंगल परचक्रानें व्यापलें होतें. लोकांना स्वत्वाचा विसर पडला होता. त्यांच्यामध्यें बाकी सर्व गुण होते. यावनी राज्यामध्यें ते सरदारी करीत, यावनी राज्याची दिवाणगिरी ते करीत, यावनी बादशाह्यांची युद्धे ते लढत आणि तरीही ते गुलामच होते; कारण त्यांना स्वत्वाचा विसर

पडला होता. अशा वेळी या भारतवर्षाच्या भाग्यानें श्री शिवछत्रपतींचा जन्म झाला. त्यांना समर्थांची जोड मिळाली आणि या दोन महापुरुषांनीं लोकांना एक दिव्य शिकवण द्यावयाला सुरुवात केली. ती शिकवण म्हणजे एक संजीवनीच होती. तुम्हीं हिंदु आहांत आणि हा हिंदुस्थान तुमचा आहे. हिंदुस्थानचें राज्य हें तुमचें राज्य आहे आणि या तत्वाच्या आड जो जो कोणी येईल तो तो देशद्रोही असें ठरवून समर्थ म्हणतात "देशद्रोही तितुके कुत्ते। मारूनि घालावे परते॥" हें त्या संजीवनीचें एक अंग झालें. पण शत्रूचा नाश करूनच राष्ट्र वर येत नसतें, राष्ट्रामध्यें अंतर्गत संघटना करावी लागते हें त्या महापुरुषांना माहित होतें. म्हणून त्यांनीं आपल्या अमोघ वाणीनें सांगितलें "मराठा तितुका मेळवावा। महाराष्ट्रधर्म वाढवावा॥" समर्थांचा हा महाराष्ट्रधर्म म्हणजेच प्राचीन वेदकालचा राष्ट्रधर्म आणि अर्वाचीन कालाची राष्ट्रभक्ती किंवा देशभक्ति होय. श्रीशिवबांनीं स्वराज्याची स्थापना करण्यापूर्वीच श्रीसमर्थांनीं त्या राष्ट्रधर्माची स्थापना महाराष्ट्रांत केली आणि हिंदु संस्कृतीच्या अभ्युदय निःश्रेयस या उभयान्वयी वाशिष्टयाचें सूत्ररुपानें "आधीं तें हरिकथा निरूपण। दुसरें तें राजकारण। तिसरें तें सावधपण। सर्व विषयीं॥ १॥" असें व्याख्यान करून ठेवलें. हा इतिहास आहे. त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होतें कीं समर्थ शिवाजी या जोडीचें कार्य या भरतखंडामध्यें–होय, अखिल भारतखंडांत–कारण 'महाराष्ट्र राज्य करावें जिकडे तिकडे' असा समर्थांचा दंडक आहे –राष्ट्रधर्माची स्थापना करण्याचेंच होतें. राष्ट्रधर्म आजच्या सारखा स्वार्थी नव्हता. एकमेकांच्या उरावर बसविण्यास शिकविणारा तो धर्म नव्हता. दुसऱ्याचें घर तुम्हीं बळकावा आणि मग तें आपलेंच म्हणून वहिवाटूं लागा, असा परस्वत्वहारी उपदेश राष्ट्रधर्म या नांवानें उपदेशला नव्हता. त्यांचा राष्ट्रधर्म अत्यंत विमल, अत्यंत उदात्त, निःस्वार्थी व परम न्याय्य स्वरुपाचा होता. इतरांच्या स्वार्थालाच तर काय पण राजाच्याही स्वार्थाला तिथें जागा नव्हती. राजा म्हणजे उपभोगशून्य सत्ताधारी व्यवस्थापक ही त्या राष्ट्रधर्माची शिकवण होती आणि मग राज्य कुणाचें? कुणाचें म्हणजे? राज्य लोकांचा, देश लोकांच, हिंदुस्थान हिंदूंचा! एकटया दुकटया व्यक्तीचा तर नव्हेंच पण हजार पांचश्यांचाही नव्हे तर देवांच . ग ईंचें व ब्राह्मणांचा अर्थात (ज्ञानमयतेचा). नो जो म्हणू र या हिंदु देशाला पवित्र-

तापूर्ण मायभुमी समजतो आणि तिच्या प्रीत्यर्थ आपलें सर्वस्व वेचतो त्या त्या सर्वांचा, ही त्या राष्टधर्माची शिकवण होती. परक्यावर आघात करावयाला तो शिकवित नव्हता पण परक्यांनीं आक्रमण केलें तर प्रवल पुरुषार्थानें त्याच्याशीं झुंजा मग झुंजता झुंजता मेलांत तरी क्षिती नाहीं हें तो शिकवीत होता. कारण "धर्मासाठीं मरावें । मरोनी अवघ्याशीं मारावें । मारितां मारितां घ्यावें । राज्य आपुलें " अशी त्या राष्ट्रधर्माची आज्ञा होती.

या राष्ट्रधर्माचा उत्कर्ष हिंदुस्थानांत व्हावयाचा ह्मणजे प्रथम येथें स्वराज्य स्थापलें गेलें पाहिजे हें त्या जोर्डीनें ओळखलें आणि स्वराज्याची स्थापना करण्यांतच त्यांनीं आपला सर्व जन्म वेंचला. हातीं घेतलेल्या कार्यांत अर्थात ते यशस्वी झाले. परंतु स्वराज्य स्थापनेपेक्षांही मोठे ह्मणजे स्वराज्य रक्षिण्याचें व पुनरपि कधींही परराज्य येऊं नयें अशी परिस्थिती देशामध्य उत्पन्न करण्याचें कार्य अर्थात देशांतील सर्व जनतेला उपरिनिर्दिष्ट राष्ट्रधर्माची दीक्षा देण्याचें कार्य अपूरेंच राहून गेलें. त्या कार्याचा श्रीगणेशा त्यांनीं आरंभिला. कांहीं व्यक्तींना तो धर्म शिकविला आणि तेवढयांच्याच सामर्थ्यानें आणि संघटनानें देशांत स्वराज्य आणलें. परंतु देशांतील सर्व व्यक्तींना राष्ट्रधर्म शिकवावयाचा हें कार्य हिमालयाएवढें प्रचंड. एकदोन व्यक्तींचें तें कार्यच नव्हे! राष्ट्रधर्माचा विसर या भारताला पडलेला आहे तो कांहीं आजकालचा नव्हे. हजारों वर्षांपासून तो पडलेला आहे. त्यांतून पारतंत्र्याची मूर्च्छा कित्येक शतकांची देशावर पसरलेली. ही मूर्च्छा समर्थ शिवाजींनीं दूर केली व जीवनरूप राष्ट्रधर्माचें चारदोन वळसे देतात न देतात तोंच त्यांचा देहांत झाला—अर्थात त्यांचें खरें कार्य अपूरें राहिलें.

त्यांनीं जो स्वराज्याचा धडा घालून दिला होता तो पुढील पिढीनें अंशाअंशांनीं गिरविला. सर्व देश यवनांचें हातून मोकळा झाला. पण राज्य लोकांचें. देश लोकांचा ( राजाचा नव्हे ), हिंदुस्थान हिंदूंचा हा मंत्र आसेतु-हिमाचल सर्वत्र घुमवावयाचा होता तें कार्य करावयाला दुसरें श्रीरामदास स्वामी महाराष्ट्राला किंवा हिंदुस्थानाला लाभले नाहींत. अथवा त्या महाराष्ट्रधर्माची शिकवणुक न विसरणाऱ्या हिंदुपदपादशाहीच्या कर्त्या पुरुषांना शत्रूपक्षांशीं अविश्रांत झुंज झुंजण्यांत ती शिकवणुक देशधार्य करण्यास अवसरहि मिळला नाहीं. याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. पुन्हां

'येरे माझ्या मागल्या' अशी स्थिती होऊन देश परदास्यांत सांपडला. कसा सांपडला? इतिहास असें सांगतो कीं, आमच्या पारतंत्र्याचा बेड्या आह्मींच आपल्या हातांनीं घडवल्या आणि त्या आमच्या आह्मींच आपल्या पायांत ठोकून घेतल्या. आमच्यांत पराक्रम होता, कर्तृत्व होतें, संपत्ती होती, शरीरबळ भरपूर होतें, या सर्वांचा उपयोग आह्मीं परक्यांच्या साठीं केला; कारण आमचे स्वत्वच विसरलें गेलें होतें; कारण राष्ट्रधर्माची संजीवनी जी समर्थ शिवाजींनीं प्रचलित केली ती जनतेपर्यंत पोंचलीच नव्हती. या संबंधांत हिंदुस्थानचें सर्वच प्रांत कमी अधिक मानानें सारखेच हतभागी होते. महाराष्ट्रानें कांहीं काल स्वराज्य चालविलें तर त्याचें स्वातंत्र्य हिसकावून घेणाऱ्या सत्तेला पन्नास वर्षांचा झगडा करावा लागला आणि शेवटीं मरतां मरतां त्या महाराष्ट्राच्या स्वराज्यानें जे हातपाय झाडले त्यानें इंग्रज बहादुराचें आसन कांहीं काळ खिळखिळें करून सोडलें. पंजाबाला स्वराज्याचा अनुभव पूरा पन्नास वर्षांचाही मिळाला नव्हता त्या मानानें इंग्रजाविषयींचा आपलेपणा वाटण्यास दहावर्षांचा काल तेथें पूरा पडला. स्वराज्याचा थोडा बहुत अनुभव घेतलेल्या प्रांतांत जर ही स्थिती तर इतर प्रांतांविषयीं वेगळें लिहिण्याचें कारण नाहीं.

या शोचनीय स्थितींमधून देशाला वर आणावयाचें आणि समर्थ शिवाजींचे अपूरें राहिलेलें कार्य पुरें करून लोकांना राष्ट्रधर्माची दीक्षा द्यावयाची हा प्रश्न १९ व्या शतकाच्या उत्तरार्धामध्यें विचारी लोकापुढें प्रामुख्यानें होता. निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या पुरुषांनीं ह्या कार्याचा पाया घातलेला होता. पंजाबमध्यें हें दुष्कर कार्य करण्याचा भार स्वामी दयानंदांवर पडला. स्वामी दयानंद हे गुजराथेंत जन्मलेले त्यांचें शिक्षण मथुरेस झालेलें आणि त्यांनीं पहिली संस्था मुंबईस निर्माण केलेली. पण योगायोग असा कीं पंजाबनें त्यांना आपल्याकडे लोहचुंबकाप्रमाणें आकर्षून घेतलें. शेवटचीं सात आठ वर्षें स्वामींनीं पंजाबांतच घालविलीं. उच्च राष्ट्रधर्माचा आदर्श ह्मणून वेदग्रंथ त्यांनीं लोकापुढें ठेवले. जनतेला स्वत्वाची जाणीव व्हावी ह्मणून आपल्या श्रेष्ठत्वाचें निदर्शक असें श्रेष्ठत्वाचें अर्थानें युक्त 'आर्य' हें अभिधान आपल्या अनुयायांकरितां त्यांनीं निश्चित केलें. आपली पूर्वींची स्थिती काय होती आणि आज आपली स्थिती काय आहे, जगामध्यें आपल्या

व्यतिरिक्त कोण लोक राहतात व त्यांचा आपला संबंध काय आहे हे सूचक प्रश्न त्यांनी समाजापुढें मांडले.

**एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।**
**स्वंस्वंचरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्व मानवाः ॥ १ ॥**

ही आठवण त्यांनीं समाजाला दिली आणि चक्रवर्तित्वाचें महान वैदिक ध्येय शक्यतेनुसार त्यांनीं लोकांपुढें मांडलें. वैदिक धर्माचा त्यांनीं मुक्त कंठानें प्रचार केला आणि लोकांची मनोभुमिका कांहींशी सिद्ध करून हा माहात्मा दिवंगत झाला.

त्या वेळीं इंग्रज सत्ता हिंदुस्थानांत बकवृत्ती धारण करून वागत होती. हिंदुस्थानावर आर्थिक आक्रमण करून येथील सर्व संपत्ती शोषून घेत देश नित्याचा पंगू करून टाकावयाचा आणि धार्मिक क्षेत्रांत तटस्थपणाचें ढोंग माजवून आंतून मिशनरींच्या प्रयत्नांस उत्तेजन द्यावयाचें व लोकांचें जीवनच कलुषित करावयाचें ही तेव्हां सत्तापक्षाची वृत्ती होती. ती लोकांना कळलेली नव्हती. परंतु विलक्षण दुरदर्शी दयानंदांना या गोष्टी स्पष्ट दिसत होत्या. वीस पंचवीस वर्षातच देशांमधील कर्तबगारी गाजविण्याजोगीं सर्व क्षेत्रें-क्षत्रियांचीं, वैश्यांची, व ब्राम्हणांची क्षेत्रें अर्थात व्यवसाय-हे परके लोक बळकावणार व येथील सर्व लोकांना निव्वळ भारवाही बनवून टाकणार ही गोष्ट त्या दिव्यदृष्टया महर्षींना त्याचवेळीं कळून चुकली आणि मग त्यांनींही प्रतिपक्षानें स्वीकारलेल्या ढोंगी धार्मिक तटस्थपणाचा लाभ घेऊन तेंच क्षेत्र आपल्याही कार्याकरितां स्वीकृत केलें व आर्यसमाजाची स्थापना केली. कोणत्याही क्षेत्रामध्यें लोक प्रांजलपणानें आणि शिस्तीनें वागावयाला शिकले ह्मणजे त्यांच्यामध्यें आपलेपणाची भावना तीव्र होत असते आणि या तीव्रतेनें त्यांच्या कर्तृत्वाला तेज चढत असतें ह्मणून-आणि धर्म हें आमचें हिंदूंचें जीवन--सर्वस्व ही गोष्ट लक्षांत घेऊन--धर्माच्या झेंडयाखालीं हिंदु समाजाला एकत्र करावयाचें, त्यांचे पंथभेद आणि तज्जन्य तंटेबखेडे नष्ट करून त्यांना संघटित आणि समर्थ बनवावयाचें व त्याच्या कर्तृत्वाला तेज चढूं लागलें कीं त्यांना राष्ट्रधर्माची दीक्षा देऊन हिंदु संस्कृतीच्या पुनरुद्धाराचें दिव्यकार्य -परमेश्वरी कार्य-तडीस न्यावयाचें असा आर्य धर्मेंद्र दयानंदांचा कार्यक्रम

होता. वेदविरहित इतर सर्व संस्कृत वाङ्मय त्यांनीं जें गौण ठरविलें आणि इतर धर्ममतांतील लोक सनातन वैदिक धर्माचे झेंडयाखालीं आणण्याची जी योजना सिद्ध करून ठेवली व अशाच प्रकारचे आर्यसमाजाचें जें अनेक नियम ठरवून टाकले त्या सर्वांचा अर्थ सरळ असाच होतो. हिंदुधर्माला विपर्यस्त व दुबळया वेदांताच्या पकडीमधून सोडवून ऐहिक जीवनांतील उदात्तता आणि दिव्यता प्राप्त करून घेऊं अशी लोकांचें मनांत आकांक्षा उत्पन्न करावयाची आणि हिंदु संस्कृतीला वेदांच्या कालीं होतें तसें प्रभविष्णु स्वरुप देऊन तिचा झेंडा जगभर नाचवावयाचा हाच उद्देश दयानंदांच्या प्रत्येक कृतीमधून व ग्रंथावरून स्पष्ट दिसतो. हिंदुसमाजावर राजकीय संकट येवो, धार्मिक संकट येवो, सामाजिक आपत्ती येवोत त्या सर्वांपासून त्याचें संरक्षण करून त्याला पुनरपि जयिष्णु आणि प्रभविष्णु बनविणारीं तत्वें बीजरुपानें आर्यसमाजाच्या रचनेंमध्यें स्वामी दयानंदांनीं गुंफून टेवली आहेत. त्यांचा प्रभाव आजही आपला अंधुक रीतीनें कां होईना पण निश्चितपणें फिरून येत आहे.

याप्रमाणें महत्कार्याची मुहूर्तमेढ रोवून स्वामी दयानंद स्वर्गस्थ झाले. परंतु त्यांनीं दाखवून दिलेल्या मार्गानें जाणारा व लोकांमध्यें चेतना आणून त्यांना योग्य त्या शिस्तीनें वागावयास शिकविणारा; मानाचें जिणें जगण्याची आकांक्षा स्वतःच्या उदाहरणानें व प्राचीन इतिहासाच्या शिक्षणानें लोकांच्या अंतःकरणांत स्फुरविणारा व ती स्फुरूं लागल्यानंतर विविध कार्यक्षेत्रांमध्यें त्यांना शिरकवून त्यांच्या अंगीं राष्ट्रधर्म शिकण्याची पात्रता उत्पन्न करणारा; लोकांच्या दिव्य भूतकालचा आदर्श त्यांच्या डोळयापुढें धरून भावी कालांतही तुह्मांस असेंच व्हावयाचें आहे अशी त्यांना चेतावणी देणारा व आपल्या स्वतःच्या उदाहरणानें या सर्व गोष्टी लोकांच्या अंत:करणावर बिंबविणारा एखादा महान पुरुष या वेळीं पंजाबला हवा होता. पंजाबकेसरी लाला लजपतरायांनीं ती उणीव शक्यतेनुसार भरून काढण्याचा भगीरथ प्रयत्नँ आजीव व आमरणान्त केला

# जन्म आणि विद्यार्थिदशा

लाला लजपतराय यांचे घराणें सामान्य अग्रवाल वैश्याचें होतें. पंजाबां-तील लुधियाना जिल्ह्यामध्यें त्याची वस्ती होती. लजपतरायांचे वडील लाला-राधाकिसन हे इंग्रजी सत्ता स्थापन झाल्यानंतर पंजाबसरकारच्या शिक्षण विभागांत उर्दु शिक्षक बनले. त्यांनीं हाच उद्योग जन्मभर केला. ते स्वभावानें मोठें प्रेमळ व भाविक असत. त्यांना मासिक ४२ रुपये वेतन मिळत असे. व तेवढयांत संतुष्ट राहून ते टापटीपीचा संसार चालवीत. त्यांना इंग्रजी येत नव्हतें. पण अध्यापनाची कला त्यांना जन्मतःच अवगत होती झटलें तरी चालेल. ते एखाद्या अर्वाचिन शिक्षणशास्त्रपटुप्रमाणें विद्यार्थ्यांना स्वत: स्वतंत्र बुद्धीनें अभ्यास करावयास लावून आपण केवळ मार्गदर्शकानें काम करीत. पण ते नुसते उत्तम शिक्षकच होते असें नाहीं. यांच्या पिढीच्या मानानें ते फार पोक्त विचाराचे सुशिक्षित गृहस्थ होते. त्यांना वाङमयाची चांगली गोडी होती. वर्तमानपत्रांतून लेखादि लिहिण्याचें व आपल्या देशबांधवांना सज्ञान करण्याचें कार्य आपला नोकरीचा वेळ संभाळून मोठ्या हौसेनें ते करीत असत. त्यावेळेचे पंजाबांतील प्रख्यात पुढारी सर सय्यद अहंमद यांचे ते अनुयायी होते. त्यांचे लेख ते मोठ्या भक्तीनें वाचीत असत पण पुढें जेव्हां सर साहेबांनीं आपली पगडी फिरविली व हिंदुमुसल-मानांचे हितसंबंध एक आहेत, हें मत बदलून मुसलमानांनीं हिंदूपासून फुटून निघावे व वेगळया संस्था स्थापन कराव्या, कारण त्यांचें हित वेगळे व हिंदूंचें वेगळे अशी सल्ला आपल्या धर्मबांधवांना देण्यास प्रारंभ केला तेव्हां वर्तमानपत्रांतून त्याविरुद्ध लेख लिहून सर साहेबांची कडक शब्दांनीं हजिरी घेण्याला त्यांचे अनुयायी झणविणारे लाला राधाकिसन कचरले नाहींत. असो.

लालाजींची आई एका शीख घराण्यांतली होती. ह्या बाई मोठ्या काटकसरी व टापटीपीनें संसार करण्यांत कुशल होत्या. थोडया प्राप्तींत गृहव्यवस्था करावयाची तर तिनेंच करावी, असा तिचा लौकिक होता. त्याप्रमाणेंच या बाईच्या अंगीं परोपकाराचा व दातृत्वाचा गुण मोठा विल-क्षण होता. कोणीही दुःखी, कष्टी घरीं आला किंवा भिक्षेकरी, संन्यासी,

अतिथी आला तर त्या सर्वांचा योग्य तो परामर्श----पतीची प्राप्ती लहानशी होती तरी त्यांतल्या त्यांत-यथाशक्ति ती बाई घेत असे. बाईचा स्वभाव मोठा मानी होता. ती कधीं कोणाचें फट म्हणून घ्यावयाची नाहीं. यामुळें अनेकदां रागाचे प्रसंगीं ती वाटेल तें बोलून जाई पण तिच्या मनांत कांहीं राहत नसे व त्यामुळें घरांतील सुखस्वास्थ्याचा भंग होत नसे.

लालाजींचा जन्म झाला त्याकाळीं पंजाबामध्यें एक विचार क्रांतीची लाट उसळली होती. स्वामी दयानंद सरस्वतींचें नांव जिकडे तिकडे गाजत होतें. त्यांचीं मतें मान्य करणाऱ्यांना ते आपल्या आर्यसमाजांतील दीक्षा देत असत. याप्रमाणें लाला राधाकिसन हेही आर्य बनले होते. देशाची उन्नती व्हावयाची असेल तर लोक धार्मिकरीत्या सुसंस्कृत झाले पाहिजेत. असें त्यांना, पूर्वीपासून वाटत असल्यामुळें आर्यसमाजाची कामें ते उत्साहानें करीत असत. तसेंच देशहितविषयक इतरहि अनेक कामांत त्यांचें अंग असे. त्यावेळचे सरकारी नोकर आजच्याप्रमाणें सर्व बाजूंनीं बांधलेले नसत. सार्वजनिक बाबतींत पुढाकार घेऊन ते निर्भीडपणें लोकांची सेवा करूं शकत असत, व हाच धडा ते आपल्या मुलांनाहीं स्वाभाविकपणेंच शिकवीत असल्यामुळें त्यांची मुलें बापसे बेटा सवाई या न्यायानें धुरंधर लोकनायकत्वाचे पदवीस पोंहोचण्याची शक्यता राही. महाराष्ट्रांतील राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यास वाहलेले कै० प्रो० विजापुरकर यांचे वडील गोविंदराव अप्पा किंवा लोकमान्य टिळक यांचे वडील गंगाधरपंत टिळक असलीं उदाहरणें त्यावेळीं अनेक होतीं.

लाला राधाकिसन यांच्या तारुण्याचा काल म्हणजे संक्रमणाचा काल होता. जुनें राज्य नुकतेंच गेलेलें होतें. क्रांतीयुद्धाच्या ज्वाला नुकत्याच विझल्या होत्या. इंग्रजसरकारच्या राजवटीनें लोकांना भुरळ पडली होती. ती शांतता, ती सुव्यवस्था, ते कायदे, तीं न्यायाचीं कोर्टें त्या आगगाड्या व तीं तारायंत्रें, तीं पोष्टआफीसें एक नी दोन कुठवर सांगावे? या थाटानें लोकांचे डोळे नुसते दीपून गेले होते. त्यांनीं या राज्याला रामराज्याची उपमा देऊन टाकिली! काठीला सोनें बांधून या राज्यांत काशीपासून रामेश्वरापर्यंत प्रवास करावा अशी म्हणच लोकांत पडून गेली होती. मात्र सोनें लांबवलें जाऊन काठी काढून घेतली गेली हें मात्र ध्यानांत आलें नाहीं! या लोकांनीं इंग्रजी

राज्याची एक बाजू तेवढी पाहिली. त्यांनीं घी देखले पण बडगा पाहिला नाहीं पण त्यांच्यांत जे विचारी पुरुष होते त्यांना राष्ट्राचा नाश होत आहे ही गोष्ट स्पष्ट कळून चुकली होती. जिकडे तिकडे इंग्रजांचे अनुकरण सुरू झालें होतें. पूर्वीच्या चालीरीतींना व संस्कारांना आतां मान उरला नव्हता. पूर्वीच्या विचारांना आतां वेडयांचे विचार हें नांव मिळत होतें. बापाविषयीं त्याच्या जुनाट मताप्रमाणें मुलांना आतां आदर वाटेनासा झाला होता. ही स्थिती पाहून त्या पिढींतील समंजस लोकांना वाईट वाटे. राग येई. पण त्यांना करतां कांहींच येत नसे. नवीन लाट त्यांना थोपवितां येत नव्हती. त्यांनीं चार शब्द सांगितले तर ते कोणी ऐकत नसे. आणि विशेष गोष्ट ह्मणजे नवीन राज्यापासून मिळणाऱ्या शिक्षणादि लाभांचा मोह त्यांनाहीं अनावर होत असे. आपल्या मुलांना नवीन शिक्षण निरुपाय ह्मणून तीं देत होतीं. कारण त्यांना नवीन राजवटीचा चांगला भाग हातीं लागेल अशी आशा वाटे. पण त्याच्या अनुषंगानें येणारे दोष त्यांना नको होते. पण हें शक्य कसें होणार? दोषांनींच शिक्षितांना घेरलें व मग त्यांनीं देव ठेवील तसें राहावें असा 'पोक्त' विचार करून बदलत्या काळाला हात जोडीत त्याच्या-पुढें त्यांनीं मस्तक नमविलें. परिस्थितीपुढें सर्वच समाज नमला. एकट्या लाला राधाकिसननें काय करावें? तरी पण अशाहि परिस्थितींत लालाजी व त्यांची धर्मपत्नी हे दांपत्य मानीपणानें व दातृत्वशीलतेनें शक्य ती लोकसेवा करीत संसार चालवीत होते.

अशा सुयोग्य मातापितरांच्या उदरीं आपले चरित्रनायक पंजाबकेसरी लाला लजपतराय यांचा जन्म २८ जानेवारी १८६५ या दिवशीं पंजाबांतील लुधियाना जिल्ह्यांतील जगरांव नामक लहानशा गांवीं झाला. लहानपणापासून मातेनें जणूं दुधाबरोबर लजपतला आपल्या अंगच्या गुणांचे बाळकडू पाजिलें. दारीं संन्यासी आला कीं त्याच्या हातानें ती त्याला भिक्षा घालीत असे. कोणी ज्योतिषी आला कीं, तिनें माझा लजपत पुढें कसा होईल ह्मणून विचारावें. व त्यानें त्या अर्भकाचा हात पाहून कांहीं हातवारे करून "हा मोठा दाता होईल", "मोठा श्रीमंत होईल", "प्रसिद्ध पुरुष होईल", "मोठें दैव काढील", असें उत्तर दिलें ह्मणजे

प्रेमभरानें त्या आपल्या लहानग्या अर्भकाचें पटापट मुके घेत तिनें त्या ज्योतिषाला चांगलें पारितोषिक द्यावें.

अशा अवस्थेंत लजपतचें बालपण निघून गेलें. तो प्रकृतीनें अशक्त होता. त्यामुळें सदा घरीं घरींच राहात असे. खेळाडूपणा किंवा द्वाडपणा त्याच्या अंगीं नव्हता. सदोदित तो आईच्या मागोमाग हिंडे. बापाजवळ सुद्धां या वयांत त्याचें फारसें रहस्य नव्हतें. याचा स्वाभाविक परिणाम असा झाला कीं, आईचे सर्व गुण त्याच्या अंगीं तीव्रपणें वाणले. तिचे नेमधर्म, तिचें दातृत्व, तिचा तो मातृसुलभ स्वभाव आणि तिचा भडभडेपणा यांचा त्याच्या चित्तावर स्थायी ठसा उमटला. अशीं ७ वर्षें गेल्यावर लाला राधाकिसननीं विचार केला कीं, आतां लालनाचा काळ संपला. लजपतला आतां शाळेंत पाठविलें पाहिजे. तत्काळ त्यांनीं त्याची पाठवणी एका उर्दु शाळेंत करून दिली.

मागें सांगितलेंच आहे कीं, लाला राधाकिसन हे उर्दु शाळेंत शिक्षक होते. अर्थात त्यांच्या मुलांचें शिक्षण एका गांवीं एकाच शाळेंत होणें शक्य नव्हतें. त्यांची बदली होईल त्या शाळेंत ते आपल्या मुलांचें शिक्षण करीत. परंतु घरची मातेची अनुकरणीय शिस्त व वडील उत्तम शिक्षक या स्थितींत लजपतरायांचा अभ्यास सुरळित चालत असे. त्यांची बुद्धि तीव्र होती. सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणें उनाडपणा करण्याची संवय नसल्यामुळें त्यांचा सारा वेळ अभ्यासांतच जात असे. त्यामुळें वर्गशिक्षकांना ते मोठे प्रीय होत असत.

चांगल्या अभ्यासाबरोबरच लजपतरायांच्या ठिकाणीं सुस्वभावीपणा होता. व इतर विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासामध्यें साह्य करावयाला ते सदा सिद्ध असत. घरीं वडिलांच्या बैठकींतील भाषणें ऐकून ऐकून त्यांची बुद्धी चांगली वाढीस लागली होती. लाला राधाकिसन हे वर्तमानपत्रांतील निवडक लेख त्यांच्याकडून वाचवून घेत असत. यामुळें सामान्य विद्यार्थ्यांना समजत नसत अशा किती तरी गोष्टींचें ज्ञान लजपतरायांना झालेलें असें. यामुळें विद्यार्थी वर्गामध्यें स्वाभाविकच त्यांना पुढारीपण प्राप्त झालें. इतर विद्यार्थी यांच्याविषयीं मोठें प्रेम आणि आदर बाळगीत असत.

या वयांतच लजपतराय मोठे धीट वक्ते झाले होते. निरनिराळ्या वक्तृत्वोत्तेजक सभांतून भाषणें करून पारितोषिकें मिळविण्याची त्यांना हौस होती. यास्तव ती कलाही त्यांना बरीच साध्य होवूं लागली. देशसेवेचा ओनामा त्यांना आपल्या तीर्थरुपांपासूनच मिळत होता. लाला राधाकिसनजींच्या विचारांचे दिग्दर्शन वर थोडेसें केलेंच आहे. तेंच बीज तरुण लजपतरायांच्या मनावर पक्कें रुजलें. तीर्थरुपांच्या सहवासानें त्यांच्यावर आणिकही एक परिणाम झाला. तो असा कीं, त्यांचा तिखटपणा व भडभडेपणा जाऊन त्या ठिकाणीं शांत स्वभाव आला. धामिक भावना त्यांच्या ठिकाणीं प्रबल झाल्या. आलेल्या संकटाला धीरानें तोंड द्यावयास ते शिकले.

याच सुमारास त्यांच्यावर आणखी एका व्यक्तीचा प्रभाव पडला. ती व्यक्ती ह्मणजे स्वामी दयानंद सरस्वती. त्यांचीं व्याख्यानें ऐकावयास बापाबरोबर ते मोठ्या आवडीनें जात असत. स्वामीजींची तेजःपुंज मुद्रा, जाडी विद्वत्ता, तसेंच आकर्षक वक्तृत्व यांचा लजपतरायावर फार परिणाम झाला. आधीं त्यांना वडिलांपासून हें वळण पूर्वीच मिळालें होतें. या व्याख्यानांचा त्यांच्या चित्तावर ठसा यावेळीं जो उमटला तो पुढें केव्हांही नष्ट झाला नाहीं. हिंदु-संस्कृतीच्या श्रेष्ठतेचे व गतवैभवाचे जें रमणीय चित्र स्वामीजींनीं आपल्या व्याख्यानांतून रंगविलें तें लालाजींच्या मनश्चक्षूंपुढें शेवटपर्यंत ताजें होतें. या उज्वल चित्रांवर दृष्टी ठेवून त्यांनीं जन्मभर कार्य केलें. स्वामी दयानंदांनीं आपल्या व्याख्यानांतून दिलेला संदेश ते आजन्म विसरले नाहींत. इतकेंच नव्हे तर व्याख्यान ऐकल्या दिवसापासून हें महनीय कार्य प्रत्यक्ष आपल्या हातून केव्हां घडूं लागेल अशी उत्कंठा त्यांना लागून राहिली. आर्यसमामाजाच्या उत्सव प्रसंगीं स्वयंसेवकाचें काम ते अत्यंत उत्साहानें करूं लागले.

वयाच्या सोळाव्या वर्षीं लजपतराय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांना या वेळीं एक शिष्यवृत्ती मिळाली. व ते लाहोरच्या सरकारी कॉलेजांत जावून राजनियमांचा (कायद्याचा) अभ्यास करूं लागले. या काळांत त्यांनीं अनेक विषयांचा व त्यांतल्या त्यांत इतिहासाचा खोल अभ्यास केला.

देशाविषयींचे विचार तर सदोदित त्यांच्या मनांत घोळत असत. आपल्या सहाध्यायाशीं या संबंधीं त्यांचे अनेकवार वादविवाद होत असत.

या वादविवादांतूनच भावी आयुष्यांतील कार्यासाठीं त्यांना अनेक सहकारी मिळाले. त्यांतील दोन विशेष उल्लेखयोग्य आहेत. ते ह्मणजे पंडित गुरुदत्त विद्यार्थी आणि लाला हंसराज हे होत. हें त्रिकूट देशहितविषयक प्रश्नांचा विचार करण्यांत व उन्नतीचे उपाय शोधण्यांत सतत एक विचाराचे असे. आपल्या आयुष्याचें ध्येय त्यांनीं याच काळांत निश्चित केलें. हिंदुसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनासाठीं सर्व आयुष्य वेंचावयाचें, अवश्य पडेल तेथें कार्य करावयाचें व आल्या आपत्तींना तोंड द्यावयाचें हा त्यांचा कृतनिश्चय याच वेळीं ठरला.

विद्यार्थी असल्यापासूनच सार्वजनिक कामांमध्यें ते जोमानें भाग घेऊं लागले. या कामीं त्यांच्या वडिलांकडून त्यांना उत्तेजन मिळालें. पंडित गुरुदत्त विद्यार्थी आणि लाला हंसराज यांच्या सहकार्यानें तें आर्यसमाजाचें काम करूं लागले. होतां होतां आर्यसमाजाच्या सर्व चळवळींचे हें तरुणांचें त्रिकूट ह्मणजे जोमदार केंद्र होऊन बसलें. त्यांची कार्यशक्ति प्रचंड होती. व उत्साह अदम्य होता. व्याख्यानें देणें, वादविवाद करणें, आर्यसमाजाच्या शाखा स्थापन करणें, निधि गोळा करणें, वर्तमानपत्रांतून लेख लिहिणें इत्यादि सर्व कामें आपला राजनियमांच्या अभ्यास संभाळून ते करीत होते. प्रौढ व कर्त्या पुढाऱ्यांची कार्यकुशलता व तरुणांची धडाडी, उत्साह आणि कळकळ यांचा मनोहर संगम त्यांचे ठिकाणीं झालेला होता, यामुळें त्यांना पुष्कळ यश येत असे. व त्या यशानें त्यांचा उत्साह द्विगुणित होऊन ते पुन्हां जोमानें कामाला लागत.

त्यांच्या या काळांतील कार्याचें दिग्दर्शन करण्याकरितां एक उदाहरण येथें देतो. १८८१ मध्यें शिक्षणाचा विचार करण्याकरितां जें एक कमिशन बसलें होतें त्या कमिशनपुढें पंजाब प्रांतांत असा प्रश्न आला कीं, प्राथमिक शाळांतून शिक्षणाचें माध्यम उर्दु असावें कीं, हिंदी असावें. हिंदूंचें ह्मणणें असें होतें कीं, हें माध्यम हिंदी असावें. व मुसलमानांचे ह्मणणें कीं उर्दु असावें; मुसलमानांची वस्ती पंजाबांत पुष्कळ व मुसलमानी राज्यसत्ता

अनेक शतकें तेथें नांदल्यामुळें उर्दूचा प्रभाव प्रबलतर होता. नागरी लिपी हिंदूंमध्यें सुद्धां फार थोड्यांना येत असे. सरकारी कामकाज अर्थातच उर्दू-मधूनच चाले. लाला लजपतरायांनीं हिंदी भाषेंतून अर्थात् हिंदी लिपींतून ह्मणजे नागरी लिपींतून प्राथमिक शिक्षण दिलें जावें यासंबंधीं मोठी चळवळ केली. यासाठीं लाहोरला समस्त हिंदूंची जी सभा झाली होती तेथें त्यांनीं भाग घेतला व ‘ ट्रिब्यून ’ पत्रांतून लेख लिहून आपल्या पक्षाचें जोरदारपणें समर्थन केलें. तसेंच लाला हंसराज व पंडित गुरुदत्त यांनीं ‘ Regenerator of Aryawarta ’ नांवाचें जें पत्र काढिल होतें त्यांतही या प्रश्नाविषयीं पुष्कळ लेख वगैरे लिहिले. अर्थात या प्रयत्नांना त्या वेळा यश आलें नाहीं. परंतु या कामीं त्यांनीं दाखविलेल्या उत्साहाच व हिंदीच्या प्रेमाचें तत्कालीन वडील पिढींतील लोकांनीं पुष्कळ कौतुक केलें.

१८८३ मध्यें लाला लजपतराय वकीलीची पहिली परीक्षा उतरले. व ते हिस्सार येथें वकिली करूं लागले. त्यांचें कार्य अधिकच जोमानें सुरूं होतें. आपल्या त्रिमूर्तिमध्येंहि कार्याचा वाटा लाला लजपतराय आपल्यावर ज्यास्त घेत असत. लाला हंसराज सर्वांत वडील होते. ते शांत प्रकृतीचे आणि पोक्त बुद्धीचे असत. ते या त्रिकूटाचे सल्लागार होते. पंडित गुरुदत्त विद्यार्थी हे अतिशय विद्वान, पंडित या पदवीला सार्थ करणारे पण ध्येयवादी होतें. आपल्या प्रभावी लेखणीनें ते आर्यसमाजाची सेवा करीत. लाला लजपतरायांच्याकडे ठराविक काम नसे. पडलेला कार्यभार ते आनंदानें, उत्साहानें व क्षमतापूर्वक पार पाडीत. निरनिराळ्या आर्यसमाजांच्या शाखाचे ते कुठें कार्यवाह, तर कुठें कोशाध्यक्ष, कुठें उत्सवाचे व्यवस्थापक, तर कुठें समाजाचें मुख्य प्रचारक ह्मणून कामें करीत. पुनः कोर्टांतील वकिली व राजनियमांचा पुढील अभ्यास चालू होतांच. पण कामाचा उरक त्यांना चांगलाच असे. यामुळें १८८५ मध्यें तें राजनियमांच्या शेवटच्या परिक्षेला बसले तेव्हां एकंदर ३० इच्छुकांमध्यें त्यांचा दुसरा क्रमांक आला.

याच सुमारास त्यांचें लग्न झालें व लौकिक अर्थानें त्यांची विद्यार्थीदशा संपून तें गृहस्थाश्रमी बनले. पण ते मरेपर्यंत विद्यार्थीच होते. त्यांना विद्येचें व्यसनच होतें. हजार सार्वजनिक कामांचा पसारा, कोर्टांतील वकिली आणि प्रपंचांचीं कामें इतकी संभाळून ते यापुढेंहि कांहींतरी वाचन-लेखन केल्यावांचून दिवस जावूं देत नसत.

# दयानंद कॉलेजची स्थापना.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें १८८५ मध्यें लालाजी वकील बनले. हिस्सार येथेंच त्यांनीं आपला व्यवसाय आरंभिला. जात्याच प्रतिभाशाली व अत्यंत परिश्रमी असल्यामुळें ते लवकरच उत्तम वकील ह्मणून प्रसिद्ध झाले व त्यांना चांगला पैसाहि मिळूं लागला. यावेळीं असा एक प्रसंग आला कीं, संपत्ति आणि अधिकार यांची चाड लालाजींना असती तर त्यांचें चरित्र कांहीं वेगळेंच बनून गेलें असतें. वकिलीमधील त्यांची हुशारी पाहून त्यांना सरकारनें ऍक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरची जागा देऊं केली. प्रपंचाच्या उमेदीचें ऐन पंचविशीचें वय, घरची सर्व अनुकूलता आणि दारीं हें राजवैभव आपल्या पायानें चालून आलेलें असा एकंदरींत हा प्रसंग होता. पण लालाजी हे खरे पुरुषसिंह होते. या वैभवाच्या मोहाला ते भुलले नाहींत. दाराशीं चालून आलेली 'लक्ष्मी' त्यांनीं परत लाविली, व विद्यार्थीदशेंत आजन्म लोकसेवा करण्याचें जें व्रत त्यांनीं घेतलें होतें तेंच पुढें चालविलें. या प्रसंगीं त्यांनीं दाखविलेली मनाची दृढता आणि निःस्वार्थीपणा किती अनुकरणीय आहे? त्यांच्या एकंदर चरित्राची पृष्ठभूमी या नात्यानें हा प्रसंग लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे. खरोखरच '**भवोहि लोकाभ्युदयाय तादृषाम्**' या भवभूतीच्या वचनाप्रमाणें असले दृढनिश्चयी पुरुषच स्वदेशाचा खरा उद्धार करूं शकतात व शकतील. लालाजींनीं जवळ जवळ पंचवीस वर्षें वकिली केली; व लाखो रुपयांची संपत्ती जोडली. पण '**आदानम् हि विसर्गाय सतां वारिमुचामिव**' या न्यायानें ते आपल्या संपत्तीचा बहुतेक भाग निरनिराळ्या सार्वजनिक कार्यामध्यें मुक्त हस्तानें दान करीत असत.

लालाजी वकिली करीत असले तरी तिकडे ते फारसा वेळ खर्च करीत नसत. आपल्या आयुष्याचें ध्येय त्यांनीं विद्यार्थीदशेंतच ठरवून ठेवलेलें होतें, व योग्य त्या सहकाऱ्यांची निवड करून प्रत्यक्ष कार्यालाहि त्यांनीं विद्यार्थीदशेंतच प्रारंभ केलेला होता. तेंच कार्य त्यांनीं यापुढें अधिक नेटानें चालविलें.

स्वामी दयानन्द सरस्वती यांचा मृत्यु १८८३ मध्यें झाला. त्यांचें कार्य स्थायी रुपानें चालविण्यासाठीं व त्यांचा व्याप साऱ्या देशभर करण्यासाठीं उत्साही देशभक्तांची व धर्माभिमानी नवयुवकांची आवश्यकता होती. असे नवयुवक सरकारी शिक्षण-संस्थांमधून बाहेर पडणें बहुतेक अशक्य होतें. इंग्रज सरकारनें येथें चालू केलेल्या शिक्षण पद्धतीचें मर्म लालाजींना त्याचवेळीं स्पष्ट कळून चुकलें होतें. हिंदु-संस्कृतीचा पुनरुद्धार करण्यासाठीं जी तरुण प्रचारकांची सेना आपल्याला पाहिजे ती स्वतंत्र शिक्षण संस्था स्थापून व त्यांतून शिक्षण देऊन आपल्याला निर्माण करावी लागेल ही गोष्ट त्यांनीं ओळखली व आपल्या विद्वान मित्रांचे सहकार्यानें स्वामी दयानंदाचें स्मारक म्हणून त्यांनीं १ जून १८८६ या दिवशीं दयानन्द अँग्लो वेदिक कॉलेज या प्रख्यात संस्थेची प्राणप्रतिष्ठा केली. लाला हंसराज हे तिचे पहिले प्रिन्सिपाल बनले. यांनीं जन्मभर या संस्थेची सेवा अवैतनिकरीत्या केली, तीच गोष्ट स्वतः लाला लजपतराय याचेसंबंधींहि म्हटली पाहिजे.

या संस्थेचें वैशिष्ट्य सांस्कृतिक शिक्षणाचें दृष्टीनें तर होतेंच परंतु राष्ट्रीय शिक्षणाच्या दृष्टीनेंही ती नमुनेदार होती. तिनें आरंभापासूनच स्वदेशीला प्रमुख स्थान दिलें होतें. सुशिक्षित वर्ग आणि अशिक्षित जनता यांच्यामधील तुटकपणा दूर करावा अर्थात अशिक्षित जनतेला धार्मिक, ऐतिहासिक आणि व्यवहारिक ज्ञान देऊन तिची बौद्धिक प्रगति करावी आणि तिकडे सुशिक्षित वर्गांना शरीरश्रमांची महति पटवून देऊन त्यांना शारिरिक दृष्ट्या बलिष्ठ आणि संघटित बनवावे, म्हणजे '**परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ**' या श्रीकृष्ण वचनानुसार दोन्ही वर्ग एकमेकांशीं सहकार्य करून हिंदुसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचा मार्ग आक्रमण करूं लागतील, असा संस्थेचा सर्वांगीण अभ्यासक्रम ठरविण्यांत आला होता. दुसरी गोष्ट जी संस्थेच्या चालकांना अवश्य वाटली ती औद्योगिक शिक्षण ही होय. कारण प्रस्तुतचें इंग्रजी राज्य हें राजकीय दृष्ट्या जितकें हानिकारक आहे त्यापेक्षांही तें आर्थिक दृष्ट्या अधिक हानिकारक आहे. अन्नमय प्राण आणि प्राणमय पराक्रम हा न्याय जसा व्यक्तीला तसाच राष्ट्रालाहि लागू आहे. देश धनधान्यसंपन्न असेल तरच देशांतील जनता राजकारणाचा गाडा नेटानें चालवूं शकेल. सर्वस्वीं कंगाल जनता सर्वस्वीं संपन्न बलिष्ठ सरकाराशीं झगडूं शकत

नाहीं. त्यांतून प्रस्तुतचें युग हें विज्ञान-युग आहे. त्या विज्ञानाचें पाठबळ नसेल तर हिंदुसंस्कृती या नवीन झगड्यांतून यशस्वी होवून बाहेर पडणें अशक्य आहे. ह्मणून स्वतंत्र शिक्षणसंस्थांनीं आपल्या अभ्यासक्रमांत औद्योगिक शिक्षणाचा व विज्ञान शिक्षणाचा अवश्य समावेश करून घेतला पाहिजे हें या संस्थेच्या चालकांनीं वेळींच ओळखलें.

स्वदेशाभिमान हा तर संस्थेच्या जीवनाचा पाया होता. व स्वावलंबन हा तिचा वाणा होता. वरील हेतु साध्य करणारें शिक्षण द्यावयाचें ह्मणजे सरकारी नियंत्रणांपासून व अर्थात पैशाच्या साह्यापासून पूर्णपणें अलिप्त राहावयास पाहिजे होतें. व आपल्या स्वालबंनाच्या ध्येयाला ही गोष्ट पोषक आहे असें समजून चालकांनीं नेटानें आपलें काम चालविलें.

वरील ध्येयानुसार कॉलेजाची स्थापना झाल्यावर स्वाभाविकपणेंच त्या संस्थेचा स्वाभाविकच पुष्कळसा कार्यभाग येऊन पडला. आपल्या वकिलीच्या प्राप्तीपैकीं अर्धा पैसा ते या संस्थेला देऊं लागले. तसें ह्मटलें तर संस्थेचीं सगळींच कामें ते आनंदानें व निरलसपणें करीत असत. संस्थेचे मुख्य कार्यवाह या नात्यानें व उपाध्यक्ष या नात्यानें त्यांनीं कित्येक वर्षें काम केलें. या काळांत संस्थेची सेवा करण्यांत त्यांनीं कशाचीच क्षिती बाळगिली नाहीं. लेख्यालयांतील काम करणें, सार्वजनिक व्याख्यानें देऊन संस्थेकरितां निधि जमविणें, संस्थेची प्रसिद्धी करणें, संस्थेविषयीं कोणी आक्षेप काढल्यास त्याचें निराकरण करणें इत्यादि कामें तर ते करीतच पण संस्थेच्या अध्यापकांशीं व विद्यार्थ्यांशींही त्यांचा निकट परिचय असे. विद्यापीठाच्या सर्व विभागावर अणि विशेषतः वसतीगृहावर त्यांची देखरेख असे. कित्येक वेळां ते प्रत्यक्ष अध्यापनाचेंही काम करीत. थोडक्यांत सांगावयाचें तर लालाजी त्या संस्थेचे केवळ प्राणच होते संस्थेचें कितीही काम पडलें तरी त्यांना त्याचें कांहीं वाटत नसे. त्यांचे त्यावेळचे सहकारीही असेच जीव तोडून काम करीत. त्यांच्या उत्साहाची व परिश्रमाची कल्पना येण्यास एक गोष्ट सांगितली असतां पुरें होईल. स्थापना केल्यापासून थोड्याच वर्षांच्या अवधींत या उत्साही तरुणांच्या टोळीनें कॉलेज परिपूर्ण केलें, टोलेजंग इमारती उभारल्या व पांच लाख रुपयांचा स्थिरनिधि निर्माण केला. कोटयविधि रुपयांचें निधि जमविण्याच्या आजच्या काळांत वरील कार्य मोठेंसे वाटत

नाहीं खरें पण पंजाबसारखा शिक्षणानें मागसलेला प्रांत व तीस वर्षांपूर्वींचा काळ, त्यांतून सरकारी धोरणापासून सर्वस्वीं स्वतंत्र रीतीनें संस्था चालविण्याचा जो बाणा महाराष्ट्रांत आणि बंगाल्यांत तेथील कर्तृत्वान चालकांना अशक्य झाला, तो यांना पुकारावयाचा होता. या गोष्टी लक्ष्यांत घेतां या तरुण मंडळीच्या कार्याचें कौतुक आजहि वाटल्यावांचून राहात नाहीं. स्वतः लालाजीनींच आपल्या राष्ट्रीय शिक्षणावरील ग्रंथांत या संस्थेच्या प्रारंभीच्या कार्यकर्त्यांविषयीं जे उद्गार काढले आहेत तेच येथें दिले असतां वाचकांना उद्‌बोधक वाटतील. लालाजी ह्मणतात, “या कॉलेजच्या संस्थापकांनीं जें कार्य केलें त्याबद्दल ते खरोखरच धन्यवादास पात्र आहेत. पंजाबांतील उच्चशिक्षणांतील अडचणी त्यांनींच आयत्या वेळीं पुढें सरून नाहींशा केल्या. खरोखर पंजाबांत आज जी काहीं सार्वजनिक कामाची कळकळ दिसत आहे, तिचें सर्वश्रेय ही संस्था अस्तित्वांत आणणाऱ्यांना व ती आजवर चालविणाऱ्यानांच दिलें पाहिजे. संस्था ज्यांनीं स्थापिली ते सर्वजण लहान होते. त्यांच्यांत ‘बडा’ कोणीच नव्हता. त्यांना पैशाचें पाठबळ नव्हतें. आणि लोकांचें सहाय्य ह्मणावें तर तेंहि मोठेंसें नव्हतें. उलट त्यांच्या लहान वयांकडे पाहून आणि त्यांचे मोठमोठे बेत ऐकून पुष्कळ लोक त्यांचा उपहास करीत असत. अशा परिस्थितींत त्यांनीं संस्थेची मूळ कल्पना काढली. ती मूर्त स्वरुपाला आणिली आणि ती आर्थिक दृष्ट्या व शैक्षणिक दृष्ट्या यशस्वी करून दाखविली हा एक कादंबरींत वर्णन करून वाखाणण्याजोगाच प्रसंग ह्मटला पाहिजे.” दुसरें एके ठिकाणीं लालाजी ह्मणतात, कीं, “त्या काळाची स्मृति झाली ह्मणजे माझें हृदय आजहि आनंदानें आणि अभिमानानें फुलून जातें.”

या संस्थेच्या कामांमध्यें लालाजी इतके गढून जात असत कीं, त्यांना अनेकदां आपल्या वकिलीचा व प्रपंचाचा विसर पडत असे. व त्यामुळें त्यांच्या वडिलांकडून त्यांना ठपका मिळत असे. परंतु इतर बाबतींत वडिलांचा शब्द ह्मणजे वेदवाक्य मानणारे लजपतराय या गोष्टींविषयीं वडिलांच्या सांगण्यांकडे दुर्लक्ष करीत व त्यांचें सर्व बोलणें मुकाट्यानें ऐकून घेऊन आपला धोपटमार्ग पुनः नेटानें चालूं लागत. स्वतः लालाजींनींच याविषयीं आपल्या एका पुस्तकांत असें लिहून ठेविलें आहे कीं, “माझा सारा जन्म

म्हणजे पितृनिष्ठा व देशभक्ति यांचा निकराचा झगडा होय. मी अनेकदा या कारणावरून वडिलांना नाखूष केलें आहे. ही मधून मधून होणारी नाखुषी वगळली तर त्यांचें मजवर अत्यंत प्रेम असे. त्यांनीं माझा प्रतिपाळ एखाद्या संरक्षक देवतेप्रमाणें केला. माझ्या प्रकृतिविषयीं चिंता करून करून त्यांचे केस अकालींच पांढरे झाले होते. त्यांच्या वार्धक्याच्या काळांतहि त्यांनीं माझ्या आजारीपणांत माझी रात्रंदिवस आनंदानें शुश्रुषा करावी व माझ्या बिछान्यापासून केव्हांही दूर होऊं नये. पुष्कळांनीं माझ्या जीवाची आशा सोडली तरी ते खंबीर असत. व म्हणूनच मला अनेकदां पुनर्जन्म मिळाला. माझ्या ठिकाणीं त्यांचा इतका जीव गुंतला होता. व हा बंधच मला सर्वस्व-त्याग करून संन्यास घेण्यापासून मागें ओढीत असे. माझ्या वडिलांच्या नैतिक दृढतेमुळें व थोर चारित्र्यामुळें माझ्या मनाला धार्मिक वळण लागलें. मी वयांत आल्यापासून नेहमीं एक गोष्ट जी लक्ष्यांत ठेवित असे ती ही कीं, वडिलांचें मन दुखेल असें काहीं एक होवूं द्यावयाचें नाहीं. घरचा सर्व कार-भार त्यांच्याकडेच असे. सार्वजनिक बाबींव्यतिरिक्त त्यांचा शब्द प्रत्येक गोष्टींत मी वेदवाक्यासारखा मानीत असे. देशभक्तीचें बाळकडू माझ्या बाळपणीं त्यानींच मला पाजिलें होतें. व पुढें कित्येकदा या गोष्टींत मी अतिरेक करितो व प्रपंचाचाकडे लक्ष देत नाहीं असें वाटून ते कधीं कधीं अप्रसन्न होत असले व मजशीं अबोला धरण्यापर्यंत पाळी येत असली तरी हें बीज प्रथम त्यांनींच पेरिलें आहे या गोष्टीचा विसर मला केव्हांही पडणार नाहीं.”

हें अप्रसन्नतेचें प्रकरण एकदा अगदीं निकरावर आलें आणि त्यांच्या वडि-लांनीं त्यांना कॉलेजमधील आपल्या कामाचें त्यागपत्र द्यावयास लाविलें. तात्पुरती पित्राज्ञा मानुन लालाजींनीं काम सोडलें. व वकिलीकडे आणि प्रपं-चाकडे लक्ष देण्यास प्रारंभ केला. पण ही स्थिति फार दिवस टिकली नाहीं. कॉलेजच्या भवितव्यतेविषयीं त्यांना अहर्निश चिंता वाटूं लागली. त्यांच्या सहकाऱ्यांचीं आग्रहाचीं पत्रें येऊं लागलीं. आणि मग लालाजींना राहावेना. त्यांचें त्या संस्थेवरील प्रेमच तसें अपत्यनिर्विशेष होतें. वडिलांच्या रागालोभाची चिंता न करतां ते पुनः कॉलेजला येऊंत मिळाले. व मध्यंतरीच्या अनास्थेचें जणूं प्रायश्चितच ह्मणून प्रत्यक्ष लाहोरास संस्थेच्या शेजारींच एक छोटेंसें घर विकत घेऊन तेथें राहूं लागले. त्यांच्या इतर सार्व-

जनिक व्यापालाहि हिस्सार पेक्षां लाहोर शहर ज्यास्त अनुकूल होतें. ही गोष्ट १८९२ मध्यें घडली.

कॉलेजचा संबंध यानंतर अबाधित १५ वर्षे कायम होता. पुढें कर्झन शाहीच्या काळांत युनिव्हर्सिटी कमिशन बसून त्यानें सर्व स्वतंत्र शिक्षण संस्थांचें स्वातंत्र्य संपुष्टांत आणिलें. त्यावेळीं ही संस्थाही त्या तडाक्यांतून सुटली नाहीं. लालाजींचा राजकारणाचा व्यापहि यावेळीं फार वाढला होता. व सरकारच्या डोळ्यांत ते खुपूं लागले होतें. तेव्हां आपला संसर्ग बाधून संस्थेचें उगाच अनहित होवूं नये या बुद्धीनें आपले प्रारंभापासूनचे सहकारी आणि कॉलेजचे प्रिन्सिपाल लाला हंसराज यांचेवर संस्थेचा सर्व भार सोंपवून लालाजींनीं संस्था सोडिली.

# समाजकारण व राजकारण.

दयानंद कॉलेजमध्यें काम करीत असतांना लालाजींची इतर सार्व-जनिक कामेंही धुमधडाक्यानें चालू होतीं. आर्यसमाजाच्या कार्याव्यतिरिक्त स्थानिक व प्रांतिक सार्वजनिक कामांत ते पुष्कळ लक्ष घालीत असत. हिस्सारच्या नगर संस्थेचे ते कित्येक वर्षें कार्यवाह होते. त्याचप्रमाणें जालंदरच्या अंग्लो-संस्कृत-कॉलेजचेही ते कार्यवाह होते. आर्यसमाजानें चालविलेल्या अनेक संस्थांशीं कोठें अध्यक्ष ह्मणून तर कोठें कोपाधिकारी ह्मणून त्यांचा कांहींना कांहींतरी संबंध असेच. त्यांचे अंगीं उत्साह व कामाचा उरक विलक्षण होता. त्यामुळें सार्वदेशीय राजकारण चालविणाऱ्या राष्ट्रीय सभेपासून तें अलग राहूं शकले नाहींत. परंतु राजकारण ह्मणजे सार्वजनिक कार्य अशी मात्र त्यांची समजूत नव्हती. कांहीं तरी भरीव कार्य करावें, सेवा करावी, लोकांच्या ठिकाणीं समष्टीजीवनाचा जो अभाव आहे तो दूर करून आपल्या प्राचीन परंपरेप्रमाणें उज्वल भविष्यकाल संपादन करण्याची आकांक्षा त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न करावी व ती साध्य होण्यासाठीं अवश्य असलेली पात्रता, त्यांच्या अंगीं बाणविण्याचा शैक्षणिक व सामाजिक तसेंच धार्मिक संस्थांच्या द्वारें प्रयत्न करावा असें त्यांना वाटत असे. ह्मणून राजकारणापासून जरी ते अलग राहिले नाहींत तरी इतर अनेक क्षेत्रांमध्येंहि विधायक समाजसेवा करण्यांत त्यांचा पुष्कळ काळ जात असे. त्यांतून राष्ट्रीय सभेचें त्यावेळचें राजकारण ह्मणजे अर्ज, विनंत्या, ठराव व हें सर्व सरकारला उद्देशून करावयाचें, जनतेकडे बिलकूल पहावयाचें नाहीं अशा कांहीं चमत्कारिक स्वरुपाचें होतें. लोकांमध्यें राष्ट्रधर्माची जाणीव उत्पन्न करूं पाहणाऱ्या व विधायक कार्यामध्यें उद्दिष्टसिद्धि मानणाऱ्या लालाजींसारख्या तेजस्वी पुरुषाला उपरोक्त भिक्षांदेहीच्या राजकारणांत विशेष मन घालावेंसे वाटलें नाहीं तर त्यांत नवल नाहीं. असें होतें तरी त्यांची खरी लोकसंग्रहाची दृष्टी असल्यामुळें राष्ट्रीय सभेच्या बैठकीसही ते बहुधा नियमानें उपस्थित रहात असत. यावेळीं अर्थातच ते पुढारी ह्मणून समजले जात नव्हते, तर राष्ट्रीय सभेच्या निशाणासाठीं अत्यंत उत्साहानें काम करणारे तरुण अशी

त्यांची गणना होत असे. परंतु स्वतंत्र राजकीय कामगिरी त्यानीं त्याच वेळीं आपण होऊन अंगावर घेतली. व या कामगिरीमुळेंच त्यांचें नांव पंजाब बाहेरलि लोकांपुढें प्रथम आलें. ती कामगिरी अशीः—

पंजाबचें राजकारण तोपर्यंत एका मुसलमान पुढाऱ्याच्या हातामध्यें होतें. त्यांचें नांव सर सय्यद अहम्मद. आजच्या पानइस्लामिक चळवळीचें ते मूळ प्रवर्तक व अलीगडच्या मुसलमानी कालेजचे संस्थापक या नात्यानें त्याचें नांव आज अनेकांना माहित आहे. परंतु या चळवळी त्यांनीं आपल्या उत्तर आयुष्यामध्यें केल्या.

त्यांचें पूर्व आयुष्य यापेक्षां बाह्यतः तरी भिन्न होतें, त्याची आज कुणालाही फारशी माहिती नाहीं. पूर्व आयुष्यामध्यें राष्ट्रीय दृष्टीचे पंजाबांतील नेते या नात्यानें ते प्रसिद्ध असत. त्यांचें '**सोशल रिफॉर्मर**' नामक पत्र पंजाबांत लोकजागृति करण्याला पुष्कळच उपयोगी पडलें. १८५७ च्या क्रांतियुद्धांत जे मुसलमान राष्ट्रीय वृत्तीनें हिंदूंच्या हाताशीं हात मिळवून हिंदुस्थानच्या स्वराज्याकरितां इंग्रजाशीं लढले, त्यांची विचारसरणी ह्मणजे हिंदुस्थानांतलि हिंदूंचें व मुसलमानांचें हितसंबंध एक आहेत अशी होती. व तीच समजूत तत्कालीन मुसलमानसमाजाची साधारणतः होती. **सोशलरिफॉर्मर** मधून सर सय्यद अहम्मद त्याच विचारांचा फैलाव करीत असत व पंजाबांतलि लालाजींच्या पिढीचे ते एका अर्थी राजकीय गुरु होते. परंतु पुढें उत्तर आयुष्यांत त्यांचें धोरण बदललें. इंग्रज सरकारच्या 'फोडा व झोडा' या कुटनीतीला त्यांच्या या मतपरिवर्तनानें विशेष साह्य मिळालें. ते आपल्या जातिबांधवांना असें शिकवूं लागलें कीं, हिंदूंचें हितसंबंध व तुमचे हितसंबंध वेगळे वेगळे आहेत. त्यांच्या हितांत तुमचें हित नाहीं. हिंदूलोक शिक्षणांत पुढारलेले असून तुह्मीं अत्यंत अडाणी अहांत अर्थात राष्ट्रीय सभेच्या मागणीनुरुप सरकारनें कांहीं आधिकार दिल्यास ते सगळे हिंदूंच्याच पदरांत पडतलि व तुमची हानि होईल. ह्मणून राष्ट्रीय सभेच्या भानगडींत न पडतां व सरकारशीं विरोधाचा प्रसंग न येऊं देतां तुह्मीं आपल्या समाजाची शैक्षणिक व इतर दृष्टीनें उन्नती करण्याच्या प्रयत्नास लागा. त्यांनीं स्वतः अलीगड कॉलिजची स्थापना करून या धोरणाचा भक्कम पाया घातला व भेदनीतीला

यतेमुळें त्यांना इहलोकीं जगांत मान नाहीं व परलोकांतहि थारा मिळणार नाहीं. आजच्या पाश्चिमात्य शिक्षणानें वा गीतेच्या संदेशानें ते जर जागे झाले नाहींत व खोट्या कल्पना उराशीं कवटाळून बसले, तर त्यांच्या उन्नतीविषयीं निराशच व्हावें लागेल. आपल्या इतिहासाच्या पुस्तकांत तर हिंदुजातीच्या उत्कर्षापकर्षाचा विचार पुष्कळच सूक्ष्म रीतीनें केलेला आहे. आपल्या प्राचीन कालाविषयीं ते लिहितात, "आजच्या नवशिक्षित तरुणांना जातीय इतिहासांचें ज्ञान फार थोडें असतें, व जें असतें तें विपर्यस्त असतें. वेद किती आहेत व त्यांचा सांप्रतच्या धर्माशीं कितीसा संबंध आहे हें त्यांना माहित नसतें. आमच्यांतील अनेक चाली-रीती खुळेपणाच्या आहेत असें समजून तरुण लोक त्यांचीं टर उडवितात. त्या चालीरीतींचें मूळरुप जर त्यांना कळेल तर त्यांनीं अशी टर न उडवितां त्यांच्यांत वर्तमानकाळाला योग्य तितकें परिवर्तन करून ते त्यापासून लाभ करून घेतील. पुष्कळ काळ गेल्यामुळें आमच्या समाजांत अनेक दोष शिरलेले आहेत ही गोष्ट खरी. परंतु प्राचीन इतिहासाचें यथार्थ ज्ञान लोकांत पसरेल तर हे आगंतुक दोष आह्माला अविलंबेच दूर करतां येतील यांत शंका नाहीं."

हीं सर्व पुस्तकें लालाजींनीं उर्दूमध्यें कां लिहिलीं याविषयीं थोडे स्पष्टी-करण केलें पाहिजे. एकतर लालाजींच्या पुस्तकांचीं भाषा उर्दु आहे असें ह्मणण्यापेक्षां केवळ लिपी उर्दु आहे. भाषा साधारणतः हिंदीच आहे आणि ही उर्दु लिपी तरी स्विकारण्याचें कारण एवढेंच कीं, त्यावेळच्या पंजाबी हिंदूंना नागरी लिपी अवगत नव्हती. सातआठ शतकें मुसलमानी अम्मल तेथें गाजत होता. यामुळें सर्वजण उर्दु लिपीच जाणत. सरकारी कामकाज सर्व उर्दुमध्येंच होई व शाळेंतून उर्दु लिपीच शिकविली जात असे. स्वतः लालाजींना लॉ कॉलेजमध्यें प्रवेश करीपर्यंत व हिंदी–उर्दुच्या झगड्यांत हिंदीचा पक्ष घेईपर्यंत देवनागरी लिपीचा गंध नव्हता. पुढें प्रयत्नानें ती त्यांनीं हस्तगत केली. व सुबोध हिंदी उर्दु लिपींत लिहिण्याचा त्यांनीं परिपाठ पाडला. हिंदूसंस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचें यापुढें देवनागरीचा प्रचार हें एक त्यांनीं अंगच ठरविलें व त्याप्रमाणें आज पंजाबांत देवनागरी लिपी अनेकांना समजतें. १८९६ मध्यें हिंदुस्थानांत अतीशय मोठा दुष्काळ

पडला त्यामुळें लालाजींचें लक्ष तिकडे वेधलें. या दुष्काळांत एकट्या राजपुताऱ्यांतून ७० हजार अर्भकें ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या हातांत सांपडलीं. सर्व साधारण लोकांच्या दैनेला तर पारावारच उरला नाहीं. यामुळें यानंतर चारपांच वर्षेपर्यंत लालाजींनीं आपलें सर्व लक्ष दुष्काळपीडितांना साह्य करण्याकडे लाविलें. आर्यसमाजाचें एक अंग या नात्यानें या पूर्वीही ते अनाथालयें स्थापन करीत असत व उत्तर हिंदुस्थानांतील जें सर्वांत प्रचंड अनाथालय फिरोजपूर येथ आर्यसमाजानें चालविलेलें होतें, त्याच्या कार्यवाहाचें काम लालाजींनीं अनेक वर्षें केलें होतें. या अनाथालयांत जवळ जवळ दोन हजार अनाथांची सोय होत असे. अशा रितीनें या कामाचा पूर्वीपासून त्यांना अनुभव असल्यामुळें त्या भयंकर दुष्काळांत जिकडेतिकडे अनाथालयांचें एक जाळेंच त्यांनीं निर्माण केलें. केवळ पंजाबांतच नव्हे तर युक्तप्रांत, मध्यहिंदुस्थान बंगाल राजपुताना येथपर्यंत त्यांच्या कामाचा व्याप पोहोंचला. लक्षावधी लोकांना अन्नवस्त्राचे साह्य त्यांनीं पोंचविलें व विशेषतः स्त्रियांना आणि मुलांना परधर्मियांच्या कचाट्यांतून सोडविलें. आर्यसमाजाच्या वतीनें त्यांनीं पुष्कळ पीडितासाठीं एक निधी उभारला; व त्याद्वारें अत्यंत थोड्या काळांत लाखों रुपयांचा निधि गोळा करून त्यांनीं तांतडीन लोकांना साह्य केलें. अनेक संस्थांचे ते स्वतः कार्यवाह असत व कित्येकदां प्रत्यक्ष देखरेखीचेंही काम त्यांच्यावर पडत असे. या काळांत त्यांना परिश्रम अतीशय झाले प्रवास फार करावा लागला, या दगदगीनें त्यांची प्रकृती बिघडली. डॉक्टरांनीं एकवार विलायतेस जाऊन या ह्मणून सल्ला दिला. पण जाग्यावर उभे राहून काम करवतें आहे तोंपर्यंत कार्यक्षेत्रांतून हटावयाचें नाहीं असा त्यांचा निश्चय होता. त्याप्रमाणें सतत ५ वर्षें त्यांनीं हें कार्य चालू ठेविलें. या कामगिरीनें सारा पंजाब त्यांच्या कीर्तिरवानें भरून गेला. खेडयांपाडयांमधून हजारों लाखो लोक त्यांना आपले मायबाप समजूं लागले. या वाढत्या लौकिकाबरोबरच सरकारची वक्रदृष्टि त्यांजकडे वळूं लागली. ख्रिस्ती मिशनऱ्यांचे कुटिल प्रयत्न जागजागीं हाणून पाडून धर्म भ्रष्टतेच्या जाळयांत फसणारीं हजारों माणसें त्यांनीं वाचविलीं होतीं. याचा स्वाभाविक परिणाम होऊन ते स्वतः व आर्यसमाज मिशनऱ्यांच्या डोळयांत खुपूं लागला; या मिशनरींचें सरकारांत पुष्कळ वजन असल्यामुळें

मिशनरींचा कोप त्यांना एका ना एका प्रकारें जाणवूं लागला, पण लालाजींनीं असल्या गोष्टींना भीक न घालतां आपलें व्रत अखंड चालूंच ठेविलें. १९०१-१९०२ सालीं दुष्काळांची चौकशी करण्याकरितां व त्यावर उपाय सुचविण्या-करितां सरकारनें एक कमिशन नेमलें होतें. त्यापुढें लालाजींची जी महत्वपूर्ण साक्ष झाली त्यावरून त्यांचा सडेतोडपणा व दुष्काळांतील कामाचा त्यांचा अनु-भव सर्वांना कळून आला. त्यांनीं य बाबतींतील सरकारच्या धोरणावर सणसणीत टीका केली, व मिशनऱ्यांचीं शेंकडों कुलंगडीं बाहेर आणलीं. दुष्काळ कां पडतात? याची साधार चर्चा करून हें सगळें सरकारच्या रयतेला पिळून घेण्याच्या धोरणाचें फळ आहे असें स्पष्ट सांगितलें. व शेवटीं पुनः सांगितलें कीं, "दुष्काळपीडितांना साह्य करण्यांत सरकार दिरंगाई लाविते व पुढें साह्य करतांनाही अंगचोरपणा दाखविते. याचा हेतु मिशनऱ्यांच्या ख्रिस्ती मतप्रसारास अप्रत्यक्ष साह्य करण्याचाच असतो. पण याचा परिणाम चांगला होणार नाहीं. मतप्रसाराचा हा सरळ मार्ग नव्हे. लोकीं असले जुलूम कधींच सहन करणार नाहींत." या साक्षीचा कमिशनवर चांगला परिणाम झाला व त्यांना आपल्या प्रतिवृत्तांत 'हिंदू अनाथ मुलें दुष्काळ-अधिकाऱ्यांना सांपडल्यास तीं मिशनरींना देण्यापूर्वी त्यांना ठेवून घेण्यास कोणी हिंदु पालक सिद्ध आहे कीं नाहीं याची चौकशी अवश्य करण्यांत यावी' अशी सूचना लिहून ठेवणें भाग पडलें. तिला सरकारनें केराची टोपली दाखविली हा भाग वेगळा.

दुष्काळ कामांतून मोकळे झाल्यानंतर लालाजी राष्ट्रीय सभेच्या राज-कारणांत विशेष मन घालूं लागले. या काळापर्यंत राष्ट्रीय सभेनें भिक्षांदेहीचाच मार्ग चालविला होता. परंतु यावेळीं लॉर्ड कर्झनसारखा अरेराव हिंदुस्थानचा कारभार पहात होता. त्यानें एकामागून एक जी दांडगाईचीं कृत्यें चालविलीं, त्यामुळें पुष्कळ लोकांच्या मनांत अर्जाविनंत्यापेक्षां कांहीं वेगळ्या मार्गानें चळवळ चालवावी, असें वाटूं लागलें होतें. लोकांना मोठा पेंच पडला होता. लोकांना जें जें हवेसें वाटे तें तें नेमकें लॉर्डकर्झनच्या दृष्टीला वावडें वाटत असे. त्यामुळें राष्ट्रीय सभेंतच दोन विचारपरंपरा निर्माण झाल्या. एका पक्षाला वाटे हीं जुलमाची कहाणी इंग्लंडांतील लोकांना कळवावी म्हणजे ते याचा परिहार करतील. दुसऱ्या पक्षाचा सगळा भर स्वावलंबनावर होता. दुसऱ्यांनीं देऊन आपल्याला स्वराज्य मिळणार

नाहीं. त्यासाठीं आपल्याला झगडा करावा लागेल, कष्ट सोसावे लागतील, शिस्त शिकावी लागेल व स्वतःच्या पायावर उभें राहून संघटित प्रयत्न करावे लागतील.

या तेजस्वी विचारसरणीचा लालाजींनीं पुरस्कार केला, व राष्ट्रीय सभेला असा कांहीं तेजस्वी व स्वावलंबी कार्यक्रम स्वीकारावयास लावावा म्हणून ते प्रयत्न करूं लागले. १९०४ मध्यें मुंबईला राष्ट्रीय सभेची बैठक झाली. येथें लालाजींना आपल्या प्रयत्नांत यश आलें नाहीं. पण त्यांनीं झगडून झगडून पुढील यशाचा मार्ग मात्र सोपा करून ठेविला. मुंबईचे सिंह म्हणून प्रख्यात असलेले फिरोजशहा मेथा यांच्याशीं राष्ट्रीय सभेच्या संबधीं त्यांची झटापट उडाली. मेथाजी मोठे वैशिष्ठ्ययुक्त पुरुष होते. ते अनेकदां नुसत्या हंसण्यानें प्रतिपक्षाला उडवून देत. कोटिक्रम करूं बसले म्हणजे सामनेवाल्याची तर राळ उडून जात असे. याही वेळीं त्यांनीं असेंच केलें. आपली बाजू म्हणून कांहीं विशेष न मांडतां त्यांनीं नुसता ठराव वाचून दाखविला व "कोठें आहेत ते याला विरोध करणारे लजपतराय?" अशी गर्जना केली. तात्काळ लालाजी पुढें आले, व खणखणीत आवाजांत १५ मिनिटेंपर्यंत त्यांनीं असें कांहीं साधार व वक्तृत्वपूर्ण भाषण केलें कीं, मेथाजी गारच होऊन गेले. तेवढ्या विधेयापुरता त्या सभेंत त्यांना पराभवच स्वीकारावा लागला! मुंबईच्या सिंहाला समोरासमोर रणांगणांत नव्हें तरी सभांगणांत दोन हात करून नामोहरम् केल्यावरच बहुधा लालाजींनां 'पंजाबचा सिंह' ही पदवी मिळाली असावी! याच बैठकींत जुनाट पक्षानें विलायतेंत एक शिष्टमंडळ पाठवून लॉर्ड कर्झनच्या अरेरावी कृत्यांचें गाऱ्हाणें इंग्लंडांतील लोकांना सांगण्याचा व अन्यायाची दाद लावून घेणाचा एक ठराव केला. या ठरावानुसार नुकतेंच या बैठकींत सर्वांवर छाप टाकून चमकूं लागलेले लाला लजपतराय शिष्टमंडळांत कै. गोखले यांचेबरोबर नेमले गेले.

लालाजींनीं हें काम मोठ्या आनंदानें पत्करलें. त्यांना प्रकृतिसाठीं युरोपची थंड हवा खाऊन येण्याची जरूर होतीच. पुनः युरोपांत जाऊन तेथील निरनिराळ्या संस्था पहाव्या, शिक्षण, समाजसेवा, राजकारण, इत्यादि

कार्यें अवलोकन करावीं युरोपियन लोकांच्या एकंदर चरित्राचा व चारित्र्याचा अभ्यास करावा व त्यापासून आपल्याला लाभ करून घ्यावा अशीही त्यांची इच्छा होती. तो योग यावेळीं सहजच आला व ते विलायतेस जावयास निघाले. त्यांच्या प्रवासादि व्ययाकरितां पंजाब असोसिएशननें तीन हजार रुपये संमत केले. पण त्यांनीं त्यांतील कवडीही स्वतः घेतली नाहीं. आपल्या नेहमींच्या उदार स्वभावानुरूप त्यांनीं तो सर्व पैसा विद्यार्थ्यांसाठीं व्ययीं घातला.

विलायतेंत त्यांनीं आपल्यावर सोंपविलेली कामगिरी अतिशय चोखपणें पार पाडली. तेथील जनतेपुढें हिंदुस्थानची दुःखें व लॉर्ड कर्झन यांचीं एकेक अरेरावी कृत्यें अशा कांहीं वक्तृत्वपूर्ण जोरदार भाषेंत मांडलीं कीं, त्यांच्या व्याख्यानांतील शब्दाशब्दाकडे येथील नोकरशाही कान टवकारून पाहूं लागली. अर्थात् या जोरदार शिष्टाईचा उपयोग जो व्हावयाचा तोच झाला. सर्व शिष्टाई अरण्यरुदनाप्रमाणें फोल ठरली, व लालाजींचे पूर्वींचें जें मत होतें कीं, आपली दाद आपल्या कर्तृत्वशक्तीकडे जावून घेतली पाहिजे त्यासाठीं दुसऱ्यावर अवलंबून राहण्यांत कांहीं अर्थ नाहीं तें या इंग्लंडांतील फेरीनें अधिकच दृढ झालें.

विलायतेमधून आपल्या पूर्व संकल्पानुसार लालाजी युरोपांतील कित्येक देशांत हिंडले व अमेरिकेचीही त्यांनीं यात्रा केली. पण रात्र थोडी व सोंगें फार असा त्यांना अनुभव आला. पाश्चिमात्य समाजाचें चरित्र व चारित्र्य मनाजोगें अभ्यासावयाला निदान वर्ष दोन वर्षें हवींत, असल्या धावत्या फेरीनें तें काम जमावयाचें नाहीं असें त्यांना आढळून आलें व ते पुनः विलायतेस येऊन गोखल्यांना मिळाले व त्यांच्या बरोबर देशीं परत आले. स्वदेशबंधूंपुढें त्यांनीं या प्रवासाची माहिती वर्णिली व सांगितलें कीं, "इंग्रज लोक आपल्या घरच्या कामांत चूर आहेत. त्यांना तुमच्याकडे पाहण्याला वेळ नाहीं. तिकडील वर्तमानपत्रें तुमची बाजू मांडावयाला व तेथील जनता तुमचीं व्याख्यानें ऐकून घ्यावयाला सिद्ध नाहीं. अँग्लो इंडियन लोकांनीं विलायतेंत जो जम बसवून ठेविला आहे व हिंदुस्थानाविषयीं जो प्रतिकूल ग्रह सर्व लोकांचा करून दिला आहे तो दूर करावयास राष्ट्रीय सभेचे उद्योग अतीशय अपुरे पडतात. तेव्हां मला तुह्मांला सांगावयाचें आहे तें हें कीं स्वदेशाविषयीं कांहीं आस्था वाटत असेल तर व्याख्यानांनीं नव्हे तर कृतीनें ती सिद्ध करा व स्वावलंबनाची कास धरून पुढें पाऊल टाका."

# वंगभंग आणि हद्दपारी.

या वेळीं हिंदुस्थानच्या राजकारणांत जें एक नवीन मन्वंतर सुरू झालें होतें, व लॉर्डकर्झन यांच्या अरेरावी राज्यकारभारामुळें लोकांत असंतोष माजून राष्ट्रीय सभेंतही दोन तटें पडूं पहात होते. यासंबधाचें दिग्दर्शन मागील प्रकरणांत केलेंच आहे. आपल्या जुलमी कारकीर्दीचा शेवट बंगालचे दोन तुकडे करून करण्याचा लॉर्डकर्झन यांचा निश्चय यावेळीं प्रसिद्ध झाला. याला वरवरचें कारण असें देण्यांत आलें होतें कीं, बंगाल प्रांत फार मोठा व राज्यकारभार करावयाला गैरसोयीचा होता म्हणून ही नवीन व्यवस्था केली पण खरें अंतस्थ कारण म्हणजे बंगाल्यांतील मुसलमानांना खुष करून त्यांद्वारें बंगाली लोकांच्या वाढत्या राष्ट्रीय आकांक्षेला पायबंद घालणें हा होता. मुसलमान ही आमची लाडकी बिबी आहे असें बंगालच्या गव्हर्नरानें स्पष्ट बोलूनहि दाखविलें होतें !

बंगाली लोक जात्याच भावनाशील. त्यांना आपल्या मातृभूमीचे दोन तुकडे होणार ही गोष्ट बिलकुल रुचली नाहीं. त्यांच्या ठिकाणीं राष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न होऊं लागली होती, व ती निरनिराळ्या मार्गांनीं प्रकट होत होती. लॉर्डकर्झननें आपल्या घमेंडींत बंगालच्या चळवळींना हवेच्या फुग्याची उपमा देऊन बंगाली लोकांवर पौरुषहीनत्वाचा आरोप करून व कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या पदवीदान समारंभाचे प्रसंगीं तर साऱ्या पौर्वात्यांना लबाड ठरवून राष्ट्रीय चळवळ्यांना डंवचलें. तशांतच लोकांच्या इच्छेविरुद्ध बंगालचे दोन तुकडे करण्याच्या कुटिल व जुलमी कृत्याची भर पडली. तात्काळ बंगालचा सुप्त अभिमान खडबडून जागा झाला, व ही योजना उडवून देऊन लॉर्डकर्झनचा नकशा उतरवावयाचा असा त्यांनीं निश्चय केला. सर्व बंगालभर निषेधपर सभा, जळजळीत व्याख्यानें, प्रचंड मिरवणुकी, वजनदार शिष्टमंडळें, योजनेविरुद्ध लाखो लोकांच्या सह्यांचे अर्ज अशी एकच अभूतपूर्व लाट उसळली. परंतु कर्झनच्या सरकारनें तिकडे लक्ष दिलें नाहीं. १६ ऑक्टोबर १९०५ या दिवशीं शेवटी बंगालची फाळणी

करण्याचा ठराव अंमलांत आलाच. तो दिवस बंगालनें पूर्व पश्चिम बंगाल्यांतील लोकांनीं—सुतकासारखा पाळला. त्या दिवशीं कोणाच्या येथें चूल पेटली नाहीं. लोकांनीं उघड्या बोडक्यानें जमावानिशीं नदीवर जाऊन स्नानें केलीं व परस्परांच्या हातावर देशबंधुत्वदर्शक राख्या बांधल्या. एवढेंच करून बंगाली लोक थांबले नाहींत. आपल्या चळवळींनीं सरकारला नुसत भंडावून सोडावयाचें, असा त्यांनीं निश्चय केला. स्वदेशीच्या योगानें स्वावलंबन तर बहिष्काराच्या योगानें परकीय सरकारचे डोळ्यांत झणझणीत अंजन पांचवावयाचें; राष्ट्रीय शिक्षणाचे योगानें तरुणांची संघटना करावयाची व तिच्या बळावर स्वतंत्र राज्ययंत्रच एकाप्रकारें निर्माण करून इंग्रज सरकारचें अस्तित्व नाकारावयाचें, त्यांचे कायदे व कोर्टें मानावयाचीं नाहींत व शेवटीं त्यांना करही द्यावयाचे नाहींत असा अत्यंत तेजस्वी आणि व्यापक कार्यक्रम त्यांनीं आंखला; व त्यांतील पहिल्या दोन तीन पायऱ्या ते झपाट्यानें ओलंडावयाला लागले.

बंगालच्या या चळवळीला अर्थात हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांचा कमी अधिक पाठिंबा होता. राष्ट्रीय सभेंतील तरुणपक्षानें तो सर्वस्वीं मान्य केला व १९०५ सालीं काशी येथें भरणाऱ्या राष्ट्रीय सभेंत तो संमत करून घ्यावा या बुद्धीनें जोराची खटपट सुरू झाली. त्या अधिवेशनाचे अध्यक्ष कै० माननीय गोखले होते. त्यांचे अध्यक्षीय भाषण अत्यंत स्फूर्तिदायक व विचारप्रवर्तक असें होतें. स्वदेशी बहिष्काराची चळवळ हें राजकारणांत वापरण्याजोगें एक कायदेशीर शस्त्र आहे असें त्यांनीं घोषित केलें. पण बैटकीच्या कामाला सुरवात होतांच जुनापक्ष आपलाच हेका धरून बसला. त्यावेळीं युवराज हिंदुस्थानात यावयाचे होते. त्यांच्या स्वागताचा ठराव विषयनियामक कमिटीपुढें आला असतांना तरुण पक्षातर्फे लालाजींनीं त्याला निकराचा विरोध केला. व तरुण बंगाली तर आह्मीं या ठरावाला भर सभेंत विरोध करूं अशी धमकी देऊं लागले. त्यांची समजूत करतां करतां जुने पुढारी थकले. राष्ट्रीय सभेंत दुफळी व्हावी ही गोष्ट सर्वांनाच अनिष्ट वाटत होती. शेवटीं तडजोड झाली. स्वागताच्या ठरावावर तरुण पक्षानें माघार घेतली—तरी बंगालचे तरुण लोक ठरावाचे वेळीं सभेंतून उठून गेलेच—तेव्हां जुन्या पक्षानें स्वदेशी बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण इत्यादिवरील ठरावांना

मान्यता देऊन एकाप्रकारें तरुण पक्षाचा विजयच कबूल केला. पण या सभेपुढचा सर्वांत महत्वाचा व एकमतानें संमत झालेला ठराव ह्मणजे वंगभंगाच्या निषेधाचा. त्या ठरावावर सर्वच वक्त्यांचीं भाषणें अतीशय जोरदार, ओजस्वी आणि भावनोद्दीपक झाली.

लाला लजपतराय यांच्या या वेळच्या भाषणांतील कांहीं भाग पुढें दिला आहे त्यावरून त्यांच्या समग्र भाषणाची कल्पना येईल. " आपल्या वंगीय बंधूवर जो अन्याय झाला तो सर्वांना माहीतच आहे. पण मला याबद्दल वाईट वाटत नाहीं. मला त्यांचें अभिनंदन करावेसें वाटतें. कां कीं, देशामध्यें तेजस्वी चळवळीचें युग प्रारंभित करण्याची सुवर्णसंधि देवदयेनें या ठरावांचे रूपानें त्यांना लाधली आहे. इंग्लंडमध्यें जेव्हां सरकार एकादा जुलूम करते व लोकाना त्याची दाद लावून घ्यावयाची असते तेव्हां ते कोणत्या रीतीनें चळवळ करतात तें मीं तुह्मांला सांगतो, ते शांततापूर्वक कायदेभंग करतात, सरकारचें अस्तित्व ते नाकारूं लागतात," "इंग्लंडांतील लोकांनीं माझ्या द्वारां तुह्मांला जो संदेश पाठविला आहे तोही असाच आहे कीं, तुह्मांला बोलतांना, चळवळ करतांना व स्वातंत्र्याचा झगडा चालवितांना आजच्या पेक्षां अधिक पौरुषाचा आणि स्वावलंबनाचा परिचय करून दिला पाहिजे.... ....आत्मबलिदानाचें प्रखर दिव्य आचरून स्वातंत्र्यदेवीचे पुजारी होण्याची पात्रता तुह्मीं आपल्या ठिकाणीं आणली पाहिजे. स्वातंत्र्यदेवता हें मोठें कडक दैवत आहे. मोठें सोवळें दैवत आहे, त्याचें दर्शन स्वार्थाचा लेशही अंतःकरणांत आहे तोंवर घडावयाचें नाहीं.......सरकारनें हें लक्षांत ठेवावें व देशबांधहो तुह्मीं सुद्धां ही गोष्ट विसरूं नका कीं, आज आमच्यांत जी जागृति आली आहे ती आतां केव्हांही नष्ट व्हावयाची नाहीं. आपल्या न्याय्य हक्कांपासून क्षणभरही वंचित करणाऱ्या सरकारचा मी धिःकार करतो. मग तें सरकार जगाच्या पाठीवरील कोणत्याही देशावर असो व स्वतःला कितीही सुधारलेलें समजत असो.... ....मला आणखी एकच गोष्ट सांगावयाची आहे ती ही की, तुह्मीं ज्याअर्थीं हा पौरुषाचा मार्ग स्विकारला आहे त्याअर्थीं त्याचा अवश्यंभावी परिणाम जें स्वातंत्र्याच्या वेदविरील बलिदान त्याला सिद्ध असा. हें सतीचें वाण एकदां उचललें आहे तर त्याला शोभेस

वर्तन शेवटपर्यंत करा. ही राष्ट्रीय सभा आज २१ वर्षे चालू आहे. एवढ्या काळांत देशासाठीं सर्वस्वावर तिलांजली देऊन फकिरी स्वीकारणारे व लोकांना स्वातंत्र्याचा मार्ग दाखवून तो आक्रमण करावयास लावणारे दृढनिश्चयी वीर आमच्यांतून कांहीं थोडेसुद्धां उत्पन्न होऊं नयेत ही किती लज्जेची गोष्ट आहे ? असो. आतां जरी सावध आपण होऊं आणि आह्मीं आमच्या ध्येयापालनापासून कांहीं झालें तरी–विचलित होणार नाहीं, असें जर सरकारला दाखवून देऊं तर माझी निश्चिती आहे कीं, आपल्या प्रगतीला अडथळा करण्याचें सामर्थ्य जगांतील कोणत्याही सरकारला नाहीं.

काशी येथील राष्ट्र सभेचें काम आटोपून लालाजी पंजाबांत गेले. व स्वदेशी बहिष्काराचा प्रसार त्यांनीं तिकडे नेटानें चालविला. पण वंगभंगाचे व तज्जन्य चळवळीचें कारण पंजाबांत लोकक्षोभ होण्याला अपुरें वाटूनच कीं काय, त्या वेळच्या पंजाब सरकारनेंही लॉर्डकर्झनचें अनुकरण करून एकामागून एक जुलमी कृत्यांची परंपराच निर्माण करण्याचें व्रत अंगिकारलें होतें. त्यामुळें पंजाबी लोकांना अखिल भारतीय चळवळीकडे लक्ष देतां आलें नाहीं. अन्यायी कृत्यांची परंपरा पंजाबांतील सिव्हिल आणि मिलिटरी गॅझिट पत्रांत ‘ Signs of the Times ’ नामक लेख मालेनें झाली. या लेखांत सर्व राजकीय चळवळीवर भयंकर कोरडे उडविले असून अत्यंत भेदक भाषेंत सरकारला ही चळवळ दडपून टाकण्याचें सुचविलें होतें. हे लेख ह्मणजे सरकारी धोरणाची पूर्वसूचनाच होती. सरकार लोकपक्षावर आघात करण्याची संधी शोधूं लागले. पुष्कळ वर्षांपासून लाला लजपतराय त्यांच्या डोळ्यांत खुपत होते. त्यांच्यावर एखादें किटाळ आणावयाचें व त्या अनुषंगानें पंजाबांतील यच्चयावत् राजकीय चळवळ निर्मूल करून टाकावयाची असा अधिकाऱ्यांनीं डाव योजिला. पहिले छट लालाजींच्या मालकीचें नसलें तरी लालाजींच्या धोरणानें चालणारें ‘पंजाबी’ नामक पत्र सरकारच्या क्रोधाला बळी पडलें. एका युरोपियन अधिकाऱ्यानें शिकारीस जाऊन मारलेले डुक्कर बरोबरच्या मुसलमान नोकरानें घरीं उचलून न्यावयाचें धर्मविषयक समजुतीनें नाकारतांच त्यास गोळी घालून ठार केलें. या प्रकरणावर टीका केल्याबद्दल पंजाबी पत्राच्या संपादकाला व प्रकाशकाला सहा सहा महिन्याची शिक्षा ठोठाविली गेली. पण

लोकपक्षाविरुद्ध निराधार जहरी टीकेचें गरळ आठवड्याच्या आठवड्यास आक-णाऱ्या सिव्हिल अँड मिलिटरी गॅझिटच्या संपादकास मात्र 'फिरून असें करतां कामा नये' असली भयंकर सूचना देऊन सोडून देण्यांत आलें. या गोष्टीनें लोकांत मोठी खळबळ उडाली. त्या पिढीचे लोक आजच्या सारखे निगरगट्ट बनले नव्हते. सरकारच्या न्याय बुद्धीवर त्यांचा विश्वास होता व त्यामुळें असलें एखादें अन्यायाचें कृत्य घडतांच ते क्षुब्ध होऊन जात. पण या वेळीं त्यांच्या क्षोभाची पर्वा न करण्याचें सरकारनें ठरविलें होतें. लोकां-च्या चळवळीला तेज चढावें असाच जणुं सरकारचा हेतु होता. ह्मणून या एकाच वर्षांत सरकारनें कॉलन्यासंबंधीं कायदा, जमिनी विकण्याचा कायदा, कालव्याची पाणीपट्टी वाढविण्याविषयीं कायदा, रावळपिंडी जिल्ह्यांत जमीन महसुलाची अतोनात वाढ करणारा कायदा असे एकामागून एक प्रजापीडक कायदे अस्तित्वांत आणले. तशांत पंजाबांतील अनेक भागांत प्लेगचा प्रादुर्भाव झाला व त्या व्यवस्थेविषयींच्या जुलमाची भर पडली. अर्थात् परिणाम जो व्हावयाचा तोच झाला. लोक अगदीं खवळून गेले. सर्व जनता खालच्य तळापासून तों वरिष्ठ वर्गापर्यंत हलून गेली. हजारों लोकांच्या श्रोतृसमु-दायापुढें पुढाऱ्यांचीं भाषणें होऊन उपरोक्त जुलमी कायदे नाहींसे करण्या-विषयीं हजारों लोकांच्या सह्यांचे अर्ज सरकारकडे जाऊं लागले. पंजाबां-तील सेनाविभागांत ज्या वर्गांतून मुख्यतः भरती होते त्या वर्गांत सदरील कायद्यामुळें अतिशय असंतोष पसरला व त्याची धग लागून पंजाबच्या लष्करामध्यें खळबळ माजली. सर्वत्र सरकारला वठणीवर आणण्याकरितां व जुलमी कायदे मागें घेण्यास लावण्याकरितां स्वदेशीची आणि बहिष्काराची कास लोकांनीं धरली. अर्थात् या सर्व गोष्टी सरकारी अधिकाऱ्यांना खप-ल्या नाहींत. आपल्या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणाची हुकुमत लोकांवर चालावी, त्यांच्या इच्छेप्रमाणें लोकांनीं चळवळी कराव्या आणि आपण सर्व सत्ताधारी असतांना आपली अडवणूक करून आणि वेळीं आपलें अस्तित्वही नाकारण्याची धमकी देऊन लोकांनीं सरकारला वाकविण्याची उमेद बाळ-गावी. ही गोष्ट जुलमी अरेरावी अधिकाऱ्यांना खरोखरच खपण्यासारखी नाहीं. अर्थात् पंजाब सरकारनें दडपशाहीचें शस्त्र उचललें व त्याचें समर्थन ह्मणून सर्व लोकक्षोभाची जबाबदारी लाला लजपतराय आदि पुढाऱ्यांवर

टाकली. तेव्हां लालाजींनीं "तुमच्या जुलमी कायद्यामुळेंच लोक खवळले आहेत. जुलमी कायदे मागें घ्या कीं लोक आतां शांत होतील." असें स्पष्टपणें बजावले. त्याचा अर्थ सरकारनें उलटा केला. लोकक्षोभाचे जनक हे पुढारीच आहेत असें त्यांनीं ठरविलें. सरकारी अधिकाऱ्याचा पक्ष घेऊन लोकपक्षाला दोषी ठरविण्याचें काम अँग्लो इंडियनी पत्रें अर्थातच चोखपणें बजावीत होतीं. त्यानीं नाहीं नाहीं त्या बाष्कळ गोष्टी लिहाव्या आणि भरमसाट विधानें करावीं. एकानें हूल उठाविली कीं, लाला लजपतराय आणि सरदार अजीतसिंग यांच्या जवळ हजारो तरुणांची फौज आहे आणि तिच्या बळावर ते पंजाबांत बंड करणार आहेत. दुसऱ्यानें लिहिलें देशी सैन्यही या लोकांनीं फितवून आपल्या बाजूचें करून ठेविलें आहे. तिसऱ्याची बुद्धी याहीपेक्षां अधिक तरळ होती. त्यानें लाला लजपतराय काबूलच्या अमीराशीं संगनमत करून त्याला हिंदुस्थानावर स्वारी करावयाला चिथवीत आहेत असें तर्कट उठविलें. तितक्यांत एकानें अगदीं नक्की बातमी अशी प्रसिद्ध केली कीं, हें भयंकर बंड, १८५७ चें क्रांतियुद्ध झालें त्याच्या अर्ध शतसांवत्सरिक उत्सवाच्या दिवशीं ह्मणजे १० मे १९०७ या दिवशीं व्हावयाचें आहे!

इतकी नक्की बातमी उठवल्यावर मग सरकारी अधिकाऱ्यांना कायद्याची कलमें पाहावयाला अवकाश कोठें होता आणि उघड चौकशी करण्याचा मूर्खपणा तरी त्यांनीं काय ह्मणून करावा? लालाजींना मात्र अर्थातच या बंडाची वार्ताही नव्हती. ते शांतपणें सर्वत्र हिंडून सरकारच्या जुलमी कायद्यांविरुद्ध लोकांची दाद लावून घेण्याचा प्रयत्न करीत होते. इतक्यांत रावळपिंडीस धरपकड झाली व त्यात त्यांचे स्नेही सांपडले. ह्मणून ते तेथें गेले. कोर्टांत जाऊन पाहतात तो हा अपूर्व खटला पाहण्याची लोकांची अतोनात गर्दी उडालेली. पण त्यादिवशीं खटला चाललाच नाहीं. लोक परत घरीं गेले. वाटेनें पोलिसांच्या चिथावणीवरून थोडा दंगा झाला. सायंकाळीं सार्वजनिक सभेंत लालाजींचें भाषण व्हावयाचें ठरलें होतें ती सभा डेप्युटी कमिशनरनें पोलिस अधिकाऱ्यांसह सभास्थानीं जाऊन व लाला लजपतराय इत्यादि पुढाऱ्यांचा अपमान करून १४४ कलमाप्रमाणें उधळून लाविली. यानंतर लालाजी लाहोरला परत आले. तों उपरोक्त ९ मे दिवशीं ते

कोर्टांत जावयास निघाले असतांना अचानक त्यांना अटक करून तडकाफडकी मोठ्या सुरक्षितपणें व गुप्त रीतीनें सरकारनें त्यांची मंडालेस रवानगी करून दिली त्याना हद्दपार करण्याकरिता सरकारनें आजकाल बरेच प्रसिद्ध झालेले पण त्या वेळीं लोकांच्या बहुतेक स्मरणांतून गेलेले १८१८ चें ' तिसरें रेग्यूलेशन ' उपयोगांत आणलें होतें !

या हद्दपारीनें हिंदुस्थानचें सगळें वातावरण एकदम हादरून गेलें. असला भयंकर अन्याय लोकांनीं यावेळीं प्रथमच पाहिला होता. अर्थात् त्याविरुद्ध जिकडेतिकडे सपाटून ओरड झाली. सर्व पक्षांनीं व सर्व पुढाऱ्यांनीं अत्यंत कडक शब्दांत या कृत्याचा निषेध केला. पार्लमेंटमध्यें या संबंधीं प्रश्न विचारण्यांत आले. व त्यांना उत्तरें देतां देतां तत्कालीन भारत-मंत्री लॉर्ड मोर्ले यांची मोठी तारांबळ उडाली. त्यांनीं अर्थातच ठरींव छापाची कायदा व सुव्यवथा यांच्या रक्षणाची, सरकारच्या हितसंबंधाची वगैरे कारणें सांगून लालाजींविरुद्ध आरोप सांगण्याचें किंवा पुरावा मांडण्याचें नाकारलें.

इकडे लालाजींची स्थिती काय होती हें आपण पाहूं. ते राजकीय कैदी होते. व त्यांचा खटला चालून त्यांना शिक्षा झालेली नव्हती. अर्थात् त्यांना बंदिवासाचे असें कांहीं दुःख नव्हतें. पण त्यांची स्वतंत्रता नष्ट झाली होती. त्यांचेवर ज्या अधिकाऱ्याची देखरेख होती तोही मोठा आडमुठ्या डोक्याचा व अरेरावी स्वभावाचा होता. लहान सहान गोष्टीं-करितां त्यानें लालाजींना निष्कारण सतवावें, त्यांचा अपमान करावा, व कायदेशीर रीत्या त्यांना ज्या सवलती मिळावयास पाहिजे होत्य त्याही मिळूं देऊं नयेत. या सर्व कारणामुळें लालाजींच्या मनावर व शरीरावर फार वाईट परिणाम झाला. त्यांचा स्वभाव अत्यंत मानी होता. जेलरनें किंवा सुपरिन्टेंडेन्टनें उठल्यासुटल्या अधिकाराची चणुक दाखवावी व आपल्या मूर्खपणाचें आणि घमेंडीचें हास्यास्पद प्रदर्शन करावें याची त्यांना चीड येत असे. देशांत असतांना २४ तास कार्य व्यापृत राहण्याची त्यांना संवय होती. व येथें तर त्यांचा सारा दिवस मोकळाच असे. त्यांचा वेळ जातां जाईना. विचार करून करून मनाला अत्यंत शीण

व्हावा त्यांची प्रकृतीही व्यवस्थेशीर जवणखाण न मिळाल्यामुळे विघडली व त्यांना यकृताचा व निद्रानाशाचा विकार जडला . अशाही अवस्थेंत मनाला विरंगुळा व्हावा झणून ते वाचन–लेखनांत काळ घालवूं लागले. अधिकाऱ्यांनीं मोठ्या कृपेनें दिलेली इंगजी पुस्तकें वाचण्यांत ते आपला वेळ कसाबसा घालवीत. ब्रह्मी भाषा शिकण्याचा व ब्रह्मदेशाची माहिती मिळावण्याचा उद्योग त्यांनीं केला व ब्रह्मदेशविषयक एक उर्दू पुस्तक लिहून काढलें. तसेंच भगवद्गीतेवर त्यांनीं एक निबंध लिहिला. त्यांना वर्तमानपत्रें किंवा मासिकें बिलकुल वाचावयास देत नसत. वास्तविक ते कांहीं कैदी नव्हते, त्यांची चौकशीही झालेली नव्हती. तेव्हां त्यांच्या दर्जा प्रमाणें वागविणें सरकारचें कर्तव्य होतें. पण तेथील अधिकारी तें कांहीं ऐकेनात. आपल्यावर आरोप काय आहे तें कळवावें व आपली उघड चौकशी करावी याविषयीं दोनतीन अर्जही त्यांनीं सरकारला पाठविले. पण सरकार त्याचें उत्तर देईना. एका अर्जांत शेंवटीं कंटाळून व सुटकेविषयीं कांहींसे निराश होऊन त्यांनीं असेंही लिहिलें कीं, 'सरकारला माझें हिंदुस्थानांत राहणें धोक्याचें वाटत असेल तर सरकार सांगेल त्या अवधीपर्यंत युरोपांतील एखाद्या शांत देशांत किंवा अमेरिकेंतही जाऊन राहावयास मी तयार आहे." पण सरकारन यालाही कांहीं उत्तर दिलें नाहीं. त्यांना अजून अशी आशा वाटत होती कीं, लालाजींविरुद्ध कसला तरी ओढून ताणून कां मिळविलेला असेना पण पुरावा आपल्याला मिळेल; व मग त्यांच्या खटल्याचा फार्स करून आ॰ण त्यांची रवानगी पांचदहा वर्षांकरितां कोठें तरी करून देऊं. पण ही त्यांची आशा फोल ठरली. आरोप सिद्ध करण्याजोगा पुरावा त्यांना काडीचाहि मिळेना; आणि कसा मिळणार ? मुळांतच ते आरोप निराधार होते इकडे लोक क्षोभाची आग तर सारखी पेटतच होती. बंगालच्या फाळणी बरोबरच असंतोषाचें एक कलम झणून लोक या हद्दपारीचा उल्लेख करीत होते. सरकारपुढें यावेळीं एक विलक्षण पेच येऊन पडला होता. लालाजींना ज्या हेतुसाठीं पकडलें तो हेतु–चळवळ दवून जावी व असंतोषाचा नायनाट व्हावा सिद्ध होणें बाजूलाच राहिलें पण त्यांच्या हद्दपारीनें लोकक्षोभ अधिकाधिक तीव्र मात्र होत होता. बरें सोडून द्यावें तर त्यांत आपलीच मानहानी होणार. इतके दिवस विनाचौकशी, विनाआरोप, एका सद्गृहस्थाला पकडून

कां ठेवलें असा ठपका येणार. या वेळीं लॉर्ड मिंटो व्हाइसरॉय होते व लॉर्ड कर्झनप्रमाणें निव्वळ दडपशाही करण्यापेक्षां दडपशाहीबरोबरच लोकक्षोभाच्या ज्वाळा कांहीं सवलती देऊन शांत कराव्या, प्रतिपक्षांतील जरा कच्चे लोक गांठून त्यांना आपल्या पंखाखालीं घेऊन लोकपक्षांत फूट पाडावी, कित्येक मुद्यांवर माघार घेतलीसें दाखवून लोकांच्या चळवळीचें मूळ कारणच नाहींसें करून टाकावें असें त्यांचें धोरण होतें. त्याला अनुसरून ज्या कायद्यामुळें पंजाबांत येवढी अस्वस्थता माजली होती तो कालव्यासंबंधींचा कायदा त्यांनीं मागें घेतला व अचानक जसें लालाजींना पकडलें होतें तसेंच एक दिवस त्यांना मंडालेहून अगदीं गुप्तपणें लाहोरला आणून पहाटे त्यांच्या घरीं नेऊन मुक्त केलें!

या मुक्ततेचा परिणाम मात्र सरकारला हवा होता तसा झाला नाहीं. लालाजींची हद्दपारीची कहाणी ऐकून सरकारविषयीं लोकांच्या मनांत अधिकच क्षोभ उत्पन्न झाला. लालाजींची गणना लाल–बाल–पाल या त्रयींत होऊन ते लोकांच्या गळयांतील केवळ ताईत बनले.

# राष्ट्रीय सभेंतील दुफळी आणि नंतर.

मंडालेहून लालाजी परत आल्यानंतर सुमारें महिन्याभरानें सुरतेस राष्ट्रीय सभेची बैठक होऊन दुफळी झाली. तो प्रकार सांगण्यापूर्वी थोडा मागील प्रकार पाहणें अवश्यक आहे.

१९०४ पासूनच वास्तविक राष्ट्रीय सभेंत दोन पक्ष स्पष्ट दिसूं लागले होते. १९०५ च्या बैठकींत तर एकेका प्रश्नावर त्यांच्यांत रणें माजली होतीं. पण इतकें होतें तरी कॉंग्रेसमध्यें दुफळी व्हावी असें कोणालाही तों पर्यंत वाटत नव्हतें. परंतु १९०६ मध्यें तो प्रकार बदलला. जुन्या पक्षाला तरुण पिढीचे विचार अगदीं बेफाम वाटूं लागले. तशांत लॉर्ड मिंटो व्हाइसरॉय झाले होते. त्यांचे धोरण प्रतिपक्षांत फूट पाडून त्यांतल्या त्यांत नरम असेल त्याच्या अंगावर चारदोन दिखाऊ अधिकार आणि शेंपन्नास पदव्या फेंकून त्याला आपल्या पंखाखालीं आणावयाचें व त्याचा नैतिक पाठिंबा मिळवून दुसऱ्या गरम पक्षास चिरडून टाकावयाचें असें होतें. या धोरणाला जुन्या वळणाचे लोक बळीं पडले. त्यांच्या हार्डीमार्सी भिक्षांदेही आणि आस्तेकदम चाल भिनली होती. नवीन पक्ष स्वावलंबी, तेजस्वी, आणि धडाडीचा होता. ज्या सरकारच्या विरुद्ध आपल्याला झगडावयाचें आहे, त्याच्या रागालोभाला भिऊन चालणार नाहीं, येईल त्या संकटाला तोंड द्यावें लागेल हें त्याला पक्कें माहित होतें, व राष्ट्रासाठीं आत्म–बलिदान करावयाचीही त्या पक्षाची सिद्धता होती. असा या दोन पक्षांत मूलतःच भेद होता. अर्थात एका म्यानांत दोन तरवारी जशा रहात नाहींत. तद्वत एका राष्ट्रीय सभेंत हे दोन पक्ष गुण्या गोविंदानें फार दिवस नांदणेंच शक्य नव्हतें. त्यांतल्या त्यांत जुन्या पक्षाला नवीन पक्षाचें वाढतें बळ पहावें ना. त्यांनीं राष्ट्रीय सभेंत वजन पाडावें आणि आपल्याला निस्तेज करून सोडावें. हा विचार त्यांना कसाचाच वाटे. या विचाराबरोबरच दुसराही असा एक विचार होता कीं, तरुणपक्ष हा स्वार्थत्यागी व धडाडीचा असला तरी उतावळा आणि साहसी आहे. कदाचित् उत्साहाच्या अतिरेकांत चालत आलेल्या राष्ट्रीय सभेचा गाडा ते मोडून तोडून विलाखिला करून टाकतील.

या विचाराखालीं १९०६ हें सर्व वर्ष जवळजवळ गेलें. नवीन तरुणांचा जोर एवढा प्रबल होता व सरकारी वर्तनही इतकें अनुत्तरदायिक व गैर मुत्सद्देगिरीचें होत होतें कीं जुन्या पक्षाला रडतखडत कां होईना बहिष्कारासारख्या तीव्र राजकीय शस्त्राला संमति द्यावी लागली होती. पण त्यांच्या पोटांत धाकधूग होत असे. इकडे तरुण पक्षाचा उत्साह तर दिवसेंदिवस चढत्या वाढत्या प्रमाणांत होता. त्यांनीं स्वदेशीसारख्या सौम्य टोकापासून तों सविनय कायदे भंगासारख्या व करबंदी सारख्या सरकारचें अस्तित्वच नाकारणाऱ्या तीव्र टोकापर्यंत एक स्वतंत्र सुसंगत आणि व्यापक असा कार्यक्रम आंखला होता. हा कार्यक्रम राष्ट्रीय सभेकडून संमत करून घ्यावा ह्या हेतूनें कलकत्ता येथें भरणाऱ्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्ष लोकमान्य टिळक व्हावेत अशी नवीन पक्षानें खटपट चालविली. पण जुन्या पक्षानें हिंदी राजकारणांतील वृद्ध पितामह दादाभाई नवरोजी यांचें नाव पुढें केलें व त्याप्रमाणें त्यांच्या अध्यक्षतेखालीं कलकत्यास सभा भरली. परिस्थिती इतकी खवळलेली होती कीं, दादाभाईसारख्या वृद्ध पुढाऱ्यानें' मी आज तरुण असतों तर बंड केलें असतें ' असे उद्गार काढले. मग काय? तरुण पक्षाला चांगलाच जोर चढला. दादाभाईंनीं स्वमुखानें राष्ट्रीय सभेचें ध्येय ' स्वराज्य ' असल्याची घोषणा केली. या ठरावावर भाषण करतांना लाला लजपतराय ह्मणाले " आपले पुढारी दादाभाई नौरोजी यांनीं ' स्वराज्य ' हें आपलें ध्येय जाहीर केलें तो क्षण मोठा भाग्याचा होय. या एका शब्दांत आमच्या सर्व आकांक्षा समावल्या आहेत. यापुढें 'स्वराज्य' आमची 'गर्जना' राहील या शब्दापासून आह्मांला स्फूर्ति मिळेल व या स्वराज्याकरिता आह्मी सर्वस्व त्यागाला तयार होऊं. हें ध्येय साधण्यासाठीं प्रयत्न करतांना आह्मी स्वतःलाहि विसरून जाऊं. आमच्या राष्ट्रीयत्वाचा हा ध्रुवताराच होय. आणि एकदां स्वराज्य हें आमचें ध्येय ठरलें ह्मणजे मग तें मिळविण्याचा मार्गही निश्चित केला पाहिजे, हा मार्ग भिक्षांदेहीचा नाहीं, सवलती मिळविण्याचा नाहीं किंवा दिखाऊ देशभक्तीचाही नाहीं. तर दुर्दम प्रयत्नवाद, खरी तळमळ, उत्कट देशाभिमान, आत्म बलिदानाची सिद्धता, लोकसेवेची उदात्त भावना आणि कडकडीत स्वावलंबन हे गुण अंगी आणून लोकांची संघटना करणें हाच तो मार्ग आहे." या सभेंत प्रसिद्ध चतुःसूत्री—स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य—मान्य झाली. काशीच्या

बैठकीपुढें या बैठकीनें एक पाऊल जास्त टाकलें. तरुण पक्षाला अत्यानंद झाला.

पण जुन्यापक्षाच्या पोटांत कळमळूं लागले. येवढी धावपळ करून व दादाभाईंना मध्यस्थी घालून शेवटीं तरुण पक्षाचाच प्रभाव राष्ट्रीय सभेंत पडला. याचा त्यांना मनःपूर्वक विषाद वाटला व पुढील बैठकींत काय पाहिजे तें करून या तरुण पक्षाला नामोहरम करावयाचें, राष्ट्रीय सभेंतून हाकून द्यावयाचे व आपली राजकारणाची गाडी पुनरपि पहिल्या चाकोरीवर आणावयाची असा त्यांनीं कृतसंकल्प केला.

नवीन पक्ष ही गोष्ट ओळखून होता. अर्थात् दोन्ही पक्षाचे डावपेच सुरू झाले. सभा मूळ नागपुरास व्हावयाची ठरली होती. पण नागपूर म्हणजे नवीन पक्षाचें बलवान केंद्र. म्हणून अनेक सूक्तासूक्त मार्गांचा अवलंब करून जुन्या पक्षानें तरी आपल्या बालेकिल्यांत म्हणजे सुरतेस नेली. व अध्यक्षाकरितां डॉ० रासबिहारी घोष यांचें नांव सुचविलें. याच सुमारास लाला लजपतराय सुटून परत आले होते. त्यांचा सर्वोच्च सन्मान करण्याचे हेतूनें व आपल्या वतीचा जोरदार लढवय्या या नात्यानें त्यांचें नांव तरुण पक्षानें अध्यक्ष पदाकरितां सुचविलें. जुन्या पक्षाची कारवाई लालाजींना माहीत नव्हती. ते नुकतेच एक तर सुटून आले होते व हद्दपारीपूर्वी पंजाबांतील स्थानिक चळवळींतच गढून गेल्यामुळें त्यांना नेमस्तांच्या कुटिल राजकारणाचा सुगावा लागला नव्हता. त्यांनीं उदार हृदयानें मी अध्यक्ष होत नाही म्हणून जाहीर केलें. राष्ट्रांतील दोन पक्षांत केवळ नांवावर दुही व्हावी हा विचार त्यांना रुचणें शक्यच नव्हतें. राष्ट्रीय सभेंत दोन तट पडले तर सरकारला दडपशाही करायला अधिकच फावेल हीं गोष्ट त्यांना माहीत होती पण नेमस्तांना त्याचें काय होय? त्यांना आपली गाडी जुन्या रुळावर न्यावयाची होती. आणि त्याप्रमाणें त्यांनीं ती नेलीही. १९०५ च्या पूर्वी ती जशी निर्जीव होती, तशीच पूरेपूर निर्जीव १९०७ नंतर त्यांनीं तिला करून सोडलें. ही बहादुरी. खरी! व ती करण्यासाठीं त्यांना श्रमही पुष्कळच पडले, अनेक डाव योजावे लागले, हिंदी राजकारणाचे जगांत हसें करून घ्यावें लागलें, राष्ट्रीय सभेची बैठक सरकारी पोलिसामार्फत उधळून द्यावी लागली पण हें सर्व त्यांनीं केलें–धैर्यानें नेटानें कले–आणि

लागलें. राष्ट्रीय सभेची बठक सरकारी पोलिसांमार्फत उधळून द्यावी लागली. पण हें सर्व त्यांनीं केलें धैर्यानें केलें—नेटानें केलें आणि—आपलें ध्येय साधलें! देशभक्तीनें वेडे बनलेल्या तरुणांना त्यांनीं राष्ट्रीय सभेबाहेर हाकलून दिलें. आणि राष्ट्रीय सभेंत फिरून थंड, धिम्या, पोक्त विचारी लोकांची स्थापना केली. धन्य त्यांची!

तरी लालाजी निराश झाले नाहींत. देशांत एकी करण्याचा त्यांनीं एक प्रयत्न करून पाहिला. नेमस्तांच्या कन्व्हेंशनवर सही करून ते त्याच्या गोटांत गेले. हेतु हा कीं, त्यांचें डोळे अजून उघडतील तर पहावें. पण व्यर्थ, त्यांचा हेतु मुळींच सफळ झाला नाहीं इतकेंच नव्हे तर लालाजींचा खरा हेतु न समजल्यामुळें तरुण पक्षाचाही त्यांच्यावर रोष झाला.

अशा परिस्थितींत लालाजींचें मन विटून गेलें. त्यांची प्रकृती मंडाले येथील झालेल्या हालानें बिघडली होती. तशांत देशातील परिस्थितीचें हें भेसुर चित्र त्यांना दिसलें. सरकारची दडपशाही अतीशय मोठ्या प्रमाणांत सुरू झाली होती. बहुतेक मोठमोठे पुढारी कायद्याच्या कातरींत पकडून सरकारनें राजकारणाच्या क्षेत्रांतून दूर केले होते. तिकडे बंगालमध्यें बाम-गोळ्याचा अवतार झाला होता. देशांत राजकीय दरोडे; व धरपकडी, चौकशा आणि फाशी असा एकच आगीचा वणवा पेटला होता. पंजाबमध्यें पहावें तर स्मशान शांतता पसरली होती. लॉर्ड मिंटोनें तेथील सर्व जुलमी कायदे मागें घेऊन सर्व लोकक्षोभावर पाणी पाडलें होतें. तेव्हां एकप्रकारें उद्वेग प्राप्त होऊन परिस्थिती थोडीशी निवळेपर्यंत, स्वस्थ बसण्यापेक्षा एकवार परदेशीं जाऊन यावें असा विचार करून ते इंग्लडास गेले.

इंग्लंडमध्यें ते वर्ष दीडवर्ष होते. तेथें हिंदुस्थानविषयक चळवळी करणें तेथील विद्यार्थ्यांचे संघ स्थापन करणें, तसेच निरनिराळ्या संस्थांचें निरीक्षण करणें इत्यादि आयुष्यक्रम त्यांचा चालला होता. अनेक राज-कारणी पुरुषांशीं याचवेळीं त्यांनीं परिचय करून घेतला व इंग्लंडांत आणि युरोपांतील इतर प्रदेशांत हिंदुस्थानविषयीं खरी माहिती पुरविण्याची आवश्यकता त्यांना याचवेळीं भासूं लागली. व लेख आणि व्याख्यानें या रूपानें त्यांनीं तें काम चालविलें. गुरू गोविंदसिंगांचा जन्मोत्सव त्यांनीं इंग्लंडमध्यें बिपिनचंद्र पाल यांच्या अध्यक्षतेखालीं पार पाडला. व्याख्यान

देतांना लालाजींनीं सांगितलें कीं, गुरु गोविंदासारख्या महात्म्याला स्वजातीच्या सेवेसाठीं चारपुत्राचें बलिदान करावें लागलें. मग त्याच महान् जातीस्तव आपल्या सारख्या क्षुद्र जीवांनीं सर्वस्वाचा बळी देण्यास कचरावें ही केवढी लज्जेची गोष्ट आहे.

यावेळीं हिंदुस्थानांत मोर्ले मिंटो सुधारणा लागू करण्यांत आल्या होत्या. लालाजींनीं त्यांचा फोलपणा स्पष्ट शब्दांत प्रगट केला. व जे अराष्ट्रीय वृत्तीचे मुसलमान मिंटोसाहेबांच्या गळीं पडले होते त्यांची त्यांनीं चांगली कान उघाडणी केली. पण त्याचा कांहीं एक परिणाम झाला नाहीं. सरकारच्या पाठबळानें पूर्व बंगाल्यांत मुसलमान अगदीं उन्मत्त बनले व हिंदूंशीं कलागती करूं लागले. १९०९ च्या प्रारंभींचा टिटाघर येथें हिंदूमुसलमानांचा भयंकर दंगा झाला त्यासंबंधीं लिहितांना लालाजींनीं जाहीर केलें कीं, असल्या दंग्यांत शेंकडा ९० प्रसंगीं पोलिसचा हात असतोच असतो.

१९०९ च्या मध्याचे सुमारास लालाजी देशीं परत आले. देशाची परिस्थिती एवढ्या वेळांत फारशी बदलली नव्हती. राष्ट्रीय सभा पूर्णपणें नेमस्तांच्या हातांत होती. अर्थात् लालाजींना तेथें जाण्यास वाव नव्हता. पण कार्य करण्यास एक नवीनच क्षेत्र उत्पन्न झालें होतें. सरकारच्या चिथावणीनें मुसलमान चढेल बनले होते. व कांहींना कांहीं कुरापती काढून हिंदूंशीं मारामारी करण्याचें त्यांचें धोरण दिसत होतें. त्यावेळचा हिंदु अत्यंत असंघटित व केवळ राजकीय झगडा करण्यांत शक्ति सर्वस्व खर्च करीत असल्यामुळें मुसलमानाशीं भांडण्याचा प्रसंग येतांच त्यांची स्थिति मोठी शोचनीय बनत असे. याचें लालाजींना फार वाईट वाटे. हिंदूंनीं सुद्धां एकीकडे राजकीय झगडा करीत असतांना दुसरीकडे स्वतःचें अंतर्गत संघटन करावें. जातिजातींमध्यें एकोपा स्थापन करावा अस्पृश्यादि मागसलेल्या वर्गांना शिक्षण वगैरे देऊन त्यांची सामाजिक योग्यता वाढवावी आणि सर्व हिंदुमध्यें राष्ट्रीय भावना प्रबळ करून स्वराज्याची शिस्त उत्पन्न करावी, ह्मणजे मुसलमानांच्या अराष्ट्रीय चळवळींनाही प्रसंग आल्यास पुढें मागें तोंड देतां येईल, नुसते मुसलमानांच्या नांवानें खडे फोडून हें काम भागणार नाहीं असें त्यांचें मत होतें व ते पुष्कळ वर्षांपूर्वीपासून अनेकदां

तें बोलूनही दाखवीत असत. पण साधारण हिंदू पुढाऱ्यांना तें पटत नसे व स्वतः लालाजींना दयानन्द कॉलजच्या व दुष्काळ निवारणादि इतर कामामुळें या गोष्टीकडे लक्ष देण्यास फावत नसे. पण आतां त्यांना संधी मिळाली. व दोनतीन वर्षें त्यांनीं हेंच कार्य चालविलें.

प्रथमतः त्यांनीं इतर दूरदृष्ट्या हिंदू पुढाऱ्यांच्या सहकार्यानें पंजाबमध्यें हिंदू सभेची स्थापना केली. तिचें प्रथमाधिवेशन सर प्रतुळचंद्र चटरजी यांचे अध्यक्षतेखालीं ऑक्टोबर महिन्यात लाहोरास पार पडलें. या सभेला अनेकांचा विरोध होता. तरी सभा यशस्वी झाली. सनातन धर्मीयांच्या वतीनें पंडित दीनदयाळ शर्मा यांनीं हिंदू समाजांतील सर्वपंथाच्या व मतांच्या समानतेबद्दलचा ठराव पुढें मांडला. व त्यावर लालाजींनीं विद्वत्तापूर्ण स्फूर्तिदायक भाषण केलें. या व्याख्यानांत लालाजींनीं जे विचार प्रगट केले आहेत ते १९२७ सालच्या हिंदुमहासभेच्या भाषणांत शोभण्यासारखे आहेत. हिंदुत्वाचें मुख्य लक्षण राष्ट्रीय तथा सांस्कृतिक कल्पना हें होय ही गोष्ट त्यांनीं प्रथमच सांगून नतर ते हिंदू शब्दांच्या इतिहासाकडे वळले व **हा शब्द निंद्य नसून गौरवास्पद आहे. त्याचा गौरव आह्मी आमच्या वर्तनानें अधिकच वाढावेला पाहिजे असें त्यांनीं सांगितलें.** नंतर हिंदूंच्या निरनिराळया पंथांत एकत्व कसें आहे, हें त्यांनीं निरनिराळीं उदाहरणें देऊन स्पष्ट केलें. **हिंदुजाति ह्मणजे हिंदुराष्ट्र होय, व हिंदू धर्म हा राष्ट्रीयधर्म आहे असें सांगतांना त्यांनीं अनेक पाश्चिमात्य ग्रंथकाराचा आधार देऊन हें सिद्ध केलें कीं, हिंदूमध्यें अनेक जाति, अनेक भाषा व अनेक धर्मपंथ असले तरी आमची संस्कृति एक आहे व आमचें रक्त एक आहे.** नंतर ते अर्वाचीन इतिहासाकडे वळले व हिंदूंच्या मनांतील राष्ट्रीय कल्पना, स्वत्वाची जाणीव आणि प्राचीन कालच्या गौरवाचे यथार्थ ज्ञान नष्ट झाल्यामुळें एकमेकांना बाधणारी प्रेमाचीं बंधनें तुटून जाऊन हिंदु जाति कशी विस्कळित व दुर्बळ बनली आणि परकीयांच्या आघातांनीं घायाळ होऊन आजच्या दीन दशेला आली, यांचें त्यांनीं सुंदर चित्र रेखाटलें. नंतर मुसलमानांच्या अराष्ट्रीय वृत्तीविषयीं त्यांनीं असें सांगितलें कीं, मुसलमानांना दोष देत बसण्यापेक्षां **हिंदूंनीं समर्थ आणि संघटित व्हावें हाच हिंदू**

**मुसलमानांच्या ऐक्याचा व परंपरेनें स्वराज्य मिळविण्याचा मार्ग आहे.**

परंतु हिंदुसंघटनाचा काळ अजून आला नव्हता. हिंदूसभेचे पुरस्कर्ते राजकीयदृष्ट्या मवाळ पंथाचे होते. ते साधारण हिंदू जनतेकडे लक्ष देईनात. रयतेची किंवा जमीनदारांची साहानुभुति मिळवीनात.

थोडक्यांत सरकारी अधिकाऱ्यांना मानपत्रें देऊन जोहुकमीपणाचें प्रदर्शन करण्यापलीकडे त्यांनीं कांहींच केलें नाहीं. लालाजी तर पुन: इंग्लंडला निघून गेले होते. त्यांना आपल्या मुलाचें शिक्षण तेथें करवावयाचें होतें. परंतु तिकडे गेल्यावर थोड्याच दिवसात तो मरण पावला! हाता तोंडाशीं आलेला तरुण मुलगा मरण पावल्यामुळें लालाजींना अत्यंत दु:ख झालें. व तशाच स्थितींत आपल्या जुन्या सहकार्यांशीं तत्वाकरिता भांडण करून हिंदू सभेच्या कामास चालना देण्याचा भार त्यांनीं शिरावर घेतला नाहीं.

त्यांनीं स्वतंत्रच मार्ग आखला. एज्युकेशन लीग स्थापन करून अस्पृश्यांमध्यें व इतर मागासलेल्या जातींमध्यें शिक्षणप्रसाराचें ते कार्य करूं लागले. अस्पृश्यांचा प्रश्न यावेळीं विशेष जोरानें पुढें आला होता. खाने-सुमारी चालू होती व भेटसक्युंलर नामक एक नवीनच खेंकटें सरकारनें उपस्थित केलें होतें. त्याप्रमाणें मागासलेल्या आणि अस्पृश्य वर्गाची गणना अहिंदू या सदरामध्यें व्हावयाची होती. यामुळें कट्टरांतले कट्टर सनातनीही खडबडून जागे झाले. व अस्पृश्य हे हिंदूच आहेत. त्याना हिंदु म्हणूनच नोंदलें जावें अशाबद्दल सनातनीय व आर्यसमाजी लोकांनीं चळवळ केली. स्वतः अस्पृश्यानींहीं आपणाला हिंदू म्हणून नोंदण्याचा आग्रह केला. व त्याचा परिणामही झाला. या निमित्तानें हा प्रश्न लोकांपुढें असतांना १९१२ त कराचीस शुद्धिसभेचें अधिवेशन झालें. तिच्या अध्यक्षपदावरून लालाजींनीं जें भाषण केलें त्यांत या प्रश्नाचा सर्वांगीण विचार केला. धर्माच्या दृष्टीनें, माणुसकीच्या दृष्टीनें, व राष्ट्रहिताच्या दृष्टीनें हिंदूंनीं अस्पृश्यतेस मूठमाती देणें किती जरूर आहे याचें त्यांनीं अत्यंत खुलासेवार आणि मार्मिक विवेचन केलें. तीच चळवळ पुढें **लाला मुन्शीराम** (स्वामी श्रद्धानंद) नीं नांवारूपास आणिली. म० गांधींचाहि याला पाठपुरावा मिळाला.

१९१२ हें वर्ष मोठें विचित्र होतें. राजकीय चळवळीचा गाडा अर्ज विनंत्यांच्या रुळलेल्या चाकोरींनें चालला होता. अर्थात् लालाजी त्यांत भाग घेत नसत. बंगालची फाळणी बादशहांचे हस्तें नामशेष करून हिंदुस्थान सरकारनें लोकक्षोभ बहुतेक शांत केला होता, व त्या दृष्टीनें लोक बहुतेक आनंदांत होते. परंतु डिसेंबरमध्यें जेव्हां कलकत्याची राजधानी बदलून दिल्लीच्या नव्या राजधानींत तत्कालीन व्हाइसराय लॉर्ड हार्डिंज मोठ्या दरबारी मिरवणुकीसह शिरले तेव्हां त्यांजवर एक भयंकर स्फोटक बॉंब फेकण्यांत आला. यानें सर्व वातावरण पुनः खवळतें कीं काय असें वाटूं लागलें. आरोपीचा सरकारनें कसून शोध चालविला व १०००० रुपयांचें पारितोषिक लावण्यांत आलें. पण खरा आरोपी शेवटपर्यंत सांपडला नाहीं. अनेक निरपराधी लोकांना मात्र पकडापकडींना व झडत्यांना बळी पडावें लागलें. आपल्यावरील सरकारचा रोष अजून गेलेला नाहीं हें लालाजींना माहीत होतें. तेव्हां या बॉंबगोळ्याचें निमित्त करून सरकार पुनः आपल्यावर कांहीं धाड आणील व मागच्या सारखें कोठें तरी डांबून राहण्याचा प्रसंग येईल, त्यापेक्षां आपण कांहीं दिवस परदेशांत जाऊन रहावें असा लालाजींनीं विचार केला. नाहीं तरी त्यांना युरोपखंड विशेषतः अमेरिका सावकाशपणें हिंडून पहावयाची होती आणि पाश्चिमात्य संस्कृतींचा व संस्थांचा सावकाशपणें अभ्यास करावयाचा होता म्हणून त्यांनीं आपला परदेशीं जाण्याचा बेत निश्चित केला.

३५९

# दुसरी हद्दपारी व अमेरिकेंतील काय.

१९१३ मध्यें कराचीला राष्ट्रीय सभेची बैठक झाली. तिला लालाजी उपस्थित होते. या बैठकीपुढें दक्षिण आफ्रिकेंतील लढ्याचा प्रश्न ठराव रूपानें आला तो त्यांच्याच मुळें होय. विदेशांत गेलेल्या व हाल अपेष्टांत दिवस काढणाऱ्या या हिंदी बांधवांविषयीं त्यांना फार कळकळ वाटत असे व दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रहाच्या साह्याकरितां भारतसेवक गोखल्यांनीं जेव्हां निधी जमविणें चालू केलें होतें तेव्हां लालाजींनीं एकट्या पंजाब प्रांतांतून त्यांना वीस हजारांहून अधिक द्रव्यसंख्या पाठविली होती. राष्ट्रीय सभेंतही या ठरावावर त्यांचें फार उत्तम भाषण झालें. शेवटीं इंग्लंडांत एक शिष्टमंडळ पाठवावें व त्यांनें या अन्यायाची दाद लावून घ्यावी असें ठरलें. याप्रमाणें कै. समर्थ. कै. लॉर्ड सिंह प्रभृतींचें एक शिष्टमंडळ विलायतेस गेलें त्यावेळीं लालाजी मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें, बरेच दिवस परदेशांत हिंडावयाकरितां म्हणून बाहेर पडले होते ते प्रथमच विलायतेस गेले. त्यांचाही समावेश या शिष्टमंडळांत करून घेण्यांत आला होता. शिष्टमंडळानें शिष्टाई केली व ती नेहमींप्रमाणें अरण्यरुदनवत् वाया गेली, आणि शिष्टमंडळ परत आलें. अर्थात लालाजी पूर्वसंकल्पानुसार परत आले नाहींत. ते अमेरिकामार्गे जपानला गेले. तेथें कांहीं काळ राहून देशभर प्रवास करून तेथील शैक्षणिक व औद्योगिक संस्थांची पाहाणी केली व आपला अनुभव लेखरूपानें त्यांनीं आपल्या देशबांधवांच्या हितास्तव कलकत्याच्या 'माडर्न रिव्ह्यू' मासिकांतून प्रसिद्ध केला. याच सुमारास एकाएकीं महायुद्ध सुरू होऊन सुप्रसिद्ध 'कोमागाटामारू' प्रकरण उपस्थित झालें व त्यांत लालाजींचा कांहीं तरी संबंध असावा असें इंग्रजांना वाटून त्यांनीं त्यांना परत मातृभूमीला परत येण्याची किंवा त्यांच्या पहिल्या बेताप्रमाणें कानडांत जाऊं देण्याची अनुज्ञा नाकारली म्हणून ते इंग्लंडलाच परत गेले. तेथें गेल्यावर सरकारचा गैरसमज दूर करण्याची खटपट त्यांनीं केली. पण ती यशस्वी झाली नाहीं. तेव्हां एक तर जपान किंवा अमेरिका यांपैकीं एकादा देश राहण्याला पसंत करून, बंदी उठेपर्यंत तेथें राहावें असा प्रश्न त्यांचेंपुढें पडला व जपानला ते नुकतेच जाऊन आले असल्यामुळें त्यांनीं अमेरिकेस जावयाचें ठरविलें. कारण अमेरिका देश म्हणजे नवें जग. तेथें पाश्चिमात्य सुधारणा पराकोटीला पोचलेली व विशेष म्हणजे तेथें हिंदुस्थानच्या लोकांना महत्वाचे वाटतील अशा

प्रश्नांचा–संस्कृती कलहाचा, जातिभेदाचा व अस्पृश्यतेचा अभ्यास करण्याची संधी मिळणार होती. अमेरिकेस जाण्यापूर्वी इंग्लंडांत असतांनाच त्यांनीं आपला आर्यसमाजावरील इंग्रेजी ग्रंथ प्रकाशित केला होता. अजून त्यांना वाटत होतें कीं, आपल्याला स्वदेशीं जाण्याची अनुज्ञा मिळेल ह्मणून अमेरिकेंत गेल्यावर तेथील संस्थांचा अभ्यास करण्याचाच काय तो विचार त्यांच्यापुढें होता. आपल्याला कित्येक वर्षें डांबून पडावें लागेल अशी त्यांना अजून कल्पना नव्हती व ह्मणूनच परदेशांत करावयाच्या चळवळीचा आरंभ त्यांनीं अद्याप केला नव्हता. पण अमेरिकेला गेल्यावर वेगळेच अनुभव येऊं लागले त्यांचेंवर पोलिसची टेहळणी राहूं लागली व त्यांची बदनामी करून त्यांना तेथें आसरा न मिळूं देण्याचे प्रयत्न होऊं लागले. यामुळें मोठी बिकट परिस्थिति उत्पन्न झाली. स्वदेशीं परत येण्याला अनुज्ञा मिळत नाहीं व अमेरिकेंतही व्यवस्थिपणें राहतां येईना. कांहीं काम करतों ह्मटलें तर सहाय्यक नाहीं कीं, सहानुभूति नाहीं. सरकारी गुप्त व उघड पोलिसचा ससेमिरा होताच, युद्धही लवकर संपावयाचा रंग दिसेना व तें संपेपर्यंत आपली अशीच कुचंबणा होऊन, स्वदेशीं जावयाला अनुज्ञा आपल्याला मिळणार नाहीं असें त्यांना स्पष्ट दिसून आलें. त्यांना यावेळीं पैशाची टंचाई पडूं लागली. लेख वगैरे लिहून पैसे मिळवावेत तर अमेरिकन पत्रें यांचे लेख स्वीकारावयास काकूं करीत. कारण इंग्रज सरकारच्या हस्तकांनीं त्यांचे कान फुंकून ठेवलेले असत. अर्थांत याला कांहीं अपवाद होतेच. त्यांचें सहाय्य व सहानुभूती लालाजींना असे. अशी ओढाताणीची स्थिती १९१६ च्या अंतापर्यंत जवळ जवळ चालू होती. त्यानंतर त्यांचे मागचा ससेमिरा जरा कमी झाला. व जसे दिवस जास्त जास्त लोटत चालले तसतसा त्यांच्या मित्राचा व सहानुभूती राखणारांचाही वर्ग वाढतच गेला पण या मध्यंतरींच्या दीड दोन वर्षांतही ते कांहीं स्वस्थ बसले नव्हते. अनंत संकटे येत होती तरी त्यांचा परिहार करीत करीत ते कामाला लागलेच होते. प्रथमच काम करण्याची आवश्यकता त्यांना दिसली ती अमेरिकन लोकांच्या मनांतील हिंदुस्थानासंबंधीचे दुराग्रह व गैरसमजुती काढून टाकण्याची. हें करण्यासाठीं लालाजी सारा अमेरिकेंत या टोकापासून त्या टोकापर्यंत फिरले निरनिराळया व्यवसायांतील सर्व प्रतीच्या लोकांशीं त्यांनीं परिचय संपादन केला. कित्येक ठिकाणीं या केवळ परिचयाचें रूपांत सहानु-

भूतींत व सहानुभूतीचें स्नेहांत होऊं लागलें. त्यांनीं तेथील शेंकडों संस्था पाहिल्या व अमेरिकेविषयीं स्वतः माहिती करून घेतां घेतांच अमेरिकनांना हिंदुस्थानाविषयीं सत्यज्ञान देण्याचा त्यांनीं उपक्रम केला. याच काळांत त्यांनीं आपलीं दोन पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं. त्यांतील एक ह्मणजे हिंदुस्थानांतील राष्ट्रीय पक्षाच्या उत्क्रांतीचा इतिहास देणारा 'तरूण भारत' ( Young India ) नामक ग्रंथ व दुसरा 'अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें' नांवाचा ग्रंथ. पहिला ग्रंथ, हिंदुस्थानची माहिती जगाला करून द्यावी व आपल्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत हिंदुस्थानाला जगाची सहानुभूती मिळवावी म्हणून लिहिलेला होता व तो अमेरिकन प्रकाशकांकरवीं तिकडेच प्रसिद्ध करण्यांत आला. दुसरा ग्रंथ जो लिहिला तो या हेतूनें लिहिला कीं, अमेरिकेविषयीं हिंदुस्थानांतील लोकांना योग्य कल्पना यावी व जगाच्या आंतर राष्ट्रीय राजकारणांत अमेरिकेचें किती वजन आहे, संपत्तीच्या जोरावर ती निरनिराळया राष्ट्रांच्या नाड्या आपल्या हातीं कशा वागविते, भिन्न संस्कृतींचा संघर्ष तेथें आमच्याप्रमाणेंच चालू असल्यामुळें त्यांनीं एतद्विषयक प्रश्नांचीं जीं उत्तरें शोधून काढली त्यांचा हिंदुस्थानच्या आजच्या परिस्थितींत आह्मी कसा उपयोग करून घ्यावा इत्यादि गोष्टी आपल्या देशवासियांना कळाव्यात. हा ग्रंथ कलकत्यास प्रसिद्ध करण्यांत आला याच काळांत त्यांनीं आणीकही एक लहानसें पुस्तक हिंदुस्थान विषयक लिहून तिकडेच प्रसिद्ध केलें. त्याचें नांव '**हिंदुस्थानचें इंग्लंड वरील ऋण**' यांत शंभर वर्षांच्या अल्पावधींत इंग्रजांनीं हिंदुस्थानची संपत्ती लुटून त्याला सुवर्णभूमी ऐवजी कंगालभूमी कसें करून सोडलें याचें साधार पण थोडक्यांत चटकदार रीतीनें विवरण केलें आहे. हीं दोन्ही पुस्तकें ('तरुण भारत' व इंग्लंडचें 'हिंदुस्थान वरील ऋण') इंग्रजसरकारला इतकी भयंकर वाटलीं कीं तीं जप्त करून हिंदुस्थानांत आणण्याची त्यांनीं बंदी केली. पण दिवाभीतानें तोंड लपविलें ह्मणून जसा भगवान सूर्यनारायण प्रकाशावयाचा थांबत नाहीं, तद्वतच इंग्लंडनें बहिष्कारार्ह ठरविलेलीं हीं पुस्तकें जगांतील समंजस वाचकवर्गांत त्यांचे योग्य तें स्थान पावलीं. पैकीं 'तरुण भारत' हा ग्रंथ तर अत्यंत प्रसिद्ध झाला. एकाच वर्षांत त्याच्या दोन आवृत्या काढाव्या लागल्या. इंग्लंडांत त्याची एक आवृत्ती स्वतंत्रपणें छापली

गेलो व पार्लमेंटच्या सभासदांना त्याच्या प्रती फुकट वांटण्यांत आल्या. एकं-दरींत या ' तरुणभारत ' ग्रंथानें लालाजींना खूपच प्रसिद्धी मिळली व त्यांची योग्यता तिकडील लोकांना कळून चुकली आणि अनेकांकडून त्यांना यापुढें सहानुभूती दाखविण्यांत येऊं लागली. त्यांच्या प्रवासांत त्यांनीं अनेक स्नेही जोडले होते त्यांचाही उपयोग होऊं लागला. पण परक्यांनीं दाखविलेली सहानुभूती व केलेलें साहाय्य प्रत्यक्ष कार्याला खरोखर कितीसें उपयोगी ठरणार ? खरी सहाय्यता त्यांना स्वकीयांकडूनच व्हावयास हवी होती व यावेळीं सुदैवानें त्यांना तीही लाभली आज हिंदुस्थानी सेवादलाचे चालक ह्मणून सुप्रसिद्ध असलेले डॉ० हर्डीकर त्यावेळीं अमेरिकेंत शिकत होते. व अमेरिकेंतील विद्यार्थ्यांच्या संस्थेचे ते तेव्हां अध्यक्ष होते. १९१६ सालच्या अखेरीस त्यांची व लालाजींची भेट होऊन विचारविनिमय झाला व कार्याची दिशा ठरतांच डॉ० हर्डीकरांनीं आपल्या अभ्यासावर पाणी सोडून लालाजींचें सहकारित्व पतकरलं.

मध्यंतरी हिंदुस्थानचे वातावरण एका प्रकारच्या क्रांतिमय विचारानें भरल होतें. महायुद्धानें एक नवा मनुच येथें सुरू झाला होता. आह्मी युद्धांत साहाय्य करतों पण आह्मांला स्वराज्य द्या या लो० टिळकांच्या बाह्यतः भयं-कर व जहाल वाटणाऱ्या मागणीला त्यावेळीं देशांत चोहोंकडे पाठिंबा मिळत होता. युद्धाची परिस्थितीही अशीच होती कीं, निवळ स्वार्थी हेतुनें का होईना हिंदुस्थानची राज्यघटना बदलून ती जरा लवचिक व कार्यक्षम कर-ण्याची आवश्यकता इंग्रज मुत्सद्यांना स्पष्टपणें दिसत होती. त्याचा लाभ घेऊन हिंदुस्थानाला वसाहतीच्या योग्यतेचें स्वराज्य-होमरूल-मिळून देण्या-साठीं होमरूल लीगच्या कायदेशीर चळवळीचा उपक्रम लो० टिळक यांनीं केला व तो तात्काळ लोकप्रिय व सर्वपक्षमान्य झाला. या बातम्या अमेरिकेंत पोचल्या तेव्हा लालाजींनीं आपल्या तोपर्यंतच्या कार्यक्रमाला १९१७ च्या प्रारंभी होमरूल लीगची जोड दिली. ते स्वतः त्या लीगचे अध्यक्ष झाले व त्यांना नुकतेच येऊन मिळालेले डॉ. हर्डीकर कार्यवाह बनले. लीगला सांपत्तिक साहाय्य तद्देशनिवासी हिंदी लोकांकडूनच त्यांनीं मिळविले व नेटानें काम चालविलें. स्वतः लालाजींच्या संपादकत्वाखालीं लीगचें मासिक ' तरुण भारत ' या नांवाचें चालू झालें, तें अल्पावधींत बरेंच लोकप्रिय

होऊन बसलें. मासिकाच्या कार्यालयांत हिंदुस्थान विषयक माहिती पुरविण्याविषयीं प्रत्यही शेंकडो पत्रें येऊं लागलीं तेव्हां लालाजींनीं एक 'इन्फर्मेशन ब्युरो' स्थापन करून त्यावर निराळ्या माणसाची योजना केली. तसेंच अमेरिकेंत निरनिराळ्या व्यवसायानिमित्त व विशेषतः शेतीवर मजूर म्हणून राहणाऱ्या हिंदी लोकाकरितां त्यांनीं एक लेबर-यूनियन स्थापन केली. या अडाणी पण सरळ अंतःकरणाच्या लोकांशीं ते स्वतः किती तरी वेळ बोलत बसत व त्यांचीं सुख दुःखें आपुलकीच्या भावनेनें ऐकून त्यांचा योग्य तो परामर्ष घेत. या लोकाकरितां त्यांनीं तेथें शाळा चालू केली व तेथें त्यांना लिहण्या वाचण्याला शिकविण्याचें काम कित्येकदां ते स्वतःच करीत असत.

होमरूल लीगचें काम हिंदुस्थानविषयक माहितीचीं लहान लहान चोपडीं किंवा हस्तपत्रकें छापवून तीं फुकट वाटावयाची या मार्गानेंही बरेंच होत असे. हीं पत्रकें व चोपडीं लक्षावधी वाटलीं जात. तीं लिहिण्याचें काम सर्व लालाजीच करीत असत. कित्येक वेळां लेखांचीं नांवें ते मोठीं मजेदार ठेवीत. मॉंटेग्यूचेम्सफर्ड सुधारणा शिजत असतांना अमेरिकेतील हिंदी लोकांना उद्देशून एक चोपडें काढलें होतें, त्याचें नांव होतें Fight for crumbs! त्यांत स्वावलंबनानेंच स्वराज्य मिळतें परकीय सरकारच्या सवलतींमधून स्वराज्याचे हक्क कधींच प्राप्त होत नसतात इत्यादि उत्साहजनक उपदेश मोठ्या परिणामकारक भाषेंत केला होता. दुसरें असेंच एक पत्रक त्यानीं काढलें त्याचें नांव India–a grave yard! असें ठेवलें. हें त्या वेळीं अत्यंत लोकप्रिय झालें होतें. त्याच्या लाखो प्रती वाटल्या गेल्या. इतकेंच नव्हे तर जगांतील बहुतेक भाषांमधून त्यांचीं भाषांतरें प्रसिद्ध झालीं. हिंदुस्थानांतही कित्येक भाषांमधून छापवून तें वाटण्यांत आलें होतें.

या काळांत ते स्वतःचा निर्वाह लेख लिहून व व्याख्यानें देऊन करीत असत. अनेक पत्रें व मासिकें त्यांचेकडे हिंदुस्थानविषयक लेखांची मागणी करीत व लालाजीही रात्रीचा दिवस करून, काळजीपूर्वक सुंदर लेख लिहून पाठवीत. अनेकदां या लेखांचीं भाषांतरें जर्मन, फ्रेंच आदि भाषेंतील पत्रांत छापलीं जात व अशाप्रकारें अनायासेंच कार्याचा प्रसार जगभर होत असे.

त्यांचा या वेळचा दिनक्रम मोठा धांवपळीचा असे. सतरा कामें पाठीमागें सदोदित असत. हीं सर्व तर करावयाचींच पण घरांतलींही झाडलोट करण्यापासून तों स्वयंपाकापर्यंत सर्वच कामें लालाजी जातीनें करीत असत. त्यांची राहाणी मूळचीच साधी व मितव्ययी असे. त्यांतून अमेरिकेसारख्या संपत्तीच्या माहेरघरीं महर्गताही पराकाष्ठेची. यामुळें घरगुती कामासाठीं नोकर ठेवणें त्यांना परवडत नसे. ही सर्व हकीकत डॉ० हर्डीकरांच्या पत्रद्वारें हिंदुस्थानांत कळली तेव्हां हजारों लोकांना अत्यंत वाईट वाटलें. त्यांना पाठविण्यासाठीं निधी गोळा करण्याची योजना निघाली पण त्याला दिवसगत लागेल ह्मणून लोकमान्यांनीं येथील होमरूल लीगचे पैशांतून त्यांना पंधरा हजार रुपये रवाना केले. लालाजींना हे पैसे पोंचतांच त्यांनीं उद्गार काढले कीं 'खरोखर सगळ्या हिंदुस्थानांत परदेशीय चळवळींचें योग्य महत्व जाणणारा पुरुष हा एकटा आहे.' या द्रव्यसंख्येचा विनियोग लालाजींनीं वैयक्तिक व्ययाकडे तर केला नाहींच पण संस्थेच्या कामींही केला नाहीं. संस्थेची गंगाजळी ठेव ह्मणून त्यांनीं ती द्रव्यसंख्या बँकमध्यें जमा केली. यावरून निःस्वार्थीपणाबरोबर त्यांची दूरदृष्टि व कार्यकुशलताही दिसूत येते.

रात्रीं दिवसा केव्हांही पहा, लालाजींची खोली ह्मणजे भोवतीं कागदाचे भारे पडले आहेत, पुस्तकें पडलीं आहेत व लालाजी हातांत पेन्सिल घेऊन एकादें पुस्तक वाचून त्यावर खुणा करीत आहेत किंवा कांहीं तरी लिहीत आहेत असा देखावा दिसावयाचाच. पुस्तकें वाचणारे ते मोठे जबर! अमेरिकेंत होते तेवढ्या काळांत त्यांनी तेथील अत्यंत समृद्ध ग्रंथशाळांतून असलेलीं हिंदुस्थानविषयक पुस्तकें एकूण एक वाचून टाकलीं. कित्येकदां तर त्यांनीं सूचना करून कित्येक जुनीं जुनीं हिंदुस्थानविषयक पुस्तकें या ग्रंथशाळेच्या चालकाना मागवावयाला लावावीं!

निद्रानाशाच्या विकारामुळें त्यांना रात्रीं फारशी झोप येत नसे. या कुशीवरून त्या कुशीवर कड पालटीत ते तळमळत पडत. कामाच्या भारामुळें त्यांची प्रकृतीही नीट वागत नसे. तरी त्यांनीं आपले सहकारी डॉ० हर्डीकर यांना उपसर्ग लागूं देऊं नये. त्यांच्यावर मुलासारखें प्रेम ते करीत. लालाजींचे कष्ट पहावेनासे होऊन हर्डीकरच त्यांचेजवळ बसत व त्यांचें

अंग दाबून देत, तों यांनीं ह्मणावें "जा हर्डीकर! तुह्मी जाऊन झोपा आतां. किती जागाल? तुह्माला उद्यां पुनः कितीतरी कामें करावयाचीं आहेत. जा मी आतां वाचतांवाचतां झोंपी जाण्याचा प्रयत्न करतों." परंतु कांहीं वेळानें पाहावें तों त्यांची तळमळ चालूच असे.

अशा स्थितींत ते आपलें लिहिण्याचें काम बहुतेक रात्रींचें करीत. त्यांचा पत्रव्यवहार फार दांडगा असे. पण तो सगळा ते स्वतः करावयाचे. हाताखालीं तीनचार माणसें त्यांचेजवळ असत पण आपलें काम त्यांनीं दुसऱ्याला कधीं सांगू नये. स्वतः काम करण्यांतच त्यांना खरा आनंद व सुख वाटत असे व त्यांचें इतरांना नेहेमीं हेंच सांगणें असे कीं तुह्मी दुसऱ्या-वर अवलंबून नसाहतां स्वतःचें काम स्वतः करीत जा. ह्मणजेच थोड्या वेळांत व थोड्या कष्टांत पुष्कळ काम होईल.

हिंदुस्थानांतील बातमीकडे त्यांचे डोळे लागलेले असत. व हीं वर्षेंही हिंदुस्थानाला फार महत्वाचीं गेलीं. १९१५ मध्यें हिंदुस्थान सरकारनें महायुद्धाकरितां येथें सैन्यभरती सुरू केली ही बातमी कळतांच त्यांना अत्यानंद झाला व त्यांनीं हिंदुस्थानवासीयांना एक उत्तेजनपर पत्र पाठविलें. तसेंच पुढें बादशहाचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यावर त्याबरहुकूम मॉंटेग्यू आपली योजना करावयास हिंदुस्थानांत आले तेव्हां लालाजींनीं **हिंस्थानचे राजकीय भवितव्य** हा ग्रंथ लिहावयास घेतला. व त्यांत त्यांच्या मतानें हिंदुस्थानची राजकीय उत्क्रांती कसकशी व्हावयास हवी याचें विवेचन केलें. इतक्यांत पंजाबांतील भीषण अत्याचारांच्या व जालियनवाला बागेच्या वगैरे बातम्या अमेरिकेंत जाऊन पोहचल्या. त्यांनीं लालाजींचें मन पोळून गलें. संतप्त मनानें त्यांनीं त्या अत्याचारांचा निषेध तिकडील वर्तमानपत्रांतून तर केलाच पण आपल्या नवीन लिहिलेल्या पुस्तकाला विस्तृत प्रस्तावना जोडून त्यांत त्यांनीं या अत्याचारांचें वास्तविक रूप स्पष्ट केलें. त्याचा पाश्चात्य वाचकांवर मोठा परिणाम झाला. याच वेळीं लालाजींनीं पंजाबातील आपल्या दुःखी देशबांधवांना "वाटतें, पंख असते तर उडून तुमच्यांत आलों असतों आणि तुमच्या कष्टांत सहभोगी झालों असतों. पण कचरूं नका. शूर पंजाब्यानो! आलेल्या संकटाला धीरानें तोंड द्या. जे नेते या सर्व विपत्तींत तुमच्यापुढें होते व संकटांचे आघात ज्यांनीं प्रथम आपल्या हृदयावर

झेलून घेतले त्यांची पाठ सोडूं नका. धीर धरा व असल्या [illegible] एकाच आघातानें चिरडून जाण्याइतके कांहीं पंजाबी लोक कच्च्या मनाचे नाहींत हें सर्व जगाला दिसूं द्या " असा धीराचा संदेश पाठविला. तो मूळातूनच वाचावयाची वाचकांना विनंति केल्यावाचून राहवत नाहीं.

लालाजींच्या उद्योगाचा परिणाम धीरेधीरे अमेरिकेंत होत होता. त्यांचें 'हिंदुस्थानचें राजकीय भवितव्य' पुस्तक वाचून पुष्कळ अमेरिकन सीनेटर्सना हिंदी स्वातंत्र्याविषयीं सहानुभूती वाटूं लागली व त्याच्या खटपटींनीं अमेरिकेच्या काँग्रेसच्या परराष्ट्रीय विभागापुढें हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची चर्चा व्हावयाचें ठरलें. हें लालाजींना समजताच, अवधी पुरा चोवीस तासांचाही नव्हता तरी, त्यांनीं तडकाफडकीं एक दहा बारा पानांचा अर्ज सभेच्या अध्यक्षांचे नावानें लिहून काढला व तो लागलींच छापवून त्याच्या प्रती त्या सभेंत कामाला प्रारंभ होण्यापूर्वी वाटून टाकल्या.

अशाप्रकारें मिळेल त्या त्या संधीचा लाभ घेऊन, कोठें लॉयड जॉर्जला व मॉंटेग्यूना अनावृत पत्रें लिहून तर कोठें युद्धसमाप्तीच्या वेळीं प्रे. विलसनला अभिनंदनाची तार पाठवून, कधीं पंजाबांतील अत्याचाराचें चित्र पाश्चात्यांपुढें रेखाटून तर कधीं हिंदी सैन्याला महायुद्धांत भाग घेऊं दिला याविषयीं इंग्रज सरकारचें अभिनंदन करून, लालाजींनीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न पाश्चिमात्य राष्ट्रांच्या डोळ्यांपुढें सतत खेळता ठेवला होता. इतक्यांत त्यांना एक अत्यंत आनंदाची बातमी कळली. लो० टिळक होमरूल लीगचे शिष्टमंडळ घेऊन विलायतेस आल्याचें त्यांना कळलें. तेव्हां लालाजींनीं अत्यंत कळकळीचें पत्र पाठवून त्यांना अमेरिकेंत येण्याविषयीं विनंती केली. याच पत्रांत त्यांनीं परदेशीय प्रचाराचें महत्व किती आहे हें स्वानुभावानें वर्णिलें होतें व तें काम करण्याची एक योजनाही त्यांनीं लिहून पाठविली होती. त्यांना लोकमान्यांविषयीं काय वाटत होतें तें मागें दिलेंच आहे. त्याच अनुभवावरून त्यांनीं आतां हें पत्र लिहिलें होतें. पण शिष्टमंडळ अमेरिकेंत जाऊं शकलें नाहीं तरी त्या पत्रावें स्मरण ठेऊन लोकमान्यांनीं परत देशीं गेल्यावर अमृतसरच्या राष्ट्रीयसभेंत तो प्रश्न काढला व त्यासंबंधीं कांहीं निश्चित योजना ठरविण्याकरितां व निधी गोळा करण्याकरितां लो० टिळ-

कांच्याच अध्यक्षत्वाखालीं एक कमीटी नेमण्याचा ठराव सभेनें संमतही केला. या कामाचा मुख्य वांटा लालाजीकडेस सोंपविला जावयाचा होता. इतक्यांत बादशाही प्रसिद्धीपत्रक निघून त्याप्रमाणें लालाजीवरील बंदी उठल्याचें व ते आपल्या प्रिय मातृभूमीस येण्याकरितां परत निघाल्याचें वर्तमान आलें. तेव्हां त्यांचें स्वागत करण्याचा ठरावही त्याच सभेंत सर्वांनीं करून घेतला.

लालाजी अमेरिकेंतून परत यायला निघाले तेव्हां त्यांच्या कार्याची माहिती तेथील लोकांना इतकी पटली होती व ते इतके लोकप्रिय झाले होते कीं त्याच्या स्तुतिपर लेख यावेळीं वर्तमानपत्रांनीं लिहिले. न्यूयॉर्कच्या सिव्हिक क्लबानें त्यांना भोज दिला व तिकडील रीतीप्रमाणें त्यांचें स्तुतिपाठही गाण्यांत आलें. लालाजींनीं आपल्या तेथील कामाचा सर्व भार आपले एकनिष्ठ सहाय्यक डॉ हर्डीकर याजवर सोपवून ते विलायतमार्गे हिंदुस्थानला यावयास निघाले ते २० फेब्रुवारीला मुंबइस येऊन उतरले तेथें त्यांचें मोठ्या थाटानें स्वागत करण्यांत आलें. जंगी मिरवणुक निघाली. सहा वर्षांचा आपला वनवास संपवून आपला लाडका पुत्र परत घरीं आलेला पाहून हिंदभूमीला आनंदाचें जणूं भरतें आलें व हा लाल आतां कोठें ठेऊं व कोठें न ठेऊं असें तिला होऊन गेलें. मेजवान्यांची व मानपत्रांची अभिनंदनपर तारांची व पुढाऱ्यांच्या मुलाखतींची एकच गर्दी उडाली. दहादहा बाराबारा हजार श्रोत्यांचा समुदाय त्यांचीं भाषणें अत्यंत उत्सुकतेनें ऐकुन घेऊं लागला. मुंबईस शांतारामाचे चाळींत लोकमान्यांच्या अध्यक्षतेखालीं तेथील विद्यार्थ्यांनीं लालाजींना मानपत्र दिलें. तेव्हां व इतर सभांतून लालाजींनीं "मी सर्व जग हिंडून आलों आहें व तुलना केली तर जगांतील इतर कोणत्याही देशांतील नागरिकापेक्षां हिंदुस्थानचे लोक योग्यतेनें कमी नाहींत अशी माझी निश्चिति पटली आहे. हताश होण्याचें तुह्मांला कांहीं एक कारण नाहीं. स्वदेशाचें हित करावयाची आपली इच्छा असली तर आपल्याहातून स्वदेशहित झालेंच पाहिजे अशी माझी दृढ निष्ठा आहे. सत्याचरण, साधेपणा शारीरिक कष्टाला कमी न समजणे इत्यादि सद्गुणांच्या बलावर इतर राष्ट्रांच्या समकक्षस्थान हिंदुस्थानला मिळवितां आलेंच पाहिजे. इतर राष्ट्रांत हे गुण फार कमी प्रमाणांत आहेत तेव्हां पाश्चिमात्य जगताचें दुर्गुण जर हिंदुस्थानानें

उचलले नाहींत तर आपला हा प्रिय मातृदेश अल्पकाळांतच स्वराज्य संपन्न होईल इतकेंच नव्हे तर इतरही राष्ट्रांना गुरुस्थानीं शोभूं लागेल. मात्र तुह्मी स्वतःच्या पायांवर उभे रहा. दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहूं नका. आपला उद्धार करण्याची शक्ती आपल्याच अंगांत असते हें खूब समजून असा" अशा आशयाचा, आत्मविश्वासपूर्ण उत्तेजनात्मक संदेश आपल्या श्रोतृगणाला निवेदन केला.

# असकारितेचे अध्वर्यू.

———:x:———

पंजाबांत जाऊन पोंचतांच लालाजींनीं एकदम कार्याला सुरवात केली. ते प्रथम सर्वत्र हिंडून तेथील परिस्थिती समजाऊन घेऊं लागले व बारा महिन्यापूर्वीं घडलेल्या अत्याचारांना बळी पडलेल्या लोकांना साह्य देऊं लागले. जालियनवालाबागेंतील हत्याकांडाच्या स्मरणार्थ राष्ट्रीय आठवडा पाळण्याची व स्मारकासाठीं पैसा मिळविण्याची त्यांनीं चळवळ केली. या कार्यासाठीं फिरत असतांना त्यांना पंजाबची जी स्थिती दिसली त्यानें त्यांचें हृदय व्यथित होऊन गेलें. इतक्यांत हंटर कमिटीचें प्रतिवृत्त बाहेर पडलें. तें वाचतांच त्यांचा मॉंटेग्यू योजनेनुसार मिळालेल्या सुधारणांवर बहिष्कार टाकण्याचा विचार जो पूर्वीच ठरला होता तो पक्का झाला व त्यांनीं ती चळवळ हातीं घेतली. 'वंदेमातरम' नांवाचें ऊर्दू दैनिक त्यांनीं चालू केलें होतें त्यांतून त्यांनीं प्रसिद्ध केलें कीं, मी कांहीं विधिमंडळांत जाणार नाहीं. याला यांनीं मुख्य कारण असें दिलें कीं, 'ज्या अधिकाऱ्यांनीं मागील वर्षी असले पैशाचिक अत्याचार आमच्या देशबांधवांवर केलें त्यांच्या मांडीशी मांडी लाऊन विधिमंडळांत बसणें व कामकरणें हें स्वाभिमानाला विघातक आहे. त्यांतून सुधाणा कायदा ह्मणजे केवळ दिखाऊ सोंग आहे. त्याचा उपयोग करून देशाचें ह्मणजे मोठेंसें हित होणार आहे असें नाहीं.' अर्थात् ते विधिमंडळांच्या सरसकट बहिष्काराला अनुकूल नव्हते पण पंजाबातील विशिष्ट परिस्थितीमुळें त्यांनीं बहिष्काराचा पुरस्कार केला.

पुढ लवकरच त्यांना कलकत्याच्या विशेष राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान देण्यांत आलें. यावेळीं त्यांनीं जें अध्यक्षीय भाषण केलें तें अत्यंत विस्तृत व माहितीपूर्ण असें आहे. पंजाबांतील अत्याचार खिलाफत व स्वराज्य या तीन प्रश्नांचा विचार त्यांत स्पष्ट शब्दांत विस्तारपूर्वक केलेला आहे. खिलाफतीचा विचार त्यांनीं या भाषणांत आंतरराष्ट्रीय राजकारणाचे दृष्टीनें केला. व शेवटच्या प्रश्नासंबंधीं त्यांनीं स्वावलंबनाची कास धरा व जनता जागी झालेली दिसत आहे तर तिच्या आंकांक्षाकडे दुर्लक्ष करूं नका असें सांगितलें

असहकारितेचा जो कार्यक्रम म० गांधींनीं त्यापूर्वीच प्रसिद्ध केला होता. त्याविषयीं त्यांनीं पूर्णमौन स्वीकारलें. शेवटीं राष्ट्रीयसभेच्या बैठकींत तो ठराव समंत झाला. तेव्हां त्यांनीं आपल्या शेवटल्या भाषणांत आपली मतें व्यक्त केलीं. ते ह्मणाले "असहकारितेचें तत्व मला मान्य आहे पण कार्य-क्रमांत मला किती तरी दोष दिसतात. तो व्यवहारांत कितपत आणतां येईल याची मला शंका आहे. देशांत राष्ट्रीय सरकार नाहीं तोंवर राष्ट्रीय शिक्षण शक्य नाहीं हें लक्षांत ठेऊन मग शाळेंतून मुलें काढावयाचीं असतील तर काढावींत. कोर्टांच्या बहिष्काराची तीच गति आहे. कौन्सिल बहि-ष्काराविषयीं बोलावयाचें तर आज ३५ वर्षें आह्मांला सहकार्याची संवय पडली आहे. तेव्हां तो बहिष्कार कसा व कितपत कृतींत आणावयाचा याचा विचार करण्याकरितां मंडळ नेमलें हें उत्तम झालें. मंडळानें पंजाबच्या अन्यायांचा विचार या प्रश्नाचे वेळीं बाजूस ठेवावा व हिंदुस्थानचें हित लक्षांत घ्यावें. खिलाफतीविषयीं मला इतकेंच ह्मणावयाचें आहे कीं, राष्ट्रीय सभेनें ही बाब आपल्या कार्यक्रमांत घ्यावयाचें कारण नव्हतें. तो मुसलमानांचा प्रश्न आहे त्यांना आपण सहानुभूती अवश्य दाखवावी व शक्य तितकें साह्यही करावें पण खिलाफत प्रश्नाशीं समरस होऊन जाण्याचें धोरण चुकीचें आहे. असो. माझा याप्रमाणें कित्येक विधेयांवर मतभेद असला तरी महासभेनें जो ठराव संमत केला आहे तो यशस्वी करण्याकरितां मनःपूर्वक झटणें हे सर्वांचें कर्तव्य आहे." आपला मतभेद येथें स्पष्ट करूनच लालाजी थांबले नाहींत तर असहकारितेचा कार्यक्रम कृतींत कसकसा आणावा याचा विचार करण्याकरितां जें म० गांधी पं० नेहरू व पटेल यांचे मंडळ नेमलें होतें त्याचें प्रतिवृत्त बाहेर पडल्यावर पटेलांनीं जी भिन्नमत-पत्रिका जोडली होती तिला त्यांनीं अनुमोदन दिलें. परंतु नागपुरच्या सभेंत जेव्हां तोच कार्यक्रम राष्ट्रानें फिरून संमत केला तेव्हां त्यांनीं विरोध बाजूस ठेवला व असहकारितेचे ते खरे खरे अध्वर्यू बनले. असहकारितेच्या यशाचा वांटा म० गांधी, पं० नेहरू व देशबंधू दास यांचेबरोबरच लालाजींना द्यावा लागेल. असहकारिता पंजाबांत त्यांनीं यशस्वी करून दाखविली ती जिवापाड श्रम करूनच लाहोरच्या असहयोग मंडळाचे ते अध्यक्ष होते. व राष्ट्रीय विद्यालयाची स्थापनाही त्यांनींच केली. तसेच लो० टिळकांचे

स्मरणार्थ त्यांनीं एक राजकारणाची पाठशाळा स्थापन केली. या शाळेत अर्थशास्त्र, राजकारण, इतिहास इ. विषयाचें उच्च शिक्षण देऊन, देशकार्याला सर्वस्वी वाहिलेले कार्यकर्ते निर्माण करावे असा त्यांचा उद्देश होता

पण पंजाबांतच कार्य करून त्यांचें समाधान होत नव्हतें. अन्य प्रांतांतही ते दौरे काढून कार्य करीतच होते. अखिलभारतीय पुढारी या नात्यानं त्यांना निरनिराळ्या सभांच व परिषदांचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती परप्रांतांतील कार्यकर्ते करीत असत व ती स्वीकारून लालाजी त्या प्रांताला आपला संदेश ऐकवीत. उदाहरणार्थ नागपुर कांग्रेसचें वेळींच अखिल भारतीय विद्यार्थी संमेलन नागपुरास भरलें होतें त्याचे ते अध्यक्ष होते. त्यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत विद्यार्थ्यांना अत्यंत सुंदर उपदेश केला. सरास शाळा सोडण्याचा परामर्ष त्यांनीं विद्यार्थ्यांना दिला नाहीं. ' माझ्या लहानापासूनच माझी अशी निश्चिती पटलेली आहे कीं, इंग्रज सरकार जें शिक्षण देतें तें आपलें आसन येथें अटळ व्हावें या धोरणानेंच देतें. पण राजकीय सत्तेचा लवलेशही आपल्या हातांत नसल्यामुळें आपल्याला त्याचा प्रतिकार करतां येत नाहीं. राष्ट्रीय सरकार असल्यावांचून राष्ट्रीय शिक्षण मिळणच शक्य नाहीं. ह्मणून जे कोणी शाळा सोडाल ते त्या भर-वंशावर सोडूं नका देशाची हांक ज्यांना ऐकूं येत असेल त्यांनीं शाळा सोडून देश कार्याला लागावें. किंवा शारीरिक कष्टाला न भितां कार-खान्यांतून मजूर बनावें व तेथील अशिक्षित मजुरांत जागृती आणावी. समाजांत जागृती आणण्याचें काम तुह्मी केलें तरी स्वराज्य कितीतरी जवळ येईल." या नंतर पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृतींचा तुलना करतांना ते ह्मणाले, 'पूर्वी एक काळ असा होता कीं पौर्वात्य तितकें त्याज्य अशी सर्वांची समजुत होती. आतां काळ फिरला आहे व पाश्चिमात्य जें जें असेल त्याचा "स" नको असें वाटू लागलें आहे. परंतु खरें सुशिक्षण तें कीं ज्यामुळें आपल्यातील चांगल्या गोष्टींना आधुनिक सुधारणांचें तेज चढवितां येईल. तुह्मी खरे विद्यार्थी बना. जें जें चांगले दिसेल–मग तें पूर्वेंत असो का पश्चिमेंत असो–त्याचा अंगिकार करा. पाश्चिमात्यांचें ज्ञान व विज्ञान हस्तगत करून घ्या. त्यावाचून हिंदुस्थानचा यापुढे तरणोपाय नाहीं." लालाजींचा स्वभाव विधा-यक कार्य करण्याचा होता. त्यांनीं आपल्या भाषणांत शेवटीं आग्रहाची

व ळकळीची सूचना केली की ' ही अखिल भारतीय विद्यार्थी सभा सतत चालेल असें करा. प्रचलित राजकारणांतील पक्षभेदांपासून ती अलिप्त राखा व विद्यार्थी जगतांत जागृती आणा. नुसत्या भावनेला बळी पडूं नका. उठा, प्रत्यक्ष कामाला लागा. मी तुह्मांला लागेल तें साहाय्य करण्याला सिद्ध आहे."

मुंबईस अखिल भारतवर्षीय मजूर परिषद झाली तिच्या अध्यक्ष-पदावरूनही लालाजींनी असेंच स्फूर्तिदायक भाषण केलें. " आज तुमच्या पुढें मुख्य प्रश्न हा आहे कीं, आपली संघटना करावी व आपल्या नडी काय आहेत यांचें ज्ञान करून घ्यावें. आज हिंदुस्थान स्वराज्याकरितां लढत आहे. पण लक्षांत ठेवा, स्वराज्य पायरीपायरीनें मिळत नसतें किंवा वराज्यांत कधीं भेसळही असत नाहीं. नुसत्या हातांतल्या हातकड्या काढल्या व पायांतल्या शृंखला तशाच ठेवल्या तर त्याला स्वातंत्र्य ह्मणत नाहींत. मजुरांच्या पायांत अनेक शृंखळा आहेत. भांडवलवाले व सरकार यांच्या बाजूला सर्व सत्ता आहे. पण मजूरवर्ग व शेतकरी वर्ग संघटित झाला तर—हिंदुस्थानचा राजकीय प्रश्नसुद्धां चुटकीसरसा सुटेल नुसता संप केला तर राजसत्तेला वांकविण्याचें सामर्थ्य तुमच्यांत आहे. केवळ तुह्मी संघटित मात्र झालें पाहिजे"

यावेळीं असहकारितेच्या चळवळीचा जोर कमी करण्याचे उद्देशानें युवराजांना हिंदुस्थानांत आणण्याचा सरकारनें विचार केला. लोकांनींही त्यांच्या स्वागतावर बहिष्कार टाकण्याचा निश्चय विदित केला होता. नोव्हेंबर मध्याचे सुमारास युवराज मुंबईला येऊन उतरले. अर्थात हरताळ पडला व त्या निमित्तानें मुंबईस दंगाही झाला. सरकार चिडून गेल. युवराजांचा दौरा सर्व हिंदुस्थानांत व्हावयाचा होता. येथें तर—प्रथम दर्शनींच हा अपशकुन झाला. तात्काळ सरकारनें आपलें दडपशाहीचें अस्त्र बाहेर काढलें. अर्थातच लालाजीवर तें प्रथमच फेकलें गेलें. सभाबंदीचा कायदा पंजाबला लागू केला व कांग्रेस कमिटीची सभा सार्वजनिक ठरवून लालाजींना पकडलें. खटला झाला. चौकशीचा फार्स व्हावयाचा तोहि झाला. शेवटीं निरनिराळ्या दोन कलमाखालीं त्यांना १॥ वर्षांची व सहा महिन्यांची अशा शिक्षा ठोठावण्यांत आल्या. तिकडे देशबंधु दास व मोतीलाल नेहरू यांनाही सरकारनें तुरुगांत डांबलेंच होतें पण त्यांना त्याच कलमाखालीं केवळ

सहा महिन्यांची शिक्षा देऊन सरकारचें समाधान झालें. यावरून सरकारचा लालाजींवर किती दात होता हें स्पष्ट दिसते. पण खरी मजा तर याच्य ही पुढेंच आहे. ती अशी कीं सरासरी दोन महिने याप्रमाणें तुरुंगांत कंठल्यावर त्यांना एका दिवशीं सरकारनें सोडून दिलें. व नंतर लगेच पुन: पकडलें! न्यायालयांतील चौकशीचा फार्स पुन: एकवार करण्यांत आला व व पुन: ९ मार्च १९२ दिवशा दोन वर्षांची शिक्षा दिली. त्यांत एक वर्ष सश्रम कारावास व एक वर्ष साधी. अर्थात सश्रम कारावास प्रथम भोगावयाचा होता! लालाजींचें वय साठीच्या जवळ आले होतें तरी कायद्याविरुद्ध त्यांना सश्रम कारावास मिळाला! पण जेथें दडपशाहीचें सत्र सुरु झालें व तीस चाळीस हजार स्वयंसेवक तुरुंगांत गेले तेथें असल्या अन्यायाची विशेष क्षिती कोणाला वाटणार? लालाजींचें सर्वत्र अभिनंदन करण्यांत आलें व झगडा जोरानें पुढें चालला. त्यानंतर महात्मा गांधी पकडले गेले व चळवळीचा पारा उतरत चालला. व लालाजी तुरुंगांतून बाहेर पडण्याच्या सुमारास देशाचा सर्वच देखावा पालटून गेला. असहकारितेचा कार्यक्रम जवळजवळ स्थगित झाला होता. कौन्सिलकडे अद्याप कांग्रेसची प्रवृत्ती झालेली नव्हती. देशांतील राजकारणाची स्थिति सांचलेल्या पाण्याप्रमाणें कुंचबणुकीची झालेली होती तसेंच 'खिलाफतीची आफत' गळ्यांत बांधून घेतल्याचें प्रायश्चित्तही देशाला मोपल्यांच्या बंडाच्या रुपानें व इतरत्र जे अनेक दंगे हिंदु मुसलमानांचें झाले त्यांनीं भोगावयास लावलें होतें!

लालाजींचा कारावास त्यांना अत्यंत कष्टप्रद झाला. त्यांची प्रकृती बिघडली. पण सरकार त्यांची बातमी बाहेर येऊं देईना. त्यामुळं लोकांना फार चिंता वाटूं लागली. तुरुंगांतून जे बन्दी सुटत त्यांचेकडून काय तें लालाजींचें वर्तमान अस्फूटसें कळे. १९२३ मध्यें बातमी आली कीं, लालाजींची प्रकृती अत्यवस्थ आहे. जुलै नऊ तारखेला तर त्यांच्या आरोग्याप्रीत्यर्थ सर्व देशभर प्रार्थना करण्यांत आल्या. त्यांची प्रकृती क्षयावर गेली होती व तशांतच त्यांना संग्रहणी झाली. सरकारनें कारागृहांतील रुग्णालयांत त्यांची पाठवणी केली होती. शेवटीं जेव्हां ते मरणोन्मुख झाले तेव्हां मृत्यूचें पातक आपल्यावर येऊं नये या भावनेनें सरकारनें १८ ऑगष्ट १९२३ दिवशीं त्यांची मुक्तता करून दिली.

# हिंदुसंघटनाचें कार्य.

कारावासांतून मुक्तता झाल्यानंतर लालाजी प्रथम आरोग्यप्राप्ती करतां सिमल्याच्या जवळ सोलोन नामक स्थानीं राहावयास गेले. येथं त्यांचें बाकीचें सर्व कार्य बंद होतें पण वर्तमानपत्रें वाचून देशाच्या प्राप्त परिस्थितीचें ज्ञान करून घेतां येत होतें तें त्यांनीं करून घेतलें. मधून मधून यावेळीं लेख लिहण्याचें कामही लालाजी करीत असत.

यावेळीं स्वराज्यपक्ष सगळीकडे जोरांत होता. नवीन निवडणुकी जवळ आल्या होत्या. पंजाबांत स्वराज्यपक्षाची शाखा लाला दुनीचंद यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झाली होती व सेप्टेंबर महिन्यांत या कौन्सिलच्या प्रश्नाचा पुरा विचार करून काय तो नित्याचा निणय करण्याकरितां व राष्ट्रीय सभेच्या दोन पक्षांतील दुही टाळण्याकरितां दिल्लीला सभेचें विशेष अधिवेशन व्हावयाचें होतें. ही सर्व परिस्थिती लालाजींनीं अवलोकन केली व आपण १९२० मध्यें जें भाकीत केलें होतें कीं, तेजस्वी कार्यक्रम राष्ट्राला पचला नाहीं तर राष्ट्र उलट खाईल तें खरें होत चाललें आहे असें त्यांना वाटलें पण देशांत अनेक ठिकाणीं जे हिंदुमुसलमानांचे दंगे झाले त्यांचा व विशेषतः मलबारांतील मोपल्यांच्या बंडाचा त्यांच्या मनावर विशेष परिणाम झाला. त्याची मीमांसा त्यांना लागेना. देशाचें कांहीं तरी चुकलें आहे इतकेंच त्यांनीं तूर्त ठरविलें. ‘ हिंदु समाजाची सांप्रतची दशा ’ या नांवाचा एक लेख त्यांनीं या वेळीं ‘ वंदेमातरम् ’ मध्यें लिहिला. व त्यांत हिंदूंनीं आप सांतले भेद बाजूला ठेऊन एक व्हावें व संघटन करावें; पण मुसलमानांनीं आह्मांला मारलें ह्मणून परक्या सरकारकडे दाद मागूं नये असा त्यांनीं उपदेश केला होता व शेवटीं स्वराज्य पाहिजे असेल तर हिंदुस्थानांतील हिंदु हा संघटित बनलाच पाहिजे, त्यावाचून देशाचा तरणोपाय नाहीं असा समारोप केला. एका अर्थी या लेखानें लालाजींनीं हिंदु संघटनेचें रणशिंगच फुंकलें. ह्मणून या लेखाचा विशेष उल्लेख केला आहे.

इकडे दिल्लीला राष्ट्र सभेचें विशेष अधिवेशन पार पडलें. त्याला प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें लालाजी जाऊं शकले हाहींत. पण ते वारंवार एकी चिरस्थायी राखण्याविषयीं व हट्ट सोडण्याविषयीं तारेनें संदेश पाठवीत असत. त्याचा योग्य तो परिणाम होऊन सभेनें बहिष्कारत्रयी स्थगित करण्याचा ठराव केला. यानंतर लालाजींनीं स्वराज्यपक्षाला पाठिंबा देण्याचें ठरविलें. व पंजाबांतील अनेक कट्टर असहकारवादी केवळ लालाजींच्या सांगण्यावरून विधिमंडळांत स्वराज्यपक्षाचे वतीनें उभे राहिले व ते बहुतेक यशस्वी झाले. दिल्लीचे विशेष अधिवेशनानें आणखीही एक विशेष गोष्ट करून ठेवली होती. हिंदु मुसलमानांचा परस्पर सलोखा व्हावा याचा विचार करण्यासाठीं व परस्पराचे हक्कांची योग्य ती योजना करण्यासाठीं लालाजी व डॉ० अन्सारी यांची एक कमिटी एका ठरावानें त्या अधिवेशनांत नेमून टाकली होती. त्याप्रमाणें कमिटीचा मसूदा लवकरच बाहेर पडला व तो राष्ट्रीय धोरणावरच उभारला असल्यामुळें हिंदूंनीं तो मान्य केला. मुसलमानांनींही त्याला संमती दाखविली पण ती तोंडदेखली संमती होती हें त्यांच्या कृतींवरून दिसून आलें.

या वेळीं लालाजींची प्रकृती साधारण बरी होऊन ते हिंडूंफिरूं लागले होते व डॉक्टरांच्या सल्ल्यावरून कोरड्या हवेसाठीं कराची व नंतर कांहीं दिवस हैद्राबादेस जाऊन राहिले होते. ते थोडथोडें कामही पहात असत. पंजाब कांग्रेसकमिटीचे ते यावेळीं अध्यक्ष होते व त्यांच्याच अध्यक्षत्वाखालीं पंजाब प्रांतिकपरिषदेचें अधिवेशन डिसेंबरच्या प्रारंभीं भरलें होतें. यावेळीं त्यांनीं केलेले अध्यक्षीय भाषण ह्मणजे कारावासांतून आल्यानंतरचें पहिलेंच होतें व त्यांत त्यांनीं असकारितेच्या अपयशाची मीमांसा केली आहे. त्यांनीं याचीं मुख्यतः तीन कारणें दाखविलीं. (१) स्वपरबलाबलाचा योग्य अंदाज लोकपक्षाच्या पुढाऱ्यांना लागला नाहीं (२) अहिंसेला •अव्यवहार्यतेच्या सीमेपर्यंत ताणीत नेलें व (३) ‘एक वर्षांत स्वराज्य’ या हुल्लडींत खरें राष्ट्रीय संघटनेचें कार्य दुर्लक्षिलें गेलें. तसच शारीरिक कष्ट भोगण्यावर आपला विश्वास नाहीं, त्यानें व्यक्तीची आत्मबुद्धी फार तर होत असेल पण राष्ट्रीय झगड्यांत त्याचा कांहीं उपयोग नाहीं. केवळ कष्टाकरितां कष्ट भोगावयाचे याचा अर्थच आपल्याला कळत नाहीं असें त्यानीं सांगितलें.

या परिषदेनंतर लवकरच ते प्रकृती उत्तम व्हावा म्हणून युरोपयात्रेस निघून गेले. लंडनमधील हिंदी विद्यार्थ्यांनीं त्यांना मानपत्र व आठशे पौंडांची थैली अर्पण केली. इंग्लंडमध्यें असतांनाच ते तेथील इंडिपेंडंट लेबर पार्टीचे सभासद झाले व त्या पक्षांतील लोकांशीं त्यांनीं घनिष्ट संबंध जोडले. नंतर ते स्विट्झर्लंडांत जिनोवा नामक उत्कृष्ट हवेच्या ठिकाणीं येऊन राहिले पण येथें त्यांची प्रकृती पुन: बिघडली व त्यांना रुग्णालयांत पडावें लागलें. नंतर सहा एक महिन्यांनीं त्यांच्या प्रकृतीला आराम पडला व युरोपांतील कित्येक ठिकाणीं केवळ प्रकृति स्वास्थ्याकरितां फिरत फिरत आणखी चार महिने घालवून जवळ जवळ एक वर्षानें परत मातृभूमीस आले. फ्रान्समधील जलवायूनें त्यांची प्रकृती आतां पूर्ण सुधारली होती. यावेळीं युरोप भ्रमणांत लालाजींचा हेतु निवळ आरोग्य हा होता व तो पूर्णपणें यशस्वी झाला. इतर बाबींकडे त्यांनीं फारसें लक्ष द्यावयाचें नाहीं असें ठरविलें होतें. पण योगायोगानें प्रकृती जास्त बिघडून तिकडे त्यांना बराच काळ राहावें लागल्यानें एक अत्यंत महत्वाचें अन्य कार्यही अनायासें त्यांना साधलें. तें कार्य म्हणजे जगांतील राजकारणी घडामोडींचा त्यांना परिचय झाला व निकट भविष्य कालांत प्रत्येक राष्ट्राचीं काय काय राजकारणें शिजून पक्व होत आहेत याचा पत्ता त्यांना लागला. **विशेषतः आगामी महायुद्धाविषयीं युरोपियन राष्ट्रांचे डावपेच व त्यांचा लाभ घेऊन हिंदुस्थानांत मुसलमानी साम्राज्य स्थापन करण्याचा हिंदी मुसलमानांना अन्य मुसलमान सत्तांचे संगनमतानें रचलेला महाव्यूह याच्या माहितीचे धागे दोरे त्यांना स्पष्टपणें समजले. यामुळें येथें हिंदुस्थानांत असतांना त्यांना हिंदु-मुसलमानांच्या दं विषयीं जें कोडें पडलें होतें तें एकाएकीं सुटलें.** हा व्यूह इतक्या कुशलपणानें व इतक्या गुप्तपणानें रचण्यांत आलेला होता कीं त्याविषयीं माहिती मिळविण्याची बुद्धी तर राहोच पण त्यांचा थोडासाही वास लालाजीसारख्या हिंदु हिताविषयीं सदोदित दक्ष असणाऱ्या व आंतरराष्ट्रीय राजकारणाशीं परिचय राखणाऱ्या चाणाक्ष मुत्सद्यालाही असहकारितेच्या धुमश्चक्रीचे भरांत--कारण राजकीय वातावरण स्वच्छ असतें तर तो आलाही असता--आला नाहीं. मग इतर अनेक भोळसटांचीं कथा काय? तरी सुद्धां १९२० त कलकत्त्यास राष्ट्र सभेच्या विशेष

अधिवेशनाचे अखेरचें भाषणांत लालाजींनीं ‘ खिलापतीच्या प्रश्नाची गुंतागुत राष्ट्र सभेनें आपल्या चळवळींत करूं नये ’ असें सांगितलें होतें. पण त्यांना त्यावेळीं कल्पना नव्हती कीं, मुसलमान इतके पाताळयंत्री व इतके संघटन-कुशल आहेत. मुसलमान हे अराष्ट्रीय वृतचे आहेत हें त्यांना फार पूर्वीपासून माहित होतें. १९१६ मध्यें जेव्हां त्यानीं ऐकलें कीं, राष्ट्रसभेच्या स्वराज्याच्या योजनेला मुसलमानांनीं पाठिंबा दिला तेव्हां अमेरिकेंत राहात असल्यामुळें येथील परिस्थितीची कल्पना नव्हती तरी त्यांना आश्चर्य वाटलें व तें त्यांनीं आपल्या, ‘ तरुण भारत ’ ग्रंथांत व्यक्तही केलें. परंतु मुसलमानांची अराष्ट्रीय मनोवृत्ती हें त्यांच्या अज्ञानाचे फळ आहे. त्यांच्या अज्ञानाचा फायदा फोडा व झोडा या कुटिल राजनीतींत प्रवीण असलेलें इंग्रज सरकार घेतें व मुसलमानांना हिंदू विरुद्ध चिथावतें. मुसलमानांत शिक्षणाचा फैलावा झाला कीं ते इंग्रज सरकारचा कावा ओळखतील व हिंदूंशीं हात मिळवून राष्ट्रीय बाण्यानें वागतील असेंच त्यांना तेव्हां वाटलें व १९२० नंतरच्या असह-कारितेच्या चळवळींत बाह्यतः तसा अनुभवही आला. यामुळेंच मुसलमानांच्या पोटांतील काळें त्यावेळीं कुणाच्या लक्षांत आलें नाहीं. मलबारांत मुसलमान मोपल्यानीं इस्लामी राज्य स्थापण्याचा जो प्रयत्न केला व काबूलच्या अमीराचें नांव पुढें करून हजारों हिंदूंचा जो अमानुष छळ केला व विशेषतः या सर्व प्रकारचा निषेध जेव्हां मुसलमानांतील कोणाही पुढाऱ्यानें केला नाहीं तेव्हां हिंदूंचे डोळे उघडावयास हवे होतें पण असहकारितेच्या मंत्राची मोहनी डोळयावर असलेले, एक वर्षांत स्वराज्य या कल्पनेनें हुरळलेले, व अहिंसेच्या बावळट तत्वज्ञानाचीं पुटेंच्या पुटें बसल्यामुळें मोहविमूढ झालेले लोक हा सर्व विचार कसा करूं शकणार ? तो काळच असा विचित्र होता कीं राजकारणांत जी परिभाषा वापरली जात होती तिचा अर्थ हिंदु एक समजत व मुसलमान दुसराच समजत. हिंदु-मुसलमानांची एकी याचा अर्थ या दोन समाजांनीं राष्ट्रीय वृत्तीनें वागून स्वयंशासनाचे अधिकार प्राप्त करून घ्यावयाचे व भावी स्वराज्यांत उभय समाजांचे स्वत्व यथाप्रमाण अबाधित रहावयाचें, एकानें दुसऱ्यावर कुरघोडी करावयाची नाहीं असा हिंदु करीत होते व प्राणपणानें आपल्या मुसलमान भाईच्या खिलाफतीची ‘ आफत ’ आपल्या गळयांत बागवून त्याकरितां पैशाची, शरीर कष्टांची किंवा कसलीच

क्षिति करीत नव्हते. पण मुसलमानांचा अर्थ वेगळा होता. मलबारांतील मोपल्यांचा पुढारी अल्ली मुसेलियर यांच्या शब्दांतच तो अर्थ सांगितलेला बरा. अल्ली मुसेलियर प्रात्यहीं आपल्या अल्लाची प्रार्थना करतांना म्हणे, 'अल्ला! हिंदु-मुसलमानांची एकी होऊं दे. सर्व हिंदु मुसलमान होऊं देत!!' हाच भावार्थ, चार दोन मुसलमान पुढारी वगळले तर बाकी साऱ्यांचा होता. त्यांच्यांत भेद असेल तर तो कोण किती मुत्सद्दीपणानें आपले विचार मांडतो व हिंदूंच्या प्रेमाचा पान्हा फुटल्याचें ढोंग किती बेमालुमपणें करतो इतक्या पुरताच होता! हा जसा 'एकी' चा अर्थ तसाच परस्पर समान योग्यतेचा अर्थ. म. गांधींपेक्षां एकादा फाटका मुसलमानही केवळ तो मुसलमान आहे याच कारणाकरितां जास्त श्रेष्ठ आहे असाच मुसलमान करीत होते. 'एका वर्षांत स्वराज्य' या मोहक शब्द योजनेची तर फारच विलक्षण दशा होती. साधारण हिंदूंना त्या गर्जनेचा अर्थ कांहींच कळत नसे. पण जे चाणाक्ष असत ते अशी कल्पना लढवीत कीं, सविनय विधिभंग सर्व देशभर चालू व्हावयाचा, भुमीकर नाकारावयाचा व सरकारी राज्ययंत्र लुलें करावयाचें आणि मग सरकार वठणीवर येऊन नाकदुराया काढूं लागलें कीं, 'वाटोळ्या टेबलाची' परिषद उभयपक्षांची भरवून तिनें भावी स्वराज्याची आखणी सिद्ध करावयाची. राजपुत्राचे स्वागताचे बहिष्काराचे वेळीं ही परिस्थिती वरवर दिसावयाला उत्पन्न झाली होती. व परस्परांना अंतिमोत्तरें पाठविण्या पर्यंत पाळी आली होती. पण तो सर्वच देखावा होता. 'एक वर्षांत स्वराज्य' या गर्जनेचा मुसलमान वेगळाच अर्थ करीत होते. त्यांच्यापुढें संदिग्ध कल्पनांचे फुगे नव्हते. सामन्यांतलि सामान्य मुसलमानांपासून तों सर्वोच्च पायरीच्या मुसलमान नेत्यांपर्यंत सर्वांना निश्चित कल्पना होती. त्यांची कल्पनाही अल्ली मुसेलियरनेंच स्पष्ट करून दाखविली व लागलेच मुसलमान पुढारी त्या इस्लामप्रेमी 'शूर' मोपल्यांचे अभिनंदनार्थ व त्यांना द्रव्यादि-साहाय्य करावयाला सिद्ध झाले. पण हिंदूंचे डोळे उघडले नाहींत. कित्येक हिंदु भोळसटें तर इंग्रेजी राज्याला इतकीं विटली कीं, 'मुसलमान आमचे भाई आहेत एकवेळ त्यांचे राज्य येथें आलें तर तें आम्ही पतकरूं पण हें इंग्रजी राज्य नको' असें कांहीं तरी आचरट बरळण्यापर्यंत त्यांची मजल गेली!! ही स्थिती पाहतांच कराचीच्या भाषणांत अल्ली बंधूंनी उल्ला

सुरला आड पडदाही स्वच्छ झुगारून देऊन स्पष्टपणें सांगितलें कीं, ' अफगाण अमारानं हिंदुस्थानावर स्वारी केली तर हिंदी मुसलमान आपल्या त्या धर्म बंधूशीं लढणार नाहींत. या सर्व घटना व त्यांचें खरें मर्म आज सामान्य हिंदूंना ही कळत आहे. पण त्या वेळीं तें थोर थोर हिंदु नेत्यांनाही उमगलें नाहीं. युरोपच्या स्वच्छ राजकीय वातावरणांत लालाजींना या सर्व गोष्टी दिसल्या व १९२५ च्या प्रारंभीं हिंदुस्थानांत ते परत आले तेव्हां संकल्पच करून आले कीं हिंदूंना आतां जागें करावयाचें, तुमच्या पायाखालीं केवढा भयानक सुरंग खणला जात आहे व त्यांत किती स्फोटक दारू भरली जात आहे ती पहा व वेळेवरच सावध व्हा अशी चेतावणी द्यावयाची !

तसें म्हटलें तर लालाजींनीं आपल्या आयुष्यांत प्रारंभापासून हिंदु संघटनेचेंच कार्य केलें आहे किंबहुना त्यांचें जीवितकर्तव्यच तें होतें असें म्हटलें तरी चालेल. केवळ परिस्थिती वेगळी होती म्हणून त्या कार्याला त्यांनीं स्वतः किंवा दुसऱ्यांनीं कुणीही तें नांव दिलें नाहीं इतकेंच, बाकी कार्य तेंच. त्यांनीं आर्य समाजांत प्रवेश केला तोही याच विचारानें. कारण आर्य समाजाचें ध्येयच वेदांच्या झेंड्याखालीं सर्व हिंदूंना एकत्र आणून हिंदु संस्कृतीचें पुनरुज्जीवन करावें आणि हिंदु जाती प्रबल व संघटित आणि राष्ट्र धर्मानें संपन्न अशी करावी हें होतें. यद्यपी स्वामी दयानंदांनीं आपल्या हातानें एका जन्मानें व वर्णानें खिस्ती असलेल्या माणसाला शुद्ध करून आर्य समाजांत घेतलें होतें तरी त्याच्याशीं खानपान व्यवहार कोणीं आर्य करीत नसत. मरेपर्यंत तो एकटा राहिला. मेल्यानंतर त्याची अंत्य क्रिया वैदिक पद्धतीनें करण्यांत आली. म्हणजे आर्य समाज हा एक वेगळा धर्म असें त्या वेळचे आर्य समजत नसत. पुढें कांहीं काळ ही समजूत बदलली व हिंदु जातीपासून आर्य समाज दूर राहूं लागला. तो आतां फिरून जवळ आला आहे व नित्याचा हिंदुजातीमयच झाला आहे. पण लालाजी आपल्या विचारांत स्थिर होते. हिंदु जातीचा गौरव रक्षण्याकरितां व तिला राष्ट्र धर्माची शिकवण देण्याकरिता आर्य समाजाची स्थापना झाली आहे, अर्थात राजकारणापासून किंवा जातीय जीवनाच्या अन्योन्यक्षेत्रापासून आर्य समाज केव्हांही दूर राहूं शकत नाहीं. हें त्यांनीं ओळखलें व याच विचारानें सह-काऱ्यांचा विरोध असतांही तें राजकारणांत लक्ष घालीत असत. विद्यार्थी

असतांना हिंदी भाषेची बाजू उचलून त्यांनीं जी चळवळ केली किंवा पुढें उर्दू भाषेंत हिंदु आदर्श प्रतिबिंबित करणारें वाङ्मय निर्माण केलें त्याच्या बुडाशीं हिंदु संघटन व त्यायोगें हिंदु संस्कृतीचें पुनरुज्जीवन हाच हेतु होता. त्यांनीं दुष्काळ पीडितांना जे साह्य केलें त्याचें रहस्य हेंच होतें. व हें त्यांनीं दुष्काळ कमीशन पुढें साक्ष देताना एका वाक्यांत स्पष्ट केलें आहे. तें वाक्य असें आहे 'The Relief Policy of the Indian Government has, till now, been a constant menace to Hinduism. याचप्रमाणें दयानंद कॉलेजचा हेतुही हिंदु संकृतीचे प्रचारक निर्माण करावें व सामान्य हिंदु समाजाला परकीय सरकारच्या धर्म भावनेला नष्ट करणाऱ्या शिक्षणापासून वांचवावें हाच होता. लेख रूपानेंही ते हेंच कार्य करीत असत. उदाहरणार्थ १८९८ त हिंदु राष्ट्रीयत्व या विषयावर एक लेख त्यांनीं हिंदुस्थान रिह्यूमध्यें लिहिला व त्यांत मुसलमान करतात तसें जातीय संघटन हिंदूंनीं करावयास हवें, नुसतें राष्ट्रसभेच्या व्यासपीठावरून व्याख्यानबाजी करून भागावयाचें नाहीं असें मत प्रतिपादन केलें. पुढें १९०८ त तर ते लहोरला पंजाब हिंदुसभेचें अध्यक्ष होते व त्यावेळचें त्यांचें अध्यक्षीय भाषण किती सुंदर होतें हें मागें एका प्रकरणांत त्यांतील उतारे दिले आहेत त्यावरून समजून येईल. त्यांचे अस्पृश्योद्धाराचें प्रयत्नही हिंदु जाती संघटित करण्याच्या बुद्धीनेंच केलेले असत. १९२१ मध्यें असहकारितेचें माध्यान्ह वेळीं त्यांनीं असहयोगाचे आदर्श (Ideals of Non-co-operation) नांवाचे पुस्तक लिहिलें त्यांत देखील त्यांनीं भावी स्वराज्यांत हिंदु मुसलमानांचें स्वत्व यथाप्रमाण अबाधित राहील, अशी लोकसत्ताक राजसत्ता आम्हांला हवी असें प्रतिपादन केलें होतें. त्यांनाही इंग्रज अमलाचा तिटकारा आला होता व स्वराज्याकरितां तेही अत्यंत उत्सुक व सर्वस्वत्यागाला सिद्ध होते पण तें स्व-राज्य-ज्यांत सर्वांचें स्वत्व यथाप्रमाण स्थित राहील असें राज्य हवें-मुसलमानी राज्य नव्हें असें ते स्पष्ट म्हणत व एक वेळ येथें मुसलमानांचें राज्य आलें तरी चालेल पण हें इंग्रज राज्य नको असें अर्वाच्य बरळणाऱ्या हिंदूंनाच निषेध ते करीत. यानंतर कारावासांतून सुटल्यानंतर त्यांनीं जो लेख लिहिल्याविषयीं वर उल्लेख केला आहे त्यांत तर एखाद्या भविष्यवाद्याप्रमाणें त्यांनीं **स्वराज्याकरितांच संघटन हवें,**

हिंदुजाती संघटित झाल्यावांचून स्वराज्य मिळणार नाहीं, असें स्पष्ट प्रतिपादन केलें आहे. हें सर्व सांगण्याचें प्रयोजन इतकेंच कीं, हिंदु संघटनाची चळवळ ही अराष्ट्रीय चळवळ आहे व त्या चळवळीचा पुरस्कार केल्यामुळें लालाजी अराष्ट्रीय बनले असा जो पुढें त्यांचेवर आरोप करण्यांत आला त्याचें वैय्यर्थ्य वाचकांचे ध्यानांत यावें; व १८९३ मध्यें किंवा १९०८ मध्यें किंवा १९२१ मध्यें ते जितके राष्ट्रीय होते तितकेच ते १९२८ मध्येंही राष्ट्रीय होते, त्यांची संघटनाची कल्पना मुसलमानांच्या द्वेषावर उभारलेली नसून स्वजातांच्या प्रेमावरच आधारलेली होती हें स्पष्ट व्हावें. असो

लालाजी हिंदुस्थानांत येऊन पोचले तों त्यांना, आपल्याला मिळालेल्या माहितीचा खरेपणा दाखविणाऱ्या कांहीं घटना नवीनच आढळून आल्या. कोकोनाडा येथें राष्ट्रीय सभेचे अध्यक्षपदावरून सात कोटी अस्पृश्यांची हिंदु मुसलमानांत समसमान वाटणी करण्याविषयीं मागणी करण्याइतका जो धाडसी निर्लज्जपणा छोट्या अलीभाईंनीं केला होता तो त्यांचे समग्र भाषण वाचून लालाजींना स्पष्ट कळला व कोहाट प्रकरण नुकतेंच घडलें होतें त्याची वार्ता त्यांच्या कानावर आली. यानंतर लवकरच दिल्ली येथें जी सर्वपक्षीय ऐक्य परिषद या हिंदुमुसलमानांच्या ऐक्याचा विचार करण्याकरितां भरली तिच्यापुढें भाषण करतांना कोणाचीही भीडभाड न धरतां लालाजींनीं स्पष्ट सांगितलें कीं कोहाट येथील हिंदूंवर जें अन्याय्य आक्रमण झालें आहे त्याची पूर्ण भरपाई मुसलमानांनीं केल्यावाचून हिंदूंचीं मनें स्वस्थ व शांत व्हावयाचीं नाहींत. पण परिषदेचीं सूत्रें निराळ्याच हातांत होतीं व त्यामुळें या भाषणाचा व स्पष्टोक्तीचा कांहींच लाभ झाला नाहीं.

एप्रिल महिन्यांत कलकत्यास भरलेल्या आठव्या हिंदुमहासभेचे ते अध्यक्ष होते. यावेळीं त्यांनीं जें भाषण केलें तें अत्यंत उद्बोधक व तेजस्वी होतें. छोट्या भाईंनीं मुस्लिम लीगच्या भाषणांत ' सीमाप्रांताला स्वयंनिर्णयाचे अधिकार देऊन त्यांना **काबूलच्या** किंवा हिंदुस्थानच्या सत्तेखालीं राहावयाची मोकळीक असावी ' असे उर्मटपणाचे व प्रत्येक हिंदु हृदयाला जाळणारें जे शब्द काढले होते त्याला लालाजींनीं आपल्या भाषणांत असें खरपुस उत्तर दिलें कीं, '**एक प्रांत तर काय, पण या हिंदुस्थानची एक**

तसुभरसुद्धां भूमी आम्ही अशाप्रकारें तोडूं देणार नाहीं. मग त्यासाठीं काय वाटेल तें झालें तरी चालेल ! यानंतर त्यांनीं हिंदु समाजाला संघटनेचा संदेश दिला. ठिकठिकाणीं स्त्रीपुरुषांकरितां आखाडे काढून अत्याचारांचा प्रतिकार करण्याची शक्ती अंगीं आणा व तरुणांमध्यें धाडस उत्पन्न करा. पौरुषहीन अहिंसेला दूर झुगारून द्या शेतकरी आणि बिन शेतकरी, सुशिक्षित आणि अशिक्षित, इत्यादी वर्गांत एकोपा उत्पन्न करा देवालयांचा उपयोग जातीच्या संघटनाकडे करा. आपल्या मुलांमुलींना औद्योगिक विशेषतः-विज्ञान-शास्त्रीय शिक्षण द्या, इत्यादि उपदेश त्यांनीं केला. नंतर जातवार प्रतिनिधित्व इत्यादि गोष्टीकडे वळून ते म्हणाले. ' राजकारणांत जातवारी वाईट. तरी हिंदुस्थानांत दोन पक्ष आहेत त्यांपैकीं एकानें-मुसलमानांनीं-जातवारी कवटाळली तर मग हिंदूंनीं तेवढें विश्वबंधुत्व पत्करणें म्हणजे आत्मघात करणें होय आजवर काय झालें तें पहा. मुसलमान सरकारच्या कच्छपीं लागत गेले व हिंदु फटकून वागत गेले. त्यामुळें हिंदूंचें नुकसान झालें आहे आतां तरी हिंदूंनीं आपल्या हक्कांना जपायला शिकलें पाहिजे. विधिमंडळांत लोक निवडून देतांना हिंदुहिताकडे दुर्लक्ष करणार नाहींत असेच लोक निवडून दिले पाहिजेत हिंदूंवर एक मोठें संकट चालून येत आहे. पण अनेक हिंदु पुढाऱ्यांना त्याची कल्पना नाहीं. व कित्येकांचे बुद्धीला मोह पडून त्यांना तें संकट आहे असें वाटेनासेंच झालें आहे. किंबहुना तें संकट ओढून आणावयाला ते साह्य करीत आहेत. अशा आत्मघातकी पुढाऱ्यांपासून सावध रहा. "

या सभेनंतर लालाजींनीं हिंदुसंघटनेनिमित्त प्रांतांप्रांतांमधून दौरे काढले व आपला हिंदु संघटनेचा ओजस्वी संदेश सर्व देशभर कानाकोपऱ्यांतून ऐकविला. ठिकठिकाणच्या प्रांतिक हिंदुसभेचें ते अध्यक्ष होते व प्रत्येक वेळीं आपल्या ओजस्वी भाषणानें तत्तत्प्रांतीयांचे मनांत ते नवी आशा. नवा उत्साह आणि नवें चैतन्य उत्पन्न करीत असत. निरनिराळ्या ठिकाणच्या परिस्थितीचें ते मार्मिकपणें व बारकाईनें निरीक्षण करीत व त्यावर काय उपाययोजना करावी याचा उपदेश ते त्या त्या ठिकाणच्या लोकांना करीत.

यावेळीं हिंदु हितसंरक्षणाचे दृष्टीनें त्यांना वरिष्ठ विधिमंडळांत जाणें अवश्य वाटल व म्हणून त्यांचेकरितां लाला हंसराज यांनीं त्यागपत्र देऊन त्यांना जागा करून दिली. ते स्वतंत्र म्हणून उभे राहिले व निवडून आल्यावर स्वराज्य पक्षाला मिळाले. यावेळीं आपली निश्चित आणि कमींत कमी अशी मागणी सरकारपुढें मांडून त्यांनीं ती देण्याचें नाकारल्यास विधिमंडळांतून उठून यावयाचें एक नवेंच वेड स्वराज्यपक्षांत शिरलें होतें तें लालाजींना संमत नव्हतें. त्यांचे मतानें ही मतदाराशीं प्रतारणा करणें आहे. दुसरें या धोरणानें हिंदूंच अहित होतें, मुसलमान तेवढे त्यांच्या हिताचा प्रश्न आला कीं आपल्या पक्षाची शिस्त संभाळून किंवा वेळीं ती झुगारून देऊनही विधिमंडळांत उपस्थित होतात व हिंदुहिताचे प्रश्नाचे वेळीं हिंदु सभासद पक्षाचे शिस्तीनें बांधला जाऊन विधिमंडळांत अनुपस्थित राहतो असा त्यांना कित्येकदां अनुभव आला. पण स्वराज्यपक्षाविषयीं त्यांचें मन विटण्याचें आणखी एक फार बलवत्तर कारण होतें. तें असें कीं, हिंदुस्थानांत मुस्लिम राज्य स्थापनेच्या मुसलमानांच्या कटाला कित्येक स्वराज्यपक्षीय धुरीणांचे अनुमोदन आहे व त्यांचे खटपटीनें हिंदुस्थानच्या राष्ट्रीय सभेची शाखा काबुलला उघडण्यांत आली आहे असें त्यांना आढळून आलें. गोमांतकाला किंवा पांदिचरीला परदेश (Foreign) मानणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांनीं काबूलला आपली शाखा चालू केली हें पाहिल्यानंतर त्यांच्या हिंदुहितविरोधी धोरणाचा लालाजींना शंका व तिटकारा यावा हें स्वाभाविक आहे. त्याप्रमाणें त्यांनीं स्वराज्यपक्ष सोडून दिला व स्वतंत्र लोकसत्ताकपक्ष निर्माण केला व नवीन निवडणुकी त्यांनीं त्या पक्षाचे वतीनें लढविल्या व पंजाब व युक्तप्रांत विधिमंडळांतून अनेक जागा हस्तगत केल्या.

या काळांत त्यांची स्थिती मोठी बिकट झाली होती. मुसलमानांशीं अगदीं तोडून वागावें तर सरकार दुहीचा लाभ घ्यावयाला टपून बसलेलें. बरें न तोडावें, तर मुसलमान आपल्या अन्याय्य मागण्या कुठवर चेपीत नेतील याचा नेम नाहीं. तिकडे हिंदुसंघटन हें अराष्ट्रीय आहे असें म्हणणारे अति शहाणे कित्येक हिंदूच निघाले! तर संघटन हें अधार्मिक आहे असें जुन्या मतांच हिंदु म्हणत होते. या सर्वांची तोंड मिळवणी त्यांना मोठ्या कुशलपणें करावी लागत होती. मुसलमानांनीं समंजस तडजोडीला हात पुढें

केला तर तो स्वीकारायावला लालाजी सतत सिद्धच असत. पण मुसलमानांनीं चढेलपणा चालविला तर निर्भीडपणें त्यांचा समाचार घ्यावयास ते कधीं मार्गे पाहात नसत. स्वराज्याकरितां हिंदुमुसलमानांची एकी अगदीं अपरिहार्य आहे व म्हणून अन्याय्य असा मोबदला देऊनही ती एकी घडवून आणावी असें प्रतिपादन जेव्हां आमच्यांतीलच कांहीं खुळचटें करूं लागलीं व त्यांचा लाभ घेऊन मुसलमान भलत्याशा मागण्या मागावयाला लागले तेव्हां लालाजींनीं आपल्या मुंबई प्रांतीय हिंदुसभेच्या अध्यक्षीय भाषणांत स्वच्छच सांगितलें कीं " मुसलमानांनीं स्वराज्याला साह्यता केली तर उत्तमच आहे. स्वराज्य थोडें लवकर, थोडें सोप्या रीतीनें मिळेल. पण ते साह्य करणार नसतील किंवा त्या मदतीच्या मोबदल्यांत सर्वस्वीं अवास्तव हक्कांच्या मागण्या करूं लागतील तर त्यांनीं खूब समजुन असावें कीं, हिंदूंना त्यांच्या साह्याची आवश्यकता नाहीं. तशी वेळच पडली तर एकटे हिंदूंही आपल्या संघटित बलानें स्वराज्य मिळविण्याला समर्थ आहेत. "

अन्य दिशेनेंही त्यांचें संघटनाचें कार्य चालू असे. उदा० त्यांनीं 'वंदे-मातरम्' पत्रांत एक लेखमाला लिहून त्यांत पंजाबांतील व पर्यायानें सर्व हिंदुस्थानांतील हिंदुसंघटनेच्या चळवळीचा इतिहास दिला होता व मुसल-मानांच्या गेल्या ७॥ वर्षांतील धोरणाची समीक्षा केली होती. तसेंच ना. आगाखान यांचे अनुयायी त्यांना विष्णुचे अवतार बनवून त्यांची त्या वेशांतील चित्रें आपल्या विपर्यस्त व खोडसाळ पुस्तकावर छापून व निर-निराळे अनेक ढंग करून भोळ्या भाबड्या हिंदूंना फसवून बाटवितात. या पंथाला शमसी मत किंवा आगाखानी पंथ असेंच नांव आहे व गुजराथेंत व पंजाबांत त्याचा अतिशय प्रसार झाला आहे. तरी आपल्या अनु-यायांचें वरील म्हणणें खरें आहे काय? आपल्याला खरोखर मी विष्णूचा अवतार आहे अशी अंतस्थ मनोदेवतेची जाणीव आहे काय? व जर नसेल तर तसें आपण प्रसिद्ध कराल काय? इत्यादि आशयाचें एक सविस्तर अनावृत पत्र ना. आगाखानांना त्यांनीं लिहिलें होतें. त्याचें उत्तर त्यांनीं कांहीं एक दिलें नाहीं. ही गोष्ट वेगळी. पण त्यापासून कित्येक हिंदूंचे डोळे उघडून ते त्या घातक पंथापासून बचावले. असाच एक प्रयत्न महाराष्ट्रांतही पुण्याचे श्री. माटे यांनीं केला होता व त्याचीहि तीच गत झाली.

वरिष्ठ विधिमंडळांतही त्यांचे उद्योग या धोरणानें चालू असत. निर-निराळे प्रश्न विचारून, निरनिराळ्या माहितीची मागणी करून सरकारची कुटिल व हिंदुहितविरोधी नीती चव्हाट्यावर आणावयाची, हिंदूवर होणाऱ्या अन्यायांची दाद लाऊन घ्यावयाची, इत्यादि प्रकारें ते आपलें काम करीत असत. उदा० त्यांनीं एकदां प्रश्न विचारून हिंस्थानांतील एकंदर अस्पृश्यांची संख्या किती आहे याची माहिती मिळविली. तेव्हां असें आढळलें कीं, मूळ संख्या साडेतीन चार कोटींच्या आंत बाहेर असतांना, लोकगणनेच्या वेळीं मागासलेले वर्ग अस्पृश्यांत टाकून व ब्रिटिश हिंदुस्थानांतील संख्येवरून संस्थानांतीलही संख्येचा अंदाज करून शेवटी तर या दोन मिळून होणारी संख्या पुनः एकट्या ब्रिटिश भारताचीच समजून सर्व हिंदुस्थानांत—अर्थात् ब्रिटिश व संस्थानी -अस्पृश्य सात कोटींच्या जवळ जवळ आहेत ही गोष्ट केवळ अधिकाऱ्यांच्या हातचलाखीनें कशीं बनवून दिली हें त्यांनीं पुराव्या-निशीं प्रसिद्ध केलें. सरकारचीं अशीं कित्येक कुलंगडीं त्यांनीं बाहेर आणलीं अर्थशास्त्रांत व आंकडेशास्त्रांत ते चांगलें निष्णात होते. त्यामुळें आपल्या भाषणात ते प्रतिपक्षाची अगदीं राळ उडवून देत. प्रतिसहकारी पक्षाचे ते मुख्य होते व आपल्या नेतृत्वाखालीं लोकपक्षाची जूट क़ायम राखणें व सरकारचा पराभव करणें इत्यादि कामें ते कुशलपणें पार पाडीत, परंतु लोक-पक्षाच्या हिताची गोष्ट सरकार करूं लागलें तर तेवढ्या पुरतें सरकारशीं सहकार्य करण्यालाही ते सिद्ध असत. जिनोवास जागतिक मजूर परिषदेला आपले प्रतिनिधी या नात्यानें पाठविण्याचें सरकारनें ठरविलें तेव्हां ते गेले. त्यांत त्यांना कांहीं संकोच वाटला नाहीं. तेथें जाऊन त्यांनीं हिंदी मजूरांचे हितसंबध पाहणारें व त्यांच्या चळवळींची बातमी जगाला पुरविणारें एक कार्यालय स्थापन करण्याचा ठराव संमत करून घेतला.

जिनोवा परिषदेहून परत आल्यानंतर त्यांनीं आपलें हिंदु संघटनेचे कार्य फिरून जोमानें चालविलें. त्यानंतर लवकरच स्वामी श्रद्धानंद यांची दिल्ली येथें एका अधम मुसलमानानें भर दिवसा ढवळ्या गोळ्या घालून हत्या केली. त्यानें सारें हिंदुस्थान हादरून गेलें. त्या हत्येपाठिमागें मुसलमानांचा एकादा सर्व देशव्यापी कट असावा असें सर्वांना वाटू लागलें. लालाजी दोन वर्षांपासून जें सांगत होतें कीं, हिंदुस्थानात मुसलमानी राज्य

स्थापन करण्याचा एक व्यूह मुसलमानांनीं रचला आहे त्याची सत्यता या हत्येने सर्वांनाच पटली; व सर्व देश हिंदुसंघटनाचे मंत्रानें निनादित होऊं लागला. लाखों लोक या कार्यात संमीलित झाले. सर्व साधारण हिंदूंना मुसलमानांच्या सत्य स्वरूपाची ओळख पटली, अनेकांना आपल्या जातीवर चालून येणाऱ्या संकटाची जाणीव झाली. अर्थात् हा स्वामी श्रद्धानंदांच्या अमानुष हत्येचा परिणाम आहेच पण त्याचें बरेंचसे श्रेय लालाजींच्या दोन वर्षांच्या निरलस उद्योगालाही द्यावें लागेल.

———

जे.
ता.
ठाणे

# शेवटचे दिवस आणि मृत्यु.

---×---

श्रध्दानंदांच्या हत्येनंतर हिंदुसंघटनेच्या कार्याला जोम चढला तर हत्येच्या सत्रालाही जोर चढला. लागोपाठ अनेक कार्यकर्त्यांना धमकीचीं पत्रें जाऊं लागलीं. माननीय पंडित मालवीयजी व पंजाबकेसरी लालाजी यांच्या हत्येचेही प्रयत्न झाले. हिंदु जातीच्या भाग्यानें ते साधले नाहींत हा भाग वेगळा. आर्यसमाजाच्या कार्यकर्त्यांवर तर हत्यारी मुसलमानांचीं प्रत्यहीं आक्रमणें होऊं लागलीं. सर्व देशाचें वातावरण हत्या, रक्तपात, जाळपोळी यांनीं भीषण व धूसर बनून गेलें. कुठेंना कुठें तरी अत्याचार घडल्याची वातमी आली नाहीं असा आठवडा, असा दिवस जाईना. हा सर्व प्रकार दूर उभे राहून सत्तापक्ष पाहत होता. मधून मधून वारा घालण्याचें कामही तो करीत होता. व त्या वाऱ्यानें आगीचा भडका पेटला कीं, त्यांत हिंदु कार्यकर्त्यांचा बळी घेऊन हिंदूंच्या न्याय्य हक्कांची होळी पेटवीत होता. असा प्रकार सर्वत्र चालला असतांना, आशेचा किरण सुद्धां कोठें चमकत नसतांना दैवगती उलटली. पार्लमेंटला मांटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांची चौकशी करण्याकरितां एक निवळ गोऱ्या लोकांचें कमिशन नेमण्याची दुर्बुद्धी झाली त्यासरसा हिंदुस्थानांतील सर्व देखावा कांहींसा पालटून गेला. सर्व पक्ष कमिशनवर वहिष्कार टाकण्याच्या कार्यावर एकत्र झाले. देशांत प्रचंड खळबळ उडाली. कमिशनशीं सहकार्य करण्याकरितां प्रांतिक व वरिष्ठ विधिमंडळांतून कमिट्या नेमून द्यावयाच्या नाहींत, कमिशनपुढें साक्षीला जावयाचें नाहीं, कमीशनच्या स्वागत समारंभांत भाग घ्यावयाचा नाहीं व पुनः एकवार १९२१ मधील राजपुत्राच्या बहिष्काराच्या वेळची परिस्थिती उत्पन्न करावयाची असा लोकांनीं निश्चय केला. निरनिराळ्या विधिमंडळापुढें वहिष्काराचे ठराव येऊं लागले. वरिष्ठ विधिमंडळांत वहिष्काराचा ठराव संमत करून घ्यावयाचें काम लालाजींनीं स्वीकारलें. या कामा त्यांनीं पुढाकार घेतला व ठरावाच्या समर्थनार्थ जें भाषण केलें तें इतकें स्पष्ट, जोरदार व सरकारचीं पापें त्याच्या पदरांत टाकणारें होतें कीं, तें ऐकून सरकार पक्षीय सभासद हतबुद्ध होऊन गेले.

या बहिष्कार पूर्तीचें एक अंग म्हणून भावी हिंदुस्थानची राज्य घटना तयार करावयाची असा राष्ट्रीय सभेनें ठराव केला होता. हें काम देशाच्या अशा परिस्थितींत किती बिकट होतें याची कल्पना करणें कठीण नाहीं. आजपर्यंत या बाबतींत एक दोन प्रयत्न झाले होते पण अखिल राष्ट्राचा पाठिंबा असलेली अशी राज्यघटना अद्याप तयार झाली नव्हती व म्हणूनच येथील नोकरशाही व तिच पाठीराखें इंग्लंडांतील सरकार वारंवार या प्रश्नावर येऊन राष्ट्राच्या पुढाऱ्यांना घोटाळ्यांत टाकीत असत. आतां या कामीं नेहरू-मंडळ पुढें सरसावलें. त्याचें काम अतिशय गुंतागुंतीचें, व जबाबदारीचें होतें. अगोदरच अस्तित्वांत असलेल्या पांच सात पक्षोपपक्षांची गुंतागुंत, हिंदु-मुसलमानांचा सांस्कृतिक व धार्मिक झगडा, मद्रासचे राष्ट्रीय सभेंत नवीनच पुढें आलेला स्वातंत्र्यवादीपक्ष, आगामी महायुद्धाची पडलेली काळी छाया, अशा सर्वत्र संकटमय परिस्थितींत सायमन मंडळाच्या नेमणुकीच्या रूपानें हिंदी राष्ट्रपुरुषाला इंग्लंडनें जी लाथ मारली व तूं आमचा गुलाम आहेस असें बजावलें त्याचा परिणाम होऊन सर्वत्र ऐक्याचा देखावा उत्पन्न झाला असला तरी तो देखावा चिरस्थायी होण्याला तशाच बलवत्तर व भरभक्कम घटनेची आवश्यकता होती. विशेषतः त्या घटनेंत हिंदुहितविरोधी अराष्ट्रीय मुसलमानी मागण्यांना शक्य तो योग्य पायबंद लावणें हें काम फारच कठीण होतें. तें काम लालाजींनीं आपल्या अंगावर घेतलें व आपल्या कौशल्यपूर्ण कार्य पद्धतीनें त्यांनीं तें अंशिकरीत्या घडवूनही आणलें. त्यांचें साहाय्य नसतें तर नेहरू मंडळाची स्वराज्य योजना इतकी तरी यशस्वी झाली असती का नाहीं याची शंकाच आहे. आतां अशीही घटना अधिकारांचें भरपूर झुकतें माप मुसलमानांच्या पदरांत टाकणारीही योजना, त्यांनीं नाकारली तर त्याचें कारण त्यांना एकच द्यावें लागेल व तें हें कीं, त्या घटनेंत मुस्लिम राज्य हे ध्येय नसून स्वराज्य हें ध्येय ठेवण्यांत आलेलें आहे ! व असाही प्रकार करण्याच्या मार्गावर मुसलमान आहेतच. त्यावरून तरी मुसलमानांना सवलती देऊन वश करण्याचें धोरण न स्वीकारतां स्वतः हिंदूंनीं संघटित व प्रबल होऊन त्या सामर्थ्यावर त्यांना वश करून घ्यावें असें लालाजी वरचेवर म्हणत त्याची सत्यता सर्वांना कळून येईल. संघटित हिंदु एकटे देखील मुसलमानांच्या साह्यावाचून व प्रसंगच आला तर मुसलमानांचा सक्रिय

विरोधही विफळ करून हिंदुस्थानांत खरें स्वराज्य--हिंदी स्वराज्य--स्थापू शकतील ही लालाजींची घोषणा सामान्य हिंदु अंत:करणाला कार्यप्रवण करावयाला समर्थ आहे.

सर्वपक्षीय परिषद आटोपली व राष्ट्रानें नेहरू योजनेवर संमतीचा शिक्का मारला तोंच तिकडे सायमन सप्तकानें आपले पांढरे पाय हिंदुस्थानच्या पवित्र किनाऱ्यावर ठेवले. मुंबई पुण्याला त्यांच्या स्वागत समारंभावर कडक बहिष्कार पडला. त्या प्रांतांतले काम आटोपून सप्तक पंजाबकडे चाललें. तेव्हां पंजाबकेसरी लाला लजपतराय यांच्या कर्तृत्वाची पुरी माहिती असलेल्या पंजाब सरकारनें त्या सुमारास लाहोरला १४४ कलम लागू केलें. पण लालाजींनीं त्याची खंति बाळगली नाहीं. पंजाबच्या लोकांना सायमन सप्तक नको आहे हें त्यांना सायमन साहेबांना पटवून द्यावयाचें हातें व त्याकरितां तीस आक्टोबरला सायमन सप्तक लाहोरला उतरलें त्या दिवशीं काढलेल्या निषेध प्रदर्शक मिरवणुकीचें अग्रगामित्व स्वीकारावयास ते धडाडीनें पुढें झाले. राष्ट्राकरितां कष्ट भोगण्यांतच आनंद मानणाऱ्या थोर महाभागांची वृत्ती अशीच असते व तिचें जें दिव्य देशवीरांना करावें लागतें तेंच दिव्य त्या दिवशीं लालाजींनांही कराव लागलें. सरकारच्या पोलिस अधिकाऱ्यांनीं गर्दी हटविण्याच मिषानें आपल्या हातांतील दंडुक्यांसह मिरवणुकीवर चाल केली. लालाजींना दूर दृष्टीनें हा प्रसंग जणुं पूर्वीच दिसला होता व म्हणून त्यांनीं लोकांकडून कोणतीही आगळिक होऊं नये किंवा झाल्याचा आरोप सरकारलाही करतां येऊं नये असा प्रबंध मिरवणुक निघतांनाच करून ठेवला होता. येवढ्या मोठ्या मिरवणुकींत एक सुद्धां लाठी कोणाच्या हातांत नव्हती. पण हृ पाहून तर पोलिसांच्या शौर्याला अधिकच जोर आला. त्यांनीं निःशकपणें दंडुकी चालवावयास प्रारंभ केला. अग्रभागींच लालाजी होते त्यांच्यावर रोख धरून मारा चालू झाला. भोंवतालच्या कित्येक माणसांनीं हें पाहतांच त्यांनीं पुढें सरून ते प्रहार आपल्या छातीवर घेतले. पण पोलिसांचें समाधान तेवढ्यानें कसें होणार? प्रत्यक्ष लालाजींच्या अंगावर हात टाकावयाची त्यांची मनीषा त्यांना पुरवून घ्यावयाची होती. दंडुकी चालूंच राहिली व त्या पंजाब केसरीच्या विशाल हृदयावर त्यांचे कांहीं आघात बसले. लालाजींनीं ते धैर्यानें सहन केले व त्याच क्षणीं त्या उन्मत्त अधिकाऱ्यांना बजावलें कीं,

घाव माझ्या छातीवर पडत नाहींत तर ब्रिटिश साम्राज्याचें थडगें आपल्या हातानें खोदून ठेवण्याचें काम या घावांनीं तुम्ही करीत आहांत.

मिरवणुक तेथून शांतपणानें सभास्थानी गेली. व सभेंत बोलाण्याकरितां लालाजी उभे राहिले. अपमानानें त्यांचा चेहरा नुसता लाल झाला होता सिंहच तो ! त्यानें या सभेंत गर्जना केली " सरकार व त्यांचे अधिकारी लोकांशीं असलें वर्तन चालू ठेवताल तर आमच्यांतील तरुण पिढी आम्हा जुन्या लोकांचे शब्दांत न राहतां, राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविण्याकरितां वाटेल तो मार्ग स्वीकारतील. तो प्रसंग पाहण्यासाठीं मी जिवंत असेन वा नसेन परंतु मी जिवंत नसलों तरी असा प्रसंग सरकारनें आमच्या तरुणांवर आणल्यास त्या झगड्यांत माझा आत्मा त्या तरुणांना आशीर्वादच देईल." राष्ट्राला त्यांनीं जो शेवटचा संदेश दिला तोही असाच तेजस्वी आहे. "या उपमर्दाचें निराकरण राष्ट्रीय स्वतंत्र्यानेंच होणार आहे" हाच तो संदेश !

सभा आटोपली व लालाजी घरीं गेले. त्यांचेवर जे आघात झाले होते त्यानें त्यांची छाती दखं लागली होती. त्यांचा देह कणखर व मन खंबीर ह्मणूनच साठी उलटून गेली असतांही जर्जर देहानें त्यांनीं ते आघात सहन केले दुसरा तिसरा असता तर त्याचा तेथेंच प्राणांत झाला असता. परंतु लालाजी योद्धे होते. त्यांच्या वार्द्धक्यपीडित देहावर त्याचें जोमदार तरुण मन सत्ता गाजवीत होतें. त्यांना अपमान अगदीं सहन होत नसे व बाहेरून जरी ते शांत दिसत तरी त्यांच्या मनावर त्या अत्याचाराचा फार–परिणाम झाला. त्यांना अधिकाधिक क्षीणता येत गेली तरी ते आपलें काम करीतच असत. ता. ३ व ४ नोव्हेंबरला जी अखिल भारतीय राष्ट्र-सभा समितीची बैठक झाली तिला ते उपस्थित होते. त्यांना देशांतून जे निरनिराळे सहानुभूतीचे वगैरे संदेश आले त्यांचे आभार मानतांना त्याचें मनोधैर्य व राष्ट्रप्रेम व्यक्त झालें. ते ह्मणाले, " पोलिस अत्याचारांनीं एकुण शद्बाची हानी होण्याऐवजीं लाभच झाला आहे." हें त्यांचे शद्ब त्यावेळीं खरे असले तरी आज मात्र ते खरे नाहींत. कारण आज लालाजीसारख्या मोहरा आपण गमावून बसलों आहोंत!

पोलिसांच्या मारानें लालाजींच्या हृदयाला धक्का बसला होता. थकण्याचीं चिन्हें दाखत होती. त्यांना वारंवार अस्वस्थता वाटत असे

व पूर्वीपेक्षां अशक्तता वाढली असल्याचें त्यांच्या अनुभवास येत होतें. ता. १६ ला रात्रीं त्यांना सर्व शरीरांत वेदना होऊं लागल्या. डॉ. धर्मवीर यांनी त्यांना तपासलें. पण प्रकृती एकदम चिंताजनक होईल असें त्यांना वाटलें. परंतु तापमापक लाऊन पाहता ऊष्णतामानांत वाढ आढळली नाहीं. नाडी नेहेमीप्रमाणेंच होती. श्वास मात्र नेहमीपेक्षां जरा जलद चालला होता. कांहीं काळजीचें कारण नाहीं असें समजून डाक्टर रात्रीं अकरा वाजतां घरीं गेले. नंतर त्यांना बरें वाटावें म्हणून त्यांचे नातु श्री. भारत भूषण त्यांच्या जवळ बसून त्यांचें अंग चेपूं लागले. परंतु दीड वाजता लालाजींना वाटलें कीं, अंग चेपत असता आपल्याला झोप लागणें शक्य नाहीं व ह्मणून त्यांनीं आपल्या नातवास निजावयास जा असें सांगितलें. सर्व रात्र कमी जास्त प्रमाणांत अस्वस्थतेंतच गेली. सकाळीं साडेसहाच्या सुमारास ते अंथरुणावर उठून बसले व आपल्याला जास्त वेदना होत असल्याचें त्यांनीं सांगितलें. नंतर ते पुनः निजले तोंच त्यांचा श्वास गुदमरून घोर लागला. तें पाहतांच श्री. भारतभूषण लालाजींच्या चिरंजीवास शेजारच्या खोलींतून हांक मारावयास गेले. पण ते दोघे परत येऊन पाहतात तों तेथें काय होतें ? पंजाबकेसरीचा आत्मा आपल्या नश्वरदेहाचा त्याग करून केव्हांच निघून गेला होता !

ही शोकजनकवार्ता सर्व नगरांत तात्काळ पसरली व क्षणार्धांत सर्व व्यवहार बंद होऊन सर्वत्र प्रेतकळा पसरली. नगर भयानक भासूं लागलें. सर्व शाळा, कचेऱ्या व कोर्टें बंद झालीं. सरकारी कॉलेजजवळील यूनियन जॅक अर्ध्या काठीपर्यंत उतरविण्यांत आलें ! लोकांचे थवे लालाजींच्या घराकडे लोटूं लागले. शवयात्रा दुसरे दिवसपर्यंत लांबवा अशा परगांवच्या कित्येक तारा आल्या पण तें शक्य नव्हतें. ह्मणून त्याचदिवशीं दुपारीं शवयात्रा काढण्याचें ठरविलें. तरी परगांवचे लोक गाड्यांतून भरभरून लाहोरास आलेच. दुपारी एक वाजतां त्यांच्या घरापासून शवयात्रा निघाली. यापूर्वी अशा तऱ्हेचा देखावा कधींच घडला नव्हता. स्मशानयात्रेच्या अग्रभागीं हजारों विद्यार्थ्यांचा समुदाय शिस्तवार रांगा करून वेदमंत्र ह्मणत ह्मणत चालला होता. अगदीं मागें वायका चालल्या होत्या. त्या व्यतिरिक्त निरनिराळ्या राजकीय, धार्मिक व सामाजिक संस्थांचे लोक थव्या

श्व्यानें चालले होते. यांमध्यें लालाजींना त्यांच्या देशकार्यांत साह्य करणारी मंडळी होती. ही मंडळी आळीपाळीनें या राष्ट्रपित्याच्या शवाला खांदा देऊन त्याविषयींचा आपला आदर व्यक्त करीत होती. मिरवणुक जसजशी पुढें पुढें जाऊं लागली तसतसे सगळे रस्ते गर्दीनें भरून गेले.

कांहीं दंगा होईल अशा समजुतीनें सरकारी अधिकारी पूर्ण सिद्धतेनें होते. पोलिस चौक्यांवर लोक हल्ला करतील अशा संशयानें ही सिद्धता करण्यांत आली होती. त्यावरून एक सिद्ध होतें कीं, पोलिसच्या दंडुक्यांनींच लालाजींना मृत्यु आला असें सरकारचें पापी मन त्यांना साक्ष देत होतें. एरव्हीं लोक पोलिस चौक्याव( आक्रमण करतील ही कल्पनाही सरकारी अधिकाऱ्यांच्या मनाला शिवण्याचें कारण नव्हतें. तें कसेंही असो. सरकारनें लष्कर व पोलिस यांना पूर्णपणें सिद्ध ठेवलें होतें. चिलखती मोटारगाड्या गांवांत आणून ठेवल्या होत्या! राष्ट्राच्या स्वाभिमानासाठीं झगडत असतांना पतन पावलेल्या या शूर लोकनायकाच्या शवयात्रेला अशा प्रकारें सर्व लष्करी सरंजाम उपस्थित असणें हें एका अर्थी उचितच होतें!

मिरवणुक अनारकली, लाहोरी गेट, पापरमंडी, शहामली बाजार आणि हिरामंडी या भागांतून गेली. दोन्ही बाजूनें घरांचे सज्जे लोकांच्या गर्दीनें भरले होते. व लालाजींच्या शवावर फुलें व गुलाबपाण्यासारखीं सुगंधी द्रव्यें उधळलीं जात होतीं. मार्गांत सारखा 'वंदेमातरम्' आणि 'पंजाबकेसरी की जय' या शद्बांचा जयनाद चालू होता. शहामली बाजारांत तर जनसमुदाय इतका फुगला कीं, कित्येक माणसें चेंगरतां चेंगरतां वाचलीं. हिरामंडीकडे मिरवणूक वळण्याच्या सुमारास तर या समुदायानें एकाद्या अफाट समुद्राचें स्वरूप धा(ण केलें. पांच वाजण्याचे सुमारास नगराबाहेर मिरवणुक पोचली. येथून रावी नदीच्या काठावर जाणाऱ्या मार्गानें मिरवणुक निघाली व रावीच्या काठींच लालाजींच्या २..ाचें दहन करण्यांत आलें!

लालाजींचे थोरले चिरंजीव श्री. प्यारेलाल परगांवीं गेले होते त्यांना ही वार्ता तारेनें कळविण्यांत आली तेव्हां तात्काळ मोटारीनें दीडशे मैलांचा प्रवास करून ते लाहोरास सायंकाळीं पांच वाजतां पोचले. आपल्या पूज्य पित्याचें शेवटचें दर्शनही त्यांना मोठ्या कष्टानें झालें!

या थोर देशभक्ताच्या मृत्यूनें सारा देश दुःखानें भग्न गेला. निरनिराळ्या पुढाऱ्यांनीं निरनिराळे दुःखोद्गार काढले. वर्तमानपत्रांनीं त्यांच्यावर अग्रलेख लिहिले. कोणी त्यांची त्यागबुद्धी तर कोणी कणखरपणा, कोणी विद्वत्ता तर कोणी धार्मिकता यांचे गौरव केलें. देशभक्तीचे पवाडे तर कवींनींच गायलें. हे सर्व प्रकार स्वाभाविक औपचारिक स्वरूपाचे झाले. आपल्याला येथें विचार कर्तव्य आहे तो वेगळाच आहे.

लालाजींना मृत्यू आला तो स्वाभाविक मृत्यु नव्हे. पोलिसी दंडुक्यांच्या मारानें त्यांना मृत्यु आला. एरवीं ते कित्येक वर्षे आणखी वाचले असते अशी डॉक्टरांची साक्ष प्रसिद्ध झाली आहे. तेव्हां सत्तापक्षाने या प्रख्यात राष्ट्रभक्ताचा बळी घेतला–प्रत्यक्ष हत्या करविली याविषयीं आतां कोणासही संशय वाटण्याचें कारण नाहीं. सत्तापक्षाला अशी कुबुद्धी कां झाली याची मीमांसा प्रथम प्रकरणांतच केली आहे. ती पाहता या मृत्यूचा राष्ट्रानें प्रतीशोध उगवावयास पाहिजे! स्वतः लालाजींचीही हीच शेवटची इच्छा होती व त्या इच्छापूर्तीचा मार्गही त्यांनींच सांगितला आहे. तो मार्ग कोणचा? इंग्रजांची येथून उचलबांगडी करून ज्या स्वातंत्र्यासाठीं लालाजी जन्मभर कष्टले तें राष्ट्र–स्वातंत्र्य मिळविणें हाच तो मार्ग होय!

याविषयीं मुंबईचा **श्रद्धानंद** लिहितोः—

लाला लजपतराय मेले–देशाच्या–स्वातंत्र्याच्या लढायींत लढतां लढतां छातीवर घाव घेऊन ते मेले–त्यांचे सोनें झालें! असल्या मरणापेक्षां अधिक भाग्यदायी असें अन्य कोणचें मरण आहे आणि असलें मरण जे मरतात त्यांचे सोनें होतें. ते मरून अमर होतात! मरणाला मारून चिरजन्म पावतात—परंतु त्यांच्या मागें जे जिवंत रहातात त्यांचें काय होतें? सोनें का माती? तें त्यांच्यामागून जिवंत राहणारांच्या कृतीवर अवलंबून रहातें. निष्क्रीय दुःखप्रदर्शन, शोकजनक ठराव, दुखवट्याच्या सभा आणि संदेश याच निर्जीव गोष्टी करून जे लोक स्वस्थ बसतात त्यांच्या जीवनाची तै जिवंत असूनहि माती होते! आणि जर मागच्या जिवंत राहिलेल्या लोकांनीं पुरूषाप्रमाणें, मृताच्या मरणाचें कारण शोधून त्याचा नायनाट केला आणि मृताच्या आजीवन चाललेल्या दिव्यकार्याला यशस्वी करून दाखविलें, तर त्यांच्या आयुष्याचें सोनें होतें।

हिंद तरुणा! तूं काय करणार? मृताच्या विरहानें गळे काढून, दांत पडलेल्या ह्मातारीप्रमाणें ऊर बडवून तूं शोकजनक ठरावाचें केवळ रडें रडणार आणि ज्या अधमानें ह्या त्यांच्या मरणाला लाठीचे तडाखे देऊन चाळविलें, त्याला व त्याला पोसणाऱ्या सत्तेला बायाबापड्याप्रमाणें पोंचट शिव्याशाप देत बोटें मोडणार—कां, राष्ट्रांतल्या पुढाऱ्यांना असल्या तऱ्हेनें मरण मरावें लागतें या अपमानानें तुझ्या हृदयांत सात्विक कोपाचा निद्रिस्त असलेला भूजंग लाथाडून तो जागा करणार? तूं रडणार कां क्रोधानें संतप्त होऊन ज्या परिस्थितीनें हे असले मृत्यु तुझ्या पुढाऱ्यांना कवटाळावे लागतात, त्या परिस्थितीलाच चिरडून टाकण्याच्या भगीरथ प्रयत्नाला लागणार?

हिंद तरुणा, लालाजींच्या मरणानें अवसन्न झालेल्या तुझ्या मनाला जर कसला चटका देऊन त्यांस चवताळावयाचें असेल तर त्याचें औषध ह्मणजे हें दुबळेपणाचें रडें नव्हे, तर पौरुषयुक्त सात्विक संतापाचे वळसे देणें हें होय! आणि तुला शोक करण्याचा अधिकार तरी कुठं आहे? मृताच्या इच्छा पूर्ण करण्याच्या आधीं आणि त्याच्या मरणाला कारण झालेल्या दुष्ट परिस्थितीचा उच्छेद करण्याच्या आधीं, कुणालाहि मृताविषयीं शोक करण्याचा अधिकार नसतो.

आणि म्हणूनच आपण सर्वांनीं असा प्रश्न केला पाहिजे कीं, 'लालाजी मेले!—पण आपण' आपण काय करणार? रडणार, कां त्यांच्या प्रेताला साक्षी ठेऊन कांहीं दिव्य प्रतिज्ञा व तीव्र निश्चय करणार? हिंद तरुणा, शक्तिदंतहीन ह्मताऱ्याकोताऱ्यांना पाहिजे तर रडूं दे—परंतु नवशक्तीनें रसरसणारें तुझें प्रखरनखदंयुक्त तारुण्य, दिव्य प्रतिज्ञांनीं व तीव्र निश्चयांनीं अभिषिक्त करून, तूं महान् कार्याला हात घाल—ह्मणजेच लालाजींचा अवमानित झालेला आत्मा हर्षपुलकित होईल; असलें हें हीन मरण मारलें जाईल व भविष्यकालची सुरम्य देवता तुझ्या ह्या प्रियतम हिंद भूमीच्या गळ्यांत विजयश्रीचे पुष्पहार अर्पण करील!

———

[stamp]

# लोकसेवक समीति.

—————×—————

हीं संस्था लालाजींनीं १९२१ च्या मार्च महिन्यापासून चालू केली. तिचा उद्देश तिच्या नांवावरूनच व्यक्त होत आहे. लालाजी विधायक कार्याचे पुरस्कर्ते होते व जन्मभर त्यांनीं विधायक कामगिरीच केली. कारण लोकांचे अंगीं राष्ट्रधर्म भिनल्यावांचून ते स्वतः स्वराज्याकरितां प्रयत्न करावयाचे नाहींत व सर्व जनता जागी होऊन प्रयत्न करूं लागल्यावांचून आजच्या विसाव्या शतकांत तरी निभाव लागावयाचा नाहीं ही गोष्ट लालाजींना पुष्कळ पूर्वींच कळून चुकली होती. ही जागृती घडवून आणण्याकरिता त्याच कार्याला आजन्म वाहून देणाऱ्या कर्तृत्ववान माणसांची आवश्यकता असते. असलीं माणसें सिद्ध करण्याकरितां व त्यांचें कार्य एक सूत्रानें चालविण्याकरितां एकाद्या संस्थेची आवश्यकता त्यांना वंगभंगापूर्वीपासूनच वाटत होती. या संबंधीं त्यांनीं त्यावेळीं कै. गोखले यांशीं विचारविनियमही केला होता व गोखल्यांची भारत-सेवक-समीति अंशतः त्या विचारविनियमाचेंच पर्यवसान होतें. पण असली संस्था स्थापन करण्याइतकी शांतता त्यावेळीं किंवा त्यानंतर बरींच वर्षे लालाजींना मिळाली नाहीं व म्हणून तो विचार मागें मागेंच पडत गेला. परंतु त्याचा विसर मात्र त्यांना केव्हांच पडला नाहीं. शेवटीं अमेरिकेतून परत आल्यावर असहकारितेच्या आंदोलनकालांत त्यांनीं कांहीं एक गाजावाजा न करतां या संस्थेचा प्रारंभ केला. लो. टिळकांच्या नांवानें त्यांनीं जी राजकारण पाठशाळा काढली होती ती त्यांनीं या नवीन संस्थेच्या ताब्यांत दिली. त्या संस्थेंत शिक्षण घेऊन सिद्ध झालेल्या लोकांनीं या संस्थेच्या द्वारां आजन्म लोकांची सेवा करावयाची असा त्यांनीं बेत आंखला. परंतु पुढें सहाच महिन्यांनीं त्यांना सरकारच्या आदरातिथ्याचा पाहुणचार घ्यावा लागला व नंतर सुटल्यावरही दीड वर्ष त्यांना संस्थेकडे लक्ष पुरवितां आलें नाहीं. तरी संस्थेचें काम बंद नव्हतें. वंदेमातरम् पत्र चालू होतें. त्याच्या संपादकालाही कारागृहांत पाठविण्यांत आलें तरी दुसरीं माणसें पुढें येऊन काम चालवीत राहिलीं. संस्थेची द्वारकादास ग्रंथशाला होती तिचाही अभ्यासूंना पुष्कळ उपयोग होत होता.

१९२५ मध्यें लालाजी परत आल्यानंतर संस्थेच्या स्थायीपणाचा विचार करूं लागले. त्यांनीं पांच लाख रुपये स्थिर-निधि जमविण्याचा संकल्प केला. पैकीं दोन लाख तर त्यांनीं जमविलेही. त्याच्या व्याजावर व इतर देणग्यावर संस्था चालत होती. **पीपल** नांवाचें अतीशय उत्तम इंग्रेजी साप्ताहिक त्यांनीं या संस्थेच्या वतीनें चालू केलें. तसेंच इमारती बांधावयाचीही खटपट चालविली ती त्याच्या मृत्युपूर्वीं थोडेंच दिवस पूर्ण झाली. त्यांनीं आपलें सर्वस्व संस्थेलाच अर्पण केलें होतें व ते तिला एकाद्या आश्रमासारखी समजत असत.

संस्थेच्या कार्यक्षेत्रांत जितकें म्हणून सार्वजनिक कार्य आहे त्या सर्वांचा समावेश होतो. पण त्याचें वर्गीकरण खालील चार प्रकारांनीं करतां येईल. (१) प्रचार व जागृती. (२) अस्पृश्योन्नती (३) मजुरांची संघटना व (४) सामान्य सामाजिक सेवा यांत दुष्काळपीडितांना किंवा पूर वगैरे येऊन हानी झाली असेल तेथें लोकांना सहाय्य करणें याचा समावेश होतो.

संस्थेंत आज वीस माणसें आहेत. प्रत्येक जणाचे हाताखालीं एकेक केंद्र चालविलें जातें व त्या भागांत जें कार्य विशेष प्रामुख्यानें करावयाजोगें असेल तें हातीं घेतलें जातें. मुख्य भर ग्रामसंघटना व अस्पृश्योन्नतीकडे असतो. अस्पृश्यांची उन्नती शिक्षण देऊन व त्यांची आर्थिक स्थिती सुधारून करावयाची असा कार्यक्रम असतो. त्यांचे करितां शाळा, रुग्णालयें, अनाथालयें व सहकारी पेढ्या काढतात. तसेंच त्यांच्या परगणा परिषदा भरवितात व त्या परिषदांत इतर सर्व हिंदूंनीं भाग घ्यावा असा प्रयत्न केला जातो. चित्रपटांचे साहाय्यानें, व्याख्यानानें व भजनानें त्यांना शिक्षण दिलें जातें व उच्च वर्गीयांना त्यांच्याशीं मिसळतां येईल असे प्रसंग उत्सवादि निमित्तानें वरचेवर घडवून आणले जातात.

स्त्रियांच्या उन्नतीकडेही संस्था लक्ष देते. त्यांच्या करितां शाळा व फिरत्या ग्रंथशाळा संस्थेनें काढल्या आहेत व प्रथमोपचाराचे सुईण कामाचे व शिशुसंगोपनाचे वर्ग चालविले आहेत. त्यांच्यासाठीं एक सर्व सोयी असलेलें रुग्णालय आपल्या मातेच्या स्मरणार्थ स्थापन करण्याकरितां लालाजींनीं मरणापूर्वीं थोडेंच दिवस १ लाख रुपये दिले आहेत.

संस्थेचें मुख्यस्थान जें लाहोर तेथें द्वारकादास ग्रंथशाळा, फार प्रचंड आहे. इतकी मोटी ग्रंथशाळा साऱ्या पंजाबांत दुसरी नाहीं. राजकारण,

समाजशास्त्र व अर्थशास्त्र, इतिहास या विषयावर येथें फार उत्तम ग्रंथसंग्रह आहे. एकंदर ग्रंथसंख्या सुमारें सात हजार आहे. हे ग्रंथ संस्थेंत जेऊन वाचणारास कांहीं पैसा द्यावा लागत नाहीं. नुकतीच ग्रंथ शाळेची इमारत पुरी झाली असून तेथेंच सभाही भरविण्याची सोय करण्यांत आली आहे. तिला लजपतराय हॉल असें नांव देण्यांत आलें आहे. टिळक राजकारण पाठशाळा व लोकसेवक समितीचें मुख्य कार्यालय याच इमारतींत असतें.

संस्थेचें कार्य सध्यां पंजाब, संयुक्त प्रांत, ओरिसा व काठियावाड या चार प्रांतांत चालू आहे. सर्व कार्य गाजावाजा न करतां, कामाची हौस आहे, तें कर्तव्य आहे या भावनेनें, लोकांत मिसळून करावयाचें असा संस्थेचा नियम आहे. याप्रमाणें गेल्या एका वर्षांत संस्थेनें दोन हजार खेडेगांवीं आपल्या कार्याचें लोण पोचविलें. अस्पृश्यांचे चारशे संघ स्थापले. चाळीस पतपेढ्या स्थापन केल्या, विद्युद्दिपाचे साहाय्यानें पासष्ट व्याख्यानें दिलीं, ओरिसा प्रांतांतील दुष्काळपीडितांना सुमारें पंचवीस हजार रुपयांचें साहाय्य केले. हा उल्लेख केवळ दिग्दर्शनार्थ केला आहे. संस्थेचा एकंदर कार्याचा व्याप फार मोठा आहे. व काम करण्याची हातोटी अत्यंत प्रशंसनीय व अनुकरणीय आहे.

गेल्या वर्षी मार्च महिन्यांत बॅ. जयकर यांचे अध्यक्षतेखालीं संस्थेचा सातवा वार्षिक दिन पाळला गेला. तेव्हां लालाजींनीं भाषण करतांना आपल्या संस्थेच्या सभासदांना उद्देशून सांगितलें कीं, तुम्हीच माझीं मुलें आहांत. मुलांइतकेंच तुमच्यावर माझें प्रेम आहे. ही संस्था मी तुमचे हवालीं केली आहे. ती कार्यक्षम बनविण्याचें काम आतां तुमचें आहे. माझें काय? दहा गेले पांच उरले. पण देशाची सर्व आशा तुमच्यावर आहे. एकपरी देशाची आशा व निराशाही तुमच्याच हातांत आहे. अत्यंत निस्वार्थीपणें त्यागवृत्ति पत्करून देशसेवेला वाहून घ्यावयाला जर शेकडों हजारों तरुण पुढें न आले तर देशाची प्रगती होणें अशक्य आहे." संस्थेचे एक सभासद श्री. अलगूराम शास्त्री सांगतात कीं हें भाषण करतांना लालाजींना गहिंवर आला होता व तें ऐकणाऱ्या आमच्यापैकीं अनेकांच्या डोळ्यांना पाणी आलें. खरेंच आहे देशप्रेमाचा इतका उत्कटपणा आहे म्हणून तर वृद्धपणींही लालाजी तरुणांच्या उत्साहानें काम करीत होते.

# लालाजींचें लेखन आणि वक्तृत्व.

लालाजींनीं आपल्या पन्नास वर्षांच्या सार्वजनिक आयुष्यांत विपुल लेखन केलें आहे. त्यांचीं स्वतःचीं अशीं वर्तमानपत्रें फार करून नव्हतींच. तरी इतरांचे पत्रांतून ते नेहमी लेख लिहीत. त्यांचे हे सर्व लेख एकत्र केले तर अफाट विस्ताराचें ते एकत्रीकरण होईल. प्रथम प्रथम ते ट्रिब्यून पत्रांत व नंतर वंगभंगाचे काळांत पंजाबी पत्रांत लेख लिहीत. त्यांनीं 'पंजाबी' साठीं लो. टिळकांचे जवळ श्री. के. के. आठवले यांना संपादक ह्मणून मागूनही घेतलें होतें. पुढें ते हद्दपार झाल्यावर पंजाबीच्या संपादक प्रकाशकांवर खटला होऊन तें पत्र बंद पडलें. तरी लालाजींचें लेखन अगदीं बंद असें कधीं नव्हतें. पुढें दुसऱ्या हद्दपारीच्या प्रसंगीं त्यांना आपल्या चरितार्थासाठीं लेखणी चालवावी लागली व त्याकाळांत त्यांचे हातून लेखन फार झालें. त्यांचे महत्वाचे बहुतेक सर्व ग्रंथ याच काळांत त्यांनीं लिहिलेले आहेत. शिवाय हिंदुस्थानाविषयक शेंकडो लेख त्यांनीं तिकडील पत्रांतून व मासिकांतून लिहिले ते व तसेच त्यांनीं आपल्या 'तरुणभारत' मासिकांतून व होमरूल लीगमार्फत चोपड्यांचे रूपानें व पत्रकांचे रूपानें केलेलें लिखाण अद्याप पुस्तक रूपानें प्रकाशित न झाल्यामुळें वाचावयास मिळत नाहीं. हिंदुस्थानांत परत आल्यावर त्यांनीं लवकरच उर्दू भाषेंत वंदेमातरम् नांवाचें पत्र काढलें व पुढें तीन चार वर्षांनीं इंग्रेजींत पीपल [ अर्थात् जनता ] नांवाचें पत्र काढलें. या दोन्हीं पत्रांतून त्यांचे विविध विषयावरील परिपक्व विचार ते आपल्या देशबांधवांना सादर करीत असत. लालाजींच्या पत्रांचें वैशिष्ट्य असें होतें कीं, तीं नुसतीं वृत्तपत्रें नसत तर मनप्रसारकपत्रें असत. जनता पत्राचें दुसरें एक वैशिष्ट्य असें होतें कीं, त्याच्या लेखक वर्गांत हिंदुस्थानांतले नांवाजलेले पुढारी व परदेशांतील चळवळे विद्वान तसेच निर्वासित हिंदी प्रोफेसर्स आदीक असत. लालाजींचा जगांतील अनेक विद्वान व राजकारणी पुरुषांशीं स्नेह असे. यामुळें त्यांचे लेख जनतेमधून प्रकाशित करून विदेशीय विद्वानांना हिंदुस्थानविषयीं काय वाटतें, ते येथील प्रश्नाकडे

कोणत्या दृष्टि-कोनानें पाहतात व येथील लोकांविषयीं काय अपेक्षा बाळग तात हें एतद्देशीयाना कळून येण्याची ही युक्ती त्यांनीं चालविली होती

लालाजींचें पहिले महत्वाचे सार्वजनिक लेख ह्मणजे सरसय्यद अहंमद यांना लिहिलेलीं अनावृत्त पत्रें. या पत्रांनींच त्यांच्या लेखनपटुत्वाचा परिचय प्रथम सर्वांना करून दिला. तसें पाहिलें तर लालाजींना विद्यालयीन उच्च शिक्षणाचा लाभ झालेला नव्हता पण त्यांनीं आपल्या परिश्रमबलानें इंग्रजी सारख्या परक्या भाषेवर इतकें प्राविण्य मिळविलें पुढें पुढें जगपर्यटनाचे प्रसंग येऊन, परकीयांशीं मिसळण्याचे व रात्रंदिवस इंग्रेजींतच व्यवहार करण्याचें संवयीनें त्यांचें भाषाप्रभुत्व वाढलें. त्यांच्या इतकी सोपी, ओजस्वी व परिणामकारक भाषाशैली हिंदुस्थानांत फार थोड्यांची असेल. त्यांच्या भाषेंत कृत्रिमपणा किंवा पांडित्याचा आव बिलकुल नाहीं तर सर्व लेखन अत्यंत सुगम, हायस्कूलांत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला सुद्धां समजेल अशा शैलीनें लिहिलेलें आहे व आधुनिक राजकारणाचा अभ्यास करावयाला, तरुणांना लालाजींच्या लेखांसारखा मार्गदर्शकही फार क्वचित् सांपडेल.

आजच्या युगांतील चळवळ करण्याचें लेखणी सारखेंच किंबहुना त्याहून काकणभर अधिकच प्रभावी असें साधन ह्मणजे वाणीचें ह्मणजे वक्तृत्व किंवा व्याख्यानें देणें हें आहे. याही गोष्टींत लालाजी अद्वितीय होते. या कलेचा अभ्यास त्यांना विद्यार्थी दशेपासूनच होता. तो पुढें सहजच वाढला व हिंदी आणि इंग्रेजी भाषेंतील नामांकित वक्ते ह्मणूनच त्यांची ख्याती झाली. हिंदी भाषेंत त्यांच्यासारखें प्रभावी व्याख्यान देणारा तर उभ्या भरतवर्षांत कोणीच नव्हता. इंग्रेजींतही त्यांची गणना हिंदुस्थानांतील चार दोन प्रख्यात वक्त्यामध्येंच होत असे. त्यांचा आवाज चांगला मोठा व खणखणीत होता व व्याख्यान देतांना त्यांच्या भाषा नैपुण्यापेक्षा त्यांच्या प्रत्येक शद्बांत व्यक्त होणारी त्याची देशप्रेमाची उसळी व तळमळच तें व्याख्यान अधिक परिणामकारक करीत असे. निरनिराळे अंगविक्षेपही ते करीत नसत. मनांतील भाव सरळ शद्बांत श्रोत्यांपुढें मांडावयाचा त्यांचा प्रघात असे. पण त्यांच्या शद्बांमागें त्यांचा अतुल स्वार्थत्याग, निस्सीम देशभक्ती व तेजस्वी कर्तृत्व उभें असल्यामुळें त्याच्या मुखांतून निघणारा प्रत्येक शद्ब ऐकणाराच्या

हृदयांत स्थायी ठसा उमटवीत असे. विषय कोणताही असो, लालाजी बोलावयास उभे राहिले कीं, श्रोत्यांचीं मनें देशभक्तीनें भारून टाकीत. ते तात्कालीन स्फूर्तीनें बोलत व तींच व्याख्यानें त्यांचीं विशेष चांगलीं वठत. आगाऊ सिद्धता करून व्याख्यानें लिहून काढण्याचा त्यांचा परिपाठ नव्हता.

लेखक किंवा वक्ते या नात्यानें यशस्वी होण्याला त्यांचें अपूर्व भाषा पटुत्व व मूर्तिमंत कळकळ किंवा देशप्रेमाचें वेड यांसारखेंच त्यांचें नियोजित विषयांचें सर्वांगीण व साधार ज्ञानही कारणीभूत होत असे. निराधार विधानें लेखांत काय किंवा व्याख्यानात काय ते कधीं करीत नसत. विविध विषयावरील माहितीचा सांठा त्यांचे जवळ भरपूर असे. आंकडे शास्त्रांतही ते मोठे पारंगत असत. अमुक एक प्रकारचे आंकडे हवे आहेत तर ते कुठें मिळतील हें त्यांना नेमकें माहीत असे व या माहितीचा ते अचूक उपयोग करीत.

त्यांच्या ग्रंथांसंबंधीं विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं, त्यांचें प्रत्येक विधेय निश्चित ज्ञानाच्या व स्वानुभवाच्या पायावरच रचलें गेलेले आहे. त्यांचा आर्यसमाजाचा इतिहास घ्या किंवा राष्ट्रीय शिक्षणावरील ग्रंथ घ्या, हिंदुस्थानची आधुनिक राजकीय उत्क्रांती दाखविणारा ‘ तरुण भारत ’ ग्रंथ पहा किंवा अमेरिकेवरील वर्णनात्मक ग्रंथ वाचा, सर्वत्र, प्रत्यक्ष रोकड्या अनुभवाचे बोल त्यांनीं काढलेले आहेत. त्यांचे राष्ट्रीय शिक्षणावरील परिपक्व विचार जे त्यांनीं मृत्यूपूर्वी सहाच महिने प्रकाशित केलेल्या आपल्या दुःखी भारत नामक ग्रंथांत दिले आहेत. तेच येथें उदाहरणादाखल उतरून घेतो.

“ राष्ट्राच्या रक्षणाला जितकी सैन्याची आवश्यकता आहे तितकीच राष्ट्रीय शिक्षणाचीहि आहे कारण शस्त्रें धारण करण्याकरतां जी चारित्र्यवान व बलिष्ट माणसें लागतात तीं या शिक्षणानें तयार होतात. सर्वसामान्य शिक्षण सक्तीचें व मोफत असलें पाहिजे व तें सरकारनेंच दिलें पाहिजे. राष्ट्रीय तिजोरींतून पहिला खर्च कोणता होणें अवश्य असेल तर तो शिक्षणाचा. हें सार्वत्रिक शिक्षण देण्याचा प्रयत्न खाजगी संस्थांनीं खाजगी पैशानें करणें हा वेडेपणा होय. हा प्रयत्न यशस्वी होणें शक्य नाहीं. शिवाय

त्यामुळें सरकारच्या कर्तव्यांचा लोकांना विसर पडतो. राष्ट्रीय शिक्षणाची योजना, व्यवस्था व अंमलबजावणी सरकारनेंच केली पाहिजे व त्यास पैसाहि सरकारनेंच पुरविला पाहिजे. अर्थात हीं सर्व कामें सरकारनें करावयाचीं तीं राष्ट्रांतील लोकांच्या इच्छेला अनुसरूनच करावयास पाहिजेत.

प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था काय ती सरकारनें करावी ही जुनाट कल्पना आतां पार नष्ट झाली आहे. व प्राथमिक शिक्षणानेंच सरकारचें कर्तव्य संपत नाहीं ही गोष्ट आतां सर्व जगभर मान्य झाली आहे. धंदेवाइक व औद्योगिक शिक्षणावरच राष्ट्राची उत्पादनशक्ति अवलंबून असते व म्हणून अशा शिक्षणाचीहि सरकारनेंच सोय करावयास पाहिजे. तसेंच बुद्धिमत्त्व आणि अग्रेसरत्व यांचा आपआपसांत संबंध असल्यामुळें उच्च बौद्धिक शिक्षणाचीहि सरकारनें उपेक्षा करून चालावयाचें नाहीं.

शिक्षणाचा अर्थ विद्यार्थ्याला कांहीं पुस्तकें पढविणें इतकाच होत नाहीं. तरूणांच्या शारीरिक जोपासनेचाहि त्यांतच अंतर्भाव होतो. देशांतील अर्भकांच्या आरोग्याकरतां योग्य ती तजवीज करणें, अवश्यच पडल्यास त्यांच्या जेवण्याखाण्याची सुद्धां शाळेंत व्यवस्था करणें हेंहि शिक्षणांतच येतें. एरवीं अर्धपोटीं राहून मिळालेल्या शिक्षणाचा योग्य तो लाभ त्या मुलांना होत नाहीं.

थोडक्यांत बोलावयाचें तर देशांत जन्मलेलें प्रत्येक मूल कर्तृत्ववान, बुद्धिवान आणि सूज्ञ नागरिक बनेल अशी त्याच्या शिक्षणाची व शारीरिक आणि मानसिक विकासाची व्यवस्था करणें हें सरकारचें कर्तव्य आहे- व तें सरकारकडून करवून घ्यावयास पाहिजे. शिक्षण ही राष्ट्रीयहिताची बाब आहे ती राष्ट्रीय सरकारनेंच चालविली पाहिजे. आईबापांच्या इच्छेचा किंवा अनुकूलतेचा तो प्रश्न नाहीं."

हीच गोष्ट सर्वत्र आहे. नुसत्या कल्पना किंवा नुसत्या अनुमान परंपरा यांवर त्यांनीं कधींच भिस्त ठेवलेली दिसत नाहीं.

लालाजींनीं आपले सर्व ग्रंथ एकाच हेतूनें लिहिलेले आहेत. हिंदुस्थानाचें पुनरुज्जीवन—सर्वांगीण पुनरुज्जीवन—व्हावें हाच तो हेतु होय. सध्या येथ संक्रमणावस्था आहे. पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृतींचा, निरीश्वर आधि-

भौतिक संस्कृतीचा सेश्वर ज्ञानप्रमुख संस्कृति शक्तींचा, संघर्ष आज येथें चालू आहे. या संघर्षांतून हिंदुस्थान विजयी होऊन, स्वत्व न गमावितां इतकेंच नव्हे तर दोन्हीं संस्कृतींतील उत्तम अंशांचा स्वीकार करून द्विगुणित तेजानें तो पुनरपि विलसूं लागावा आणि अखिल मानवजातीच्या गुरुस्थानीं पुनरपि एकवार त्याची स्थापना व्हावी. एतदर्थच त्यांनीं आपले सर्व ग्रंथ लिहिलेले आहेत. एकादा शोध लावण्याकरितां किंवा विद्वत्ता प्रकट करण्याकरितां किंवा वाङ्मयवृद्धी व्हावी ह्मणूनही त्यांनीं आपली लेखणी कधीं झिजविली नाहीं. लोकशिक्षण हाच त्यांचा उद्देश व तो त्यांच्या इतका कोणीच साधला नाहीं असें ह्मणावें लागतें. कारण त्यांच्या इतकी विपुल ग्रंथसंपत्ती—व तीही इतक्या विविध विषयावरील अनुभविक ज्ञानानें खचलेली व समतोलपणें भावी पुनरुज्जीवनाचा मार्ग दर्शविणारी—आधुनिक भारताच्या नेत्यांमधून क्वचितच दुसऱ्या कोणी निर्माण केली असेल. निवळ वाङ्मय, निवळ इतिहास, निवळ प्राचीन संशोधन किंवा निवळ अर्थशास्त्रिय आंकडेबाजीचीं पुस्तकें त्यांनीं लिहिलीं नाहींत. परंतु त्यांच्या ग्रंथांत वाङ्मय आहे, तें शोधपूर्वक लिहिलेलें आहे व त्यांत अवश्यक तितका अर्थशास्त्रीय सिद्धांतांचा व आंकडेशास्त्राचाही उपयोग त्यांनीं केलेला आहे. पण या सर्वांचा त्यांनीं असा कांहीं सुंदर समवाय केला आहे कीं, सामान्य वाचकालाही त्यांचे ग्रंथ बोधप्रदच वाटतात. अभ्यासू वाचकाला अर्थात् त्यांचे ग्रंथ ह्मणजे उपयुक्त ज्ञानाच्या खाणीच होत.

ते तत्ववेत्ते किंवा तत्वजिज्ञासूही नव्हते. तर इतर क्षेत्रांतल्या प्रमाणेंच वाङ्मय क्षेत्रांतही ते व्यवहारवादी होते. आयुष्यामध्यें जगांतील हजारों व्यवसायाच्या लोकांशीं निकट परिचय आल्यामुळें व माणसाची पारख करण्याची हातोटी त्यांना उत्तम असल्यामुळें मानवी जीवनाच्या विविध अंगांचें ज्ञान त्यांना भरपुर होतें व त्याच्या सूक्ष्म छटा त्यांच्या ग्रंथांतूनही उमटलेल्या दिसतात. पण एकाद्या प्रश्नावर मतिकुंठित झाली तर ती गोष्ट तेथल्या तेथेंच प्रांजलपणें उल्लेखित करून ठेवावयाला ते कमी करीत नाहींत.

लालाजींनीं ग्रंथ अनेक लिहिले आहेत व ते सर्वच उत्तम आहेत. पण त्यांतही मुकुटमणी ह्मणून जर कोणता शोभत असेल तर तो ' दुःखी

भारत' ( Unhappy India ) हाच होय. हा त्यांचा ग्रंथराज आहे. अमेरिकन नागीण मिसमेयो इच्या विषारी दंशावर उतारा देण्याचे निमित्तानें लालाजींनीं हा ग्रंथ निर्माण केला. तो त्यांच्या मृत्यूपूर्वी अवघा सहाच महिने प्रसिद्ध झाला. हा ग्रंथ ह्मणजे त्यांच्या सर्व परिणत ज्ञानाचें फळ होय. कारण ज्या कार्यासाठीं त्यांनीं आजन्म देह झिजविला त्याच कार्याचें मंडन करणारा हा सिद्धांत ग्रंथ आहे. अनैतिक दुर्गुण व सामाजिक दोष यामुळें राजकीय पारतंत्र्य प्राप्त होतें आणि या पारतंत्र्याच्या अवस्थेंत ते दुर्गुण व दोष जास्तच वाढीस लागून शेवटीं राष्ट्रामध्यें दुःख, दैन्य, आणि रोगराई यांचें साम्राज्य माजतें व तें राष्ट्र विलयाच्या पंथास लागतें. अशा अवस्थेंत त्याला जीवन देणारी अमृतवल्ली कोणती असेल तर ती स्वतंत्रता हीच एक होय. या सूत्रमय तत्वावर महाभाष्यरूपानें त्यांनीं हा विस्तृत ग्रंथ रचला आहे. त्यांचे इतर ग्रंथ वाचणें ज्यांना शक्य नसेल त्यांनीं येवढा ग्रंथ तरी वाचावा. ह्मणजे त्यापासून त्यांना लालाजींच्या सर्व मतांचा परिचय होईल; आज हिंदुस्थानची जी बिकट परिस्थिति झालेली आहे तिची पूर्ण जाणीव पटेल; व या संकटांतून सुटावयाचा मार्ग कोणता आहे व तो प्राप्त परिस्थितींत कसा सांपडेल हेंहि त्या महापुरुषाच्या अनुभविक बोलांच्या रूपानें वाचावयास मिळेल.

---

# लालाजी आणि लोकमान्य.

थोर पुरुषांची तुलना करूं नये असें साधारण मत प्रचलित आहे. कै. गडकऱ्यांनीं हीच गोष्ट आपल्या एका नाटकांत, थोर पुरुषाना आकाशांतील ताऱ्यांची उपमा देऊन फार मार्मिक रीतीनें ध्वनित केली आहे. पण चिकित्सक युगांतल्या आजच्या माणसाला तें कसेंसेंच वाटतें. व जनतेनें तर मागेंच या दोन पुरुषांची तुलना त्यांना एका त्रिमूर्तीचे अवयव करून सोडलें. आतां त्यांत कुणालाही कांहीं अनिष्ट वाटत नाहीं. थोर लोकसेवकांच्या कामगिरिवर आपल्या मान्यतेचा शिक्का मारावयाचा हा एक प्रकार आहे इतकाच 'लाल–बाल–पाल' या शब्द योजनेचा अर्थ केला जातो. देशभक्तांच्या कामगिरीला मान्यता किंवा त्यांच्याविषयीं जनतेला वाटणारा असीम आदर व्यक्त करण्याचा एक प्रकार हें जसें अशा प्रकारच्या तुलनेचें एक समर्थन तसेंच अशा तुलनेचें दुसऱ्याही एका प्रकारें समर्थन करतां येतें महापुरुष हे ईश्वरांशसंभूत असतात. तशांत एकच महत्कार्य करण्यासाठीं एकाच कालीं जे पुरुष भिरनिराळ्या स्थळीं उत्पन्न होत असतात त्यांच्यांत तर अधिकच साम्य असतें. भेद जो असतो तो केवळ परिस्थित्यनुसार पडलेला असतो. यामुळें अशा महापुरुषांच्या वर्तनाची तुलना केल्यास त्यापासून सामान्य प्राकृत जनांना पुष्कळच लाभ होत असतो. व याच एका दृष्टीनें ही तुलना या ठिकाणीं संक्षेपानें करावयाचें योजिलें आहे.

लालाजींच्या चरित्राचें वरवर अवलोकन केलें तरी त्याचें लोकमान्यांच्या चरित्रांशीं कोणालाही विलक्षण साम्य दिसणार आहे. लाला लजपतराय व लोकमान्य टिळक यांचे जन्म दहा वर्षांच्या फरकानें झाले–अर्थात् बहुंवशीं एकाच प्रकारच्या परिस्थितींत ह्मणजे नुकतेंच स्वराज्य गेलेलें आहे; तें स्वराज्य आपल्या डोळ्यांनीं पाहिलेले व त्या स्वराज्यांत प्रत्यक्ष कामगिरी बजावलेले अनेक लोक जीवमान आहेत; नवीन इंग्रेजी राज्याचें सत्य स्वरूप अजून फारसें उमगलें नसल्यामुळें त्या विषयींचे स्तुतिवाद ठिकठिकाणीं ऐकूं येत आहेत अशा काळांत त्यांचें बालपण गेलें. दोघांचेही

जन्म मध्यमवर्गीय कुळांत झाले होते. दोघांचेही जनक शिक्षक होते. त्यांना अर्वाचीन विद्येचा संस्कार नसूनही त्यांची समाजांत मान्यता चांगली होती व त्यांनींच आपापल्या मुलांना सार्वजनिक कार्याचें व देशभक्तीचें बाळकडू पाजलें. शिक्षण होत असतांनाच लोकमान्यांना व लालाजींना देशसेवेचा छंद लागला. आपलें भावी आयुष्य देशसेवेंतच वेचावयाचें असा दोघांनींही त्याच वेळेस निर्धार केला व दोघांनींही सारख्याच बाणेदारपणानें तो शेवटास नेला. देश वर आणण्याकरितां प्रथम उपाय दोघांनांही राष्ट्रीय वृत्तीला पोषक अशा शिक्षणाचा प्रसार हाच वाटला व तदनुसार दोघांनींही स्वतंत्र शिक्षणसंस्था स्थापूनच सार्वजनिक कर्तव्य क्षेत्रांत प्रथम पदार्पण केलें. याच कालांत दोघांनाही पूर्वी गुरुस्थानी मानलेल्या पुरुषांशीं उदात्त तत्वांकरितां विरोध करावा लागला व त्या प्रसंगांतून सारख्याच नेटानें मार्ग काढून दोघांनींही आपल्या तेजाची चुणुक आपल्या पूर्वीच्या पिढींतील कर्त्या पुरुषांना दाखवून दिली.

परंतु दोघांचा जन्म वेगवेगळ्या प्रांतांत व वेगवेगळ्या परंपरेंत झालेला होता. महाराष्ट्र व पंजाब यांच्यांत जो भेद आहे त्याला कारणें दोन. एक नैसर्गिक प्रदेशरचना व दुसरें इतिहास. निसर्गरचनेचा परिणाम तेथें वस्ती करून राहणाऱ्या लोकसमाजावर होत असतो हा सिद्धांत आतां सर्वमान्य झालेला आहे व त्याचें प्रत्यंतर आपल्याला येथें दिसतें. महाराष्ट्राची भूमी जशी खडकाळ व लहान लहान पर्वतांनीं व्यापलेली आहे तशीच येथील लोकांचीं शरीरें कंटक पण ठेंगू आहेत व त्याची मनोभूमिकाही रूक्ष व तर्कनिष्ठ आहे. उलट पंजाबांतील भूमी उर्वरा व नदीनदांनीं प्रक्षालित केलेली आहे व उत्तुंग हिमाचलाची छाया सर्व प्रांतावर पडलेली आहे. अर्थात् तेथील लोक उंच बांध्याचे पण सुखलोलुप व त्यांची मनोभूमिकाही उत्पातप्रिय आहे. कोणतीही चळवळ तेथें निघाली कीं, ती एकाएकीं जोरावते व अत्यंत प्रभावी होते पण तेवढी वेळ गेली कीं, मग त्यांच्या मनांत कांहीं राहावयाचें नाहीं. ते स्वभावानें दिलदार, सीधे शिपाईगडी आहेत. उभय प्रांतांतील लोकांच्या मनोरचनेंतला हा फरक प्रादेशिक कारणामुळें उत्पन्न झालेला आहे व तो तर या दोन पुरुषांच्या मनोरचनेंत दिसून येतोच पण या दोन प्रांतांतील परिस्थिति त्याकाळीं जी भिन्न भिन्न होती तिचाही परिणाम यांच्या

चरित्रावर झालेला दिसतो. परिस्थितीची भिन्नता पाहावयाची तर त्यावेळीं नुकत्याच विझलेल्या क्रांतियुद्धाच्या वणव्याचें जनकत्व महाराष्ट्रीयांकडे होतें तर तो विझविण्याला इंग्रज सरकारला मनोभावानें साहाय्य करण्यांत पंजाबी लोक अग्रेसर होते. अर्थात् या दोन प्रांतांतील लोकांकडे व त्यांतल्या त्यांत लोकधुरीणांकडे पाहावयाचा, नवागत परक्या सत्तेचा दृष्टिकोनही वेगळा होता. महाराष्ट्रांतील प्रत्येक सार्वजनिक पुढाऱ्याकडे येथलें सरकार अत्यंत साशंकपणानें पाहातें. कै. महर्षी रानड्यांसारखीं सोळी माणसेंही या कटाक्षांतुन सुटत नाहींत. उलट पंजाबांत स्थिति अगदी वेगळी. तेथें सांस्कृतिक झगड्याला प्रामुख्य आहे. तीन भिन्न भिन्न संस्कृतींची गांठ पवित्र पुरातन पंचनदाच्या क्षेत्रात पडलेली आहे. मुसलमानांची वसती तेथें पुष्कळ व त्यांचे अराष्ट्रीय वृत्तीचे चाळे सदैव चालू. सहजच राजकारणापेक्षां धार्मिक चळवळींना तेथें अधिक जोम चढतो.

या अंतर्बाह्य परिस्थितीचा परिणाम या दोन महापुरुषांच्या मनोरचनेवर होऊन त्यांच्या कार्यांत भिन्नता उत्पन्न झाली. सोळाव्याच वर्षी, आपला देह भावी कार्याकरितां कणखर व बलिष्ठ बनविण्याच्या उद्योगास लोकमान्य लागले व सार्वजनिक कर्मक्षेत्रांत उतरतांना आपल्या स्वतंत्र कर्तृत्वाची व स्वार्थत्यागाची छाप त्यांनीं तत्कालीन थोर थोर पुढाऱ्यांच्या मनावर पाडली तर लालाजी विद्यार्थी होते तेव्हांपासूनच स्वामी दयानंद सरस्वतींचे अनुयायी झाले व आपल्या देहस्वास्थ्याचीही खंती न करतां आर्यसमाजाचें कार्य करण्यांत आपला सारा काळ घालवूं लागले. पुढें हा भेद अधिकच स्पष्ट होत गेला. दोघांचेंही कार्य एकच होतें. हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांत स्वत्वाचा अभिमान उत्पन्न करावयाचा व 'हा देश तुमचा' असें त्यांना बजावून, आपल्या सनातन संस्कृतीच्या रक्षणाकरितां सिद्ध व्हा अशी चेतावणी त्यांना द्यावयाची हेंच कार्य दोघांच्याही डोळ्यापुढें होतें. लालाजींना परिस्थितीचें आनुकूल्य लाभल्यामुळें ते प्रथम त्या क्षेत्रांत शिरले. लोकमान्यांना १८५७ ची स्मृती ताजी होती. वासुदेव बळवंतांचा उद्योग व त्याच वेळेस घडलेले दक्षिणेंतील भीषण दुष्काळ व त्या पाठोपाठ घडलेले शेतकऱ्यांचे दंगे* या घटना त्यांच्या डोळ्यांपुढें होत्या. स्वाभाविकपणें

* हे दंगे व वासुदेव बळवंत फडक्यांचा उद्योग म्हणजे १८५७ ची

देशाच्या सर्व अवनतीचें मूळ राजकीय पारतंत्र्यांत आहे व तें प्रथम नष्ट केल्यावांचून इतर कोणच्याही दिशेनें लोकांची उन्नती घडवून आणणें शक्य नाहीं असें प्रतिपादन ते विद्यार्थीदशेपासूनच करूं लागले व तदनुसार त्यांनीं आजन्म याच क्षेत्रांत कार्य करीत करीत आपली काया झिजविली. लालाजींचीं पहिलीं पंचवीस वर्षें शैक्षणिक, सामाजिक व धार्मिक कार्य करण्यांत गेलीं व या काळांत त्यांना असाच अनुभव आला कीं, देशांत राजकीय पारतंत्र्य आहे तोंवर या अन्यान्य क्षेत्रांतील कार्य व्हावें तसें फलप्रद होत नाहीं व अनेकदां तर प्रत्यक्ष राजसत्तेकडूनच त्या कार्यांत अडथळे उत्पन्न केले जातात. यानंतर ते राजकीय क्षेत्रांत उतरले व शेवटपर्यंत तें क्षेत्र मग त्यांनीं सोडलें नाहीं.

१९०५ नंतर लालाजी व लोकमान्य यांची जीवनगंगा, बाबू बिपिनचंद्रपाल यांच्यासह त्रिवेणीसंगमाच्या लाल, बाल, पाल या रूपानें एकत्रच वाहूं लागली. कारण येथून पुढें दोघांचें कार्यक्षेत्र व प्रतिपक्षी एक व कार्यपद्धतीही एक असाच देखावा दिसतो. दोघांनाही अनुभव सारखेच येत गेले. सरकारी रोषाला दोघेही सारखेच बळी पडले व दोघांनींही सारख्याच निर्भीक अंतःकरणानें राजसत्तेच्या अन्याय्य छळाला तोंड दिलें. या काळांत दोघांचींही तत्त्वें एकच होतीं. भिक्षांदेहीच्या स्थळीं स्वावलंबन हा दोघांचा ही मूलमंत्र होता. जनतेला जागृत करा हा दोघांचाही संदेश होता. ध्येयवादी असूनही व्यवहाराची मर्यादा सोडावयाची नाहीं हें दोघांच्याही आयुष्यक्रमाचें सार होतें व विधायक राष्ट्रधर्माचे दोघेही सारखेच पुरस्कर्ते होते. दोघांनींही जन्मभर लोकसंग्रह केला. दोघांचीही भिस्त देशांतील तरुण पिढीवरच नेहेमीं असे व दोघेही जन्मभर तरुणांचेच पुढारी होते. शरीरानें साठी उलटल्यावरही दोघेही मनानें व उत्साहानें तरुणच होते.

योगायोगानें दोघांचेंही मरण अशा आणीबाणीच्या वेळीं घडून आलें कीं, ज्यावेळीं देशाला त्यांच्या नेतृत्वाची सर्वांत जास्त आवश्यकता होती.

---

पुनरावृत्ती करण्याच्या सर्व देशव्यापी अशा एका कटाचा भाग होता. याविषयीं सविस्तर माहिती लाला लजपतरायकृत 'तरुण भारत' या ग्रंथांत पृ. १३०–१३८ वर पाहावी.

दोघांचाही अंत झाला तो एकप्रकारें सारखाच झाला. आजन्म भोगलेल्या कष्टांनीं दोघांचेही देह जर्जर झाले होते व दोघेही कार्य करीत करीतच मेले. पण त्यांतल्या त्यांत पंजाबकेसरीला जास्त दिव्य लाभलें. वीर मरणाचा लाभ त्यांना घडला. पंजाबकेसरीनें देह ठेवला तो 'अभिमुख शस्त्राघातीं समर मुखामाजीं राहिलें काय' असा प्रत्यक्ष शरशय्येवरच ठेवला!

पण दोघांच्या जीवनांत शेवटपर्यंत भेद हा होताच. लाला लजपतराय शेवटपर्यंत एका कामाला चिकटून असे राहिलेच नाहींत. सारा काळ त्यांनीं अनेकविध कार्यांचा व्याप चालूच ठेवला होता व सर्व कार्यें ते सारख्याच योग्यतेचीं समजून करीत. याच्या उलट लोकमान्य टिळकांनीं शेवटपर्यंत, आपले विद्यार्थीदशेंत बनविलेलें, 'राजकारण प्रमुख, अन्य सर्व कार्यें गौण' हें मत सोडलें नाहीं. यामुळें साहजिकच लालाजींच्या ठिकाणीं अनेकविधता व लोकमान्यांच्या ठिकाणीं मूलग्राही एकविधता दिसून येते. आपलाच मार्ग खरा आहे अशी लोकमान्यांची इतकी रोमरोम निश्चिति असे कीं, त्या गोष्टींत इतरांचे मताकरितां स्वतःचे निश्चित ठाम मतानुसार ठरलेली कार्यदिशा बदलणें पटत नसे. स्वकीयांशीं विरोध आला तरी स्वमताकरितां तो अपरिहार्य ह्मणून ते स्वीकारीत. लालाजींनीं स्वजनाशीं विरोध सहसा केलाच नाहीं. तसाच प्रसंग पडल्यास ते मुकाट्यानें माघार घेत व त्या कार्याचा क्षणभर संन्यास करून अन्य क्षेत्रांत कार्य करण्यांत व्यग्र होऊन जात.

दोघेही उत्तम वकील होते. व त्या वकीली बुद्धीचा दोघांनींही स्वदेशासाठीं भरपूर उपयोग करून घेतला. पण लोकमान्यांनीं न्यायालयांत जाऊन वकीलीचा व्यवसाय कधींही केला नाहीं. व यामुळें त्यांना आर्थिक सुस्थिती फारशी लाभलीच नाहीं. उलट लालाजींनीं पंचवीस वर्षें वकीली करून लाखो रुपये मिळविले आणि ती सर्व संपत्ति कुबेराच्या औदार्यानें त्यांनीं देशमातेच्या चरणीं अर्पण केली. सांपत्तिक बाबतींत त्यांना कधींच उणीव पडली नाहीं.

दोघेही तीव्र बुद्धीचे विद्वान होते. पण लोकमान्यांना जसा प्रोफेसर ह्मणवून घेण्यांत अभिमान वाटत असे तसा लालाजींना पंडित ह्मणून कधींच

वाटला नाहीं. ते दयानंद कालेजांत कधीं कधीं शिकवीत असले तरी तें केवळ प्रसंग निभावण्याच्या दृष्टीनेंच होय. लोकमान्यांची गणना जाड्या विद्वानांत होते आणि त्यांच्या ग्रंथानीं जगाच्या ज्ञानांत चिरकालीन महत्वाची भर टाकलेली आहे. लालाजींचें ग्रंथ कर्तृत्वही कमी नाहीं. विस्तारानेंच पाहिलें तर तें लोकमान्यांच्या पेक्षांही कदाचित् अधिक भरेल. पण त्यांनीं आपली लेखणी मुख्यतः प्रचलित विषयावरच चालविली आहे. लोकांचे डोळयापुढें उत्तम आदर्श असावेत ह्मणून त्यांनीं जीं अनेक चरित्रें लिहिलीं तीं सर्व देशभाषेंत—अर्थात् पंजाबांत देशभाषा हिंदी असली तरी लिपि उर्दू असल्यामुळें लालाजींचे हे सर्व महत्वाचे ग्रंथ त्याच लिपींत छापले आहेत व ह्मणून त्यांचा लाभ ती लिपि अवगत नसणाऱ्यांना घेतां येत नाहीं ही खेदाची गोष्ट होय—लिहिलीं आहेत व बाकीचें सर्व लिखाण इंग्रेजींत केलें आहे तर लोकमान्यांचें, दोन ग्रंथ वगळल्यास, बाकी सर्वच लेखन देशभाषेंत पण साधारण वाचकाच्या दृष्टीनें विचार करतां, राजकारणाचे शिक्षण देण्याचें कामीं लोकमान्यांचे केसरींतील लेखांच्या अवजड व लठ्ठ खंडांपेक्षां लालाजींचीं पुस्तकेंच जास्त उपयुक्त ठरतील.

लालाजी व लोकमान्य दोघेही हिंदुसंस्कृतीच्या पुनरुत्थानाचे दिव्य मंत्रद्रष्टे होते पण येथेंही दोघांच्या दृष्टिकोनांत भेद हा आहेच. जाज्वल्य तत्वनिष्ठेबरोबरच लोकमान्यांच्या ठिकाणीं अंतःकरणाचें कांहींसें निष्ठायुक्तत्व व आचरणाचा बराचसा कर्मठपणा होता व तो नष्ट होण्याला विशेष कारणें न घडल्यामुळें शेवटपर्यंत तो पुष्कळसा टिकला. लालाजींच्या ठिकाणीं मुळांतच हे घटक फारसे नव्हते. त्यांतून विदेशपर्यटनाचा अनुभव त्यांना पुष्कळ घडल्यामुळें शेवटीं शेवटीं तर त्याची दृष्टी विशेषच व्यापक बनली होती. लोकमान्यांना हिंदुसंस्कृतीचें स्वरूप चालू काळाला अत्यंत अपरिहार्य ह्मणून तितकेंच बदलून बाकी सर्व राखावयाचें होतें तर पाश्चात्य संस्कृतीमधून उत्तम अंश—अपरिहार्य ह्मणून नव्हे तर बुद्धिपुरस्सर—ग्रहण करून एक नवीनच दिव्य आणि भव्य संस्कृती निर्माण करावी असें लालाजींना वाटत असे.

अशी तुलना आणखी पुष्कळ करतां येईल. पण दिग्दर्शन करावयाला लिहिला इतका भाग पर्याप्त आहे असें वाटतें. आतां जातां जाता

इतकें मात्र सांगणें अवश्य आहे कीं, या प्रकरणांत लाला लजपतराय किंवा लोकमान्य टिळक यांना उद्देशून जीं जीं विधानें केलीं आहेत त्यांच्या समर्थनार्थ आधार कुठेंही दिले नाहींत. कारण एक तर तसें करण्याची आवश्यकता वाटत नाहीं व दुसरें तसें करावयास विस्तार फार लागतो. म्हणून आधार देण्याचे भानगडींत न पडतां दोघांचेंही जीवनकार्य सामग्र्येंकरून मनः-चक्षूंपुढें आणून जे विचार सुचले तेच स्थूल रूपानें येथें उल्लेखित केले आहेत.

# लालाजींची कामगिरी.

राष्ट्रांत वेळोवेळीं महापुरुष निर्माण होणें हें तें राष्ट्र जिवंत असल्याचें निदर्शक असतें व या कसोटीनें पाहतां आपला हिंदुस्थान हें जिवंत राष्ट्र आहे कारण या राष्ट्रांत गेल्या पन्नास वर्षांच्या अल्पकाळांत असे अनेक महापुरुष अवतीर्ण होऊन, आपलें जीवितकार्य करून, जगाला या हिंदुराष्ट्राचें तेज दाखवून व हिंदुस्थानांतल्या कोट्यावधी जनतेला स्वोन्नतीच्या मार्गावर पदार्पण करावयास लावून पुनरपि त्या अनंत चैतन्य सागरांत विलीन झाले. नुकताच दोन तीन महिन्यांपूर्वी येथील परकीय नोकरशाहीच्या उन्मत्त पोलिसी दंडुक्याला बळी पडून हुतात्मा झालेला आपला चरित्रनायक पंजाबकेसरी लाला लजपतराय हा एक अशाच प्रकारचा प्रखर तेजस्वी व कर्तृत्ववान महापुरुष होता. त्याच्या जीवितकार्याचें विवेचन या प्रकरणांत संक्षेपतः करावयाचें आहे.

लाला लजपतराय यांचें त्रेसष्ट वर्षांचें जीवित आज आपल्या डोळ्यांपुढें आहे. त्यांनीं केलेलीं विविध कार्यें आज सर्वांना माहीत आहेत. त्यांच्या जीविताचें रहस्य काय होतें? त्यांच्या आयुष्याचा ध्रुवतारा कोणता होता? त्यांची निष्ठा काय होती? या गोष्टी जर आपल्याला नीट कळूं शकल्या तरच त्यांच्या जीवनांतील विविध घटनांचा योग्य अर्थ आपल्याला समजेल; तरच त्यांच्या जीवित कार्याची मीमांसा आपल्याला करतां येईल.

लाला लजपतराय यांचा जन्म या भारत वर्षांत झाला तेव्हांची स्थिती काय होती याचें विवेचन मागें एका प्रकरणांत संक्षेपतः केलेंच आहे तें लक्षांत घेतलें तर लालाजींच्या जीविताचें रहस्य काय होतें, व त्यांची निष्ठा कोणती होती याचा उलगडा सहज होण्यासारखा आहे. त्यांतल्या त्यांत पंजाबची विशिष्ट स्थिति लक्षांत घ्यावयास पाहिजे. पंजाबांत त्याकाळीं संस्कृतींचा तिरंगी झगडा चालू होता. हिंदु संस्कृती व मुसलमान संस्कृती यांचा सामना जवळ जवळ संपवून, हिंदु संस्कृती प्रतिपक्षाला भुईवर

लोळवून विजयभरानें जों क्षणभर दम घेत आहे तोंच अगदींच परकीय व परदेशीय अशी तिसरी सत्ता येथें आली. त्या सत्तेनें आपल्या बरोबर जी संस्कृती आणली ती हिंदु व मुसलमान या दोन्ही संस्कृतींपेक्षां कांहीं निराळीच होती. हिंदु किंवा मुसलमान यांपैकीं कुणालाही फारसें अनुकूल नसलेलें विज्ञानबल तिचें जवळ भरपूर होतें किंबहुना तेंच तिचें मुख्य बल व रहस्यस्थान होतें. अर्थात् पुनः कलह सुरू झाला. मुसलमानांत मताचा अभिनिवेश किंवा साध्या भाषेंत बोलावयाचें तर मतवेड प्रचंड असल्यामुळें त्यांच्यांत एकीची भावना पटकन उत्पन्न झाली व त्यांचे पुढारी सर सयद अहमद यानीं सर्व परिस्थितीचा विचार करून मुसलमानांना तारण्याचा त्यांच्यामतें उत्तम ठरलेला मार्ग मुसलमानांना दाखवून दिला व हिंदु मुसलमानांचा झगडा पुनः नव्या स्वरूपांत प्रारंभित झाला. दुसरे बाजूस इंग्रज होता. त्याची संस्कृती मुसलमानांप्रमाणें पाशवी बलावर उभारलेली व उपभोगप्रिय होती. मुसलमानांप्रमाणेंच ते मूर्तीपूजेचे द्वेष्टे, व गोभक्षक होते. मुसलमानांप्रमाणेंच ते एका देवाचे उपासक व अर्थात्च असहिष्णु तत्वज्ञानांचे पुरस्कर्ते होते. इतकें साम्य त्यांचें मुसलमानांशीं होतें. पण मुसलमानांपेक्षां जास्त असें बुद्धिबल, विज्ञानबल व लुटारू वृत्तीचे आणि अनीतीमय कां असेना पण राष्ट्रधर्माच्या भावनेचें बळ त्यांपाशीं होतें. हिंदु संस्कृतीचें सामर्थ्य त्यांनीं ओळखलें व मनांत खूणगांठ बांधली कीं, या देशांत आपली प्रतिस्पर्धी, सांस्कृतिक दृष्ट्या वरिष्ठ अशी जाती कोणती असेल तर ती हिंदु जाती आहे व आपला गाशा गुंडाळण्याचा प्रसंग आपल्यावर कधीं आला तर तो या जातीच्या प्रयत्नानें येणार! अर्थात् हिंदु जातीचें वैशिष्ट्य नाहींसें करावयाकडे त्यांना आपल्या सर्व प्रयत्नांचा मारा चालविला. ज्यांनीं ज्यानीं मिशनरी वाङ्मयाचा ईंग्लिश इतिहास लेखकांच्या ईंग्लिशांच्या हिंदू विषयींच्याच उद्गारांविषयींचा थोडासा परिचय जरी करून घेतला असेल तरी त्याला हें सांगणेंच नको कीं त्यांच्या सर्व विषारी व विपर्यस्त टीकेचा मारा हिंदूंविरुद्ध आहे. मुसलमानांविरुद्ध त्यांत एक अक्षर सांपडावयाचें नाहीं. मुसलमानांशीं ईंग्रज सरकारची जी [illegible] दिसत आहे तिची पूर्वपीठिका ही अशी आहे.

तिसरा पक्ष हिंदूंचा. त्यांच्याविषयीं विशेष कांहीं लिहावयाचें कारण आहे असें वाटत नाहीं. पंजाबातील शीख हिंदूंची स्थिती अत्यंत शोचनीय होती. हिंदु संस्कृतीच्या रक्षणाकरितां हौतात्म्याच्या वेदीवर ज्या शतशः शीख हिंदुवीरांनीं आपलें बलिदान केलें होतें त्याच संस्कृती तारक महान पुरुषांच्या आजच्या वंशजांचा बुद्धिभ्रंश इतका पराकोटीला जाऊन पोंचला होता कीं, आपला कोण नी परका कोण हें त्यांना समजेनासें झालें होतें. आपल्या शिंगांच्या बलानें लांडग्यावर कसा बसा विजय मिळविल्यावर एकाद्या गाईनें नित्याच्या सुरक्षिततेकरितां एकाद्या वाघाचा आश्रय करावा तसे शीख हिंदु इंग्रजांना बिलगले होते.

देशांतील इतर हिंदु समाजाची स्थितीही कांहीं स्पृहणीय नव्हती. त्यांच्यांत पंथभेद, जातिभेद, प्रांतभेद अनंत होत. त्यांचा लाभ घेऊन धूर्त इंग्रजानें आपल्या कौटिल्यबलावर त्यांचा इतिहास लिहिण्याच्या मिषानें एका पंथाविरुद्ध दुसरा पंथ, एका प्रांताविरुद्ध दुसरा प्रांत निर्माण करतां यावा असें विपर्यस्त वर्णन करून ठेवलें होतें. एखाद्या कोट्याधिशाचा मुलगा जन्मतांच आईला आंचवतो व दाईच्या अंगावर पिऊन तिलाच आई मानतो हजार गांठींची तिची गोधडी त्याला आपलें सर्वस्व वाटतें व स्वतःच्या वाड्यांत तो जसा एकाद्या चोरासारखा वागतो, हा सर्व पैसा व वैभव माझेंच आहे, मीच याचा वारस, आणि मी जिला आपली आई समजतो ती केवळ पैसा देऊन माझ्या बापानें नोकर ठेवलेली दाई, ज्या दिवाणजींना मी इतका भितो ते केवळ माझ्याच अन्नावर पोसलेले माझे नोकर हें तो जसें विसरतो व मग त्या दाईच्या व दिवाणजींच्या तंत्रानें चालतो त्यांना आपल्या वर्तनानें खुष करावयाचा जसा प्रयत्न करूं लागतो, तशी स्थिति सामान्य हिंदु जनतेची त्यावेळीं झालेली होती. इंग्रज सरकार आमचें मायबाप असें त्यांना वाटूं लागलें होतें व त्यांचा बाह्य भपका पाहून हे कोणी स्वर्गलोकचे देव तर नव्हेत अशी भलतीच मिथ्या समजूत त्यांची होऊं लागली होती. व हा त्यांचा बुद्धिभ्रंश शक्य तितका अधिकाधिक होत जाईल व सत्यस्थितीची जाणीव त्यांना केव्हांच व्हावयाची नाहीं अशी व्यवस्था इंग्रज सरकार शिक्षणप्रणालीच्या व ख्रिस्तीमतप्रसाराचें द्वारां करीत होतें. अर्थात् हिंदुसंस्कृतीचें जीवित अत्यंत धोक्यांत येऊन पोंचलें होतें.

ज्या बुद्धिभ्रष्ट हिंदूंना स्वत्वाची जाणीव करून द्यावयाची ते निराश व दीन झाले होते, त्यांच्या ठिकाणीं महान आकांक्षा उत्पन्न करावयाच्या, ब्रम्ह जितकें सत्य आहे तितकेंच जगतही सत्य आहे व त्याचा उपभोग उपयोग करून घेणें हें मनुष्य या नात्यानें तुमचें कर्तव्य आहे असें त्यांना शिकवून त्यांना पुरुषार्थी जीवन जगण्याला प्रवृत्त करावयाचें, त्यांच्या प्राचीन संस्कृतीचें माहात्म्य त्यांना कथन करावयाचें, व हा दिव्य वारसा तुमचा आहे. त्याला साजेसें वर्तन करा अशी त्यांना चेतावणी द्यावयाची व ती घेऊन ते जरा सावध झाले, त्यांचें प्रज्ञाहतत्व नष्ट होऊन त्यांना स्वत्वाची जाणीव उत्पन्न झाली कीं, या साऱ्या आपत्तींचें मूळ, पंधराशे वर्षांच्या दास्याचें व पारतंत्र्याचें जन्म कारण जें राष्ट्रधर्माचें अज्ञान तेंच नष्ट करावयाचें, राष्ट्रधर्माची संजीविनी त्यांना द्यावयाची व मग त्यांच्याकरवीं आजच्या युगाला साजेल अशाप्रकारें हिंदुसंस्कृतीचें पुनरुज्जीवन करावयाचें हें त्यावेळचें कार्य होतें.

## जीवनाचें महात्म्य

——:o:——

आपल्या राष्ट्रीय शिक्षणावरील महत्वाच्या ग्रंथांत ते म्हणतात "ऐहिक जीवनाविषयीं आमच्या लोकांची सर्वसामान्य कल्पना अशी आहे कीं, तें एक अपरिहार्य असें संकट आहे. जग हें दुःखमय आहे आणि त्यांतून सुटका होईल तो सुदिन ही भावना त्यांच्या मनावर फार पक्की बिंबलेली असते. ही खुळी कल्पना काढून टाकण्याकरितां व जीवनाचें माहात्म्य ( गॉस्पेल आफ लाइफ ( Gospel of life ) लोकांना समजावून देण्याकरिता अतिशय चिकाटीच्या आणि व्यापक प्रयत्नाची आज आवश्यकता आहे आणि जगामध्यें पुरुषार्थानें दीर्घकाल--शंभर वर्षें--जगणें हें आपलें कर्तव्य आहे"

## धर्म आणि राष्ट्रीय शिक्षण

——:o:——

याच सिद्धांताचें अधिक स्पष्ट विवेचन, राष्ट्रीय शिक्षणाचें कार्य सांगतांना, त्यांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे "हिंदुधर्माचा सिद्धान्त 'ज्ञानात् एव तु कैवल्यम्' असा आहे. याठिकाणीं ज्ञान म्हणजे नुसतें शाब्दिक ज्ञान

नव्हे तर अनुभवाचें ज्ञान होय. परंतु असें अनुभवाचें ज्ञान मिळविण्या-करितां जन्मभर 'कर्म' करावें लागतें व तें आसक्ति न ठेवतां करावें लागतें. अशा ज्ञानमार्गी मनुष्यानें प्रथम समाजाचीं कर्तव्यें पार पाडलीं पाहिजेत आणि समष्टीजीवनाच्या भावना हितसंबंध व सुखें यांचा अनुभव घेतला पाहिजे. हें झाल्यानंतर मग ऐहिक जीवनाच्या कांहीं कांहीं अंगांचा त्याग करून दुसऱ्या कांहींकडे वळावें म्हणजे कर्म-उपासनेच्या पायऱ्या संपल्यानंतर तो ज्ञानाचा अधिकारी होत असतो. पूर्वकालीं वैराग्याची महती असली तरी त्यामुळें श्रीमंतीपेक्षां दारिद्र्य अधिक स्पृहणीय आहे असा समज मुळींच नव्हता. तर केवळ आयुष्याच्या काहीं काळांत सांपत्तिक भानगडीपासून अलिप्त रहावें इतकाच त्या वैराग्याचा अर्थ होता. प्राचीन संस्कृत वाङमयांत संन्यासाचा उल्लेख दूरचा तरी सापडेल कीं, नाहीं याचा संशयच आहे. तत्कालिन सर्व ऋषी मुनी चांगलें धनधान्यसंपन्न व कुटुंबी असत. त्यांना योगाचा वगैरे अभ्यास करावयाचा असे म्हणून ते जनसंमर्दा-पासून अलिप्त असे दूर अरण्यामध्यें रहात असत. एकांतवास हे कांहीं त्याचें ध्येय नव्हतें. समाजाची सेवा करण्याचा तो एक मार्ग होता. मानीव जीवनाची गुंतागुंतीचीं कोडीं समाधानकारक रीतीनें सोडवून मनुष्य जातीची कांहीं उपयुक्त सेवा करावी या हेतुनेंच ते एकांतवास करीत. मुक्तीची किंवा निर्वाणाची इच्छा साधण्यासाठीं त्यांचा एकांतवास नव्हता. परंतु उत्तर सर्व गोष्टी बरोबर वैराग्याचा आणि एकांतवासाचाही विपर्यास झाला. त्याग हेंच जीवनाचें ध्येय बनलें. ही निवृत्यात्मक विचारसरणी पुढें पुढें लोकांच्या इतकी हाडीमासी खिळली कीं, तें आमचें एक वैशिष्ट्यच होऊन बसलें. या निवृत्तीचा आपल्याला उलगडा करतां येईल; वादाच्या भरांत प्रतिपक्षाशीं बोलतांना तिचें समर्थनही करतां येईल पण तिनें आपलें सर्व उत्तरकालीन वाङमय ग्रासून टाकलें आहे हें प्रांजलपणें विचार करूं बसल्यास नाकारतां येणार नाहीं. माझ्या मतें आज हिंदुस्थानला जर कशाची पहिली आवश्य-कता असेल तर ती या निवृत्यात्मक विचारसरणीचा संपूर्ण नायनाट करण्याची होय. हिंदु जातीच्या अधःपाताचें व उत्तरकालीन दौर्बल्याचें मुख्य कारण हेंच होय. ख्रिस्ती धर्मांतही असली विचारसरणी आहे पण त्यांनीं ती आचरणांत न आणतां केवळ पुस्तकांत ठेवली आहे म्हणूनच

त्याना आज इतक्या सुधारणा करतां येत आहेत तेव्हां आपल्यापुढें मुख्य काम कोणतें असेल तर तें हें कीं, जनतेच्या विचारसरणींत पालट पाडावयाचा. पुरुषार्थी जीवन जगण्यामध्यें, मानाचें जिणें जगण्यामध्यें-असुनी जिवंत-ही मेला असले कापुरुषाचे अनार्य जीवन नव्हे—कांहींतरी राम आहे कांहीं मजा आहे हें त्यांना समजावून दिलें पाहिजे. आज आह्मी जगत नाहीं असें नाहीं. आह्मी जगतों. आमच्यातील कित्येकजण तर नुसत्या जगण्यालाच इतकें महत्व देतात कीं, सर्व आयुष्यभरांत ते दुसरें कांहींच करीत नाहींत

प्राचीन आर्यांना मनुष्यजीवनाचे माहात्म्य कळलेलें होतें व सुधारणेचा हा काळ येण्यासाठीं किती मानवी श्रम खर्ची पडले आहेत याची त्यांना उत्तम कल्पना होती. आपल्या धर्मग्रंथांमधून ती सर्वत्र आहे. मनुष्यजन्माची थोरवी धर्मग्रंथांनींही भरपूर सांगितली आहे पण आयुष्याच्या ध्येयाचा प्रश्न आला कीं, ही निवृत्ति आणि अकर्मण्यता सर्व घात करते. राष्ट्रीय शिक्षणानें ही मारक विचार परंपरा मुलांच्या मनांतून प्रथम नाहींशी केली पाहिजे ”

लालाजी या आर्यसमाजांत शिरले याचें कारण त्यांचेंही जीवनकार्य तेच होतें हें होय. आतां कोणी असें ह्मणेल कीं, लाला लजपतराय आर्यसमाजांत शिरले ते फार लहान वयांत शिरले तर ते याच हेतूनें शिरले हें कसें समजावें? याप्रश्नाचे उत्तर सोपें आहे. कारण पुढें वीस वर्षांनीं जेव्हां आर्यसमाजांत दोन तट पडले तेव्हां एका तटाचें नेतृत्व लालाजींकडे होतें दुसरा पक्ष असें म्हणे कीं, आर्यसमाजाचा हिंदुधर्माशीं कांहीं एक संबंध नाहीं, तो एक स्वतंत्र धर्म आहे व आर्यसमाजाच्या कार्यकर्त्यांनीं राजकारणाच्या भानगडींपासून अलिप्त राहून आपलें धार्मिक कार्य करावें, व आर्यधर्माचा झेंडा साऱ्या जगभर फडकवावा. तेव्हां त्याच लालाजींनीं स्पष्ट उत्तर दिलें कीं “नाहीं. माझ्या समजुतीप्रमाणें आर्यसमाज हिंदू व हिंदुसंस्कृतीचा पुनरुद्धार हेंच आर्यसमाजाचें कार्य आहे व राजकारणापासून अलिप्त राहून आपलें चालावयाचें नाहीं. ह्मणून मी स्वतः राजकारणांत भाग घेणारच.”

त्यांची राजकीय निष्ठा या तत्वाला धरून होती. देश पारतंत्र्यांत पडला होता त्याला स्वतंत्र करावयाचें होतें. पण लालाजींना जें स्वातंत्र्य आत मिळवावेंसे वाटत होतें तें असें होतें कीं, ज्याचा पुनः केव्हांही नाश

व्हावयाचा नाहीं; व असें स्वातंत्र्य मिळविण्याचा मार्ग एकच होता. तो असा कीं, लोकांना राष्ट्रधर्माची दीक्षा द्यावयाची, राष्ट्रीय म्हणून कांहीं एक शील उत्पन्न करावयाचे. या राष्ट्रधर्माची महती लालाजींनीं अनेक ठिकाणीं मुक्तकंठानें गायली आहे उदाहरणार्थ एक दोन उतारे देतो.

"अत्यंत उच्च धार्मिक तत्वज्ञान व उदात्त नैतिक भावना यांनीं मुक्त असूनही आज कित्येक शतकें हिंदुस्थान पारतंत्र्यांत आहे आणि तो कुणाच्या पारतंत्र्यांत? शारीरिक शक्तीनें, धार्मिक भावनेनें किंवा तीव्र बुद्धीनें जीं सर्वतोपरी हीन दर्जाचीं आहेत त्या राष्ट्रांच्या दास्यांत आज हिंदुस्थान इतकीं शतकें पचत आहे. हें असें कां व्हावें? या प्रश्नानें मला रात्रंदिवस अस्वस्थ करून सोडलें आहे.

कोणत्याही मानवी समाजाचें, समाज या नात्यानें जें सामर्थ्य असतें तें त्या समाजाच्या घटकांमध्यें समष्टिविषयक कर्तव्याची जी जाणीव असते तीवरच सर्वस्वीं अवलंबून असते. समाज सुरक्षित असावा व समाजाचें कल्याण व्हावें ही जाणीव व्यक्तिशः प्रत्येक घटकामध्यें जितकी मोठी व जितकी तीव्र असेल तितका तितका तो समाज समर्थ होईल व महत्पदाला पोंचेल. आणि आमच्यामध्यें जर कोणती उणीव असेल तर ती अशा प्रकारच्या समष्टिविषयक जाणिवेची, राष्ट्रविषयक जाणिवेची उणीव आहे. व त्याचाच परिणाम आमचें पारतंत्र्य होय. एरवीं शारीरिक शक्तींत आह्मी जगांतील कोणाही राष्ट्राच्या बरोबरीचे आहोंत. नाजुक शरीरें असण्यांत भूषण मानणारे किंवा आपल्या शरीराच्या लठ्ठपणांतच आपला पिढीजाद मोठेपणा आहे असें समजणारे काहीं वरिष्ठ वर्गाचे हिंदु वगळले तर सामान्यतः आमचे लोक शरीरानें सुदृढ व काटक असतात. ओलीकोरडी भाकर खाऊन ते राहत असले, त्यांचे कपडे जाडे भरडे असले, त्यांचीं घरें हवाशीर नसलीं तरी यांच्यांतून जे शिपाई होतात ते जगांतील नामांकित शिपायांची शारीरिक बाबतींत व शौर्यसाहसादि गुणांत सहज बरोबरी करतात. इतिहास त्याच्या पराक्रमाची साक्ष देत आहे बौद्धिक दृष्टीनें विचार केला तरी हेंच दिसेल. हिंदुसंस्कृती म्हणजे बौद्धिक विकासाची परमावधीच होय. अर्वाचीन काळ घेतला, अगदीं इंग्रजी राजवटीचा विचार केला तरी जगाच्या ज्ञानांत अपूर्व भर टाकणारे जगदीशचंद्र बोसां-

सारखे प्रतिभासंपन्न पुरुष या देशानें उत्पन्न केले आहेत. आणि धर्माच्या प्रदेशांत शिरावें तर तेथें आमचेंच एकमेव राज्य दिसतें. दिव्य औपनिषदिक ज्ञानाचे अज्ञात निर्माते, महात्माबुद्ध, श्रीमदाद्यशंकराचार्य यांच्यासारखी व्यक्ती जगांत एकातरी देशाने उत्पन्न केलेली दाखवून द्या. तत्वज्ञान बघितलें तर तेथली हीच स्थिती आहे. षड्दर्शनांचे अमर निर्माते व त्यांचेवरील टीकाकार यांसारख्या सत्यभाषी निर्भीड विचारसरणीचे तत्ववेत्यांची मालिका जगांत कोणत्या तरी देशानें निर्माण केली आहे काय? आणि हें सर्व जर खरें आहे तर राष्ट्र या नात्यानें आमची अवस्था अशी हीन कां? आह्मी दुर्गतिपंकांत पडलों आहोंत आणि वर उठूं शकत नाहीं असा आमच्यांत कोणचा दोष आहे? नवीन परिस्थितीशीं आम्हांला जुळवून घेतां येत नाहीं ह्मणावें तर हिंदूधर्मासारखा व्यापक आणि लवचीक धर्म जगांत दुसरा कोणचा आहे? सतत बारा शतकें मुसलमानांनीं, राजसत्तेच्या बलावर आह्माला नामशेष करण्याचा प्रयत्न केला, आज शंभर वर्षें खिस्ती मिशनरीही तेच करीत आहेत; तरी हिंदुधर्म जेथल्या तेथें स्थिर आहे! व तो पुढेंही अनंतकाल आपल्या या जन्मभूमींत स्थिरच राहील असा रंग दिसतो! ह्मणजे परिस्थितीशीं जुळवून घेण्याचा गुण आमच्यांत आहे. आह्मांला शंभर वर्षें मिळालेल्या शिक्षणानें देशाच्या दुर्गतीचीही उत्तम जाणीव पटलेली आहे; आम्ही देशभक्त ह्मणून मिरवितो; राष्ट्र विलयास जात चाललें असा आक्रोश आह्मी चालविला आहे; देशाच्या राज्यकारभारांत सुधारणा करण्याविषयीं वर्तमानपत्रांत मारे जोरानें मोहीम चालू आहे; इतकें सर्व आहे तरी राष्ट्रस्वातंत्र्याच्या मार्गात आपण एक पाऊलही अग्रेसर होऊं शकलों नाहीं याचें कारण काय? आमची देशभक्ती वांझ कां ठरते? सरकारचे दोष हुडकून काढून त्यावर प्रखर टीका करण्याचा उद्योग आह्मी आज इतकीं वर्षें सतत निरलसपणें चालविला असतांना त्याचा कांहींच कसा परिणाम होत नाहीं? बरें घटकाभर राजकीय क्षेत्र सोडून सामाजिक प्रगतीकडे वळलें तरी काय देखावा दिसतो? येथें तर सरकाची धोंड आड नसते मग राजाराममोहनराय, स्वामी दयानंद सरस्वती, पंडित ईश्वर चंद्रविद्यासागर, महर्षी महादेव गोविंद रानडे असले असले खंदे वीर या क्षेत्रांत कामास उतरले असतांना त्यामानानें कामगिरी कां झाली नाहीं?

या सर्वांचें कारण वर सांगितलें तेंच एक आहे. राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीला जी राष्ट्रहिताची जाणीव असावयास पाहिजे व त्या राष्ट्रहितापुढें व्यक्तिहिताला दुय्यमदर्जा देण्याची बुद्धी पाहिजे ती आमच्यात नाहीं आमच्यांत सगळा वैयक्तिक स्वार्थ भरला आहे. आमच्यांतील बहुतेकाना तर समाजाची किंवा राष्ट्राची कल्पनाच नसते. पण ज्यांना ती असते किंवा निदान जे असें दाखवितात ते सुद्धां व्यक्तिहिताच्या आड येतांच राष्ट्राची कल्पना साफ विसरून जातात. आह्मी मोठे प्रकांडपंडित असूं, त्या पांडित्याचा गर्वही बाळगीत असूं, दुसऱ्यांच्या चुका काढण्याची आह्मांला मोठी हौस असेल पण समष्टिहिताची जाणीव कशी बाळगावी याचा ओनामा आमच्यांतील बहुतेकांना अद्याप शिकावयाचा आहे."

"आमच्या धर्माची शिकवण स्वार्थीपणाची आहे असें नाहीं, किंवा आमच्या थोर महात्म्यांनीं स्वार्थी वृत्तीचा निषेध केला नाहीं असें नाहीं, किंवा राष्ट्रीय कर्तव्याची शिकवणच आमचीं शास्त्रें आह्मांला देत नाहींत असें नाहीं तर राजकीय पारतंत्र्य फार काळ आमचे येथें घर करून बसलें आहे व त्यानें आमच्या रक्तांतली राष्ट्रवृत्ति मारून टाकली आहे. आमच्या बापआजापासून ती आह्मांला मिळाली नाहीं कारण स्वतः त्यांनाच तिची ओळख नव्हती. पाश्चिमात्यांपासून आह्मी राष्ट्रधर्म शिकावयाचा तर त्यापाठोपाठ अनेक दोषही आमच्यांत शिरणें अपरिहार्य आहे. खरा राष्ट्रधर्म आमच्यातील फार थोडे लोक शिकले. राष्ट्रधर्माचा पाश्चिमात्य सहकारी जो आधिभौतिक सुखवाद तो मात्र पुष्कळांनीं उचलला. त्याचीही आह्मांला जरूर आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु एकटा सुखवादच बळावला व त्याला निस्वार्थी राष्ट्रधर्माची जोड मिळाली नाहीं तर आमचा सर्वनाश होणार हें विसरून चालावयाचें नाहीं. देश श्रीमान होईल, त्याचा व्यापार वाढेल, औद्योगिक प्रगति होईल पण त्याबरोबरच सार्वजनिक कर्तव्यांची जाणीव आमच्या लोकांत उत्पन्न झाली नाहीं तर त्या सर्वांचा आह्मांला काहींएक लाभ नाही किंबहुना भावी अवनतीचा—जर आतां अवनति शक्य असेल तर—पायाच त्यायोगें आह्मीं खणून ठेवला असें होईल. होय, आम्हांला सुखवाद पाहिजे आहे पण त्याबरोबरच किंवा खरें बोलावयाचें तर त्याच्या पूर्वीच आह्मांला आमच्या लोकांमध्यें राष्ट्रहितापुढें व्यक्तिहित तुच्छ लेखण्याची बुद्धि उत्पन्न

व्हायला पाहिजे आहे. आह्मांला मुख्य गोष्ट पाहिजे ती ही कीं, देशांतील प्रत्येक मनुष्य देशभक्त असला पाहिजे, त्याला सार्वजनिक कर्तव्यांची जाणीव असली पाहिजे आणि सार्वजनिक हितार्थ व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या लाभावर पाणी सोडावयास तो सदैव सिद्ध असला पाहिजे. हाच आमचा परमोच्च धर्म होय आणि यानेंच आमची मुक्तता होईल. या राष्ट्रधर्माचा देशभर प्रसार करण्यासाठीं राष्ट्रधर्माचे जणुं मूर्तिमंत आदर्शच असे प्रचारक आह्मांला पाहिजेत. ते एकदां प्रांतोप्रांतीं निर्माण झाले कीं मग राष्ट्रधर्माची मूळें या देशांत जीव धरतील आणि देशाची प्रगति झपाट्यानें होऊं लागेल. पण जर ही बाब आपण दुर्लक्षिली तर शेंकडों वर्षे देशाचें नांवानें ओरड करूनही देशाचें पाऊल तसुभरसुद्धां पुढें पडणार नाहीं."

राष्ट्राची आर्थिक स्थिती सुधारून त्यांच्या अंगांत त्राण उत्पन्न करावयाचें व मग स्वातंत्र्याचा झेंडा उभारावयाचा. पूर्वीचा इतिहास त्यांना माहीत होता. कर्तृत्ववान व्यक्तींनीं आपल्या प्रचंड पराक्रमाच्या बलावर देशाच्या कांहीं कांहीं भागांना स्वातंत्र्य मिळवून दिलें होतें परंतु लोकांनीं सर्वात्मना प्रयत्न करून जें मिळविलेलें नसतें तें लोकांना राखतांही येत नाहीं. एक व्यक्ती गेली कीं तिचा पराक्रम तिच्या बरोबर जातो व लोक पुन: कोरेचे कोरे राहतात. तसें आतां होऊं द्यावयाचें नाहीं लोकांनीं स्वत: जागे होऊन राष्ट्रधर्म शिकून, राष्ट्रस्वातंत्र्याकरितां प्राणपणानें प्रयत्न करावेत व स्वातंत्र्य मिळवावें. ते जागे होईपर्यंत आपलें काम केवळ त्याची सेवा करावयाची, त्याची सर्वतोपरी उन्नती घडवून आणावयाची, त्याना ज्ञान द्यावयाचें, त्यांचें दारिद्र्य नासून टाकावयाचें इतकेंच आहे. लोकांनीं आपलें ऐकावें व आपल्या बरोबर यावें असें वाटत असेल तर आपण त्यांचें हित रात्रंदिवस पाहतों, स्वत:च्या देहापेक्षांही त्यांच्यावर आपलें जास्त प्रेम आहे, याची निश्चिति त्यांना पटली पाहिजे व अशी निश्चिति पटावयाला निस्वार्थी लोकसेवा हाच एक मार्ग आहे असें त्यांनीं ठरविलें. शिक्षणाच्या व समाज सेवेच्या कार्याला वाहून घेणें हाच देशोद्धाराचा सर्वोत्तम मार्ग आहे; व जनतेचा सेवक व्हावयाचें, जनतेवर प्रेम करावयाचें पण तिचा गुरू होण्याची हांव धरून तिला आशेंत वागविण्याचा प्रयत्न करावयाचा नाहीं हा त्यांनीं आपला बाणा ठरविला. कोणीही दु:खी

देशबांधव दिसला कीं, त्याची सेवा करावयाची, त्याचें दुःख दूर करण्याकरितां स्वतः कष्ट भोगावयाला सिद्ध व्हावयाचें हाच त्यांचा धर्म होता. आकाशांत मनोरे बांधून ध्येयवादी ह्मणवून घेण्यापेक्षां भुईसरपट चालून व जनतेची सेवा करून तिची मनोभूमिका सिद्ध करावयाची व त्यांत राष्ट्रधर्माचें बीज पेरावयाच यांतच त्यांना समाधान वाटे. राष्ट्रसभेचा उपयोग लोकांना राजकीय शिक्षण देणें हाच आहे असें ते मानीत. लोकांच्या मनांत समष्टिरूप जाणीवेचा विकास सावकाश, पण स्थायी व्हावा असा त्यांचा मोठा कटाक्ष होता. कारण लोक शारीरिक व मानसिकदृष्ट्या अत्यंत क्षीण झालेले आहेत. एकादा अति धडाडीचा व तेजस्वी मार्ग आंखून त्यामार्गानें लोकांना नेलें व ही उडी त्यांना न झेपल्यामुळें त्यांनीं कच खाल्ली तर तिनें त्यांचा तेजोवध होईल व राष्ट्र मागें जाईल अशी त्यांची निश्चिति होती. ह्मणून वाजवीपेक्षां फाजील घाई न करतां विधायक कार्याच्या मार्गानें जनतेला जागृत व संघटित करीत करीत इतकें संघटित व समर्थ बनवावयाचें कीं, पारतंत्र्याला सहज हांकून देतां यावें असा त्यांचा कार्यक्रम होता.

हा कार्यक्रम त्यांनीं आचरणांत कसा आणला हें त्यांचें जीवन चरित्र पाहिलें असतां सहज समजतें. त्यांचीं पहिलीं पंचवीस वर्षें शिक्षण देण्यांत मुख्यतः गेलीं. शाळा स्थापन करून, पुस्तकें लिहून व वर्तमानपत्रद्वारें, चालून आलेल्या संधींचा लाभ करून घेत त्यांनीं लोक जागृतीचा मार्ग आक्रमण केला. हाच क्रम त्यांचा कमीअधिक मानानें पुढेंही आमरण चालू होता. ते परदेशीं गेले तरी तेथेंही या कार्याचा व ध्येयाचा त्यांना विसर पडत नसे. निरनिराळ्या शिक्षण संस्थांचें निरीक्षण करून त्या निरीक्षणाचा स्वदेशांतील संस्थांना उपयोग करून द्यावयाचा, निरनिराळ्या विषयांचा स्वतः अभ्यास करून ते ते विषय देशबांधवापुढें मांडावयाचे व त्यांच्या ठिकाणीं भावी मोठेपणाची आकांक्षा उत्पन्न करावयाची हें कार्य त्यांनीं सतत ५० वर्षें चालविलें होतें. या ज्ञानदानाच्या कार्याबरोबर समाजाची सेवा करावयाची हा त्यांचा दुसरा मार्ग होता व तोही त्यांनीं तितक्याच स्वार्थत्यागानें व चिकाटीनें आक्रमण केला. अनाथालयें, दुष्काळपीडितांना साहाय्य हीं कामें तर ते करीतच पण कोणीही देशबांधव कसल्याही संकटांत पडून साहाय्याची अपेक्षा करीत असला कीं, त्याला

हात द्यावयाला लालाजी सदैव सिद्ध असत. मग तो बिचारा वैयक्तिक आपत्तींनीं गांजला असो, दुर्धर रोगानें पछाडला असो. परधर्मीयांच्या हातांत सांपडून अगतिक झाला असो किंवा सर्वसमर्थ सरकारच्या अन्यायी कोपाला बळी पडून उभ्या नगरांत डोकेंहि टेकावयाला जागा नाहीं अशा अनाथ अवस्थेप्रत पोचलेला असो, त्याला लालाजी साहाय्य करीत. हीं कार्यें करीत असतांना ते आपल्या प्रपंचाकडे किंवा देहाकडेही पाहात नसत. कोणावर कांहीं अन्याय झाल्याचें कळलें कीं, मग त्यांना तो दूर केल्यावांचून चैनच पडत नसे. १९०५ च्या सुमारास जे जमीनविषयक जुलमी कायदे झाले त्यामुळें लोक संत्रस्त होऊन गेले. तात्काळ लालाजींनीं त्या विषयांत मन घातलें. तोपर्यंत तो विषय त्यांना नवीन होता परंतु लोकांचें दैन्यहरण हेंच त्यांचे ब्रीद असल्यामुळें तें काम त्यांनीं हौसेनें पतकरलें व इतक्या धडाडीनें व तरीही इतक्या कुशलपणानें चालाविलें कीं, सरकारला अन्यायाचा अवलंब करून त्यांना निर्वासित करावे लागलें. शेवटीं अन्यायी कायदा परत घ्यावा लागला तो लागलाच.

लालाजींचा जन्म एका उत्तम शिक्षकाच्या पोटीं झाला होता व उत्तम शिक्षक जसा आपलें ज्ञान विद्यार्थ्यांच्या डोक्यांत कोंबावयाचें स्थळी त्यांचें त्यांनाच शिकूं देतो तसेंच वर्तन लालाजी लोकांशीं करीत असत. लोकांना काय करावयाला हवें आहे. काय करावेसें लोकांना वाटतें हें ते पाहात व तेंच त्यांना करूं देत; व स्वतःही तेंच कार्य निःस्वार्थपणें व चिकाटीनें ते करूं लागत. अर्थात चिकाटी, कळकळ, निस्वार्थीपणा यांनीं युक्त असलेलें कोणतेहि कार्य यशस्वी हें व्हावयाचेंच. पण यांचें कार्य यशस्वी होऊं लागलें कीं सरकारला तें पाहावत नाहीं पददलित लोकांमध्यें कोणत्याही प्रकारची संघटना झालेली, समष्टि जीवनाची भावना स्फुरूं लागलेली परकीय सरकारला खपणें स्वाभाविकच अशक्य आहे तें त्या कार्यांत अडचणी उत्पन्न करतें. या अडचणी येऊं लागल्या व त्या परकीय सरकारकडून येत आहेत हें लोकांना स्पष्ट दिसलें कीं, तें सहजच राजकीय क्षेत्रांत येऊन पोचतात. हाच प्रकार लालाजींनीं आपल्या पहिल्या पंचवीस वर्षांच्या कार्यांत घडवून आणला. यामुळें राष्ट्रांत शिस्त उत्पन्न होण्यास साह्य झालें. मानी जीवन जगावें असें लोकांना वाटूं लागलें. ते स्वदेशी बहिष्काराची भाषा बोलूं लागलें. लाला-

ओंनीं त्यांना पाठिंबा दिला, त्या चळवळींत प्राण ओतला व पुन? लोकांनाच काम करावयाला लाविलें.

लोक क्षणभर उठले, चमकले, नि पुन: मागें पडले. लालाजींना वाटलें अजून कार्य वाटतें तितकें झालें नाहीं. राष्ट्रांतील पुरेशा व्यक्तींना अजून राष्ट्रधर्माची शिकवण मिळालेली नाहीं. ते पुनः आपल्या सेवेच्या कार्याकडे वळले. लोकांची सेवा करावयाची, त्या सेवेच्या बळावर त्यांना वश करून घ्यावयाचे व त्यांची संघटना घडवून आणावयाची आपल्या आकांक्षा ते आपण होऊन प्रकट करतील व त्या साधण्याकरितां आपण होऊन प्रयत्नाला लागतील असें करावयाचें हा त्यांचा कार्यक्रम त्यांनीं पुनरपि अंगीकारला. मोर्ले साहेबांनीं दिलेल्या सुधारणाकडे ढुंकूनही न पाहतां त्यांनीं हिंदुसभेचें कार्य उचललें यावरून हीच गोष्ट स्पष्ट होते.

१९२० मध्यें ते अमेरिकेंतून परत आल्यावर त्यांनीं जनतेला असहका- रितेचा अंगीकार करतांना पाहिलें. या वेळीं कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत अध्यक्ष असतांना त्यांनीं जें वर्तन केलें त्यावरून त्यांची निष्ठा अधिकच स्पष्ट होते. त्यांना असहकारितेचा कार्यक्रम मान्य नव्हता. आपला मतभेद त्यांनीं म. गांधींना स्पष्ट बोलून दाखविला होता. ही क्षोभक चळवळ फार तर वर्ष दोन वर्षें चालेल, नंतर पुनः उलट खाऊन राष्ट्राची परागति होईल असा त्यांचा आक्षेप होता. पण राष्ट्रीय सभेच्या मंडपांत त्यांनीं पाहिलें कीं, ज्याला आपण जनता जनता असें ह्मणतो ती जनता या ठरावाला अनुकूल आहे. सर्व साधारण वर्ग अनुकूल आहे, व सुशिक्षित वर्ग, नेता समजला गेलेला वर्ग प्रतिकूल आहे तेव्हां लोकांच्या इच्छेपुढें त्यांनीं मान वाकविली व असहकारितेला संमती दिली! यावेळीं त्यांनीं असें केलें नसतें, विरोध करून वेगळा पक्ष स्थापन केला असता तर त्यांच्या छत्राखालीं, एकदोन अपवाद वगळता, देशांतला सर्व नेतृवर्ग गोळा झाला असता यांत शंका नाहीं. कदा- चित राष्ट्राचा त्यामुळें लाभ झाला असता व राष्ट्राचीं जीं कांहीं वर्षें मध्यंतरी वायां गेलीं तीं जातींना. हें सर्व खरें पण लालाजींना एकच दैवत ठाऊक होतें. तें ह्मणजे जनता—लोक! त्यांची इच्छा, त्यांचा शब्द ह्मणजे लालाजींना वेदवाक्यसा वाटे. आणि त्या त्यांच्या दैवतानें—त्या जनतेनें—तर स्पष्टपणें निः संदिग्ध शब्दांत असहकारिता पुकारली होती. मार्गांतील संकटांचीं लालाजींना

पूर्ण कल्पना होती. पण त्यांना वाटलें, कदाचित राष्ट्राची नैसर्गिक उत्क्रांती येथपर्यंत झालीही असेल. तें कसेंही असो, ही राष्ट्राची आज्ञा आहे ती आपण शिरोधार्यच मानावयाची व पडतील त्या संकटांना तोंड द्यावयाचें हाच त्यांचा विचार यावेळीं होता.

याचा परिणाम असा झाला कीं, लोकांची राजकीय जाणीव वाढली. अर्थात् ती पुरेशी नसेल—नाहींही. पण जी उत्पन्न झाली आहे तिचा उपयोग राष्ट्रांत संघटना निर्माण करण्याकडे करावयाचा हाच लालाजींच्या शेवटल्या वर्षांतील कार्यक्रम होता. कारावासांतून सुटून आल्यावर त्यांनीं जी भेट दिली त्यांत त्यांनीं मुख्य गोष्ट ही सांगितली कीं, एका वर्षांत स्वराज्य या हुल्लडानें राष्ट्रीय संघटनेकडे दुर्लक्ष झालें.

पण देशाच्या भवितव्याविषयीं ते उदासीन किंवा निराश नव्हते. त्यांना मोठी आशा वाटत असे. सायमन मंडळाच्या नेमणुकीसरसा राष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून जो त्याच्या बहिष्काराचा ध्वनी उमटला त्याचा अर्थ राष्ट्र जांभया देऊन जागें होत आहे असा त्यांनीं केला व आपल्या शेवटल्या पुस्तकांत जगांतील राष्ट्रांना विशेषतः साम्राज्यवादी राष्ट्रांना त्यांनीं बजावलें कीं पहा, आतां हिंदुस्थान जागा होत आहे जगाची शांतता आज हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यावर अवलंबून आहे. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य ह्मणजे जगाच्या सुखाची वाढ, जगाच्या संस्कृतीचा विकास, मानव्याची प्रगति, पृथ्वीवर न्यायाचें राज्य स्थापण्याचा उपाय व परमेश्वरी कृपेला पात्र होण्याचा सर्वांत सोपा व सर्वांत जवळचा मार्ग होय.

हिंदुस्थानचें जागतिक कार्य काय आहे याविषयीं ते लिहितात—

## आमचें जागतिक कार्य

आज आमचें येथें सर्व गोंधळ व अराजकता माजली आहे. ही स्थिती अनैसर्गिक आहे. समाजाचा नाश करणारी आहे व परस्पर सहकार्याला प्रतिकूल आहे तिच्यामुळें जितजेत्यांतच काय पण जितांजितांतही आपआपसांत सहकार्य होणें अशक्य होऊन बसलें आहे. युरोपांत सुद्धां आज सर्वत्र अंदाधुंदीच आहे. युरोपियन सुधारणा जगावी ह्मणून जर्मन युद्ध लढलें गेलें असें ह्मणतात. पण ती सुधारणा जगण्याला नालायक आहे. ती वांचूच शकत

नाहीं. सगळा युरोप आपसांत भांडत आहे. शांतता दिसते ती केवळ दिखाऊ आहे. परस्पर कुरबुरी, अविश्वास, मत्सर, वैर यांनीं सर्व युरोपचें वातावरण धुंद होऊन गेलें आहे. राष्ट्रेंच एकमेकांशीं भांडत आहेत असें नाहीं तर समाजातले वेगळे वेगळे वर्ग आपसांत प्राणघातक झगडा करीत आहेत. किंबहुना सारें जग या भांडणांत चूर आहे—युरोप, अमेरिका, आशिया कोणीच त्यांतून सुटलेला नाहीं. आह्मी हिंदुस्थानांत सरकारशीं भांडत आहोंत तें या उद्देशानें कीं उपरोक्त जागतिक भांडाभांडीचें एक कारण तरी नाहींसें व्हावें. आमचें मागणें फार सोपें आहे. आमचे नेमस्त मित्र मागतात तशी साम्राज्याची भागीदारी आह्मांला नको किंवा जगांतल्या भांडणांत शिरावयाचा हक्कही आह्मांला नको. आह्मांला पाहिजे तें फक्त स्वातंत्र्य—पूर्ण स्वातंत्र्य—आमच्या परंपरेनुसार राज्यसंस्था निर्माण करून पुरुषार्थी जीवन जगण्याचें स्वातंत्र्य आह्मांला हवे. त्यायोगें आह्मी इतर राष्ट्रांशीं सहकार्य करूं व त्यांतूनच एक नवीन जग निर्माण करूं.

हिंदुस्थान आशियाखंडाचें काळीज आहे. व हिंदुस्थानचा प्रश्न सुटला कीं आशियाचाही मुख्य प्रश्न सुटल्यासारखाच आहे. आशिया युरोपच्या दास्यांत पडला त्यावेळीं प्रथम हिंदुस्थानच पुढें होता. आतां आशिया स्वतंत्र होत आहे. याही वेळीं स्वातंत्र्याची ललकारी प्रथम हिंदुस्थाननेंच ठोकली पाहिजे.

हिंदुस्थान हें जसें आशियाचें काळीज तसें आशिया हें जगाचें काळीज आहे. मनुष्यवस्तीचा अर्धा भाग येथें रहातो. सर्व धर्मांचें संस्कृतींचें व सुधारणांचें हें जन्मस्थान आहे. हें आशियाखंड जोंवर परतंत्र राहील तोंपर्यंत जग स्वतंत्र होऊंच शकत नाहीं. आशिया स्वतंत्र झाला नाहीं तोंपर्यंत जगांत लोकसत्ता नांदत आहे असें ह्मणणें फोल आहे. विभक्तांत अविभक्तपणा कसा पहावा हें सर्व जगाला आशियाच शिकवील. जो इतरांना पूर्ण स्वातंत्र्य देतो तोच खरा स्वतंत्र. आत्मा व परमात्मा हे केवळ एकाच वस्तूचे दोन बाजूंचे भास आहेत बाकी वस्तु एकच आहे. स्वधर्मानुसार प्रत्येकानें वर्तन करणें हेंच खरें स्वातंत्र्य आहे. व्यष्टीचें खरें स्वरूप तेंच कीं जें समष्टींतही पहतां येतें. तसेंच जगाचें कार्य तोच मनुष्य आनंदानें करूं शकतो कीं, ज्याला मीच जग आहे असा अनुभव येत असतोः इत्यादि तत्वें आज

मानवजातीला कोणी शिकवूं शकत असेल तर तो आशिया व त्यांतल्यात्यांत हिंदुस्थानच शिकवूं शकेल. आह्मांला स्वातंत्र्य पाहिजे आहे. व्यक्तीचें, राष्ट्राचे व खंडाचें स्वातंत्र्य पाहिजे आहे व जगांतली प्रत्येक व्यक्ती व प्रत्येक राष्ट्र स्वतंत्र असावें ही आमची इच्छा आहे. आमचे ध्येय मानव्याची प्रगती हें आहे. सर्व मानवी आदर्श व सुधारणा जेथें एकत्र सामावतील अशी एक ज गतिक संस्कृति निर्माण करणें हें आमचें ध्येय आहे. आम-च्यांत सर्वोत्तम असें जें काय असेल तें आह्मी जगाला देऊं इच्छितों. पण ही गोष्ट तेव्हांच शक्य आहे कीं, जेव्हां आह्मी परक्यांच्या दास्यामधून व परसंस्कृतीच्या कचाट्यांतून मुक्त होऊं. अन्य संस्कृतीचा केवळ ती परकीय ह्मणूनच आह्मी द्वेष करतों असें नव्हे तर तिचे गुणदोष पाहून तिचा स्विकार करावयाचा कीं, नाहीं हें ठरविण्याला आज आम्ही स्वतंत्र नाहीं आणि म्हणून तिच्या कचाट्यांतून आपली मुक्तता करून घेणें हें आमचें पहिलें साध्य आहे ”

सध्यां जगांत राजकारणाचे जे वारे वाहात आहेत त्यांचें निरीक्षण करतां लालाजींना असें वाटत असे कीं, कदाचित् या गडबडींत हिंदुस्था-नाला स्वराज्य मग ते वसाहतीचें कां असेना--मिळून जाईल. पण तेवढ्यानें त्यांचें समाधान होत नव्हतें. तें स्वराज्य कांहीं लोकांनीं मिळविलेलें होत नाहीं, वाहत्या गंगेंत हात धुवून घेण्यासारखाच तो प्रकार असें त्यांना वाटत असे व त्या स्वराज्याचा उपयोग करून लोकांना पूर्ण जागृत करावयाचें, राष्ट्रधर्मानें उत्स्फूर्त करावयाचें, या तीस कोटींच्या प्रचंड राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीला राष्ट्रधर्माचें सूत्र शिकवावयाचें व पूर्ण लोकसत्ता येथें स्थापन करावयाची हीच त्यांची आकांक्षा होती. स्वराज्याच्या नुसत्या योजना लिहून काढण्यांत त्यांना अर्थ दिसत नव्हता ते १९२३ त लिहितात-

“ स्वराज्याची पूर्ण घटना सिद्ध करावयाच्या स्थितींत आज आह्मी नाहीं कां कीं, स्वराज्य आह्मांला पाहिजे असेल हें त्या विशिष्ट कालावर, स्वराज्य संपादनाच्या मार्गावर, डोळ्यांपुढें असणारीं ध्येयें व्यवहारांत उतरण्याच्या आमच्याचातुर्यावर व कर्तृत्वावर, राष्ट्राच्या त्यावेळच्या नैतिक व मानसिक विकासावर आणि कांहीं अंशीं तत्कालीन जागतिक परिस्थिती-वरही अवलंबून राहील. १९३० मध्यें जें स्वराज्य आह्मी मागूं तें

स्वाभाविकरीत्याच १९२३ मध्यें आम्हांला हवें असलेल्या स्वराज्यापासून भिन्न राहील तेव्हां अशी योजना करावयाचा. काल येईपर्यंत व राष्ट्र त्या पायरीला पोंचेपर्यंत आमच्या स्वराज्याची अमुक एक अशी निश्चित योजना करण्यांत अर्थ नाहीं. १९१६ मध्यें राष्ट्रीय सभेनें केलेली योजना १९१८ मध्यें राष्ट्राला अत्यंत अपुरी वाटूं लागली. व राष्ट्राला पुढें नेण्याच्या ऐवजीं तिनें त्याचें पाऊल प्रत्यक्ष मागें आणलें. तेव्हां अशी योजना करावयाची सत्ता हातीं आल्यावर नुसती योजना लिहून काढावयाला काय उशीर लागणार आहे, अशी सत्ता मिळूं द्या कीं, त्याच क्षणीं अम्हांला इष्ट किंवा व्यवहार्य वाटत असलेल्या स्वराज्याची योजना अम्ही सिद्ध करूं. तोंपर्यंत आमचीं तत्वें काय आहेत तीं स्पष्ट करणें व त्यांचें शिक्षण जनतेला देणें एवढेंच काय तें शक्य आहे व तेंच आम्हीं करावें हें योग्य आहे."

"आपल्या लोकांना मला जे विशेष सांगावयाचें आहे तें हें कीं, जोपर्यंत एकादी स्वराज्याची योजना तयार केल्यास ती कृतीमध्यें उतरविण्याचें सामर्थ्य आमच्यामध्यें नाहीं तोंपर्यंत आमचीं तत्वें आणि आमचें ध्येय हीं स्पष्टपणें जाहीर करणें व त्यावर चर्चा करून त्यांचा यथायोग्य अर्थ जनसाधारणाला समजावून देणें हेंच आमचें कर्तव्य आहे. ह्मणजे तसें सामर्थ्य अंगीं येतांच सविस्तर योजना लिहून काढणें आह्मांला शक्य होईल. तोंपर्यंत आमचें पहिलें काम हें कीं, लोकांपुढें योग्य आदर्श मांडाव याचे व त्यांच्या अंतःकरणावरच ते बिंबतील असें करावयाचें; आणि आमचें दुसरें कर्तव्य हें कीं, योग्यकाळ येतांच राष्ट्राला अवश्य वाटेल ती स्वराज्याची योजना अमलांत आणण्याकरितां एक प्रबल आणि सुयंत्र संघट्टना—एक यंत्र निर्माण करून ठेवावयाचें"

हिंदु संघटन ते या बुद्धीनें करीत होते. हिंदुसंस्कृतीचें पुनरुज्जीवन करून तिला एक जागतिक संस्कृती बनवावयाची, मुसलमानांना राष्ट्रधर्म शिकवून त्यांना या हिंदुस्थानचे खरे पुत्र बनवावयाचे, व पूर्ण लोकसत्ता येथें स्थापन करून भांडवल शाहीनें ग्रासलेल्या पश्चिमेला विकासाचा मार्ग दाखवून द्यावयाचा हा निदिध्यास त्यांना आपल्या शेवटच्या वर्षांत लागला होता. ते ह्मणतातः—

"आम्हांला अशी लोकसत्ता पाहिजे कीं, ज्यांत हिंदुस्थानांतील सर्वांचा समावेश होईल; व हा धनी आणि हा गुलाम, हा भांडवलवाला व हा मजूर हा शास्तावर्ग आणि हा शासितवर्ग असा भेदभाव उरणार नाहीं. जेथें सर्वजण एकमेकांचे बंधु आणि सहकारी बनतील. याचा अर्थ असा नाहीं कीं, या आमच्या भावी लोकशासनांत खाजगी मालमत्ता राहणार नाहीं. किंवा सगळेच सारखे श्रीमंत व गरीब होतील, श्रीमंत व गरीब या दोन्ही संज्ञा सापेक्ष आहेत. लोकशासनांत श्रीमंत लोक रहातील व गरीब लोकही रहातील. पण आज ज्या भांडवलशाहीनें सारा युरोप हैराण झाला आहे ती भांडवलशाही मात्र रहाणार नाहीं"

अमेरिकेहून प्रसिद्ध केलेल्या एका पत्रकांत हीच कल्पना त्यांनीं जास्त सविस्तर रीतीनें विशद करून मांडली आहे. त्यांत ते ह्मणतातः–

"आतां आह्मांला जें स्वराज्य हवें तें खऱ्या लोकसत्तेच्या अस्सल लोकसत्तेच्या स्वरूपाचें हवें. परकीय भांडवलवाले व साम्राज्यवादी यांची जागा ज्यांत स्वकीय भांडवलवाले व जमीनदार यांना मिळेल असें स्वराज्य नको. मग खरें स्वराज्य मिळविण्यास कांहीं थोडा उशीर लागला तरी चालेल पण मिळवूं तेव्हां अस्सल खणखणीत नाणें मिळवूं, नकली बद आवाजाचें नाणें, फुकटावारीं मिळालें तरी आह्मांला नको. आतां ही गोष्ट खरी कीं, परकीय नोकरशाहीपेक्षां स्वकीय नोकरशाही केव्हांही श्रेष्ठच आहे. आज आह्मी दोघांचे गुलाम आहोंत. परकीय राज्य गेलें कीं, मग आह्मांला फक्त एक मालक राहिला–स्वकीय भांडवलवाल्यांची गुलामगिरी आमची राहिली. खरें स्वराज्य मिळविण्याच्या मार्गात हीही पायरी आह्मांला चढावी लागेल यांत शंका नाहीं. व त्याला आमची हरकत नाहीं'. फक्त खरें ध्येय विसरून चालावयाचें नाहीं. गोऱ्या नोकरशाहीऐवजीं काळी नोकरशाही यावी येवढ्याचकरितां कांहीं आम्ही आमच्या आयुष्याचे मोल देऊन हा झगडा चालवावयास तयार नाहीं. आह्मांला सामाजिक लोकसत्तेचें ध्येय गांठावयाचें आहे.

आमच्या ह्मणण्याचा अर्थ जरा स्पष्ट केला पाहिजे. समाजसत्तावादाचा झेंडा आह्मांला उभारावयाचा नाहीं; आह्मांला त्याचा अर्थच कळत

नाहीं. आह्मी त्याचा कधीं अभ्यास केला नाहीं. आह्मांला नुसतीं मतें, नुसतीं ध्येयें नकोत. आजची समाजाची रचना चुकीची व अन्यायाची आहे. ती दुष्ट व रानटी–आहे. पूर्वीच्या मागसलेल्या काळापेक्षा आजच्या सुधारणेच्या काळांत ती अधिकच रानटी बनली आहे. या आधुनिक सुधारणेनें मनुष्य जातीच्या फार मोठ्या भागाला बहुजन समाजाला केवळ दुःख, दैन्य उपासमार रोगराई व मृत्यु–यांचाच लाभ झालेला आहे. पण आतां प्राचीन युगाची स्थिति परत आणावी असेंही आह्मांला वाटत नाहीं व आह्मांला वाटलें तरी तें आतां अशक्य आहे. आतां आह्माला समतेचें व न्यायाचें युग प्रारंभित करावयाचें आहे आमच्या मतानें प्रत्येक राजसत्तेनें खालील दहा गोष्टीकडे लक्ष देणें हें तिचें प्रथम कर्तव्य आहे.

(१) राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीला खावयाला स्वच्छ व पौष्टिक अन्न भरपूर मिळावें. आरोग्यशीर घरें असावींत व आच्छादनाला योग्य कपडा मिळावा. या तीन वस्तूंची ददात कोणाही व्यक्तीस पडतां कामा नये.

(२) राष्ट्रांत जन्मलेल्या प्रत्येक मुलाला–मग ती धर्मसंतति असो कीं, अधर्मसंतति असो ( ज्या अर्थीं कामवासना ही नैसर्गिक आहे व गर्भसंभवापासून तों जन्मापर्यंतच्या सर्व क्रिया ज्या अर्थीं निसर्ग नियमानींच होत असतात त्या अर्थीं प्रत्येक मूल केवळ त्याचा एकट्याचा विचार करतां धर्मसंततीच होय ) उत्तम अन्न व उत्तम कपडे मिळाले पाहिजेत इतकेंच नव्हे तर त्याच्या त्याच्या प्रवृत्तीनुरूप शिक्षणाची व विकासाचीही भरपूर संधी मिळाली पाहिजे.

(३) प्रत्येक वयांत आलेल्या व्यक्तीनें शारीरिक किंवा बौद्धिक पण उत्पादक काम करून राष्ट्रीय उत्पन्नांत भर घातलीच पाहिजे.

(४) प्रत्येक व्यक्तीला आपआपल्या मानसिक विकासाला योग्य तो फुरसतीचा काळ मिळाला पाहिजे.

(५) स्वतःच्या किंवा समाजाच्या बचावाप्रित्यर्थ पडेल तेवढा प्रसंग वगळून इतर वेळीं कोणीही कुणाची हत्या करतां कामा नये.

(६) प्रत्यकाला त्याच्या स्वतःच्या किंवा कुटुंबाच्या आवश्यकते

नुसार सुखानें राहतां यावें इतका जमीन, हवा, पाणी, व अन्न नैसर्गिक व कृत्रिम संपत्ती मिळाली पाहिजे.

(७) कोणीही दुसऱ्याला त्याच्या इच्छेविरुद्ध बळानें किंवा धमकी देऊन आपल्या कामाला लावतां कामा नये.

(८) प्रत्येक व्यक्तीचा राजकीय दर्जा सारखा राहावा. सर्वांच्या संमतीनें व सर्वांच्या हिताकरितां एकाद्या व्यक्तीला, तात्पुरती अधिक सत्ता द्यावयाची ती अपवाद म्हणून द्यावी.

(९) प्रत्येक व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार कोणत्याही मानव समुदायांत वसती करून राहण्याचा अधिकार असावा. मात्र त्यायोगें दुसऱ्या कोणाच्या अधिकारास धक्का लागतां कामा नये.

(१०) केवळ निसर्ग-निर्मित वा त्याच्याच अनुषंगानें येणाऱ्या गोष्टींतील भय वगळतां बाकी सार्‍याबाबतींत स्त्री पुरुषांचा दर्जा समाजांत सारखा असावा.

हीं तत्वें तंतोतंत पाळून जर कोणी व्यक्ती इतरांपेक्षा जास्त संपत्तीमान होईल तर त्याला आमची ना नाही. त्यानें तिचा खुशाल उपभोग घ्यावा. मात्र त्यामुळें इतरां कोणाही व्यक्तीवर वा व्यक्तिसमुदायांवर अन्याय होऊं नये.

हीं आमची निष्ठा आहे. व तिचा प्रचार करावयास आम्हांला हिंदुस्थानांत कळकळीचे प्रचारक हवेत.

हें सार्वत्रिक लोकजागृतीचें कार्य करण्याकरितांच त्यांनीं शेवटीं शेवटीं लोकसेवकसमिती स्थापन करून त्याद्वारें आजन्म लोकसेवेचें व्रत चालविणारे तरुण एकत्र गोळा करण्याचा व त्यांना आपलें कार्य करण्याची पात्रता अंगीं आणण्याची संधी देण्याचा उपक्रम केला होता. कारण आतां या देशाला असें स्वातंत्र्य मिळवावयाचे आहे का, जें एकदां मिळाल्यावर पुनः केव्हांही पारतंत्र्याची छायासुद्धां त्यावर पडतां कामा नये असें त्यांना वाटे. त्यांची जन्मभराची आकांक्षा हीच होती व म्हणूनच ते शेवटीं शेवटीं सुद्धां ब्रिटिश साम्राज्यांतून बाहेर पडलेंच पाहिजे असें म्हणणाऱ्याच्या बाजूला

वळले नाहींत; वसाहतीचें स्वराज्य जें नेहरू योजनेंत आजचें ध्येय ठेवलें आहे तेंच योग्य असेंच ते म्हणत राहिले.

भलत्याच ध्येयवादाच्या भरीं न पडतां राष्ट्राला कायमचें स्वातंत्र्य--जें जगाच्या अंतापर्यंत--भंग--पावावयाचें नाहीं असें स्वातंत्र्य मिळविण्याचा व्यवहार्य मार्ग शोधून काढावयाचा व त्या मार्गानें चालत असतांना कितीही संकटें आलीं--स्वकीयांनीं बोल लावला किंवा परकीय सरकारनें छळ केला--तरी त्यांना जुमानावयाचें नाहीं व आपल्या मार्गानें स्वतः आजन्म चालत राहून स्वोदाहरणानें लोकांना त्याच दिव्य मार्गावरील पथिक बनवावयाचें हेंच त्यांचें ध्येय होतें.

लालाजी तत्ववेत्ते नव्हते. लालाजी जाडे विद्वान नव्हते, लालाजी मोठे सिंह पराक्रमी नव्हते. लालाजींचा देहही कांहीं फार बलिष्ठ नव्हता. पण त्यांना राष्ट्रसेवेचें--लोकसेवेचें वेड लागलें होतें. वर्षाचे तीनशेंपासष्ट दिवस व दिवसाचे चोवीस तास ते त्या वेडाच्या धुंदींतच असत. व या धुंदींत त्यांच्या तोंडून राष्ट्रांच्या चिरंतन कल्याणाचीं तत्वें प्रकट झालीं, त्या वेडाच्या धुंदींत त्यांच्या, वाणींत--प्रत्यक्ष बृहस्पती व लेखणींत प्रत्यक्ष सरस्वती आरूढ होऊन बसे; त्या वेडाच्या धुंदींत जगांत पराक्रमी म्हणून नांवाजलेल्या व सदोदित आपल्याच गुर्मीत राहणाऱ्या ब्रिटिश सत्तेला भय वाटेल अशीं कृत्यें ते लीलेनें करून जात; त्या वेडाच्या धुंदींत हजार हत्तींचें बळ त्यांच्या अंगांत संचरत असे. हें वेड जन्मभर आपल्या अंगी. संचरून घेतलें हीच लालाजींची कामगिरी होय.

---:o:---

# लालाजींचें गुणसंकीर्तन.

मागील प्रकरणांत लालाजींची कामगिरी काय याचें विवेचन केलें आहे. ही कामगिरी ते यशस्वी रीतीनें करूं शकले याचें कारण त्यांचे अंगीं असलेले विशिष्ट गुण व त्यांची कार्य करण्याची विशिष्ट पद्धती. त्या गुणांचा व त्या कार्य पद्धतीचा या प्रकरणांत संक्षेपतः प्रपंच करावयाचा आहे. एका अर्थानें मागील प्रकरणाची ही पुरवणीच म्हणतां येईल.

लालाजींचें पहिलें वैशिष्ट्य जें प्रथम दर्शनींच दिसतें तें म्हणजे त्यांचें सर्वांगीणत्व. राष्ट्राची सेवा त्यांनीं केली; इतरही करतात. पण अमुक एक कार्यक्षेत्र असें नाहीं कीं, ज्यांत लालाजींनीं भरपूर काम करून ठेवलें नाहीं. एका क्षेत्रांतील कार्याविषयीं विशेष प्रीति व दुसऱ्यांतलि कामाचा कंटाळा हा प्रकार त्यांच्या जवळ नव्हता. शिक्षण, समाजसेवा, वाङ्मय निष्पत्ती, धार्मिक पुनरुज्जीवन, राजकीय लढा, विदेशांतील कार्य या प्रत्येक क्षेत्रांत त्यांनीं महत्तर वाटा उचललेला आहे, व प्रत्येक क्षेत्रांत एकाद्या तज्ज्ञाप्रमाणें कुशलपणें व व्यवस्थितपणें त्यांनीं कार्य केलें आहे. मग तें कार्य आंकडे मोडून कांहीं तत्वें सिद्ध करण्याचें आंकडेपंडिताचें असो, किंवा एखाद्या अनाथालयांतील अनाथाच्या दुःखनिवारणाचें असो; शाळेंत शिकविण्याचें असो किंवा हिंदुमुसलमानांचा दंगा झालेल्या एकाद्या गांवीं जाऊन हिंदुवरील अन्याय्य आक्रमणाचा प्रतिकार करणें असो. लालाजींना तें सारखेंच पवित्र व कर्तव्य आहे असें वाटत असे–

दुसरें वैशिष्ट्य म्हणजे राष्ट्रसेवेची अखंड तळमळ. अनेकांचा असा अनुभव आहे कीं, त्यांच्या चेहऱ्यावर सदैव गंभीरपणाची व चिंतेची छाया दिसत असे. राष्ट्राशीं त्यांची इतकी तन्मयता झालेली होती कीं, राष्ट्र पारतंत्र्यांत खितपत असतांना आपण हंसण्याखेळण्यांत व चैनींत एक क्षणही दवडणें म्हणजे पातक आहे असेंच त्यांना वाटत असे. व त्यांना एकच आयुष्यांत, चाळीस पंचेचाळीस वर्षांच्या अवधींत, निरनिराळ्या कार्य क्षेत्रांत जें प्रचंड कार्य करतां आलें त्याचें रहस्य या अखंड तळमळींत

आहे त्यांचा वेळ वायां असा मुळींच जावयाचा नाहीं. दिवसाचा प्रत्येक तास व त्या तासांतील प्रत्येक मिनिट देशसेवेच्या कांहींना कांहीं कामीं खर्चावयाचें हा त्यांचा जन्मभराचा नियम होता देशकार्यांत ते एकदां मग्न झाले कीं, मग त्यांना वकीलीचें, प्रपंचाचें किंवा स्वतःच्या देहाचेंही भान राहत नसे. जेवण्याखाण्याची स्मृती होत नसे. दुष्काळ निवारणाचे कामीं हिंडत असतांना त्यांना केव्हां केव्हां उंटावरून साठ साठ मैल प्रवास एका दिवसांत करावा लागे व त्यामुळें सर्व अंग दुखत असे तरी मुक्कामावर पोचले कीं, विश्रांती घेण्यांत दोन घटका सुद्धां न मोडतां ते एकदम कामाला भिडत. त्यांना यकृताचा विकार असे व तो त्यांच्या अशा वर्तनानें फारच त्रास देत असे. पण लालाजी ते सर्व कष्ट धैर्यानें सहन करीत व आपलें काम करीत. त्यांच्या या अखंड कर्मप्रवणतेविषयीं त्यांचे प्रारंभा-पासूनचे एक सहकारी लाला हंसराज म्हणत कीं, तुमचा हा एक दोषच आहे. तुम्हांला जर सक्तीची विश्रांती घेण्याचा प्रसंग आला तर तुमची मोठी कठीण दशा होईल. या शद्बांचा अनुभव त्यांना १९०७ मध्यें मंडालेस आलाच. सहा महिन्यांत त्यांनीं एकाद्या राक्षसासारखीं ३००-४०० पुस्तकें वाचून टाकलीं व बरेंच लिहिलेंही. तरी रिकामपणाची त्यांची तक्रार सारखी चालूंच असे. त्यांच्या या सतत कार्यव्याप्रृत राहण्याच्या संवयीची साक्ष अमेरिकेंत त्यांचे बरोबर राहावयाचा अनुभव असलेले डॉ. हर्डीकर व वरिष्ठविधी मंडळांत त्यांचे बरोबर कार्य क.ण्याची संधी मिळालेले लोक देतात.

त्यांची देशभक्ती मोठी उज्वल व आदर्श स्वरूपाची होती. त्याच्या देशभक्तीला सीमाच नव्हती. ती निस्सीम, तशीच निरपवाद होती. देशबांधव मग तो कोणत्याही प्रांतांतला असो, श्रीमंत असो कीं, गरीब असो वरिष्ट वर्गाचा असो किंवा कनिष्ट वर्गाचा असो, लाहोरांत बसून आपला रोजगार करणारा असो किंवा सात हजार कोस दूर-अमेरिकेंत, जाऊन पोटासाठीं तेथील शेतांवर खपणारा मजूर असो, फार तर काय-पण सरकारी नोकर-व प्रत्यक्ष त्यांच्यावर पाहारा करणारा पोलिस शिपाई-सर्वांवर ते प्रेम करीत. अलोट प्रेम करीत. मंडालेला हद्दपारीवर जांत असतांना वाटेंत देशी पोलिसांचे झालेले हाल पाहून त्याचें अंतःकरण

तळमळलें व गोऱ्या सार्जंटला दीडशें दोनशें रुपये पगार कां व या बिचाऱ्या काळ्या पोलिसला ७-८ रुपड्यांवर नोकरी करून या आपत्ती भोगण्याचा प्रसंग कां असे विचार त्यांच्या मनांत आल्याचें त्यांनीं स्वतःच आपल्या हद्दपारीच्या कहाणींत सांगितलें आहे.

लालाजींचा आणखी एक गुण म्हणजे त्यांच्या विविध कार्याच्या पाठीमागें दिसणारा त्यांचा स्वतंत्र बाणा किंवा स्वतंत्र मतवादित्व. आयुष्या-रंभीं त्यांनीं दयानंदांचें अनुयायित्व पत्करलें व नंतर प्रत्येक कार्य स्वतंत्र बुद्धीनें केलें. त्यांतही स्वामी दयानंदांनीं आपल्या ग्रंथांमधून व्यक्त केलेलीं सर्व मतें आर्यसमाजीयांवर बंधनकारक नाहींत असें त्यांचें मत होतें. केवळ समाजाचे दहा नियम त्याला मान्य असले म्हणजे पुरे असा त्यांचा आग्रह होता हाच बाणा त्यांचा राजकारणांतही दिसतो. चाळीस वर्षांच्या आयुष्यांत ते अमक्या एकाचे अनुयायी होते असा प्रकार केव्हांच दिसत नाहीं. याला कारण त्यांची स्वतंत्र बुद्धी हें तर एक आहेच पण दुसरें असें कारण आहे कीं, ते ज्या कार्यांत पडत त्या क्षेत्रांत त्यांच्यापेक्षां वरचढ पुरुष बहुधा कोणीच नसे. आपल्या कार्याची दिशा ते स्वतःच प्रथम आंखून घेत व मग परिस्थित्यनुसार त्यांत काय अवश्य वाटतील ते फरक करात. पण दुसऱ्याच्या सर्वस्वी तंत्रानें असे ते कधींच चालले नाहींत. पण याचा अर्थ असा नाहीं कीं, ते एकांडे शिलेदार होते किंवा त्यांना दुसऱ्यांचें चांगलें असें कांहीं वाटतच नसे त्यांना जेथून कांहीं चांगली गोष्ट मिळेल तिचा ते तेथून स्विकार करीत. व अशा रीतीनें ते सर्वांशीं वागत असल्यामुळें त्यांच्या टिकाणीं सर्व चांगल्या गुणांचा व त्यांच्या कार्यांत देशसेवेच्या सर्व प्रकारांचा परिपोष झालेला दिसतो.

स्वतंत्र बुद्धीच्या माणसांत कधीं कधीं फार दुर्मिळ असणारा मनाचा समतोलपणा लालाजींजवळ होता. एकाच बाजूला झुकून त्यांनीं विचार केलेला बहुधा कोणासही दाखवितां येणार नाहीं. परकीयांचे दोष त्यांना दिसत तसे स्वकीयांचेही दिसत व त्यांवरही कठोरपणें टिका करावयाला ते मागें पाहात नसत. तसेच पाश्चिमात्यांचे गुण घेण्यासही तें सदोदित सिद्ध असत. पाश्चिमात्यांच्या सुधारणेविषयीं तें एका ठिकाणीं लिहितात.

## आधुनिक सुधारणांची इष्टानिष्टता

---:o:---

" कित्येक विचारी लोकांना सांप्रतची औद्योगिक वाढ आवडत नाहीं. आध्यात्मिक व सांस्कृतिक दृष्टीनें पहातां त्यांच्या म्हणण्यांत पुष्कळ सत्य आहे व आध्यात्मिक आणि सांस्कृतिक हानिकडे दुर्लक्ष करणें हिंदुस्थानाला तरी अशक्य आहे. केवळ खाण्यापिण्यांतच आयुष्याचे सार्थक नाहीं पण खाणेंपिण म्हणजेच जीवनसर्वस्व नसले तरी खाल्यावांचुन मात्र जगणेंच शक्य नाहीं. आपल्याला जगावयाचे असेल तर अन्न पाहिजे व त्यासाठीं पडेल ती किंमतहि दिली पाहिजे. आत्म्याची हानि न करतां पुरेसें अन्न मिळविण्यासाठीं आपण आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा करणें हें आपलें कर्तव्य आहे. परंतु आत्म्याची हानि होते म्हणून अन्न मिळविण्याचाच प्रयत्न करूं नये असें ठरवून स्वस्थ बसणें हा मात्र आत्महत्यारीपणा आहे. त्यामुळें आपल्याला अन्नही मिळणार नाहीं. आपण मरून जाऊं व नामशेष होऊं "

सर्व जगभर प्रवास केल्यामुळें त्यांची दृष्टी विशेषच व्यापक बनली होती व त्यामुळें ते प्रत्येक गोष्टीचा विचार साधक बाधक रीत्या व सर्वांगीण असा करीत. प्राचीन संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाचा विचार त्यांनीं असाच समतोल मनाने केला आहे.

## प्राचीन संस्कृतीचें पुनरुज्जीवन

---:o:---

" आमची प्राचीन संस्कृती उदार, श्रेष्ठ आणि व्यापक आहे. धर्म, तत्वज्ञान, कायदे, समाजशास्त्र, विद्याकला यांत आम्ही जी प्रगती केली ती कोणच्याही राष्ट्राच्या मानानें वरिष्ठ आहे. किंबहुना या विसाव्या शतकांतील त्या त्या विषयाच्या ज्ञानाशीं तुलना केली तरी आम्हांला खालीं मान घालण्याचा प्रसंग सहसा येत नाहीं. आमचा इतिहास आम्हांला कमीपणा खास आणीत नाहीं इतकेंच नव्हे तर आम्ही त्याचा अभिमान बाळगावा इतका तो उज्वल आहे. पण या सर्वांचा अर्थ असा नाहीं कीं, प्रत्येक बाबतींत आमच्या पूर्वजांनीं अगदीं परासीमा गांठली होती. आमच्या दोषांकडे दुर्लक्ष करणें, समाजाच्या पुनर्घटनेचा विचारही मनांत न आणणे,

धार्मिक अधःपाताकडे कानाडोळा करणें व आपल्यांत पुराणकालीं रूढ झालेल्या कित्येक मूर्ख चालींचें आजही समर्थन करूं पहाणें म्हणजे आमच्या उन्नतीला अडथळा करणें आहे. दोष दूर करावयाचे असतील तर त्यांचें मूळ आपल्याला शोधून काढण्यास हवें. यासाठीं प्राचीन कालाचाहि विचार करावा लागेल. जगांतील स्वतंत्र राष्ट्रमालिकेंत हिंदुस्थानला हक्काची जागा मिळविण्यासाठीं आपल्याला अनेक नवीन गोष्टींचें ज्ञान मिळवावयाचें आहे. पण त्यापूर्वीं कालांतरानें जीर्ण व निरुपयोगी इतकेंच नव्हे तर घातक होऊन बसलेले आमचें जुनें ज्ञान किंवा अज्ञान आम्हाला टाकून द्यावें लागेल. आपल्या पूर्वजांनीं खऱ्या मानलेल्या कांहीं कल्पना जर आज खोट्या ठरत आहेत तर त्यांचा त्याग आपल्याला केलाच पाहिजे. पूर्वजांच्या कांहीं चाली चुकीच्या होत्या, आपण त्याची सुधारणा केली पाहिजे. पूर्वजांच्या कांहीं संस्था त्यांच्या त्या जुन्या काळाला अत्यंत योग्य व उपकारक होत्या पण आजच्या मन्वंतरांत त्या कुचकामाच्या ठरत असतील तर त्यांच्या स्थलीं आपण नवीन संस्थांची स्थापना केली पाहिजे. कारण आपल्याला आपल्या पुराण पूर्वजांची नुसती निर्जीव नक्कल करावयाची नसून त्यांच्याहिपेक्षां उच्चतर स्थल गांठण्याची आकांक्षा बाळगावयाची आहे ”

घाईनें मतें बनविणें व तीं घाईनेंच बोलून दाखविणें असा प्रकार त्याचा नव्हता. याविषयींचें उदाहरण एक मोठें मजेदार देतां येण्यासारखें आहे. आयुष्याच्या प्रथम भागांत त्याना हिंदूंचे दोष फार भयंकर वाटत व त्यामानानें पाश्चिमात्य समाजाची माहिती नसल्यानें ते स्वकीयांच्या दोषांवर फार कडक टीका करीत. पुढें ते विलायतेस गेले व अमेरिकेंतहि हिंडले व त्या समाजाची त्यांनीं पाहणी केली. तेव्हां स्वकीयांच्या दोषाविषयींची त्यांची दृष्टी पुष्कळ निवळली व हिंदुस्थानांतल्या सामान्य माणसाच्या योग्यते-विषयीं त्यांनीं असें लिहिलें :—

## हिंदी माणसाची योग्यता

——:o:——

हिंदुस्थानवासी लोकांची इतर राष्ट्रांतील लोकांशीं तुलना दोन प्रकारें करतां येते. उच्च प्रतीचे पुरुष घेतले तर हिंदुस्थानांत असे महात्मे उत्पन्न

झाले आहेत कीं, त्यांच्याकडे पहातांच जगानें तोंडांत बोटच घालावें. बरें हिंदुस्थानांतला खालच्यांतल्या खालच्या वर्गाचा मनुष्य बघावा तर इतर कोणत्याहि राष्ट्रांतल्या त्याच्या दर्जाच्या माणसापेक्षां तो कमी ठरत नाहीं. ही गोष्ट मी सांगतो ती नुसती आत्मप्रौढी म्हणून किंवा अनुमानधपक्यानें सांगतों असें नाहीं. प्रत्येक जातीच्या व दर्जाच्या हिंदुस्थानी माणसाशीं कारण-परत्वें माझा संबंध आलेला आहे. विशेषतः मागासलेले जे वर्ग समजले जातात त्यांच्यांतच गेलीं पंधरा वर्षें मी कार्य करीत होतों. त्यांच्या घरीं, त्यांच्या शेतांत, रस्त्यावर, बाजारांत, कोर्टांत इत्यादि सर्व ठिकाणीं मला त्यांच्याशीं भेटण्याचे प्रसंग आले आहेत. परंतु मानसिक दृष्टीनें तें आमच्यांतील उच्च दर्जाच्या माणसापेक्षां अवनत किंवा कमी प्रतीचे आहेत असें मला तरी कधीं वाटलें नाहीं. सामान्यतः एकादा निरक्षर हिंदी शेतकरी अमेरिकेंतल्या किंवा युरोपांतल्या कारखान्यांतून काम करणाऱ्या सामान्य गाऱ्या मजुरापेक्षां हृदयाच्या श्रीमंतीपुरतेंच बघावयाचें तर पुष्कळ श्रेष्ठ असतो. त्याला उणीव काय ती शिक्षणाचीच असते.

पुढें पुढें तर ते असेंही म्हणूं लागले कीं, " ह्या युगांत सौम्यवृत्ति किंवा निरहंकार यांची मुळींच प्रतिष्ठा नाहीं व ज्याला आपण पौर्वात्य—लोक त्याग म्हणून म्हणतो त्या आत्मत्यागाला सुद्धां कोणी विचारीत नाहीं. स्वयंनिर्णयाचा हा काळ आहे. येथें ज्यानें त्यानें आपणच आपली दाद लावून घेतली पाहिजे. आत्मप्रौढी करून व स्वतःचा मोठा बडेजाव करून प्रसिद्धी मिरविली तरच यशस्वी जीवन कंठतां येईल अशा काळांत आपण राहात आहोंत. आपल्या ठायीं असलेल्या दोषांचा व दुर्गुणांचा उगीच मोठा बाऊ करून चालणार नाहीं. त्यामुळें आपल्यांतील आत्मविश्वास नाहींसा होऊन पारतंत्र्याचे पाश मात्र अधिकाधिक घट्ट होत जातात." त्यांनीं शेवटचा जो 'दुःखी भारत' नामक ग्रंथ लिहिला तो मात्र याच विचारसरणीचें फळ होय. यावरून ते शेवटपर्यंत विद्यार्थी कसे होते व नवीन गोष्ट शिकावयाला कसे सिद्ध असत याचाही उत्तम प्रत्यय येतो.

त्यांचे अंगचा कणखरपणा किंवा तेजस्विता तर प्रसिद्धच आहे. त्यांना 'पंजाबकेसरी' ही पदवीही त्याच गुणाकरितां प्रामुख्यानें मिळालेली आहे. परंतु अंगीं उत्तम धैर्य व धडाडी असूनही उतावीळपणा किंवा नुसता

अविचारी साहसी स्वभाव त्यांचा नव्हता. उगीच अद्वा तद्वा भाषणें करून संकटें अंगावर ओढून आणावयाची हें धोरण त्यांना पसंत नसे. संकटें आपण होऊन आलीं तर त्यांना ते शूराप्रमाणें तोंड देत व त्यांचा निरास करून पुनः कामाला लागत. हे त्यांनीं केव्हांही सोडलें नाहीं व आमच्यांतील कित्येक लोकांचें होतें तसें त्यांचे धैर्य वा कणखरपणा उतारवयांतही मंदावला नाहीं. त्यांचा स्वाभिमान इतका तेजस्वी होता कीं, १९०७ त सरकारनें त्यांचा अन्याय्य रीतीनें हद्दपार केल्यावर त्यांना त्याच सरकारच्या कोर्टांत पुनः वकीली करणें अयोग्य वाटलें व पुनः त्यांनीं वकीली न करतां आपल्याला सर्वतोपरी देशसेवेलाच वाहून घेतलें. ते शेवटपर्यंत सरकारपुढें वाकले नाहींत तर त्यांना तोंड देत राहिले. सर्व छळ त्यांनीं सोसले व शेवटीं मृत्यूही वरला. पण पाठ म्हणून दाखविली नाहीं. हें असामान्य धैर्य त्यांना आत्मनिरीक्षणानें प्राप्त झालेलें होतें. ते वारंवार स्वतःच्या कृत्यांचें व विचारांचें परीक्षण करीत व आपल्याला धैर्य देण्याविषयीं व आपल्या हातून कांहीं कचेपणाचें काम न व्हावें याबद्दल देवाची प्रार्थना करीत. त्यांच्या अशा एका आत्मनिरीक्षणाचे वर्णन त्यानीं स्वतःच केलेलें आपल्याला त्यांच्या हद्दपारीच्या कहाणींत वाचावयास मिळतें.

लालाजींच्या देशभक्तीला, उद्योगाला किंवा तेजस्वीपणाला मर्यादा नसली तरी ते आपल्या ध्येयाला मात्र नेहेमीं व्यवहाराची मर्यादा घालीत असत. उदात्त कल्पनांच्या लाटांवर विहार करण्यात त्यांना कधींच मजा वाटली नाहीं. व त्यांनीं व्यवहाराचा मार्ग केव्हांही सोडला नाहीं. उगाच तात्विक काथ्याकूट करण्यापेक्षां प्रत्यक्ष जें कार्य आज करता येत असेल–मग तें मोठें असो कीं, लहान असो–तें पटकन करावयास लागावें असा त्यांचा स्वभाव होता. देशहिताला अवश्यच असेल तर–ते तात्विक चर्चेचा काथ्याकूट करण्यास कंटाळत नसत. पण एरवीं ध्येयनिष्ठा म्हणून तात्विक चर्चा करणें त्यांना आवडत नसे. कृती करूं लागावें, मग मनांत खरी तळमळ असेल तर कृतीच्या द्वारें आपली निष्ठा प्रकट होईलच. असें त्यांना वाटत असे. म्हणून डोळ्यापुढें दिसणारी व सर्वांच्या आटोक्यांत असणारी व्यावहारिक मर्यादा ते आपल्याला घालून घेत व तदनुरूप कार्य करीत या व्यवहारवादित्वामुळें लालाजींना कार्यांत अपयश असें सहसा आलें

नाहीं व अशाप्रकारें केव्हांही अपयश न मिळवितां सतत कार्य करीत राहणें हीच खऱ्या लोकसंग्रही पुरुषाच्या कार्य कुशलत्वाची कसोटी होय. कारण अपयशानें सामान्य लोकांचा धीर खचत असतो व तस होऊं देणं केव्हांही इष्ट नसतें. लोकांचा उत्साह सदोदित स्थायी टेवावयाचा असेल तर त्यांना नेहमीं जयच मिळत गेला पाहिजे. व ही गोष्ट लालाजींच्या नेतृत्वाखालीं नेहमीं साधत असे,

देशसेवेकरितां त्यांनीं आपला देह वाहिला होता पण इतराविषयीं त्यांच्या बरोबर जे प्रवासाकरितां कार्यास जात-त्या विषयीं सर्व काळजी जन्मदात्या बापाप्रमाणें स्वतः लालाजी वहात असत. स्वकर्तव्यापुढें जेवणा-खाण्याची शुद्धी विसरणारे लालाजी बरोबरच्या माणसाचें जेवण झालें किंवा नाहीं याची चौकशी करावयाला कधीं विसरत नसत. एकाद्यानें उत्तर दिलें कीं, 'एवढें काम करून जेवतों' तर म्हणावयाचे, "नाहीं! नाहीं! अगोदर जेऊन घ्या. वेळेवर जेवणखाण केलें नाहीं तर हातून काम काय मातीचें होणार? अहो काम करावयाला अगोदर देह पाहिजे! व तो चांगला धडधाकट पाहिजे!" असें एकादें छोटेंसें व्याख्यान नियमित आहारादि विषयांवर देऊन टाकीत!

आपल्या सहकाऱ्यांशीं ते बरोबरीच्या नात्यानें व प्रेमानें वागत कोठें हिंडावयास वगैरे गेले तर त्याच्या खांद्यावर हात टाकून चालत चालत त्याच्याशीं संवाद करीत. भाषणांत मार्मिकतेनें त्या माणसाचे दोष दाखावण्या-बरोबरच त्याला प्रेमळ उपदेशही होत असे. अशा वेळचीं त्यांचीं कित्येक वाक्यें मोठीं मजेदार आहेत उदा. 'होय होय, माझ्या बाळा! **आपल्याला आत्मा तर हवाच पण त्याहीपेक्षां जास्त आवश्य-कता शरीराची आहे** (Yes, my boy! we want spirit but more body) **शरीर असें बनलें पाहिजे कीं, लोकांनीं तुझ्याकडे पाहातच राहावें** (Make yourself able to be looked at). विमानांवाचून आकाशांत उडण्याचें धाडस करण्यांत अर्थ नाहीं त्यापेक्षां जमीनीवर चालूं लागावें हें बरें. (Do not attempt to fly in the air without a machine. Come to

the solid ground and walk.) **जी स्थिती आहे ती आहे तिलाच तोंड दिलें पाहिजे** ( Facts are facts and they must be faced.) बरें आहे, अस्पृश्यांनीं आपली उन्नती आपणच करून घ्यावी हें म्हणणें ठीक आहे. तुम्हीं त्यांचा उद्धार करूं नका. फक्त नम्रपणें त्यांची सेवा करा. ( Well, the untouchables must improve themselves. Don't potronise them, serve them humbly ).

लालाजी मोठे लोकसंग्रही होते. त्यांना अनेक कार्यें करावयाचीं असल्यामुळें शेंकडों व्यक्तींना हाताशीं धरावें लागे. त्यांना माणसाची पारख उत्तम होती. कोणत्या माणसाचा उपयोग कोणत्या कामीं करून घ्यावा हें ते अचुक ओळखीत. व त्याप्रमाणें त्याच्याशीं वर्तन ठेवीत. यामुळें त्यांना कधीं पश्चात्तापाचा प्रसंग आला नाहीं. ही कसोटी ते देशांतील लहान मोठ्या पुढाऱ्यांनाही लावीत. व त्यांचे वर्णन बहुवर्थ-सूचक मार्मिक वाक्यानें करीत. लोकमान्यासंबंधीं ते नेहमीं म्हणत कीं, Tilak, Oh yes, a man of the Masses.

असें लालाजींच्या अंगीं अनंत गुण होते व ते सर्वच कमी अधिक प्रकर्षाला पोचले होते. अर्थात् सामान्य लोकांना ते अनुकरणीय आणि म्हणूनच चरित्रांत वर्णनीय आहेत पण त्यांच्या प्रत्येक गुणाचें वर्णन तर काय पण येथवर केलें तितपत दिग्दर्शन करूनसुद्धां यथार्थ कल्पना येण्याइतकें लेखन असल्या चिमुकल्या पुस्तकांत शक्य नाहीं म्हणून त्यांच्या एका महत्वाच्या गुणाविषयीं थोडें लिहून या प्रकरणाची व त्याबरोबर चरित्राची समाप्ती करतों.

लालाजींचें वैयक्तिक आयुष्य व सार्वजनिक आयुष्य यांच्यांत एक प्रकारचा पिंडीं तें ब्रम्हांडीं या न्यायानें सारखेपणा दिसतो व याला धरूनच आदर्श कुटुंबांत जसा कार्याचा सर्व भार तरुणांवर असतो-वृद्धांनीं सेवा करावयाची, मुलांची काळजी वाहावयाची, दीन अपंग असतील त्यांची व्यवस्था लावावयाची. व घराचा आब राखून वेळप्रसंग आल्यास परक्यांपासून व चोरांचिलटांपासून घरांतील मंडळींचें संरक्षण करावयाचें

आणि या सर्व गोष्टी वृद्धांचे सल्ल्यानें व अनुमतीनें करावयाच्या. तद्वतच राष्ट्रांतील निरनिराळ्या सार्वजनिक कार्यांचा मुख्य भार तरुणांवर असावा या मताचा लालाजी पुरस्कार करीत. तरुणांवर त्यांची सगळी भिस्त असे. तरुणांना देशसेवेचें शिक्षण द्यावें, तरुणांचें संघटन करावें. त्यांना हरप्रकारें साह्य करावे असें त्यांना नेहेमीं वाटे. विद्यार्थीवर्गाचे ते मोठे कैवारी होते. त्यांच्या हितासाठीं ते परोपरीनें झटत असत. अमेरिकेंत असतांना त्यांनीं या कामीं जे परिश्रम केले ते सर्वांना माहीतच आहेत. एक देशबंधु दासांचें नांव वगळलें तर लालाजीइतके विद्यार्थ्यांना आर्थिक व अन्य साह्य कोणा पुढाऱ्यानें केल असेल असें दिसत नाहीं. शिक्षणाचे दृष्टीनेंही त्यांनीं लोकसेवकसमिती व टिळकराजकारणशाळा स्थापून तरुणांना देशसेवेच्या मार्गदर्शनाचे सानुभव धडे देण्याची व्यवस्था केली. याही गोष्टींत कै. भारत सेवक गोखले वगळले तर लालाजींना दुसरी तोड नाहीं. त्यांनीं ग्रंथ लिहिले तेही मुख्यतः तरुणांकरितांच लिहिले.

विद्यार्थ्यांनीं राजकारणांत भाग घ्यावा कीं, नाहीं यासंबधीं त्यांचे मत अगदीं स्पष्ट आहे. जपानवरील आपल्या पुस्तकांत ते लिहितात. " जेथें शिक्षक आणि विद्यार्थी राजकारणांत भाग घेत नाहींत असा एकहि देश या पृथ्वीच्या पाठीवर नसेल. त्यांना राजकारणांत भाग घेण्याला बंदी करणें हेंच वास्तविक पद्धतशीर विचारसरणीच्या उलट आहे आणि कोणत्याहि चांगल्या सरकारच्या हितसंबंधास अतिशय घातक आहे. राजनीतिशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र किंवा आंकडेशास्त्र ह्या गोष्टी इतक्या महत्वाच्या व आवश्यक आहेत कीं, सर्वसाधारण मनुष्य जीवनापासून त्यांस अलग ठेवण शक्य नाहीं.…………अध्यापक आणि विद्यार्थी यांना विद्यमान राजकारणापासून दूर ठेवण्यासारखी मूर्खपणाची व आत्मघातक चूक दुसरी कोणतीहि नसेल. राजनीतिशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र इत्यादि आपण केवळ नियतपाठपुस्तकांच्या आधारेंच शिकवूं शकतों; त्या त्या शास्त्रांच्या सिद्धांतांचे राष्ट्राच्या किंवा बाह्य जगाच्या जीवनावर होणारे परिणाम स्पष्ट न करतां किंवा विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष डोळ्यांसमोर स्वदेशामध्यें रात्रंदिवस चालणाऱ्या घडामोडीवर योग्य प्रकाश न टाकतां वरील प्रकारचीं शास्त्रें शिकविणे शक्य आहे असे जे अध्यापक म्हणतात त्यांचें तें म्हणणें 'आम्ही

[illegible] टच्या भूमिकेशिवाय रंगभूमिवर हॅम्लेट नाटकाचा प्रयोग करूं शकतो' [illegible] म्हणण्याइतकेंच हास्यास्पद होणार आहे.

कारण यापुढें प्रकारचा आडपडदा न ठेवतां विद्यार्थी व शिक्षक यांच्यांत चालू राजकारणाच्या बिकट प्रश्नासंबंधीं मनमोकळी व सांगोपांग चर्चा होणें अवश्य आहे. प्रत्यक्ष सरकारच्या धोरणाला सुद्धां अशी चर्चा फार अनुकूल व उपयुक्त होणार आहे. विद्यार्थ्यांच्या कित्येक चुकीच्या व भ्रामक कल्पना त्यामुळें नाहींशा होतील, अनेक गैरसमज दूर होतील व अनेक प्रकारचे भ्रममूलक द्वेषाभास प्रकाशांत येतील.

त्यांचें वाङ्मय तरुणांना अभ्यास करण्याला अत्यंत योग्य आहे. व या बाबतींत, हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांत लालाजींचें स्थान केवळ अद्वितीय आहे. त्यांच्याइतकी विविध व उद्बोधक ग्रंथनिष्पत्ती तरुणांकरितां अन्य कोणाच पुढाऱ्यानें केलें नाहीं. या संबंधांत लालाजींविषयीं एका वाक्यांत लिहावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, अभ्यासाला साह्य त्यांनीं शेंकडों विद्यार्थ्यांना केलें इतकेंच नव्हे तर पुढील कार्याच्या वाटेलाही त्यांनीं त्यांना लावून दिलें. शेंकडोंना कुमार्गावरून सुमार्गावर आणलें, शेंकडोंच्या विपत्तींचा निरास त्यांनीं केला व हजारों लाखोंना आपल्या भाषणानें लेखनानें व विशेषतः कृतीनें स्वदेशसेवेचा मार्ग दाखवून दिला.

स्वतः त्यांचें सार्वजनिक जीवन आदर्श जीवन होतें पण त्यांचें वैयक्तिक व प्रापंचिक जीवनही आदर्श होतें. आणि या दोहोंची सुंदर एकात्मतता त्यांनीं केली होती. त्यांच्या सार्वजनिक जीवनांत त्यांनीं पूर्वींची आश्रमपद्धती पाळली होती असें दिसतें.

लालाजींच्या चरित्राचे ठोकळ मानानें चार कालखंड पडतात. जन्मापासून तों विद्यार्थीदशा संपेपर्यंतचा पहिला; वकीलीच्या प्रारंभापासून तों हद्दपारीपर्यंतचा दुसरा; तेथपासून तों अमेरिकेहून परत आले तोंवरचा तिसरा व असहकारितेपासून मृत्युपर्यंतचा चवथा. यद्यपि या चार कालखंडांना पूर्वींच्या चार आश्रमाप्रमाणे समजतां येत नसलें तरी त्या विभागांशीं यांचें पुष्कळ साम्य आहे.

पहिल्या विभागांत बाहेरची देशपरिस्थिती आणि त्यांचे परंपरागत संस्कार यांच्या अनुरोधानें त्यांचा मानसिक विकास झाला व भावी आयुष्याचें ध्येयही याच कालांत निश्चित झालें. पुढील कार्यासाठीं अत्यंत उपयुक्त अशी शारीरिक व मानसिक सिद्धता त्यांनीं या कालांत केली. स्वकार्यांतील एकनिष्ठ सहकारी त्यांनीं या कालात मिळविले. पुढील काळांत प्रकट झालेली त्यांची स्वतंत्र बुद्धी, अदम्य श्रमशीलता, निर्मळ चारित्र्य, अतुल स्वार्थत्याग, विलक्षण ध्येयनिष्ठा या सर्वांचें अर्जन व जोपासना त्यांनीं याच कालांत केली. देशभक्तीचे व समाजसेवेचे धडे याच कालांत त्यांनीं आपल्या वडिलांपासून घेतले. तस्मात् हा सिद्धतेचा काळ किंवा जुन्या-परिभाषेत बोलावयाचें म्हणजे ब्रम्हचर्याश्रमाचा काल होय हा पाया त्यांनीं अत्यंत पक्केपणीं भरला म्हणूनच त्यावर अत्यंत यशस्वी व सर्वांगीण आयुष्याची इमारत उभारतां आली.

दुसऱ्या विभागांत त्यांनीं प्रपंचाबरोबरच देशसेवा केली. ती इतकी विविध, उज्वल आणि महत्वाची आहे व ती इतक्या शांतपणानें, निर्भीकतेने व निस्वार्थपण केलेली आहे कीं, त्या तपश्चर्येचें फळ लोकांच्या व सरकारच्याही दरबारीं चाळीसाव्याच वर्षी मिळालें. लोकांनीं अत्युच्च राष्ट्रनायकांच्या त्रयींत त्यांची गणना केली तर सरकारनें अतीशय अन्याय्य–मार्गाचें अवलंबन करून त्यांना विनाचौकशीच निर्वासित करून त्यांच्यांतलि देशभक्ती कसाला लावली. या बावीस किंवा चोवीस वर्षांत त्यांनीं चरितार्थाकरिता वकीली केली, आर्यसमाजाचे ते एक आधारस्तंभ होते. दयानंद कालेजचें काम व अनाथालयाचीं व इतर कामें त्याच्याकडे होती, अनेक निधि त्यांना जमवावे लागत होते, वर्तमानपत्रांत लेखन, राष्ट्रीय सभेचें कार्य, औद्योगिक घडामोडी इत्यादि कार्यें त्यांनीं कुशलपणें पार पाडलीं या एकेका शाखेंत त्यांनीं केलेली कामगिरी इतकी भरदार आहे कीं सामान्य कार्यकर्त्याची तर छातीच दडपून जाईल. एकेका दुय्यम प्रताच्या पुढाऱ्यांच्या सर्व आयुष्यांत ज्या कामगिरीशी तिची तुलना करतां येईल. लालाजींच्या मोठेपणाची खरी कल्पना त्यांनीं या कालांत केलेल्या कामांवरून महज पटते. व त्यांच्या कीर्तिमंदिराचा मुख्य आधारही तोच होय. हा त्यांचा ग्रहस्थाश्रम म्हणतां येईल. ‘काय करावे हो, ही प्रपंचाची बेडी

पायांत पडली आहे ना! नाहीतर देशसेवा हातून व्हावी असें कां आम्हांल वाटत नाहीं? असें प्रपंचाचें रडगाणें गाणाऱ्या लोकांना लालाजींनीं या पंचवीस वर्षांच्या जीवनक्रमानें चोख उत्तर दिलें आहे. आजच्या कालांत देशपरिस्थितीकडे दुर्लक्ष करून, स्वदेशाच्या उद्धारार्थ कांहीं एक प्रयत्न न करतां जो गृहस्थाश्रम सर्वत्र पाळला जातो त्याला तें पवित्र नांव शोभत नाहीं असें त्यांनीं सिद्ध केलें व स्वतः खरा संसार करून दाखविला. त्यांनीं पित्याला संतुष्ट केलें, पत्नीला सुख दिलें, मुलांना देशकालानुसार जगामध्यें तेजस्वी व स्वावलंबी जीवन जगण्याला योग्य करून सोडणारें शिक्षण दिलें, आप्तमित्रांचा परामर्ष घेतला. हा वैयक्तिक संसार नेटका आचरून दाखवीत असतांनाच त्यांनीं देशाचा संसारही तितक्याच सुयोग्यपणें चालवून दाखविला. दीनदुर्बलांची सेवा केली, अज्ञानांना ज्ञान दिले, भमातेचे कष्ट दूर करण्यासाठीं तें अहोरात्र झटले व परकीय सत्तेशीं त्यांनीं झुंज घेतली.

तिसऱ्या विभागांत त्यांना बहुतकाळ स्वदेशाला पारखे होऊन परदेशांत वणवण करीत भटकत वानप्रस्थाश्रम करावा लागला. स्वतःचीं कामें स्वतः करावीं लागलीं. संसाराचीं बंधनें त्यांचीं या कालांत कायम असलीं तरी त्यांचा पाश न मानता ते मातृभूच्या मोक्षाकरितांच सारखे कष्टत होते. आपला प्रपंच त्यांनीं आपल्या सुविद्य व कर्तव्यदक्ष मुलांच्या गळ्यात सोपवून आपण नुसतें दुरून—खरोखरच दुरून—मार्गदर्शकाचें काम करीत असत. या कालांत त्यांनीं परदेशी जे प्रचाराचें वगैरे कार्य केलें तें गेल्या ७५ वर्षांत केवळ अपूर्व आहे.

चवथा विभाग १९२० ते १९२८. हा त्यांचा संन्यासाश्रम. या कालांत त्यांचा संसार पार विसरला गेला होता. सारा देश त्यांना आपलाच वाटूं लागला होता. आपलें सर्वस्व त्यांनीं या कालांत आपल्या देशाला अर्पण केलें. देशाचीच चिंता करण्यांत त्यांचे चावीसही तास वेळे जाऊं लागले. संन्याशाप्रमाणें त्यांनीं एक आश्रमही स्थापन केला. त्याला आधुनिक कालाला अनुसरून नांव दिलें 'लोकसेवक समिती.' तेथें लालाजींचा सर्व काळ देशहितचिंतनांत जाऊं लागला. ते खरे संन्यासी बनले. अखेरच्या

दिवसांत त्यांनीं मजुरांचे हितसंबंध अर्थात् मानवजातीवरील प्रेम व हिंदु संघटन म्हणजे संस्कृतिरक्षण अर्थात् परमात्मचिंतन. याकडेच सर्व लक्ष लावलें होतें. व त्यांना मृत्यूही वीरासारखा आला. ते मरून अमर झाले. सूर्यमंडळाला भेदून गेले. कारण ते समोरासमोर छातीवर घाव खाऊन धारातीर्थी मरण पावले होते व ते खरे खरे संन्यासी व परिव्राटही होते.

लालाजींचे हें जीवन आदर्शजीवन होय. आमची वर्णाश्रमपद्धती त्रिकालाबाधित आहे असेंच जणूं काय त्यांनीं सिद्ध केलें. कारण बदलत्या काळाला अनुसरून आदर्शजीवन जगून लालाजींनीं जुनी वर्णाश्रम व्यवस्था तंतोतंत पाळली. असें उदाहरण अर्वाचीन हिंदुस्थानांत फार विरळा व, लालाजींचें वैशिष्ट्य यांतच आहे. नव्या जुन्याचा सांधा त्यांनीं आपल्या आयुष्यांत कुशलतेनें घालून दाखविला. पूर्व पश्चिमेचा सांधा पक्का घालावयासाठीं त्यांनीं जन्मभर प्रयत्न केले व तोच दिव्य संदेश भारताच्या संतानांना देऊन लालाजी मोक्षाला गेले.

——:o:——

# शुद्धिपत्र.

—:o:—

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| प्रस्तावना पान २ | २५ | ग्रहणमुक्त | ग्रहणभुक्त |
| २ | ३ | पवत | पर्वत |
| ,, | २४ | लागला | लागलों |
| ५ | १८ | भारती | भारतीय |
| ६ | ११ | पडून | बुडून |
| ८ | १ | वळा | वेळीं |
| ,, | १४ | वशिष्ठयाचें | वैशिष्ठयाचें |
| ,, | १९ | राष्ट्रधर्म | पण त्यांचा राष्ट्रधर्म |
| ,, | २२ | या नांवानें | या नांवानें त्यांनीं |
| ९ | २८ | देशधार्य | देशभर प्रसृत |
| १२ | १३ | प्रभाव | प्रत्यय |
| ,, | ,, | आपला | आपल्याला |
| १५ | ६ | मताप्रमाणें | माताबद्दल |
| २२ | ९ | स्वालबंनाच्या | स्वावलंबनाच्या |
| ,, | ११ | स्वाभाविकपणेंच | लालाजींवरच |
| २६ | २६ | निशाणासाठीं | निशाणाखालीं |
| ३० | ११ | त्यांना | त्यांची |
| ३० | २९ | | ‘ १८९६ मध्यें ’ पासून वेगळा छेदक पाहिजे |
| ३१ | १५ | पुष्कळ | दुष्काळ |
| ३२ | २९ | दुसऱ्यांनीं | ते म्हणत कीं दुसऱ्यांनीं |
| ३५ | ३ | तटें | तट |
| ,, | २१ | नकशा | नक्षा |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | २३ | पहिले छट | पहिले प्रथम |
| ४६ | १२ | तरी | ती |
| ,, | २० | नांवावर | आपलया नांवावर |
| ४७ | १ व २ | या ओळी येथें नकोत | |
| ६२ | १५ | सधाणा | सुधारणा |
| ६३ | २ | पूर्णमौव | पूर्ण मौन |
| ६५ | ९ व १० | वराज्यांत | स्वराज्यांत |
| ६८ | २७ | आत्मबुद्धि | आत्मशुद्धि |
| ६९ | १९ | मुसलमानांना | मुसलमानांनीं |
| ७१ | २१ | सामन्यांतील | सामान्यांतील |
| ८३ | २५ | शब्दाची | राष्ट्राची |
| ९९ | ७ | सोळीं | सोवळीं |
| १०१ | ३ | दिव्य | दिव्य मरण |
| १०२ | १२ | देश भार्षेत | देश भार्षेत आहे |
| १०८ | १८ | परंतु उत्तर सर्व | परंतु उत्तर कालांत सर्व |
| ११० | ५ | मुक्त | युक्त |
| ११३ | २८ | आर्शेत | आज्ञेंत |
| ११६ | १० | मोल | मोलें |
| १२२ | २९ | प्रत्येकालो | प्रत्येकाला |
| १२३ | १२ | भय | भेद |
| १३३ | २६ | वृद्धांनीं | वृद्धांची |
| १३४ | २३ | दर | दूर |
| १३६ | २६ | आयुष्यांत ज्या | आयुष्यांतल्या |

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३८५